यशवंतराव
चव्हाण
महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगा घरोघरी

HIS 310

आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास



मुखपृष्ठ : अविनाश भरणे /AA-03-352

# २. महाराष्ट्रातील सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधन

यशवंतराव
चव्हाण
महाराष्ट्र
ज्ञानगंगा घरोघरी मुक्त विद्यापीठ

HIS 310

आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास

पुस्तक दुसरे

# महाराष्ट्रातील सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधन

लेखक : प्रा. डॉ. प्रकाशचंद्र व्यास


| | |
|---|---|
| घटक १ : धार्मिक प्रबोधन | १ |
| घटक २ : सुधारणावादी चळवळी | २० |
| घटक ३ : कामगार चळवळी | ४० |
| घटक ४ : सांस्कृतिक परिवर्तने | ५३ |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## कुलगुरू : डॉ. राजन वेळूकर

## मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा परिषद

डॉ. रमेश वरखेडे (अध्यक्ष)
संचालक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

डॉ. पंडित पलांडे
संचालक
वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

डॉ. नारायण चौधरी
प्रपाठक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

डॉ. नरेंद्र बोखारे
समाजशास्त्र विभाग
पुणे विद्यापीठ
पुणे

डॉ. उमेश राजदेरकर
वरिष्ठ अधिव्याख्याता
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

श्रीमती शिवरंजनी पांडे
अधिव्याख्याती
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

डॉ. शरणकुमार लिंबाळे
प्रपाठक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

डॉ. सुरेश पाटील
अधिव्याख्याता
विद्यार्थी मूल्यामापन तंत्रज्ञान केंद्र
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

श्री. नामदेवराव शिंदे
सहायक संचालक
विभागीय व अभ्यासकेंद्र व्यवस्थापन केंद्र
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

श्री. विजयकुमार पाईकराव
अधिव्याख्याता
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

प्रा. यशवंत कळमकर
२४१०, सोनगीर वाडी
वाई ४१२ ८०३

प्रा. हिंदुराव वायदंडे
सहायक ग्रंथापाल, आय.आय.टी
मुंबई

श्री. महेश म्हात्रे
संपादक, नागपूर तरुण भारत
नागपूर

प्रा. शैलेंद्र देवळणकर
१५, रुक्मिणी अपार्टमेंट
चेतनानगर, औरंगाबाद

डॉ. सरल धारणकर
१२, ओमकार, पाटील लेन ३
कॉलेज रोड, नाशिक

## राज्यस्तरीय अभ्यासक्रम समिती

डॉ. हरिभाऊ अ. फडके
(सेवानिवृत्त प्राध्यापक,
कुरूक्षेत्र विद्यापीठ)
'अंकूर', प्लॅट नं.२, बिल्डींग नं.३
नरसिंहनगर, नाशिक

डॉ. सुहास राजदेरकर
इतिहास विभाग प्रमुख
बिटको कॉलेज, नाशिकरोड

डॉ. राजा दीक्षित
इतिहास विभाग
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड
पुणे

प्रा. डॉ. सौ. सरल धारणकर
१२, ओमकार, पाटील लेन नं.३
कॉलेज रोड, नाशिक

डॉ. ना.गो. [illegible]वरे
पद्मपाणी, प्लॉट नं.१८
बिल्डर्स सोसायटी, नंदनवन कॉलनी
औरंगाबाद

प्रा. आर. एस. गायधनी
(सेवानिवृत्त इतिहास विभाग प्रमुख)
स.प.महाविद्यालय, पुणे)
३०, मॉडेल कॉलनी, कॉलेज रोड,
नाशिक

प्रा. उमेश बगाडे
इतिहास विभाग, डॉ. बाबासाहेब
आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद

डॉ. प्रभाकर देव
रघुकुल, ६२-अ, गणेशनगर, नांदेड

प्रा. डॉ. आर. एस. मोरवंचीकर
(सेवानिवृत्त विभाग प्रमुख,
सेंटर फॉर टुरिझ ॲडमिनिस्ट्रेशन
औरंगाबाद)
१६, संभाजी नगर, पहाडसिंगपुरा
मकबऱ्याच्या मागे, औरंगाबाद

प्रा. डॉ. शांता कोठेकर
इतिहास विभाग,
नागपूर विद्यापीठ, नागपूर

प्रा. डॉ. ज. वि. नाईक
(सेवानिवृत्त इतिहास विभाग प्रमुख
मुंबई विद्यापीठ)
१२/२६८, स्वरगंगा, चैतन्यनगर
वाकोला ब्रिजजवळ, सांताक्रूझ
(पश्चिम), मुंबई

डॉ. अरूण भोसले
इतिहास विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



## लेखक

प्रा. डॉ. प्रकाशचंद्र व्यास
'अभीप्सा' आंतरभारती वसाहत
औराद शहाजानी, ता. निलंगा,
लातूर - ४१३ ५२२

## अभ्यासक्रम संयोजक

डॉ. उमेश राजदेरकर
वरिष्ठ अधिव्याख्याता
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

## संपादक

प्रा. रं. ना. गायधनी
३०, मॉडेल कॉलनी
कॉलेज रोड
नाशिक-४२२ ००५



## निर्मिती

श्री. आनंद यादव
व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

*(First edition developed under DEC development grant)*



© २००४, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक



❑ प्रथम प्रकाशन : ऑगस्ट २००४
❑ प्रकाशन क्रमांक : १२३०
❑ अक्षरजुळणी : पाध्ये असोसिएट, नाशिक
❑ पुनर्मुद्रण : जुलै ०५, जून ०६, एप्रिल ०७, डिसें. ०८, फेब्रु. ०९
❑ मुद्रक : श्री. सुनील देशपांडे, मे. आर्ट अँड प्रिंट, ई-२६, ॲडिशनल एम.आय.डी.सी., अंबड, नाशिक - ४२२ ०१०
❑ प्रकाशक : डॉ. राजेन्द्र वडनेरे, प्रभारी कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक - ४२२ २२२

ISBN 81-8055-086-9

(HIS 310-2)

# आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास (HIS 310)

## अभ्यासक्रम

**पुस्तक १ : ब्रिटिश वसाहतवाद आणि महाराष्ट्र**

घटक १ : ईस्ट इंडिया कंपनीची महाराष्ट्रातील वाटचाल (१६०० ते १८५८)
घटक २ : १८५७ च्या लढ्यातील महाराष्ट्राचे योगदान
घटक ३ : इंग्रजी अमदानीतील आर्थिक धोरण
घटक ४ : संस्थानिकांच्या प्रभावाखालील महाराष्ट्र

**पुस्तक २ : महाराष्ट्रातील सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधन**

घटक १ : धार्मिक प्रबोधन
घटक २ : सुधारणावादी चळवळी
घटक ३ : कामगार चळवळी
घटक ४ : सांस्कृतिक परिवर्तने

**पुस्तक ३ : राष्ट्रीय आंदोलनातील सहभाग**

घटक १ : इंग्रजी अमदानीविरुद्ध उठाव (१८४०-१९१०)
घटक २ : लोकमान्य टिळक
घटक ३ : महात्मा गांधी
घटक ४ : संस्थानातील आंदोलने

पुस्तक दुसरे

# महाराष्ट्रातील सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधन

## प्रास्ताविक

बी.ए. तृतीय वर्षाच्या इतिहास विषयाच्या विशेष स्तरावरील अभ्यासक्रमांपैकी 'आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनांचा इतिहास' (HIS 310) या अभ्यासक्रमातील हे दुसरे पुस्तक आहे. यात महाराष्ट्रातील सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधन आपण अभ्यासणार आहोत.

आधुनिक भारताच्या इतिहासाप्रमाणे महाराष्ट्रालाही राजकीय संघर्ष व स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास आहे. सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधन क्षेत्रातील इतिहास आहे. आधुनिक महाराष्ट्रातील आरंभिक जडणघडण होण्यास जबाबदार घटक म्हणून 'ब्रिटिश वसाहतवाद आणि महाराष्ट्र' या विषयीच्या इतिहासाचा आढावा पहिल्या पुस्तकात आला आहे. तसेच या दुसऱ्या पुस्तकात आपण 'महाराष्ट्रातील सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधन' अभ्यासणार आहोत. यानंतरच्या तिसऱ्या पुस्तकात राजकीय जडणघडणीत 'राष्ट्रीय आंदोलनात महाराष्ट्राचा इतिहास' याचा आपण अभ्यास करणार आहोत.

प्रस्तुतच्या दुसऱ्या पुस्तकात महाराष्ट्रातील सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधनाच्या अनुषंगाने चार घटकांतून इतिहास रेखाटन आहे. हे चार घटक पुढीलप्रमाणे आहेत - (१) धार्मिक प्रबोधन (२) सुधारणावादी चळवळी (३) कामगार चळवळी (४) सांस्कृतिक परिवर्तने. या तीन पुस्तकांतून सलगपणे महाराष्ट्राचा इतिहास व सामाजिक सांस्कृतिक प्रबोधनाचे समग्र स्वरूप साकार होईल.

प्रादेशिक इतिहास हा राष्ट्रीय इतिहासाचा महत्त्वाचा भाग आहे. अशा विविध प्रादेशिक अंगातूनच भारताचा राष्ट्रीय स्वरूपाचा समग्र इतिहास साकार केला पाहिजे. म्हणून भारतीय स्वातंत्र्य आंदोलन समजून घेण्यास महाराष्ट्रातील परिवर्तनाचा वेगळा आढावा घेऊन भारतीय संदर्भात त्याची मांडणी केली आहे.

महाराष्ट्रातील सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधन समजून घेण्यासाठी धर्म क्षेत्रातील प्रबोधन, विविध सामाजिक व धार्मिक चळवळी, कामगार चळवळी, कला, शिल्प, संगीत क्षेत्रातील परिवर्तने केव्हा व कशी झाली, कशी रुजली याचे आकलन होण्याच्या दृष्टीने प्रस्तुत पुस्तक लिहिले आहे. या विषयाचा आवाका फार मोठा आहे. येथे पुस्तकाची मर्यादा लक्षात ठेवून समग्र धावता आढावा व आवश्यक तेथे विस्तारपूर्वक लेखन केले आहे.

प्रबोधन हा शब्द सत्त्वशोध व जागृतीचा परिचायक आहे. एकदा आत्मचिंतनाची दिशा लाभली म्हणजे तर्क-बुद्धीवर घासून पाहिले की ग्रंथप्रामाण्य नाकारण्याची क्षमता येते. यातून नवीन समाजनिर्मितीची ऊर्जा जन्म घेते. या दृष्टीने प्रबोधनामुळे बुरसटलेले विचार, मागासलेपण:, समाजातील दोष नष्ट होऊन समाज पुन्हा गतिमान होतो. जागतिक इतिहास लक्षात घेतला तर प्रबोधन व पुनरुज्जीवन पंधराव्या शतकात सुरू झाले. त्याहून भारतातील व महाराष्ट्रातील प्रबोधन फार उशिरा म्हणजे एकोणिसाव्या शतकात सुरू झाले. त्यामुळे इतिहासातून आधुनिक काळाच्या पाऊलखुणा दिसू लागतात. कातावलेल्या सापाने कात टाकावी व पुन्हा चैतन्यमय व्हावे तसे ब्रिटिश राजवटीच्या परकीय जोखडाखाली महाराष्ट्रात राजकीय, सामाजिक धार्मिक जीवनाची अवरुद्ध झालेली गती महाराष्ट्राने पुन्हा प्राप्त केली. मात्र या संजीवनीचा आरंभ ब्रिटिश कालखंडातील शिक्षण व आधुनिक पाश्चात्त्य विचारसरणी, राज्य प्रणाली, वैज्ञानिक दृष्टिकोन, इंग्रजी भाषेतील विद्वानांचे जागतिक कीर्तीचे व नवी दृष्टी देणारे साहित्य यांच्यामुळे झाला.

या पुस्तकातील घटक १ मध्ये 'धार्मिक प्रबोधन' अंतर्गत महाराष्ट्रातील (भारतासह) प्रबोधन व सुधारणा चळवळीचा अर्थ, उदय कसा झाला हे सांगितले आहे. धर्मसुधारणा चळवळींचे प्रकार, प्रारंभीचे ख्रिश्चन मिशनरींचे प्रयत्न व परिणाम मांडले आहेत. त्यांच्या कार्यातून महाराष्ट्रात जागृती झाली. एक प्रतिक्रिया जन्मली. प्रबोधनाच्या पाऊलखुणा, कारणे, सुधारणावादी विचारसरणी यांचीही ओळख करून दिली आहे. या प्रबोधनकार्यात लोकहितवादी विष्णुबुवा ब्रह्मचारींपासून अनेक सुधारकांचे व समाजाचे कार्य आणि योगदान मांडले आहे. आत्मीय सभा, प्रार्थना समाज, आर्य समाज, रामकृष्ण मिशन, सत्यशोधक समाज, थिऑसाफी, इत्यादींचा महत्त्वाचा वाटा राहिला आहे. त्यांच्या संस्थापक व सदस्यांचे अमूल्य योगदान आहे. यामुळे धार्मिक चळवळीला लाभलेले स्वरूप व परिवर्तन समजून घेण्यास मदत होईल.

घटक २ मध्ये 'सुधारणावादी चळवळी' यात ब्रिटिश कालखंडात एकोणिसाव्या शतकापूर्वीचे, एकोणिसाव्या शतकारंभीचे सामाजिक जीवन, त्याचा महाराष्ट्रावर उमटलेला प्रभाव स्पष्ट केला आहे. या पार्श्वभूमीवर ब्रिटिशांनी केलेल्या सुधारणा व ख्रिश्चन मिशनरींचे कार्य स्पष्ट केले आहे. महाराष्ट्रातील आद्यसुधारक चळवळी, महिला चळवळ, शैक्षणिक चळवळ, ब्राह्मणेतर चळवळ, दलित चळवळ, आदिवासी चळवळ, विद्यार्थी, शेतकरी चळवळ, अविद्यार्थी संघटनांचे प्रयत्नही दिले आहेत. यामुळे या चळवळींचे अधिष्ठान, उद्दिष्टे, स्वरूप, कार्य, भूमिका, इत्यादी समजून घेता येईल.

घटक ३ मध्ये 'कामगार चळवळी' अंतर्गत कामगार चळवळींचा आधुनिक काळातील जागतिक स्तरावरील उदय भारतीय पार्श्वभूमीला अनुलक्षून मांडला आहे. या आधारे महाराष्ट्रातील व पर्यायाने भारतीय चळवळीत नारायण मेघाजी लोखंडे यांचे कार्य व इतरांचे प्रयत्न समजून घेणे गरजेचे आहे. म्हणून त्याचा ऐतिहासिक आढावा घेतला आहे. सोबत त्याचे वैधानिक स्वरूप व महत्त्व स्पष्ट केले आहे. या चळवळीच्या वीसाव्या शतकातील वाटचालीत ना. म. जोशी, श्रीपाद डांगे, शेतकरी कामगार पक्ष, शेतकरी संघटना व नेते, इत्यादींचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. या चळवळीत अनेक अडसर निर्माण झाले आहेत. त्यांचा निर्देश करून त्यांना दूर सारण्याचे उपाय सुचविले आहेत. सोबत कामगार चळवळीमुळे निर्मित झालेले कामगार कायदे व कल्याणाची भूमिका ही वर्णनाच्या ओघात मांडली आहे. हा धावता आढावा आहे.

घटक ४ मध्ये महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासातील 'सांस्कृतिक परिवर्तने' अभ्यासावयाची आहेत. म्हणून सांस्कृतिक अभ्यासाचे घटक, सांस्कृतिक पुनरुत्थानकालीन साहित्य विकास, मराठीचे साहित्य व संशोधन, ललित साहित्य, नाटक, कादंबरी, लघुकथा, कथा, इत्यादींची माहिती दिली आहे. महाराष्ट्राचे कलाक्षेत्रातील योगदान महत्वाचे आहे. संगीत, गायन, नाटक, कीर्तन, चित्रकला, रंगभूमी, इत्यादी विविध क्षेत्रांतही महाराष्ट्रातील महत्त्वाच्या ऐतिहासिक नोंदी मिळतात. चित्रकला, शिल्पकला, गायन या क्षेत्रात महाराष्ट्रीय कलावंतांनी राष्ट्रीय सीमा ओलांडून आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी मिळविली आहे.

सारांश, ही विविधांगी परिवर्तने व त्यांच्या घडण्यात ज्यांनी जीवन खर्ची घातले, त्यासाठी आजन्म तपश्चर्या केली. अशा साहित्यिक व कलाकारांचा प्रबोधनातील वाटा काय होता याची या पुस्तकात ओळख करून दिली आहे.

या संपूर्ण परिवर्तनातून महाराष्ट्राचा आधुनिक चेहरामोहरा निर्मित झाला व इतिहासाला वेगळे वळण लाभले आहे. म्हणून या व्यापक व विविधांगी इतिहासाला या पुस्तकाच्या मर्यादेत समजून घेण्यासाठी हा लेखन प्रपंच होय.

# घटक १ : धार्मिक प्रबोधन

*अनुक्रमणिका*


१.० उद्दिष्टे
१.१ प्रास्ताविक
१.२ विषय-विवेचन
१.२.१ धर्मसुधारणा : अर्थ व प्रकार
१.२.२ महाराष्ट्रातील धर्मप्रबोधनाची कारणे
१.२.३ धार्मिक प्रबोधनाच्या पाऊलखुणा
१.२.४ लोकहितवादी व धर्मप्रबोधन
१.२.५ विबिध समाजांचे धर्मप्रबोधन कार्य
१.२.६ विष्णुबुवा ब्रह्मचारी यांचे जागृती कार्य (१८२९-१८७१)
१.२.७ धर्मप्रबोधन : काही संदर्भ
१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
१.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
१.५ सारांश
१.६ सरावासाठी स्वाध्याय
१.७ क्षेत्रीय्र कार्य
१.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

★ धर्मसुधारणेचा अर्थ स्पष्ट करता येईल.

★ भारतात ईस्ट इंडिया कंपनीने व्यापार प्रसाराबरोबरच ख्रिस्ती धर्मप्रसार कसा घडवून आणला ते स्पष्ट करता येईल.

★ महाराष्ट्रातील धर्मप्रबोधनाची कारणे स्पष्ट करता येतील.

★ आचार्य बाळशास्त्री जांभेकरांचे धर्मसुधारणेसंबंधीचे कार्य विशद करता येईल.

★ धर्मसुधारणेच्या संदर्भात परमहंस सभेचे कार्य स्पष्ट करता येईल.

★ लोकहितवादींचे धर्मप्रबोधनाबाबतचे कार्य स्पष्ट करता येईल.

★ ब्राह्मो समाजाचे धर्मप्रबोधन क्षेत्रातील कार्य स्पष्ट करता येईल.

★ प्रार्थना समाजाचे धर्मप्रबोधन क्षेत्रातील कार्य स्पष्ट करता येईल.

★ महात्मा जोतीबा फुले यांच्या सत्यशोधक समाजाचे समाज परिवर्तनाच्या चळवळीतील योगदान स्पष्ट करता येईल.

★ आर्य समाजाचे धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रातील कार्य विशद करता येईल.

★ रामकृष्ण मिशनचे आणि स्वामी विवेकानंदाचे धार्मिक क्षेत्रातील प्रबोधन स्पष्ट करता येईल.

★ विष्णुबुवा ब्रह्मचारी यांनी केलेलें जागृतीचे कार्य विशद करता येईल.

★ लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, विनोबा भावे, सानेगुरुजी यांनी धर्मक्षेत्रात केलेले कार्य, सुधारणा स्पष्ट करता येतील.

## १.१ प्रास्ताविक

महाराष्ट्रात सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधन कसे झाले व त्यामुळे महाराष्ट्राचा चेहरामोहरा कसा बदलला याचा परिचय आपण या घटकात करून घेणार आहोत. १९ व्या शतकात महाराष्ट्रातील सामाजिक, आर्थिक, राजकीय तसेच सांस्कृतिक जीवनात एक नवीन कालखंड, नवे युग, नवे चैतन्य उदयाला आले. राजकीय जीवनातील अनास्था, अराजक व अशांतता आता संपण्याच्या मार्गावर होती. इंग्रजी राजवटीने केलेल्या नियंत्रणामुळे सुव्यवस्थितपणा व योजनाबद्धपणा येऊ लागला. कार्यक्षम आधुनिक शासनपद्धतीचा पायंडा पडला. रूढिग्रस्तता, अंधश्रद्धा, ग्रंथप्रामाण्य, इत्यादी बाबींतून वेगळे होण्याची नवी दृष्टी देणारा प्रकाश, नव्या शिक्षणासोबत विस्तारत होता. सामाजिक समतारूपी परिसाचा स्पर्श होऊन आणि आत्मपरीक्षण करून आचार-विचार आणि उच्चार यांत बदल होऊ लागले. आत्मवैभव, आत्मचिंतन, स्वाभिमान यांबरोबरच गत आर्थिक व सांस्कृतिक वैभवाचा शोध सुरू झाला.

समाजाचे सदोष स्वरूप, जातिव्यंवस्था व तिचे वाईट परिणाम ज्येष्ठ-कनिष्ठता, धर्मातील बुरसटलेले विचार यांतून झालेल्या मंथनातून स्वतंत्र मौलिक दृष्टिकोन आकार घेऊ लागला. धर्म, शिक्षण, संस्कृती, ज्ञान व शासन परंपरा यांमुळे पाश्चात्त्यांचे वेगळेपण जसे कुतूहल वाढवत होते तसे ते आत्मशोध व चिंतनांचे संकेतही देत होते. त्यांचे प्रगत भौतिक जीवन, विद्या व बुद्धिप्रामाण्यवादी दृष्टी, स्वातंत्र्य, प्रेम व वैज्ञानिक दृष्टिकोन, आधुनिकतेच्या पार्श्वभूमीवर आमची धर्मनिष्ठा, अंधतेने चालणारे

समाजजीवन, संस्कृतीचे चांगुलपण विसरून जीवनातील बुरसटलेले विचार कवटाळणारी वृत्ती यात अंतर होते. ब्रिटिश व युरोपियनांच्या सोबत राहून बुरसटलेल्या विचारांना त्यागण्याची तीव्रता, ग्रंथप्रामाण्याचा फोलपणा ओळखून बुद्धिप्रामाण्याची ओढ, स्वत्व, स्वाभिमान, स्वातंत्र्याची जोपासना, स्वधर्माचे दोष दूर करण्याची तयारी व गरज अशा शुभ संकेतांचा वारसा देणारे १९ वे शतक भारताप्रमाणे महाराष्ट्रातील जीवनात प्रबोधन व त्याची दिशा स्थिर करणारे ठरले.

## १.२ विषय-विवेचन

### १.२.१ धर्मसुधारणा : अर्थ व प्रकार

*लॉर्ड पॉमर्स्टनने* ब्रिटिश संसदेत केलेले पुढील वक्तव्य खूपच बोलके आहे - 'खरोखरच ही बाब लक्षणीय आहे. असे मानतात की, ज्या प्रदेशात पहिल्यांदा शास्त्र व कला यांचा उदय झाला तो प्रदेश एका बेटावर (इंग्लंड) राहणाऱ्या लोकांच्या ताब्यात आला आहे. पूर्वेकडील ही संस्कृती एके काळी खूप भरभराटीस आली होती व तीच संस्कृती आज रानटी अवस्थेत पोहोचली आहे. या पार्श्वभूमीवर इंग्रजांनी भारतावर आपली सत्ता रुजवली. यानंतरच पुनरुज्जीवनास सुरुवात झाली. सत्य, न्याय व प्रेम या त्रयींवरच सामाजिक व धार्मिक सुधारणांचा पाया उभारला गेला. या सुधारणांचे अग्रणी ठरले राजा राममोहन रॉय. त्यांना भारतीय परंपरेत 'पहिली आधुनिक व्यक्ती' असे म्हटले जाते. १९व्या शतकात रॉय यांचे विचार देशभर पसरले. १९ वे शतक धार्मिक व सामाजिक सुधारणांचे शतक ठरले'.

सामाजिक-धार्मिक चळवळ (Socio-Religious Movements) यातील एक शब्द सामाजिक (Socio) असून या शब्दामध्ये समाजाची पुनर्रचना असा अर्थ अभिप्रेत आहे. ही सामाजिक पुनर्रचना सामाजिक वर्तणूक, चालीरीती, समाजरचना व समाज नियंत्रण यांवर अवलंबून असते. 'धार्मिक' (Religious) या शब्दाचा अर्थ समाजामध्ये पुनर्रचना असा अभिप्रेत आहे. ही सामाजिक पुनर्रचना सामाजिक वर्तणूक, चालीरीती, समाजरचना व समाज नियंत्रण यांवर अवलंबून असते.

धार्मिक या शब्दाचा अर्थ समाजामध्ये ज्या प्रकारची वैचारिक परंपरा असते व जिला कायदेशीर स्वरूप प्राप्त झालेले असते आणि जिचा प्रभाव समाजाच्या प्रगतीवर होत असतो, अशा पद्धतीला धार्मिक पद्धत किंवा धर्म म्हणतात.

धर्म हे संस्कृतीचे श्रेष्ठ अंग होय. प्राचीन ऋषी-मुनींनी या देशात जीवन जगण्यासाठी चाकोरी तयार केली. 'धारयति इति धर्मः' या धर्म स्वरूपात ईश्वर स्वरूप, ईश्वर भक्ती, मानवतेचे प्रेम, सत्य व न्याय, दया, क्षमा, शांती, त्याग, परोपकार, समाजसेवा, स्वत्व, स्वाभिमान, प्रवृत्तिवाद, वैभवाच्या, अभ्युदयाच्या, स्वराज्य-साम्राज्याच्या आकांक्षा, निर्लोभ वृत्ती, निर्मळ विशुद्ध जीवन, औदार्य अपेक्षित आहे असे मत डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी 'महाराष्ट्र संस्कृती' या ग्रंथात व्यक्त केले आहे.

*श्री सहस्रबुद्धे* पुढे म्हणतात, ''पण मराठेशाहीचा अंत होऊन पाश्चात्त्य विद्येचा प्रसार येथे होताच धर्माचा खरा अर्थ इथल्या नेत्यांना अत्यंत अल्पावधीत कळू लागला. प्रथम बंगालमध्ये आणि मग महाराष्ट्रात धर्मसुधारणेची चळवळ सुरू झाली. १८४८ साली लोकहितवादी यांनी 'प्रभाकर' पत्रात जी 'शतपत्रे' लिहिली त्यात धर्मसुधारणेची, खऱ्या धर्माची सर्व तत्त्वे सांगितली आहेत. त्याही अगोदर बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग यांनी धर्मसुधारणेची चळवळ सुरू केली होती''.

*प्रो. कोनिथ जोन्स* यांच्या मते, 'एखाद्या प्रभावी व्यक्तीमुळे किंवा त्याच्या विचारसरणीमुळे भारावलेले लोक जेव्हा एकत्र येऊन आपल्या गुरूचा संदेश सर्वत्र प्रसारित करण्यासाठी जे सामुदायिक प्रयत्न करतात त्याला चळवळ (Movement) म्हणतात. यात संघटन असते. चळवळ कधी संस्थापकानंतर भक्कम चौकटीचे स्वरूप ठेवून असते तर कधी तशी स्थिती नसेल तर संस्थापकासोबत संपून अल्पजीवी ठरू शकते. अर्थात, अशा धार्मिक व सामाजिक चळवळीतूनच समाजवर्तनाला एक वेगळे वळण लागते'.

सुधारणांचा आढावा घेऊन प्रो. जोन्सने १९ व्या शतकातील भारतासंबंधी सुधारणांचे दोन प्रकार सांगितले आहेत. (१) संक्रमणावस्थेतील सुधारणा व (२) दुसऱ्या संस्कृतीतून स्वीकारलेल्या सुधारणा या प्रकारांत एकमेकांवर सांस्कृतिक प्रभाव दिसून येतो. आपण १९व्या शतकात घडलेल्या सुधारणा अभ्यासणार आहोत. भारतातील या सुधारणा दुसऱ्या सदरात मोडतात. सुधारणांमागे विशिष्ट तात्त्विक अथवा वैचारिक संघर्ष असतो. *प्रो. जोन्स* यांच्या मते, 'छपाईकलेचा विकास होऊन संघर्षात्मक साहित्य उपलब्ध होते. परस्परविरोधी वैचारिक साहित्य निर्माण होते'.

(२) धर्मग्रंथांची निरनिराळ्या भाषांतून भाषांतरे होऊन वाद उत्पन्न होतात.

(३) साक्षरता वाढते, ज्ञानाचा स्वाभाविक प्रसार होतो व त्यातून वैचारिक संघर्ष जन्मतात. भारतात इ.स. १८५० ते १९१९ पर्यंत झालेल्या चळवळीने कधी ब्रिटिश संस्कृतीशी समावेशन तर कधी स्वत्व जोपासणारे सांस्कृतिक स्वरूप टिकवून धरले. कोणत्याही प्रकारच्या सामाजिक व धार्मिक चळवळीचा पाया हा तत्कालीन अनिष्ट परंपरेच्या निषेधावर व तीव्र मतभेदांवर आधारित असतो. उदाहरणार्थ, युरोपातील रोमन कॅथॉलिक धर्माविरुद्ध मार्टिन ल्यूथरच्या नेतृत्वाखाली लढा अशा मतभिन्नतेचे तीन स्तर आढळतात. (१) युरोपीय प्रभावाचा केलेला निषेध (२) पर्शियन अरेबिक विचारसरणीशी असलेला तीव्र मतभेद (३) ब्रिटिश सत्ता स्थापनेनंतर भारतीयांनी त्याचा अनेक स्तरांवर निषेध केला व तीव्र मतभेद निर्माण झाले.

## ख्रिश्चन मिशनरींचे कार्य व परिस्थिती

भारतात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने व्यापारासोबत हळूहळू सत्तासंपादन केली. बंगाल व त्यानंतर इतरत्र या सत्तेसोबत गुप्त ख्रिस्ती धर्मप्रसार सुरू ठेवला. अठराव्या शतकात धर्मगुरूंनी वैयक्तिक स्वरूपात हे प्रयत्न केले. बंगाली शिकले. धर्मग्रंथ भाषांतरित केले. पण त्यांना कंपनीचा उघड पाठिंबा नव्हता. १८०७ मध्ये हा धर्मप्रसार डॉ. टेलरने एकमेव कार्य म्हणून करण्याचा प्रयत्न मुंबईत केला. पण गव्हर्नरने त्याला वास्तव्य करण्यासच नकार दिला. तो सुरतेत स्थिरावला. जॅडसन, हॉल व नॉट या तीन अमेरिकी मिशनऱ्यांनी १८१२ मध्ये प्रयत्न केला. पण त्यांना बंगालकडे हाकलण्यात आले. परंतु जॅडसन ब्रह्मदेशात तर हॉल व नॉट बंगालनंतर मुंबईतच राहिले. गव्हर्नर सर एव्हिन नेपियनने परवानगी दिली. १८१३ मध्ये नवा कायदा होऊन भारतात धर्मप्रसाराला परवानगी मिळाली. त्यामुळे मोठ्या प्रमाणात मिशनरी घुसले. अनेक स्थळी प्रेसबिटिरियन चर्चेस, ख्रिश्चन मिशन्स जमल्या. 'मिशनरी चर्च सोसायटी', 'सोसायटी फॉर द प्रोपागेशन ऑफ ख्रिश्चन नॉलेज', 'दि अँग्लीकन चर्च सोसायटी फॉर द प्रोटेक्शन ऑफ ख्रिश्चन रिबेर्टी', 'दि सालवेशन आर्मी', 'दि लंडन मिशनरी सोसायटी', 'दि बॅप्टिस्ट मिशनरी सोसायटी', 'दि मेथॉडिस्ट अँड स्कॉटिश मिशनरी सोसायटी' यांसारख्या देशभर कार्य करणाऱ्या मिशनरींना ऊत आला. १८१८ ला मराठी सत्ता संपली. एलफिन्स्टनने मोठ्या धूर्तपणे महाराष्ट्रावर सत्ता आणली पण धर्मप्रसारकांना बाजूला ठेवले. बुद्धिप्रामाण्य, तारतम्य व व्यवहारवादी तत्त्वावर उभा असलेला ख्रिश्चन धर्म भारतीयांना आवडेल तेव्हा ते स्वीकारतील. तो त्यांच्यावर लादणे योग्य नाही असे एलफिन्स्टन व जेम्स मिलचे म्हणणे होते. बिशप हेवरही घाई करून इच्छित नव्हता. म्हणून पुण्यात धर्मप्रसार झाला नाही. १८२० पासून कोकणपट्टीकडे प्रयत्न करणारी चर्च मिशनरी सोसायटी होती. १८२२ मध्ये स्कॉटिश मिशनरी सोसायटीकडून डोनाल्ड मिचेल आला. त्यानंतर रॉबर्ट नेस्मीट, रेव्ह. जॉन विल्सन, रेव्ह. मरे मिचेल आले व त्यांनी महाराष्ट्रात धर्मप्रसार केला. हर्णे, बाणकोट येथे बायबलवर मराठी प्रवचने दिली जात. मराठी शिकून ते मराठी माणसाला धर्म सांगू लागले. १८११ मध्ये कलकत्त्याजवळ सेरामपूर येथे डॉ. विल्यम कॅरेने संपूर्ण बायबल मराठीत भाषांतरित केले. १८०८ मध्ये डॉ. रॉबर्ट ट्रमंड ने मराठी व्याकरण व शब्दकोश प्रसिद्ध केला होता. १८१३ व १८१५ पासून तीव्र गतीने हिंदूंना बाटवून ख्रिश्चन करण्यात आले. ५० वर्षे ही गती टिकली. खेतवाडी व गिरगावला मराठी शाळा सुरू केल्या. गार्डन हॉल मिशनरीने प्रभाव वाढवला. १८२४ मध्ये मुंबईत मिशनरी मुलींची शाळा सुरू झाली. ४०० मुली शिकू लागल्या. पुढे स्कॉटिश मिशनरी, ऑक्झीलरीने मिळून ६५ शाळांतून २७०० विद्यार्थी (इ.स. १८२७) शिक्षणाकडे वळवले. कोकणात शाळा काढल्या. बायबलचे अध्यापन केले. ते विद्यार्थ्यांना धार्मिक साहित्य मोफत देत.

मुंबई इलाख्यात रेव्ह. विल्सन जॉन व पत्नी मार्गारिटने स्त्री-शिक्षणावर भर दिला. मराठी मिशन व चर्च मिशन सोसायटीच्या मुलींच्या शाळा वाढल्या. पारशी, गुजराती, मराठीतून शिक्षण दिले. ही संख्या १८२६-२७ मध्ये ३०० तर १८४९-५० मध्ये २००० झाली. त्याने १८३२ पासून इंग्रजी शाळाही सुरू केली. या 'अंब्रोळी इंग्लिश स्कूल' मध्ये ४१५ हिंदू १३ पारशी विद्यार्थी होते. १८३५ मध्ये 'सेंट्रल कॉलेज' आणि १८३६ मध्ये अनाथ, अपंग मुलींची शाळा सुरू झाली. १८२३ मध्ये स्कॉटिश मिशनरीचे पहिले धर्मांतर , १८२९ साली बाणकोटच्या रामचंद्र या ब्राह्मणाचे दुसरे धर्मांतर व मुंबईत नारायण शेणवीचे तिसरे धर्मांतर घडून आले. १८३१ मध्ये विल्सनने ५ जणांना बाप्तिस्मा दिला. १८३६ ला काही मुलींना पुन्हा बाप्तिस्मा दिला. १८६१ मध्ये 'सेंट्रल कॉलेज' चे नाव 'विल्सन कॉलेज' झाले. यामागे हळूहळू धर्मांतराची प्रखर भूमिका जाणवते.

वरिष्ठ जातीतील व शिकणारे हिंदू अपेक्षेप्रमाणे मोठ्या संख्येने ख्रिश्चन झाले नाहीत. भारतातील ब्रिटिश साम्राज्य हिंदूंच्या जातिव्यवस्थेवर उभे आहे. ख्रिश्चन धर्म समतेवर उभा आहे. विचारवंतांना वाटत होते की, या धर्मप्रसारामुळे समता प्रसारित करून सामाजिक समता आणता येईल. परंतु साम्राज्य टिकणार नाही ही शंका होती. १८५० मध्ये मद्रास येथे मिशनरींची सभा होऊन पुढील निर्णय झाले.

(१) भारतात जातिभेद घट्ट पायावर उभा आहे.

(२) बाप्तिस्माच्या वेळी ख्रिस्ती होणारे लोक पूर्वीची जात ठेवावी म्हणतात.

(३) ख्रिस्ती धर्म येऊन ही जात दुबळी न होता प्रभावी झाली आहे. कारण हिंदू समाजातच त्यांना फक्त प्रतिष्ठा नसून त्यासोबत हिंदू धर्मात त्या मूळ स्वरूपाशी एकरूप दिसतात. धर्मप्रसार नाकारू इच्छिणारा सर थॉमस मन्रो हिंदू धर्म व संस्कृतीचा प्रशंसक म्हणून जॉन मार्शमन हा अधिकारी त्याचा तीव्र विरोध करून नापसंती दर्शवितो.

ख्रिस्ती धर्मीयांचे धर्मांतर कार्य आता गतिमान झाले. अशाच एका प्रकरणाविषयी 'बॉम्बे समाचार'ने अग्रलेख लिहून फेब्रुवारी व मे १८४१ मध्ये आवाज उठवला. मिशन शाळेचे शिक्षण नको असे वातावरण होऊन मुले शाळेतून काढली गेली. सोराबजी या पारसी कुटुंबाच्या एकुलत्या एक मुलाला बाटवले गेले. हे प्रकरण मिशनऱ्यांच्या वतीने कोर्टात निकालात निघाले. फेब्रुवारी १८४१ मध्ये जेम्स क्रॅफोर्डने सभा घेऊन फिशरची स्तुती केली. प्रकरण सुप्रीम कोर्ट म्हणून प्रिव्ही कौन्सिल लंडनमध्येही गेले. ४ नोव्हेंबर १८४१ रोजी नाशिक येथील 'बॉम्बे समाचार'च्या ख्रिस्ती मिशनरींनी अनेक प्रकारे हिंदूंचा अपमान केला याची उदाहरणे पुढीलप्रमाणे -

(१) ख्रिस्ती मिशनऱ्यांनी गाय मारून रेणुका मंदिराजवळ टाकली. ब्राह्मण तक्रार घेऊन गेले तर उन्मत्त असिस्टंट १८२२ मध्ये कलेक्टर रिव्हज त्यांनाच दम देत म्हणाला,

'तुम्ही तक्रार मागे घ्या नाहीतर मीच गाय मारून मंदिरापुढे टाकीन'.

(२) असिस्टंट कलेक्टर रिव्हजने पंचवटीजवळ संन्याशाच्या समाधीला कैद्याद्वारे उकरून प्रेत कुत्र्या-कोल्ह्यांना खाण्यास फेकून दिले.

(३) पाच हजार ब्राह्मण नाशिकच्या बालाजी देवळात धर्मविधी करीत असता मिशनऱ्यांनी प्राण्यांची हाडे फेकली व घाणेरडे पाणी ओतले.

ब्राह्मणांच्या तक्रारींकडे पुन्हा दुर्लक्ष केले. शेवटी गव्हर्नरकडे तक्रार करून पुढे धर्मकार्य चालू करताच सरकारी अधिकाऱ्यांनी उन्मत्तपणे तेथे घोडे नाचवले. ब्राह्मणांनी चिडून त्यांना जबर चोप देऊन धडा दिला. पण न्यायालयाने ब्राह्मणांनाच शिक्षा व दंड ठोठावला. यामुळे मुंबई गव्हर्नर सर जॉन कारनॅकने सर्व ब्राह्मणांना सोडले. सरकार व मिशनरींचे असे हे संगनमताने होणारे धर्मप्रसार कार्य होते.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - १*

**पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगून कंसात (X) किंवा (✓) अशी खूण करा.**

(०१) १९ व्या शतकात महाराष्ट्रातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय जीवनात नवचैतन्य उदयास आले. ( )

(०२) सत्य, न्याय, व प्रेम या त्रयींवर सामाजिक व धार्मिक सुधारणांचा पाया उभारला गेला. ( )

(०३) डॉ. राजा राममोहन रॉय धार्मिक व राजकीय सुधारणांचे अग्रणी होते. ( )

(०४) 'सामाजिक' या शब्दात 'सामाजिक पुनर्रचना' अभिप्रेत नाही. ( )

(०५) सामाजिक पुनर्रचनेचा संबंध सामाजिक वर्तणूक चालीरीती, समाजरचना, समाज नियंत्रण यांच्याशी नसतो. ( )

(०६) प्रा. कोनिथ जोन्स यांच्या मते सामाजिक चळवळीस नेतृत्व व संघटन आवश्यक असते. ( )

(०७) कोणत्याही सामाजिक व धार्मिक चळवळीचा पाया तत्कालिन अनिष्ट परंपरांचा निषेध व तीव्र मतभेद यांवर रचलेला असतो. ( )

(०८) मुंबई इलाख्यात रेव्ह. विल्सन जॉन व त्यांची पत्नी मागरिट यांनी स्त्री-शिक्षणावर भर दिला. ( )

(०९) वरिष्ठ जातीतील व शिक्षित हिंदू मोठ्या प्रमाणावर ख्रिश्चन झाले. ( )

(१०) ख्रिस्ती धर्मप्रसारकांना ख्रिस्ती धर्माच्या प्रसारामुळे हिंदुस्थानात समता आणता येईल पण साम्राज्य टिकणार नाही अशी भीती होती. ( )

(११) ख्रिस्ती मिशनऱ्यांनी अनेक प्रकारे हिंदूंचा अपमान केला. ( )

## १.२.२ महाराष्ट्रातील धर्मप्रबोधनाची कारणे

डॉ. आर. जी. भांडारकर, सदाशिव कृष्ण फडके व आचार्य शं. द. जावडेकर यांसारख्या विद्वानांनी धर्मसुधारणा-विषयक मांडलेली मते अतिशय बोलकी आहेत. ती मते पुढीलप्रमाणे -

*डॉ. आर. जी. भांडारकर* - ''जी गोष्ट व्यक्तीची तीच देशाची, खरी उन्नती व्हावयाची असेल तर प्रथम उच्च धर्माचा प्रसार झाला पाहिजे. राजकीय हक्क प्राप्त करून घेण्यात राष्ट्रीय सभा भरवा अथवा प्रांतिक सभा भरवा किंवा सामाजिक सुधारणा घडवून आणल्यास सामाजिक परिषदा भरवा परंतु जोपर्यंत धर्म जागृती नाही, तो पर्यंत देशास या खटाटोपीत खरे यश यावयाचे नाही. प्रथम आत्म्याचीच उन्नती झाली पाहिजे''.

*सदाशिव कृष्ण फडके यांनी* कारणात्मक बाजूवर भर देऊन लिहिले - ''या युगाच्या आरंभी पाश्चात्त्य शिक्षणाने नास्तिकता व पाखंडवादाची अशी भयंकर लाट या देशात उसळली होती. तिने कित्येकांच्या मताप्रमाणे लवकर सर्व देश व हिंदू धर्म आमूलाग्र उखडून टाकला असता. परंतु ईश्वर चिंतन व नियतीमुळे त्या वेळी राजा राममोहन रॉय हा अलौकिक पुरुष लाभला. त्याने एकेश्वर पंथ नामक एक नवीन लाट उत्पन्न केली. यामुळे पुढे येणारी आपत्ती टळली''.

*आचार्य शं. द. जावडेकर* विविध सुधारणांची भूमिका मांडून ही बाब अधिक पुढीलप्रमाणे करतात - ''याच सुमारास बंगालमध्ये राजा राममोहन रॉय यांच्या नेतृत्वात पाश्चात्त्य ज्ञानाने नवीन लाट प्राप्त झाली. बंगाली हिंदूंनी आपल्या धर्म विचारात व आचारात क्रांती घडविली. ते आधुनिक भारताच्या निर्मितीच्या प्रयत्नात गुंतले होते. त्यांना हिंदी समाजात एक सर्वांगीण क्रांती घडवून आणावयाची होती; त्यासाठी आपल्या धर्म विचारात व धर्म आचारात प्रथम क्रांती झाली पाहिजे, अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. पहिली धर्मसुधारणा, दुसरी समाज सुधारणा आणि तिसरी राजकीय सुधारण अशी प्रतवारी त्यांनी आपल्या अंत:करणाशी निश्चित केली होती''.

वरील मतांचा व इतर विद्वानांच्या मतांचा परामर्श घेता या धर्मसुधारणेमागे व सामाजिक प्रबोधनामागे अनेक कारणे होती. ती पुढीलप्रमाणे -

### (अ) आचारविचारांची ओळख, स्वीकार

सुबुद्ध भारतीयांचा बलशाली ब्रिटिश राज्यकर्त्यांशी संबंध आला. नवे आचारविचार, पाश्चात्त्य जीवन पद्धती, धर्म व जीवनाचा दर्जा उंचावलेल्या मूठभर भारतीयांनी ही माहिती घेतली. नवे वारे जन्मले.

### (आ) भौतिक सुधारणा

ब्रिटिशांनी त्यांच्या साम्राज्य व व्यापाराच्या दृढीकरणासाठी केलेल्या अनेक भौतिक सुधारणांमुळे अनुकूल वातावरण तयार

झाले. या भौतिक प्रगतीसमोर आपली अवनती स्पष्ट जाणवत होती. त्यातून जन्मलेली मरगळ घालवण्यासाठी भारतीय अस्वस्थ झाले व प्रबोधन घडले.

### (इ) वैज्ञानिक दृष्टिकोन

विविध क्षेत्रांत पाश्चात्त्यांनी शास्त्रीय शोध लावले. वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारला, नवी मूल्ये जोपासली. या वैज्ञानिक दृष्टीत नवीन भौतिक दृष्टी काही भारतीयांना आशादायी वाटली व त्यांनी ती प्रसारित केली.

### (ई) संघटित धर्मप्रसार

ख्रिस्ती मिशनऱ्यांचा प्रभावी संघटित धर्मप्रसार, शिक्षणप्रसार, इत्यादी कामांमुळे बरेच भारतीय प्रभावित झाले व हेवा वाटून त्यांनीही तसे कार्य सुरू केले.

### (उ) शिक्षण, उदारमतवादी मते

ख्रिस्ती मिशनरी मुख्यत: धर्मकार्य करत. सोबत शिक्षण, (शालेय, महाविद्यालयीन) उदारमतवादी वृत्तीची कामेही करत. त्यांची प्रेरणा घेऊन पुनरुज्जीवनाची सुरुवात झाली.

### (ऊ) धार्मिक सुधारणा

हिंदू धर्माचे दोष दाखवून त्यावर ख्रिस्ती मिशनऱ्यांनी टीका केली. भारतीय धर्मपरंपराची अवहेलना झाली. याला उत्तर म्हणून हिंदू धर्मात बऱ्याच सुधारणा हाती घेण्यात आल्या. स्वत्वाचा शोध सुरू झाला.

### (ए) सामाजिक व धार्मिक चळवळी

भारतीय धर्म अभ्यासून त्यातील अनिष्ट रूढी, परंपरा, कर्मकांड दूर करून मूळ धर्मतत्त्वावर चढलेल्या घातक अंधश्रद्धेची मुळे काढून टाकून सामाजिक व धार्मिक चळवळी सुरू झाल्या.

### (ऐ) प्रबोधनाची पायाभरणी

बंगालमध्ये प्रबोधनाची पायाभरणी झाली. प्रबोधनाचे युग प्रथम बंगालमध्ये सुरू झाले व नंतर देशभर (महाराष्ट्रात व नंतर इतरत्र) हे लोण पसरले.

### सुधारणावादी विचारसरणी

प्रारंभी पुनरुज्जीवनाची चळवळ केवळ एक बौद्धिक चळवळ होती. पुढे या निकषावरच अनेक धार्मिक व सामाजिक सुधारणा झाल्या. तसेच भारतीय राजकीय चळवळींनाही स्फूर्ती देण्याचे काम या प्रबोधनातून झाले. भारतातील धार्मिक व सामाजिक चळवळी मुख्यत: तीन प्रकारच्या विचारसरणींच्या होत्या.

(१) **बुद्धिवाद :** प्रबोधनाच्या सुधारणावादी चळवळीत बुद्धिवादाच्या दृष्टिकोनातून विचार होऊन प्रचलित धार्मिक व सामाजिक जीवनात बदल करू इच्छिणाऱ्या चळवळीचा समावेश होतो. पहिल्या प्रकारात ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, पारशी धर्मातील सुधारणा चळवळी तसेच लोकहितवादी, आगरकर, महर्षी कर्वे, इत्यादी सुधारकांचा यात अंतर्भाव आहे.

(२) **परंपरचे जतन :** दुसऱ्या प्रकारात प्राचीन सांस्कृतिक वैभव व परंपरा यांचे जतन करणारी चळवळ मोडते. थिऑसाफिकल सोसायटी, लिंगायत चळवळी, चिपळूणकर आणि लो. टिळकांचे कार्य या अंतर्गत येते.

(३) **संमिलन :** जुन्या-नव्या विचारसरणी जोडून प्राचीनतेचे समर्थन करणाऱ्या आर्य समाज, देव समाज, साधारण ब्रह्म चळवळीचा हा तिसरा प्रकार होय.

या धार्मिक-सामाजिक चिंतनातून आत्मपरीक्षण सुरू झाले. समृद्ध, ऐतिहासिक आणि विशाल वारसा असूनही आपण पराभूत का झालो, कोणते दोष धार्मिक व सामाजिक जीवनात होते. त्यांचे निराकरण करूनच खरे परिवर्तन आणता येईल का याविषयी विचार होऊ लागला.

### धर्म व समाजात पुढील दोष होते -

(१) **बुरसटलेल्या कल्पना :** अनेक देव वादाच्या कल्पना व मूर्तिपूजेचे प्रस्थ, पाप-पुण्य, पुनर्जन्म, स्वर्ग-नरक, इत्यादी कल्पनांमध्ये समाज अडकून गेला होता.

(२) **व्रतवैकल्यांचा प्रभाव :** ग्रह, नक्षत्रे ज्योतिषशास्त्र, नशीब, नवस, व्रतवैकल्ये, तीर्थयात्रा, तंत्रमंत्र, समुद्रपर्यटन बंदी, इत्यादींचा समाजावर प्रभाव होता.

(३) **शोषण :** ब्राह्मण पुरोहित धर्माच्या नावावर समाजाचे फारच शोषण करत होते.

(४) **ख्रिश्चन धर्मप्रसार :** ख्रिश्चन धर्माचा प्रसार भारतात ख्रिश्चन मिशनऱ्यांद्वारा मोठ्या प्रमाणात चालू होता.

(५) **जातिव्यवस्था :** जातिव्यवस्था व अस्पृश्यता पाळली जात होती.

(६) **वर्णश्रेष्ठत्व :** वर्णव्यवस्थेचे वर्चस्व असून त्यासंबंधीची वर्णश्रेष्ठत्वाच्या अहंकाराची भावना होती.

(७) **सतीची चाल :** सती जाण्याची (पाठविण्याची) चाल, बालहत्या पद्धत, बालविवाह, सक्तीचे वैधव्य किंवा विधवांच्या पुनर्विवाहास बंदी.

(८) **केशवपन :** विधवांना केशवपनाची सक्ती.

(९) **स्त्री-शिक्षणाचा अभाव :** अत्यल्प स्त्री-शिक्षण या बाबींचा विचार करून परिवर्तनाची पावले प्रथम धार्मिक प्रबोधनातून व नंतर सामाजिक चळवळीतून कशी पुढे आली हे आपण या घटकात व पुढील घटकात अभ्यासणार आहोत.

## *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१*

**(अ) पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगून कंसात (X) किंवा (✓) अशी खूण करा.**

(१) 'खरी प्रगती व्हावयाची असेल तर प्रथम उच्च

धर्माचा प्रसार झाला पाहिजे' असे डॉ. आर. जी. भांडारकरांचे मत होते. ( )

(२) 'राजा राममोहन रॉय यांनी एकेश्वर पंथ नामक एक नवीन लाट उत्पन्न केली' असे आचार्य जावडेकर म्हणाले. ( )

(३) ख्रिस्ती मिशनरी मुख्यत: धर्मप्रसाराचे कार्य करत. सोबत शिक्षण व इतर उदारमतवादी कार्यही करत. ( )

(४) भारतीय सुधारणावादी चळवळीचे तीन प्रकार होते. ( )

(५) धर्म व समाजात अनेक दोष होते. त्यांच्या विरोधासाठी विविध व्यक्तींनी चळवळी उभ्या केल्या. ( )

**(आ) पुढील विधानांत गाळलेल्या जागी योग्य शब्द भरा.**

(१) ब्रिटिशांनी साम्राज्य व व्यापार दृढीकरणासाठी केलेल्या -------- मुळे अनुकूल वातावरण निर्माण होते.

(२) -------- मुळे भारतीयांची दृष्टी बदलली, त्यांनी आधुनिक दृष्टिकोन स्वीकारला.

(३) ख्रिस्ती मिशनऱ्यांनी धर्मप्रसाराबरोबरच -------- प्रसाराचेही कार्य केले.

(४) भारतीय धर्म अभ्यासातून -------- हल्ला चढविण्यात आला.

(५) -------- येथे प्रबोधनाची पायाभरणी झाली.

## १.२.३ धार्मिक प्रबोधनाच्या पाऊलखुणा

न्या. रानडे यांच्या मते, 'एक चांगली सामाजिक पद्धती तुम्हाला तोपर्यंत अनुभवता येणार नाही जोपर्यंत तुम्ही राजकीय अधिकार प्राप्तीत कमी पडत असाल. तसेच जोपर्यंत तर्क (बुद्धी) व न्यायावर आधारित सामाजिक पद्धत आणि व्यवस्थापन नसेल तोपर्यंत उत्तम आर्थिक प्रणाली समाजाला उपलब्ध होत नाही. तुमचे धार्मिक विचार निकृष्ट असतील तर सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात यश मिळणार नाही. हे परस्परावलंबन दुर्घटना नसून नैसर्गिक नियमच आहे'. चांगल्या समाजरचनेच्या उभारणीसाठी न्याय व विवेक यांच्या आधारे समाजरचना उभी झाली पाहिजे. धार्मिक आदर्श जर हिणकस असतील तर सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात यश येणे शक्य नाही. या नैसर्गिक नियमाला समजून घेतले पाहिजे.

### (अ) आचार्य बाळशास्त्री जांभेकरांचे आरंभिक प्रयत्न

आचार्य बाळशास्त्री जांभेकर (१८१२-१८४६) यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यात पोंबर्ले येथे झाला. त्यांना मराठी, इंग्रजी व संस्कृत भाषा चांगल्या अवगत होत्या. त्यांचे वडील गंगाधरशास्त्री यांना सदाशिव काशिनाथ ऊर्फ बापू छत्रे आदर देत. शिक्षणात त्यांना बापू छत्रेंचा आधार लाभला होता. बाळशास्त्री गुजराथी, बंगाली, फारसी, गणित, भूगोल, इत्यादी भाषांमध्ये व इतर विषयांतही प्रावीण्य मिळवून होते. ते सहअध्यापक, डेप्युटी नेटिव्ह सेक्रेटरी, अक्कलकोट युवराजांचे शिक्षक, प्रोफेसर (एलफिन्स्टन कॉलेज), शिक्षक अध्यापक वर्गाचे रेक्टर, मराठी शाळांचे इन्स्पेक्टर, इत्यादी नोकरीची पदे साभाळून लोकशिक्षण, समाजसुधारणा आणि ज्ञानप्रसार करण्यावर स्वत:चा पैसा खर्च करत. शिक्षण प्रसारार्थ त्यांचा सल्ला मोलाचा असे. पाश्चात्त्य शिक्षण, स्त्री-शिक्षण, धर्म व समाजसुधारणेवर त्यांचा भर होता. गुरूने शंभरपट ज्ञानी होऊन प्रयत्न केले तर दसपट ज्ञान शिष्याला देऊ शकतील असे ते म्हणत. त्यांनी इतिहास संशोधन, शिलालेख वाचन, ताम्रपटांचा शोध व वाचन यांवर भर दिला. अनेक ग्रंथ इंग्रजीतून लिहिणारे ते पहिले भारतीय विद्वान होते. हिंदुस्थानचा इतिहास, हिंदुस्थानातील इंग्रजी राज्याचा इतिहास, हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास, इंग्लंडचा इतिहास व १७६७ मध्ये ज्ञानेश्वरीची पहिली छापील पोथी (पाठभेदासह) त्यांनी संपादित केली.

बाळशास्त्री जांभेकर महाराष्ट्रातील सर्वच सुधारणांचे आद्यप्रवर्तक होते. १८३२ मध्ये त्यांनी 'दर्पण' पाक्षिक सुरू केले. त्यानंतर १८४० मध्ये 'दिग्दर्शन' या नावाचे मासिक चालवले. बंगालमधील राजा राममोहन रॉय व बाळशास्त्री पाश्चात्त्य विद्येचे पुरस्कर्ते होते. कारण पाश्चात्त्य विद्येमुळेच अज्ञान व अंधकार घालविता येईल असा त्यांना विश्वास होता. ते म्हणत, 'पूर्वीचे ऋषिजन विद्यासंपन्न असून सर्व जन्म विद्यादानात घालवत. त्यांचेच अनुकरण करून आपण येथील प्रजेमध्ये स्वदेशाभिमान व स्वधर्माभिमान रुजवला पाहिजे'. बाळशास्त्री फक्त उपदेश करून थांबले नाहीत तर त्यांनी धर्मांतरितांची शुद्धी करून त्यांना स्वधर्मात परत घेतले. त्याप्रमाणेच श्रीपाद शेषाद्री या तरुणाला ख्रिश्चनांनी बाटवले होते. त्याला त्यांनी शुद्ध करून स्वधर्मात घेतले. यासाठी त्यांना त्या वेळच्या शास्त्री, पंडितांचा कडवा विरोध सहन करावा लागला. पण तो सोसून त्यांनी महाराष्ट्राच्या बुद्धीला नवे वळण लावण्याचे महत्त्वाचे कार्य केले.

### (आ) दुसरा प्रयत्न - परमहंस सभा

प्रार्थना समाज व परमहंस सभेच्या सुधारणा एकाच गटात मोडतात. कारण दोन्हींवर इंग्रजी प्रभाव होता. तसे पाहता 'परमहंस सभा' हे रूप विकसित होण्यास १८४९ साल उजाडले. त्याच्या पूर्वी दु. म. मेहताजी चे कार्य दादोबा पांडुरंग तर्खडकर, दिनमणी शंकर, दलपतराम भागुबाई, दामोदरदास, इत्यादींनी सुरत येथे 'मानव धर्मसभा' म्हणून चालविले. १८४२ साली दुर्गारायांनी 'पुस्तक प्रसारक मंडळी' स्थापन करून १८४० (काहींच्या मते १८४४) मध्ये 'परमहंस सभा' स्थापन केली. सुरतेत ख्रिस्ती होणाऱ्यांना पुन्हा हिंदू करणे, सुशिक्षित तरुणांना आवाहन करणे असे कार्य चालू होते. पण त्यात त्यांना कमी यश लाभले. परमहंस सभा स्थापनेचे श्रेय दादोबा पांडुरंग तर्खडकरांचे (१८१४-८२)

होते. ते व्यापारी परिवारात जन्मले व वाढले. Bombay Native School मध्ये शिकून १८४६ मध्ये बाळशास्त्री जांभेकरांनंतर ते मुख्याध्यापक झाले. त्यांनी १८४३ मध्ये 'धर्म विवेचन' हे पत्रक काढले. त्याची प्रसिद्धी १८४८ साली झाली.

मराठीचे पंडित व मराठीचे पाणिनी म्हणून प्रसिद्धी पावलेले दादोबा पांडुरंग यांनी सुरतच्या 'मानव धर्मसभा' संस्थेची भूमिका मांडून ईश्वर निराकार आहे. नीतिपूर्वक ईश्वरभक्ती करणे हा खरा धर्म होय. विवेक बाळगून नित्यकर्मे करावीत. सर्वांसाठी ज्ञान व शिक्षण आणि प्रत्येक मानवाला विचारस्वातंत्र्य आहे. मूर्तिपूजा करणे वेडगळपणा होय. या सभेचा प्रार्थना दिवस रविवार होता. ही अल्पजीवी सभा होती. त्यामुळे १८४९ मध्ये त्यांनी 'परमहंस सभा' स्थापन केली. या सभेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती.

(१) जातिसंस्था नष्ट करणे, (२) मूर्तिपूजा करू नये, (३) विधवा पुनर्विवाह घडविणे, (४) स्त्री-शिक्षणाला महत्त्व व आधार देणे, (५) दलित वर्गात शिक्षणाचा प्रसार करणे.

**(क) दादोबांची सप्ततत्त्व प्रणाली**

(१) ईश्वर एक असून त्याची भक्ती करावी.
(२) ईश्वरनिष्ठेतच खरा धर्म आहे. निष्ठा ही प्रेम व नैतिक वर्तनावर अवलंबून असते.
(३) सर्व जगाचा धर्म एकच आहे.
(४) प्रत्येक व्यक्तीला विचारस्वातंत्र्य आहे.
(५) आपले दैनंदिन कार्य तर्कसुसंगत व नीरक्षीर विवेकावर आधारित असावे.
(६) संपूर्ण मानव जात एक आहे.
(७) सर्वांना योग्य प्रकारचे ज्ञान द्यावे.

प्रो. जे. व्ही नाईकांनी परमहंस सभेच्या धर्म स्वरूपाचे विश्लेषण करताना लिहिले की, दादोजींनी सर्वधर्म ग्रंथामध्ये शहाणपण व आध्यात्मिक विचार असतात. त्यांनी एक ते तीन तत्त्वात खरा धर्म व चार ते सात तत्त्वात मानवी बुद्धिप्रामाण्याला उचलून धरले आहे व त्यातून सामाजिक गुलामगिरीचाही ते निषेध करतात. हंस निरक्षीर विवेक करतो तसा हा धर्मविचार मानणारा वागेल, बुद्धी व तर्काने ईश्वर तत्त्वाशी व धर्माशी निष्ठ राहील असे दादोबांना वाटून परमहंस हा शब्द वापरला असावा.

सभेचे सभासदत्व घेताना गुप्तता पाळत, नावे गुप्त ठेवत, विधी म्हणून जातपात न पाळण्याची शपथ घेत, ख्रिश्चनाच्या हातचा पावाचा तुकडा खाणे व यादीत नाव नोंदविणे ही प्रक्रिया करत. प्रो. जे. व्ही. नाईक यांच्या मते प्रथम दोन वर्षे मुसलमानाच्या हातून पाणी पिणे बंधनीय होते. बाबा पद्मजी व डॉ. आर. जी. भांडारकर यांच्या लेखनात याला मात्र पुरावा नाही. सभासद एकत्र येत, प्रार्थना व विचार करत. वार्षिक सभेला तर पूर्ण प्रांतातून सभासद येत. कर्मठांचा होणारा विरोध हे कारण गुप्ततेमागे असावे. भरपूर संख्या झाल्यावर समाजात उघडपणे वावरता येईल. राम बालकृष्ण जयकरकडे सभा होत. १८५३ मधील गिरगावची सभा डॉ. भांडारकरांच्या नेतृत्वाखाली झाली. नंतर डॉ. आत्माराम पांडुरंगांच्या घरी सभा होत. धार्मिक व सामाजिक विषयांवर तेथे निबंध वाचत. दादाबोंचा 'परम हौसिक ब्रह्मधर्म' हा ओवी संग्रह होता. ही तर या सभेची 'स्मृती' होय. पाध्ये, जयकरांच्या मते पूर्वतयारी म्हणून 'दया, भक्ती, मनाचा मवाळपणा व बाह्याचारावर त्यांचा कटाक्ष असे'. राम बालकृष्ण जयकर कृतिवीर होते. समुद्र पर्यटनविरोधी विचार जावेत म्हणून ते इंग्लंड दौरा करून आले. सपत्नीक ते सर्कस पाहण्यास जात. आत्माराम पांडुरंग, दादोबा पांडुरंग, दादाभाई नौरोजी, नारायण विश्वनाथ मंडलिक हे सुधारणावादी तरुण संस्थेचा विस्तार करण्यासाठी धडपडत होते. 'अरुणोदय' वृत्तपत्राच्या नोंदीनुसार भि. ल. चव्हाण, स. ल. चव्हाण (दोघे शिक्षक), लक्ष्मणशास्त्री हळवे, सखारामशास्त्री ब्राह्मण, बाळशास्त्री शिंत्रे-सारस्वत, मदन श्रीकृष्ण खत्री असे विविध थरांतील लोक यात रस घेत. नंतर यात मो. बि. संजगिरी, तु. ता. पडवळ हे सारस्वत व भंडारी सहभागी झाले. बाबाजी पद्मजी व ना. र. नवलकर सभेत आले पण नंतर ख्रिस्ती बनले. नंतरचे बारा नवे सभासद झाले. ते म्हणजे ल. न. जोशी, ना. बा. पटवर्धन, बा. बा. भागवत (एलफिन्स्टन स्कूल, मुंबई), के. शि. भावलकर (पुणे), वा. भि. करमरकर (सोलापूर), बा. म. आदूरकर (नागपूर), ना. रा. दातार (जमखंडी), पु. ज. काणे, दीक्षित (रत्नागिरी), विष्णुपंत जांभेकर (धुळे), रामचंद्र गावडे (ठाणे), अच्युत हरी जमखंडी. मुस्लिमांना प्रवेश बंद नव्हता. माडगावकरांच्या मते गुप्त प्रचारातून पुणे, अहमदाबाद, खानदेश, बेळगाव, रत्नागिरी येथे प्रचार केला. कलकत्ता, मद्रास, काशी येथे शाखा झाल्या. डॉ. भांडारकरांच्या रत्नागिरी शाखेचा पुरावा आहे तसे पुरावे वरील शाखांचे मिळत नाहीत असे डॉ. जे.व्ही. नाईक म्हणतात. डॉ. नाईकांच्या मते जोतीराव फुलेंचा या सभेशी जवळचा संबंध होता. भावलकर व फुलेंच्या प्रयत्नांतून पुण्यात सभा आणि प्रभावी कार्य झाले होते. बाबा पदमजी व जोतीबांच्या मैत्रीतून सत्यशोधक समाज स्थापन झाला. या सभेतूनच प्रार्थना समाज निर्मित झाला. १८५१ मध्ये परमहंस सभेविषयी 'ज्ञानोदयात' उघड लेखन झाले. टीका करून रा. अ. जोशी ऊर्फ गजाबांनी 'परमहंस मतप्रशंसा' ही कविता छापली. भाऊ महाजनांनी सभेचा पक्ष 'प्रभाकर' मध्ये लिहिला. मूळ सभासद गप्प होते. कार्यपद्धतीबद्दलची शंका वाढली. १८८० मध्ये यादीचे रजिस्टर गहाळ झाले. हळूहळू सभा इतिहासजमा झाली.

**(ख) परमहंस सभेच्या ऱ्हासला पुढील बाबी कारणीभूत झाल्या**

(१) **आर्थिक फटका :** गजाबा ऊर्फ रा. अ. जोशींची टीका प्रखर होती. सभासद व्यवस्थित उत्तर देऊ शकले नाहीत. पण प्रो. नाईक हे कारण न मानता आर्थिक कारण देतात. शेअरबाजारात आर्थिक फटका बसून सभेचे आर्थिक आधारस्तंभ ढासळले.

(२) **प्रसार कार्य :** प्रसार कार्य मर्यादित राहिले.

(३) **गुप्तता :** गुप्त सदस्यत्व, याद्या, सभा घेणे, उघडपणा नसणे यातून शंका वाढत गेली. जनमताचा पाठिंबा घटला.

(४) **जातीयतेचा भक्कम पाया :** जातीयता विरोधी कार्याची सभेने केलेली पायाभरणी स्तुतीयोग्य होय पण गुप्तपणे. हजारो वर्षांचा रुजलेला हा प्रवाह संपणे शक्य नव्हते.

(५) **संशय, भित्रेपणा :** सभासद दडपण, भित्रेपणा, संशयी व आत्मविश्वास रहित बनून कार्य दुर्बल झाले.

तरी सभेचे कार्य महत्त्वाचे होते. दादोजींच्या 'पारमहंसिक ब्राह्मधर्म' या वीस ओव्यांच्या पोथीत ते लिहितात -

विश्वकुटुंबी जो सर्वादि कारण। बापा त्या शरण जावे।
जावे तुम्ही बंधूच्या नात्याने। वागा मानवाशी। उदार मनाशी॥
ठेवूनिया भूतदयेने। करा देवपूजा। हीच अधोक्षजा आवडते।
करा किंवा टाळा। बाह्य धर्म सोंग। ठेवा अंतरंग। शुद्धतरी।
दया भक्ती शील। मनाचे मवाळ। करिली हळहळ। देशाचिया।
म्हणोनिया दावा। सदाचरणास। ज्ञानाचा तो अंत। दादोबा म्हणे।

यातून शुद्ध अंत:करण, सदाचार हाच धर्म, कर्मकांड नको, भूतदया हीच पूजा, मानव मात्राचे ऐक्य, स्वदेश सेवा हीच धर्म सेवा या धर्म क्रांती तत्त्वांनी मुक्त पारमहंसिक सभेचे आरंभिक काळातील महाराष्ट्रातील धर्म क्षेत्रातील कार्य कौतुकास्पद ठरते.

## *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ३*

**पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगून कंसात (X) किंवा (✓) अशी खूण करा.**

(१) बाळशास्त्री जांभेकराना मराठी, गुजराथी, बंगाली, फारसी इंग्रजी भाषांचे ज्ञान होते. ( )

(२) जांभेकरांनी 'दर्पण' हे पाक्षिक व दिग्दर्शन हे मासिक सुरू केले. ( )

(३) आत्माराम पांडुरंग मराठीचे पंडित व पाणिनी होत. ( )

(४) पारमहंसिक ब्राह्मधर्म ग्रंथ टिळकांनी लिहिला. ( )

(५) परमहंस सभेसाठी दादोबा पांडुरंग यांनी सप्ततत्त्व प्रणाली तयार केली होती. ( )

## १.२.४ लोकहितवादी व धर्मप्रबोधन

गोपाळ हरी सिधये यांचा जन्म १८ फेब्रुवारी १८२३ रोजी झाला. वडील बाजीराव पेशव्यांचे सेनापती बापू गोखले यांचे फडणीस होते. वतनावरून ते देशमुख म्हणवत. त्यांचा सरंजाम रद्द झाला. गोपाळराव १९ वर्षांचे असताना वडील वारले. पेन्शन चालू होते. वडीलबंधू चिंतामणराव व गोपाळराव यांच्यावर कुटुंबाची जबाबदारी आली. इंग्रजी, संस्कृत, फारसी, गुजराती आणि हिंदीचे उत्तम जाणकार, उत्कृष्ट हस्ताक्षर असल्याने ते सरकारी नोकरीत गेले. ट्रान्सलेटर, शिरस्तेदार, मुनसफ, सबअसिस्टंट कमिशनर (पुणे), असिस्टंट कमिशनर (सातारा), १८५६ मध्ये इनाम कमिशनर बनले. इनामे नियमानुसार जप्त केल्यामुळे त्यांच्या विषयी लोकांत गैरसमज वाढला. बनावट इनामे जप्त करावी लागली. व्यक्तिश: ते निष्कलंक चारित्र्याचे होते. तरी त्यांना लोकापवादाची झळ सोसावी लागली.

दादोबांच्या नंतर धर्मप्रबोधन कार्यात अग्रणी नाव हे लोकहितवादींचेच होते. त्यांनीच प्रथम नवीन धर्मतत्त्वे मांडली. ब्राह्मण हे हिंदू धर्मात गुरुस्थानी असले तरी हीन कर्मकांडाला त्यांनी ब्राह्मण जीवनाचा आधार केले. पुराणांच्या भाकडकथा प्रभावी होत्या. ते वास्तव जग पाहून ओळखू शकण्याच्या स्थितीत नसून अवतार घेऊन इंग्रजी लोकांचा संहार करील या कल्पनांना प्रस्तुत करीत होते. गुरुत्वाऐवजी ते विद्याशून्य, बैल, मूर्ख ठरले असे लोकहितवादी मानत. लोकहितवादी पाश्चात्य विद्येचे अभिमानी व संस्कृती विद्येचा तिटकारा करणारे होते. स्वदेश सेवा, विचारस्वातंत्र्य, ईश्वरभक्ती, स्त्री-पुरुष समानता, प्रवृत्तीमार्ग, गुणनिष्ठ वर्णभेद, सत्याचरण, विद्यार्जन या संदर्भात सर्व मानवांचा दर्जा समान मानत. या धर्मतत्त्वांना उचित मानून ते पुरस्कार करत होते. हिंदू व मुसलमान धर्मशास्त्रांच्या व्यवहार भागावर गोषवारा काढण्याचे काम त्यांना सोपवण्यात आले. १८६३ पासून ते स्मालकॉज जज्ज बनले. १० वर्षे अहमदाबादेत व नंतर जॉइंट सेशन जज्ज (नाशिक) म्हणून काम केले. शेवटी डिस्ट्रिक्ट जज्ज (ठाणे) राहून अनेक पदे व पदव्या शासनाकडून व लोकांकडून मिळवून ते सन्मानित जीवन जगले. एक वर्ष रतलाम संस्थानाचे दिवाण राहिले. इ. स. १८९२ मध्ये त्यांचा मृत्यू झाला.

हिंदू-मुसलमानांच्या धर्म, व्यवहारशास्त्रांची संहिता करताना बरेच विरोधाभास त्यांनी ओळखले. यामुळेच ते इतिहासाच्या अभ्यासाकडे वळले. निष्क्रिय परिस्थिती व लोकमत यांतून त्यांनी अनुभव व चिंतन केले. ते बहुश्रुत व समाज उद्धाराची तळमळ असलेले खरे सुधारक व चिंतक होते. त्यांनी 'शतपत्रे' लिहिली. तसेच इतिहासपर ८, चरित्रपर ७, सामाजिक ७, राजकीय-आर्थिक ५ ग्रंथ लिहिले. नियतकालिकांत लोकहितवादी मासिक (१८८२), त्रैमासिक (१८८३) चालविले. संकिर्ण विषय म्हणून होळीचे उपदेश, सरकारचे चाकर आणि सुखवस्तू हिंदुस्थानातील साहेब लोकांशी संभाषण, पदनामा, पुष्पवन, शब्दालंकार, कलियुग, बोधजग असे लेखन केले. प्रभाकर, ज्ञानप्रकाशन, ज्ञानोदय, बुद्धिप्रकाश, अर्थज्ञानवर्धक, बॉम्बे टाइम्स, दि थिऑसाफिस्ट या वृत्तपत्रांतून लेखन केले.

धार्मिक दृष्ट्या ते तर्कशुद्ध विचार जोपासत. प्राचीन ऋषीमुनी पूज्य आहेत पण त्यांचे ग्रंथ प्रमाण मानण्याची गरज नाही. प्राचीन ब्राह्मण धर्म सुधारावा मात्र खरा दर्जेदार ब्राह्मण काशी ते रामेश्वर कुठेतरी सापडेल का? प्राचीन विद्येचे जाणकार ब्राह्मण होते आज सर्व मूर्ख बनले आहेत. फक्त पाठांतर विद्या मानून त्यांनी खरा हिंदू धर्म संपविला. त्यांनी 'देश ही मातोश्री' मानली व 'स्वदेश प्रीती' या पत्रात त्याचे वर्णन केले आहे. ते इतिहास प्रेम जोपासून होते. आनंद व अध्ययनासाठीच इतिहास न अभ्यासता ज्ञानप्रसार व त्यातून होणारा मनोविकास त्यांना प्रभावी वाटला. इतिहासामुळेच पूर्वग्रह विसरून वास्तवाचे भान

हिंदू समाजाला होऊ शकेल असे लोकहितवादी मानत. त्यामुळे राष्ट्रीय दोष कळतात. इतिहासकार नसले तरी इतिहासकारांच्या उदयाला अनुकूल पार्श्वभूमी निर्माण करणारे ते समाजचिंतक व निबंधकार होते.

धार्मिक सुधारणांविषयी लोकहितवादींचे विचार चिंतनीय ठरतात. त्यांच्या मते - ''हिंदू लोकांचा दृष्टिकोन निवृत्तीवादी आहे. इहजीवितापेक्षा त्यांच्यात परलोकनिष्ठा अधिक आहे. हिंदू समाजाच्या निष्क्रियतेला परंपरागत, साचेबंद, जुनाट धर्म कारणीभूत झाला. समाजाची उभारणी बलिष्ठ व सुयोग्य पायावर व्हावी यासाठी धार्मिक विचार, आचार, सुसंगत व सुदृढ असणे आवश्यक आहे. म्हणून धर्माचा साधक-बाधक विचार केल्याशिवाय सामाजिक सुधारणेचा विचार परिपूर्ण होऊ शकत नाही. कालमहात्म्ये करून हिंदू धर्माची सुधारणा करणे जरूर आहे. त्याशिवाय या लोकांचा परिणाम दिसणार नाही. चार लोक, ज्यांचे मनात स्वदेशाचे कल्याण आहे, त्यांनी एकत्र होऊन धर्म-सुधारणा करण्यास आरंभ करावा हे मला बरे वाटते'' (पत्र क्र.६४, शतपत्रे)

त्यांचे विचार असे सनातन धर्म व मर्यादा ओलांडणारे होते. ईश्वर मानून इतर बुद्धिवाद कसोटीवर धर्माची चिकित्सक मांडणी ते करतात. सती जाणे, विधवा पुनर्विवाहाचा विरोध करणे. बालविवाह, विधवा केशवपन, इत्यादी अमानवीय व अहितकारक पण धर्मांतरित पाळलेल्या बाबींचा तीव्र विरोध करत. जुनी त्याज्य धर्म चौकट मोडून नवीन लवचीक सर्वसमावेशक चौकट स्वीकारण्याचा विचार ते मांडतात. अनिष्ट धर्मनिष्ठ बाबी, धर्ममार्तंडाचे वर्तन यावर त्यांनी प्रहार केले. वैदिक संस्कृतीच्या चांगुलपणाला त्यांनी स्तुतियोग्य मानले. त्यांनी सामाजिक संस्था ईश्वरप्रणीत न मानता त्यात बदल करण्यावर भर दिला. ७० व्या शतपत्रात ते लिहितात - ''मनूचे वचन असो, याज्ञवल्क्याचे असो, कोणाचेही असो, ब्रह्मदेवाचे का असेना, बुद्धीरेव बलियसी. घातक वचन त्यागा''. ते जात जन्मावरून न मानता कर्मावरून मानत.

## *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ४*

**पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगून कंसात (X) किंवा (✓) अशी खूण करा.**

(१) दादोबांनंतर धर्मप्रबोधन कार्यात अग्रणी म्हणून लोकहितवादींचे नाव घेतले जाते. ( )

(२) लोकहितवादींनी प्रथम धर्मतत्त्वे मांडली. ( )

(३) लोकहितवादींचा कर्मकांड, पुराणांच्या कथा, अवतार यांस पाठिंबा होता. ( )

(४) लोकहितवादी विद्यार्जनाच्या संदर्भात सर्व मानवांचा दर्जा समान मानत. ( )

(५) लोकहितवादी बहुश्रुत व समाज उद्धाराची तळमळ असलेले सुधारक व चिंतक होते. ( )

(६) इतिहासामुळे पूर्वग्रह विसरून वास्तवाचे भान हिंदू समाजाला येईल असे लोकहितवादी मानत. ( )

(७) धर्माचा साधकबाधक विचार केल्याशिवाय सामाजिक सुधारणा परिपूर्ण होतील असा लोकहितवादींचा आग्रह होता. ( )

## १.२.५ विविध समाजाचे धर्मप्रबोधन कार्य

### (अ) ब्राह्मो समाजाचे महाराष्ट्रातील कार्य

राजा राममोहन रॉय यांनी बंगालमध्ये 'ब्राह्मो समाज' स्थापन केला. त्यामुळे भारतात धार्मिक प्रबोधनास प्रारंभ झाला. देवेंद्रनाथ टागोर, केशवचंद्र सेन, राजनारायण बोस यांच्यामुळे समाजाची लोकप्रियता बंगालमध्ये व देशभर वाढीस लागली. या समाजाचा मुंबईत धर्मसुधारणा व समाजसुधारणा या संदर्भात प्रभाव पडला. न्या. रानडे व डॉ. आर. जी. भांडारकर यांच्या नेतृत्वात १८६७ पासून हे कार्य सुरू झाले. तसे पाहता १८६४ पासूनच केशवचंद्र सेन यांचा प्रभाव मुंबईत दिसत होता. नवशिक्षित लोक याकडे वळू लागले. डॉ. जदुनाथ सरकार व आर. सी. दत्त यांनी बुद्धानंतर हिंदू धर्मातील दोष दाखवून राजा राममोहन रॉय यांनीच धर्मसुधारणा केली व त्यास उदार बनविले असे म्हटले आहे. तसेच डॉ. ए. आर. देसाई यांनी असे म्हटले आहे की, या समाजाने लोकांत राष्ट्रीय जागरूकता निर्मितीसाठी, व्यक्तिस्वातंत्र्य, राष्ट्रीयत्व, सहकार्य व लोकशाहीचे नवे दालनच उघडले. देशाला अनेक नेते ब्राह्मो समाजाने दिले. बिपिनचंद्र पाल, चित्तरंजन दास, आनंदमोहन बोस, प्रतापचंद्र मुजुमदार, रवींद्रनाथ टागोर, अक्षयकुमार दत्त, ईश्वरचंद्र विद्यासागर, सुरेंद्रनाथ बॅनर्जी हे श्रेष्ठ नेते पुरविले. स्वातंत्र्याचा पूर्वरंग तयार झाला. ही चळवळ म्हणजे स्वातंत्र्याचा पहिला निनाद असे डॉ. शिरीषकुमार मित्रा म्हणतात. महाराष्ट्रात न्या. रानडे, आर. जी. भांडारकर, इत्यादींनी प्रेरणा घेऊन 'प्रार्थना समाज' निर्मित केला. सामाजिक व धार्मिक क्षेत्रात बरेच चांगले कार्य घडले.

### (आ) प्रार्थना समाजाचे धर्मप्रबोधन कार्य

महाराष्ट्रात विविध धर्मसुधारणांचे जे आरंभिक प्रयत्न आपण अभ्यासले त्या दोन्ही सभांना अपयश आले. विशेषत: दादोबा पांडुरंग यांनी पुन्हा प्रयत्न केले. इ.स. १८६७ साली दादोबा व आत्माराम या बंधूंनी नव्याने प्रयत्न सुरू केले. प्रार्थना समाजाची स्थापना ब्राह्मो समाजाच्या प्रेरणेतूनच झाली. नंतरच्या टप्प्यात न्या. रानडे, डॉ. भांडारकर, इत्यादींनी ह्या कार्यात स्वत:ला झोकून दिले.

यापूर्वी परमहंस सभेने मराठी समाजात, समाज सुधारण्याचा व सामाजिक जाणीव निर्मितीचा सकारात्मक प्रयत्न केला. त्यासाठी क्रांतिकारक तत्त्वज्ञानच प्रभावी ठरत नाही तर जनतेचे ज्ञान समृद्ध करून त्यांची मने वळवून ते शक्य होते. हा अनुभव पाठीशी घेऊन १८०७ पासून १८५४ पर्यंत डॉ. टेलरच्या प्रयत्नातून ख्रिस्ती धर्मीय झालेल्यांची मुंबई इलाख्यातील वाढलेली संख्या १,१२,४२५ झाली. बालविवाह, बहुपत्नीत्व, लादलेले विधवापण व केशवपन, जातिभेद, स्पृश्यास्पृश्य भेद, स्त्री-

शिक्षणावरील बंदी, इत्यादींमुळे हिंदू समाज दुरवस्थेत होता. शेवटी जगन्नाथ शंकरशेठ (१८०३-१८६५), बाळशास्त्री जांभेकर (१८१२-१८४६), दादोबा पांडुरंग (१८१४-१८८२), लोकहितवादी (१८२३-१८९२), जोतीबा फुले (१८२७-१८९५), इत्यादींनी धार्मिक व सामाजिक मंथन करून नवीन मार्ग दाखवला.

महाराष्ट्रात १८६७ च्या प्रार्थना समाजाअगोदर दोन प्रकारचे नेतृत्व जन्मले होते. पहिल्या विभागाचे नेतृत्व समाजसुधारक शैक्षणिक संस्थांची मंडळे स्थापन करत होते तर दुसऱ्या गटाचे नेतृत्व खुद्द ब्रिटिश सरकारकडेच होते. या प्रयत्नांतून पुढील संस्था उदयाला आल्या.

(१) स्टुडण्टस् लिटररी ॲण्ड सायन्टिफिक सोसायटी (१८४८),
(२) ज्ञानप्रसारक सभा (१८४५),
(३) रॉयल एशियाटिक सोसायटी (१८३४),
(४) बॉम्बे असोसिएशन (१८५२).

तसेच नियतकालिके सुरू झाली. उदाहरणार्थ, दर्पण (१८३२), दिग्दर्शन (१८४०), प्रभाकर (१८४१), ज्ञानोदय (१८४२), ज्ञानप्रकाश (१८४९), सर्व काही वैचारिक मंथनासाठीच होते. सरकारने कायदेशीर प्रयत्न करून जातिभेदरहित समान शिक्षण (१८१७), सतीबंदी, (१८२९), धर्मांतरानंतरसुद्धा पूर्वीची मालमत्ता मिळणारा हक्क (१८३० व १८५०), यात्रा करावर बंदी (१८४०), गुलामगिरी बंदी (१८४३), विधवा पुनर्विवाह कायदा (१८५६), मुंबई विद्यापीठ १८५७ मध्ये स्थापन झाले. महाराजा लिबल केसमुळे हिंदू जागे झाले, अस्वस्थ झाले. केशवचंद्र सेन १८६४ मध्ये मार्गदर्शनार्थ मुंबईत आले पण खूपसा प्रभाव झाला नाही. तरी २० डिसेंबर १८६६ रोजी डॉ. आत्माराम यांनी 'समविचारी लोकांची सभा' बोलावली. चर्चा करून ३१ मार्च १८६७ रोजी 'प्रार्थना समाज' साकार झाला. मात्र नाव 'एकेश्वरवादी मंडळी' असे ठरले. स्वत: आत्माराम पांडुरंग पहिले अध्यक्ष झाले. ३० जुलै रोजी घटना बनविण्यात आली. पुन्हा दुसऱ्यांदा केशवचंद्र सेन इ.स. १८६८ मध्ये मुंबई भेटीस आले. १८६८ मध्ये न्या. रानडे व १८६९ मध्ये डॉ. भांडारकर सदस्य झाले. रानडे यास 'जुन्या भागवत धर्माची शाखा' म्हणत. भागवत धर्म हिंदू धर्मातील प्रोटेस्टंट पंथ होय असे रानडेंचे मत होते. मध्यकाळापासून आध्यात्मिक व सामाजिक प्रगती करण्यासाठी, हीनदलितांना उद्धारण्यासाठी महाराष्ट्रीयन संतांनी सुरू केलेली प्रक्रिया आता प्रार्थना समाज चालवत आहे असेही ते म्हणत. रानडेंनी प्रार्थना समाजासाठी घोषवाक्य ठरविले - ''Love of God, in the service of man''. हा बायबलचा प्रभाव होता.

**(क) न्या. रानडेंनी ठरविलेली प्रार्थना समाजाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे**

★ समाजाची नैतिक प्रगती करणे.

★ ईश्वरपूजेची वर्तमान चौकट काढून तेथे आध्यात्मनिष्ठ दुसरी व्यवस्था देणे.

न्या. रानडे, भांडारकर इत्यादींनी सहा तत्त्वे सांगितली.

(१) परमेश्वर एकच असून तो सृष्टीकर्ता होय. तो चिरंतन, आध्यात्मिक, अनाकलनीय आहे. त्याच्या ठायी सर्व आनंद व चांगले असते. जो सर्वत्र व्याप्त असून सर्व शक्तिमान दयाळू व पवित्र आहे.

(२) ईश्वर आत्म्याचे अद्वैत मानले तरी ईश्वर सगुण मानून ते द्वैतवादी सगुणोपासक व भक्ती मार्गी ठरले. नंतरच्या जगात सुख प्राप्तीसाठी परमेश्वर भक्ती करावी.

(३) प्रेम व ईश्वरावर श्रद्धा हीच खरी भक्ती.

(४) मूर्तिपूजा व मानव निर्मित वस्तूची पूजा ही खरी ईश्वरसाधना होय.

(५) ईश्वराचा पुनर्अवतार होत नाही. कोणताही ग्रंथ बिनचूक व ईश्वरप्रणीत नाही.

(६) सर्व ईश्वराची लेकरे आहेत. त्यात भेदभाव न ठेवल्याने ईश्वर प्रसन्न होतो. तसे करणेच माणसाचे खरे कर्तव्य होय.

**(ख) षडंगाची उपासना पद्धती**

प्रार्थना मंदिरात साप्ताहिक उपासना असून तिची सहा अंगे होती.

(१) **उद्बोधन :** इतर विचार मनातून काढून स्वत:ची व इतर उपासकांची वृत्ती उपासनोन्मुख करणे.

(२) **स्तवन :** ईश्वराचे वैभव, पावित्र्य, तेज, प्रेम, सामर्थ्य आदि गुणांचे स्तवन करणे.

(३) **कृतज्ञता दर्शन :** ईश्वराविषयी कृतज्ञता व्यक्त करणे.

(४) **प्रार्थना :** ओव्या, अभंग व तत्सम प्रार्थना करणे.

(५) **निरूपण :** उपदेशात्मक प्रवचन देणे.

(६) **आरती :** या उपासनेसाठी समाजाने अनेक प्रार्थना मंदिरे बांधली. मुंबईचे प्रार्थना समाज मंदिर सर्वांत प्रसिद्ध आहे.

अशा या समाजाचे अनुयायी सहा प्रकारच्या उपासना स्तरातून वागत.

ही विचारसरणी पुढील मुद्यातून सारांश रूपात लक्षात ठेवता येईल. ईश्वरनिष्ठा, त्याची विविध प्रकारे आळवणी, सर्व त्याची लेकरे म्हणून मूर्तिपूजेऐवजी मानवाशी चांगले वागावे. धर्मग्रंथ मानवनिर्मित आहेत. विश्वनिर्माता ईश्वर दयाळू आहे, त्याची भक्ती करावी.

प्रार्थना समाजाचा विस्तार महाराष्ट्र, गुजरात, आंध्र प्रदेश, तामिळनाडूपर्यंत झाला. प्रार्थना समाजाच्या सामाजिक कार्याचा आढावा आपण पुढील घटकात घेणार आहोत. प्रार्थना समाजाचे सुधारणावादी विचार तत्कालीन समाजाला पेलणारे नव्हते. धर्माचरणाचाच एक भाग समजून सभासद समाजसेवा करत असत.

### (ग) प्रार्थना समाजाचे आधारस्तंभ व त्यांचे धर्मप्रबोधन कार्य

भांडारकरांच्या व न्या. रानडेंच्या कार्याचा परिचय वरील माहितीत आला आहे. येथे इतर महत्त्वाच्या सुधारकांची दृष्टी, कार्य व भूमिकेचा तसेच प्रार्थना समाजाच्या वतीने झालेल्या धर्मप्रबोधन कार्याचा आढावा घेऊ या.

वामन आबाजी मोडक यांनी मराठीतून उपदेशपर व प्रार्थनापर पदे रचली. धर्म व नीतीवर व्याख्याने दिली. ती ग्रंथरूपात उपलब्ध आहेत. विचार, वक्तृत्व या दृष्टीने त्यांची व्याख्याने, प्रार्थना समाज उत्सव प्रसंगीची कीर्तने व त्यातून नवे विषय मांडणे, गोपीचंद चरित्र, येशू चरित्र, एकनाथ चरित्र, सॉक्रेटिस चरित्र ते रंगवत. सुरत येथे गुजरातीतून ते बोलत. त्यांनी अनेक स्थळी हे कार्य करून प्रार्थना समाजाचे विचार विकसित केले.

सर नारायण गणेश चंदावरकर हे प्रार्थना समाजाचे एक महत्त्वाचे आधारस्तंभ होते . राष्ट्रभाषेचे व प्रार्थना समाजाचे ते कार्यकर्ते होते. त्यांनी बी. ए. पास करून 'इंदुप्रकाश' चे संपादन सुरू केले. कायदे पंडित, हायकोर्टाचे जज्ज (मुंबई), दिल्ली दरबारात गव्हर्नर जनरलद्वारा निमंत्रित, १८८५ च्या प्रथम काँग्रेस अधिवेशनात व १९०० च्या लाहोर अधिवेशनात ते हजर होते. ते 'मुंबई युनिव्हर्सिटी फेलो' व 'जस्टिस ऑफ दि पीस' चे मानकरी होते.

ते प्रार्थना समाजाचे सभासद होते. सार्वजनिक आयुष्याला त्यांनी धर्माचे अस्तर चढविले. ते म्हणत, 'आम्ही सर्वांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, धर्मसुधारणेचा प्रश्न हा चळवळींचा पायाभूत झाला पाहिजे. लोकांच्या सुधारणेसाठी त्यांच्या धर्मविषयक समजुतीत सुधारणा करताना व धर्मास प्राधान्य न देता दुसऱ्या मार्गाने प्रयत्न करणे म्हणजे विहिरीतून चाळणीत पाणी काढण्याच्या प्रयत्नासारखे निष्फळ होणार आहे. आपणांस जे योग्य वाटते ते योग्य, सत्य, न्याय्य ठरवून ते कर्तव्यबुद्धीने आचरणात आणावे.

सातारा भागात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी प्रार्थना समाजाचे कार्य मोठ्या जिद्दीने केले. १९०१ ते १९०३ पर्यंत ते इंग्लंडमध्ये राहिले. शिक्षणानंतर मोठ्या अधिकारी पदाची नोकरी न करता १०० रुपये घेऊन त्यांनी प्रार्थना समाजाचे कार्य सुरू केले. समाजसेवा व अस्पृश्योद्धार कार्य केले. हिंदू धर्मातील परंपरा अंधश्रद्धा, चुकीच्या प्रथा, भोळ्या समजुती, कर्मकांड याविरुद्ध आवाज उठवला. प्रार्थना समाजाची तत्त्वे प्रसारित केली. अखिल भारतीय डिप्रेस्ड क्लास मिशन' संस्था स्थापन करून (१९०६) अस्पृश्य समाजात, महाराष्ट्रात व बाहेर शिक्षण प्रसार केला. शाळा निर्मिती केली. अस्पृश्योद्धार परिषदा भरवल्या. १९१० नंतर ते प्रार्थना समाजापासून विलग झाले.

### (ई) प्रार्थना समाजाच्या अपयशाची कारणमीमांसा

प्रार्थना समाजाच्या अपयशास पुढील कारणे जबाबदार ठरली.

(१) प्रवर्तकांतील मतभेद,
(२) आचारविचारांत विसंगती,
(३) मर्यादित जनपाठिंबा व सभासदत्व,
(४) उच्च मध्यमवर्गीयांकडे नेतृत्व,
(५) जनसामान्यांशी तुटलेला संपर्क,
(६) ब्राह्मो समाज ख्रिश्चन प्रभावातून जन्मला हा गैरसमज वाढला.

अच्युतराव कोल्हटकर म्हणतात, 'या समाजाला जनतेला खुलवता आले नाही. सत्यशोधक जलशाला दहा हजार जमायचे. पण प्रार्थना समाजाच्या वाढदिवशी पन्नासही यायचे नाहीत'. तसेच प्रार्थना समाज तार्किक चर्चेचा तर सत्यशोधक समाज अंत:करणाचा फुलोरा. येथे तत्त्वज्ञान (ज्ञानाची उसळी) आहे. सत्यशोधक चळवळीत नाही'. (पण सत्यशोधक समाजाला तत्त्वज्ञान नाही हे म्हणणे योग्य नाही.) या समाजावर महात्मा फुले, टिळक, कर्मठ हिंदू, ज्ञानप्रकाश (पत्रक) व इतर विद्वान टीका करतात. तरी या समाजाचे कार्य प्रभावी होते. यातूनच ना. गोखलेंचा 'भारत सेवक समाज' व रानडेंची 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' या दोन महत्त्वाच्या संस्था निर्माण झाल्या. संत तुकारामादी संतांची वचने प्रार्थना समाजाने मांडून समतेचे धडे दिले.

### स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न – ५

**पुढील विधानांत गाळलेल्या जागी योग्य शब्द भरा.**

(१) -------- यांनी बंगालमध्ये ब्राह्मो समाज स्थापन केला.
(२) महाराष्ट्रात न्या. रानडे, आर. जी. भांडारकर, इत्यादींनी -------- ची स्थापना केली.
(३) -------- हे प्रार्थना समाजाचे पहिले अध्यक्ष झाले.
(४) -------- हे प्रार्थना समाजाचे एक मोठे आधारस्तंभ होते.
(५) -------- यांनी सातारा भागात प्रार्थना समाजाचे कार्य जिद्दीने केले.
(६) --------, -------- व -------- ही तीन कारणे प्रार्थना समाजाच्या अपयशास कारणीभूत ठरली.

### (उ) सत्यशोधक समाज व महात्मा जोतीराव फुले यांचे समाज प्रबोधन

आधुनिक महाराष्ट्रातील मूलगामी समाजपरिवर्तनाच्या चळवळीचे अध्वर्यू म्हणून महात्मा जोतीराव फुले यांचे नाव अग्रगण्य ठरते. त्यांचा जन्म इ.स.१८२७ मध्ये पुणे येथे झाला. त्यांचे कुटुंब मूळचे सातारा जिल्ह्यातील कटगुणचे. पण ते पुरंदर तालुक्यात खानवडीस तर शेटीबा पुण्यात येऊन राहिले. मूळ आडनाव 'गोऱ्हे' होते. वडील गोविंदराव व आई चिमणाबाई पुण्यात राहत. गाद्या, लोड व फुलांचे शेले तयार करून विकण्याच्या व्यवसायामुळे ते 'फुले' म्हणवू लागले. प्राथमिक शिक्षणानंतर त्यांनी स्कॉटिश मिशनच्या इंग्रजी शाळेत शिक्षण

घेतले. ख्रिस्ती मिशनरींविषयी आदर, तळागाळातील लोकांच्या जीवनाचा जवळून परिचय, त्यांच्या सुखदु:खात समरस होणे, मिशनची ईश्वरनिष्ठा, मानवतावाद, धर्मचिकित्सा, भ्रातृभाव यासमोर हिंदूंतील माणुसकीरहित भेदपूर्ण वागणे यामुळे त्यांचे मन बेचैन होई. मित्रपरिवारातील काही मुस्लिमांनी हिंदू धर्मीयांवर भेदभाव, उच्च-नीचपणाबद्दल केलेल्या टीकेमुळे लहाणपणीच जोतीराव प्रभावित झाले होते. ते चिंतनशील व बुद्धिकौशल्यवादी होते. त्यामुळे शेजारी गफारबेग मुन्शी व मेजर लिजिट्साहेब यांनी त्यांच्या शिक्षणाकडे लक्ष देण्यास सांगितले म्हणून वडिलांनी स्कॉटिश शाळेत त्यांना शिकवले. तेथे सदाशिव बल्लाळ गोवंडे, मोरो विठ्ठल वाळवेकर व सखाराम यशवंत परांजपे हे ब्राह्मण विद्यार्थी त्यांचे चांगले मित्र बनले. स्कॉच मिशन व सरकारी इन्स्टिट्यूशनमुळे मला थोडे बहुत ज्ञान प्राप्त झाले, मनुष्याचे खरे अधिकार कळले असे स्वत: जोतीरावांनी म्हटले आहे. ख्रिस्ती मिशनरींची कार्यपद्धती, धर्मोपदेशकांचे व्यक्तित्व यांचा प्रभाव त्यांनी ग्रहण केला.

फुलेंच्या मनावर व विचारांवर थॉमस पेनचा प्रभाव पडला. तो कट्टर एकेश्वरवादी होता. त्याचे - (१) Justice and Humanity (२) An Occusional Letter of the Female Sex (३) Commonsense (४) Rights of Men (५) Age of Reason हे ग्रंथ फुलेंवर प्रभाव करणारे ठरले. शब्दप्रामाण्य नाकारणे, धर्मभोळेपणा व बायबलचे शब्दप्रामाण्य नाकारणारा, देश, वंश, पंथ, लिंग, इत्यादींवरून माणसातील भेदभाव नाकारतो. सर्वांशी बरोबरीने राहणे ईश्वरी योजना होय. त्याच्या मते व्यक्तीची प्रतिष्ठा, स्वातंत्र्य, समता, न्याय, मानवाचे नैसर्गिक हक्क ही तत्त्वे महत्त्वाची होती. "The world is my country, my religion is to do good". हे थॉमसचे म्हणणे फुलेंच्या धार्मिक व सामाजिक सुधारणेचा आधार बनले.

### (क) सत्यशोधक समाजाचा इतिहास

'सत्यशोधक समाजाचा इतिहास'चे लेखक महेश जोशी यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी फुलेंनी स्थापन केलेल्या समाजाला सत्यशोधक का म्हटले हा प्रश्न हाताळला. फुलेंनी या पंथाला 'सत्यशोधक' किंवा दादोजींनी 'मानवधर्म' शब्द वापरला. १८३२ मध्ये मुंबईचा गव्हर्नर लॉर्ड क्लेअर म्हणतो की भारतीय लोक सत्याची फारशी पर्वा करीत नाहीत. हा अपप्रचार जावा व 'सत्यशोधक' नाव आकर्षक व प्रतिष्ठित वाटावे म्हणून फुलेंनी समाजाला 'सत्यशोधक समाज' नाव दिले असे मत डॉ. सरदेसाईंनी 'आधुनिक महाराष्ट्र' (पृ.२५९) मध्ये व्यक्त केले आहे.

### (ख) सत्यशोधक समाजाचे कार्य

फुलेंनी 'गुलामगिरी', 'सार्वजनिक सत्यधर्म', 'शेतकऱ्यांचा आसूड', 'ब्राह्मणांचे कसब', इत्यादी ग्रंथ लिहिले. प्रथम दोन ग्रंथांत त्यांनी ब्राह्मणी धर्माचा ढोंगीपणा, भटभिक्षुक व पुरोहितांकडून होणारी शेतकरी, शूद्रांची फसवणूक, ब्राह्मणी स्वार्थ, अवतार कल्पनेतील खोटेपणा, इत्यादी ब्राह्मणप्रधान बाबींवर हल्ला चढविला.

गेल ऑमवेद यांनी सत्यशोधक समाजाच्या कार्याला चार टप्प्यांत विभक्त केले आहे. (१) १८७३-१८९० (२) १८९०-१९१० (३) १९११-१९१९ (४) १९२० पासून पुढे ब्राह्मणेतर पक्ष (चळवळ). जोतीरावांनी जीवनभर केलेल्या कार्यांपैकी १८४८-६५ पर्यंत दलितोद्धार व स्त्रीदास्य विमोचन हे प्रश्न प्रभावीपणे हाताळले. इ.स. १८६५-९० या दुसऱ्या कालखंडात सत्यशोधक समाजाची स्थापना केली. धार्मिक व सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी १८५७ ला बॉम्बे युनिव्हर्सिटीच्या स्थापनेनंतर महाराष्ट्रात एक नवी पिढी जन्मली. इंग्रजी साहित्य, सुधारणा, राष्ट्रधारणा, शास्त्रांची नवी माहिती, कला याकडे वळण होऊन जुने शास्त्री व पंडितांचे पुढारीपण संपले आणि महाराष्ट्रात दोन सामाजिक विचारप्रवाह जन्मले. (१) परंपरानिष्ठ जहाल संप्रदाय (२) समन्वयशील प्रागतिक संप्रदाय दोन्हींचे अधिष्ठान राष्ट्रवादच होते. धार्मिक व सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्यासाठी फुलेंनी सत्यशोधक समाज उभा केला.

पहिल्या कालखंडात ब्राह्मणेतरांनी ब्राह्मणांच्या धार्मिक आणि सामाजिक हक्कांना आव्हान दिले. पुरोहितांचा प्रभावीपणे विरोध केला. स्वत: धार्मिक व सामाजिक कृत्यांवर भर दिला. परंपरा व अंधश्रद्धांना आव्हान देऊन पुरोहितांविरुद्ध यश मिळविले. पुणे, मुंबई, अहमदनगर जिल्ह्यात प्रसार केला. 'दीनबंधू' ने १८८३ मध्ये 'शेतकऱ्यांचा आसूड' ग्रंथ छापला. शेतकरी मागण्या व असंतोष अर्जाद्वारे सरकारला कळविला.

दुसऱ्या कालखंडात (१८९५-९६) च्या प्लेगच्या साथीमुळे व दुष्काळामुळे समाजाला ओहोटी लागली. विदर्भात काही खेडी मोठी शहरे आणि दक्षिणेत कोल्हापूर, बेळगाव या भागात ती मर्यादित राहिली. राष्ट्रवादी नेत्यांनी या समाजाविरुद्ध प्रभावी प्रचार केल्याने अधिकच मर्यादा पडली. नंतर १९११ मध्ये कोल्हापुरात स्थापना झाली. बडोदा संस्थान प्रमुख क्रमश: शाहू महाराज व गायकवाड यांनी चळवळीला (ब्राह्मणेतर) उचलून धरले व चळवळ पुन्हा वाढली.

तिसऱ्या टप्प्यात संपूर्ण महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा येथे चळवळ पसरली. पुणे, नाशिक, ठाणे, सासवड, अहमदनगर, निपाणी, बेळगाव, अडगाव, जळगाव, अकोला, इंदापूरला शाखा स्थापन झाल्या. १९१९ च्या मॉंटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणा कायद्यात सक्रिय सहभाग देऊन सत्यशोधक समाजातूनच १९२० ला ब्राह्मणेतर पक्ष जन्मला व चौथा टप्पा सुरू झाला. राजर्षी शाहूंच्या नेतृत्वात सत्यशोधक समाजाने केलेले कार्य प्रभावी ठरले. कोल्हापूर व सातारा हे या समाजाचे बालेकिल्ले ठरले. शेजारीही हे कार्य विस्तारले.

### (ग) सार्वजनिक सत्यधर्म

फुले यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' या ग्रंथात सार्वजनिक

सत्यधर्माचे अधिष्ठान मानवी स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व या तत्त्वावर अधिष्ठित केले. विश्वकुटुंबवादाचा हा जाहीरनामाच होय. त्यांनी संस्थेचे ब्रीदवाक्य 'सत्यमेव जयते' ठेवले. सत्य व नीती या तत्त्वांना महत्त्व दिले. ते लिहितात, 'सत्य सर्वांचे आदीघर। सर्व धर्मांचे माहेर' ब्राह्मणी बनावट कार्यसाधक ग्रंथांपासून लोकांना दूर ठेवले. निर्मिक (ईश्वर) कसा आहे. धर्म स्वरूप काय आहे व खरा सत्य धर्म पाळणारा कोण याविषयी जोतीरावांचे विचार चिंतनीय ठरतात.

फुले 'एक ईश्वर एक धर्म' या तत्त्वाचा पुरस्कार करत. ते म्हणत -

''मानवाचे धर्म नसावे अनेक। निर्मिक तो एक। जोती म्हणे॥
कोणास न पिडी। कमावले खाई। सर्वा सुख देई। आनंदात॥
खरी हीच नीती। मानवाचा धर्म। बाकीचे अधर्म। जोती म्हणे॥''

दगड वा धातूची मूर्ती, विविध रूपे मानून भजन-पूजन, किर्तन करू नका. निर्मिक परिपूर्ण असून त्याला कशाचीही गरज नाही. ग्रह, राशी, नक्षत्रे, तीर्थयात्रा, ज्योतिष सर्व मानू नका. त्यांनी 'जगी सर्व सुखी असा कोण आहे, विचारी मना तूची शोधून पाहे' या श्लोक कर्ते, समर्थ रामदासांवर टीका केली. 'सार्वजनिक सत्यवर्तनी' साठी त्यांनी ३३ नियम 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तकात दिले. त्यापैकी महत्त्वाचे पुढीलप्रमाणे आहेत.

निर्मिकास मान द्यावा, पूजा करू नये, परस्पर बंधुभाव ठेवा, विचारस्वातंत्र्य प्रत्येकास आहे. मादक पदार्थांचे सेवन करू नका. असत्य बोलणे, व्यभिचार, चोरी करून नका. धर्माचे पुस्तक सर्वांसाठी खुले असावे. पिढीजात श्रेष्ठत्व नसते. विद्यादानात दुजाभाव नको. अपंग, महारोगी, अनाथास दानधर्म करा.

फुलेंनी जुनी समाज परंपरा घालवा म्हणताना नवीन समाज रूपे दिली. ब्राह्मणांची मंगलाष्टके व मंत्र लोकांना कळत नाहीत म्हणून त्यांनी सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टक व सर्व पूजाविधी तयार केले आणि छापून वाटले. त्यांना मुस्लीम व ख्रिश्चन धर्म संस्थापकांचा आदर वाटायचा. ब्राह्मणी संस्कृतीतील धार्मिक वाङ्मय म्हणजे ब्राह्मणेतर समाजावरील जाचक बंधने, मंदिर प्रवेशाला अडचणी हे प्रकार त्यात नाहीत.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींच्या मते, 'जोतीबाचा विश्वकुटुंबवादाचा सार्वजनिक सत्यधर्म' हा जाहीरनामा आहे. सार्वजनिक सत्यधर्मात जोतीबांच्या महात्मतेचे तेजोवलय पूर्ण प्रकट झाले आहे. त्याचे तीन भाग दिसतात. मूलभूत मानवी हक्क, त्यावर आधारित विश्व कुटुंबवाद आणि जीवनाचे व विश्वाचे सत्य स्वरूप प्रकट करणारा बुद्धिवाद. पश्चिमेकडून म्हणजे आधुनिक पाश्चिमात्य संस्कृतीकडून त्यांना या तीन प्रेरणा मिळाल्या'. भट-पुरोहित मध्यस्थ होत. ते म्हणत -

'सर्वसाक्ष जगत्पती। त्याला नको मध्यस्थी।'

तसेच ते म्हणतात-

जगामाजी धर्म अगणीत होती। लढाया खेळती। रेड्यापरी॥
रेडे धरणारे प्राणास मुकती। कित्येक म्हणती। स्वर्गी गेले॥
कोणी म्हणे सर्व महिर झाले। जन्नतीस गेले। कोणी म्हणे॥
सद्विवेकावीण सर्व भांबावले। रक्तपाती झाले। जोती म्हणे॥

अर्थात, सद्विवेक ठेवा, बुद्धीची कास धरा, नीतिपूर्ण आचरण करा हीच निर्मिताची भक्ती होय.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ६*

**पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगून कंसात (X) किंवा (✓) अशी खूण करा.**

(१) आधुनिक महाराष्ट्रातील मूलगामी समाज परिवर्तनाच्या चळवळीत महात्मा जोतीबा फुले यांचे नाव अग्रगण्य ठरते. ( )

(२) महात्मा फुले यांच्यावर थॉमस पेन या विचारवंताचा प्रभाव पडला होता. ( )

(३) महात्मा फुले यांनी धर्माचा ढोंगीपणा, पुरोहितांकडून होणारी शेतकरी, शूद्रांची फसवणूक, अवतार संकल्पना यावर कडाडून हल्ला केला. ( )

(४) महात्मा फुले एक ईश्वर, एक धर्म या तत्त्वाचा पुरस्कार कधीही करत नसत. ( )

(५) महात्मा फुले यांनी जुनी समाज परंपरा घालवा असे म्हणताना नवीन रूपे प्रतिमाने मात्र दिली नाहीत. ( )

## (ऊ) आर्य समाजाचे महाराष्ट्रातील धार्मिक प्रबोधन

महर्षी दयानंद सरस्वतीप्रणीत 'आर्य समाज' ही वैदिक धर्माची सुधारित स्वरूपातील मांडणी होय. ब्राह्मो समाज, प्रार्थना समाजाप्रमाणेच आर्य समाजानेही भारतात महत्त्वपूर्ण योगदान दिले. राष्ट्रवादाला, धर्मसंघटनाला, धर्मांतराला आळा या संबंधात प्रखर भूमिका घेऊन दोषमुक्त, स्वच्छ धर्म स्वरूप देण्याचा या समाजाने प्रयत्न केला. शुद्ध वैदिक तत्त्वावर भारतीय वैदिक धर्माची पुनर्रचना करून रूढी व त्याज्य परंपरा यांविरोधी आवाज बळकट केला. धर्मशुद्धीसोबत धर्मांतरितांचे शुद्धीकरण करण्यावर भर दिला. इंग्रजी सत्ता व ख्रिस्ती धर्म या दोन व्यापक संकटांना त्यांनी मर्यादित करण्यासाठी प्रयत्न केले. धार्मिक व सांस्कृतिक परंपरा वाढविली.

स्वामी दयानंद सरस्वतींचे मूळ नाव मूळशंकर असून त्यांचा इ.स. १८२४ मध्ये जन्म काठेवाडातील मोरवी राज्याच्या टकारा गावी झाला. त्यांचे कुटुंब शैव परंपरा पाळणारे ब्राह्मण होते. वडील अंबाशंकर यांनी त्यांना पाचव्या वर्षापासून संस्कृत अभ्यासाकडे वळवले. चौदाव्या वर्षापर्यंत त्यांनी चार वेदांचा अभ्यास केला. साहित्य, व्याकरण, तर्कशास्त्रातही ते पारंगत झाले. चौदाव्या वर्षी शिवरात्रीला जागरणाच्या वेळी शिवपिंडीवर उंदराने केलेला उपद्रव पाहून मूर्तीत जर देव आहे तर त्याच्या माथ्यावर उंदीर कसा फिरतो? देव त्याला विरोध का करीत नाही? वडिलांनी व इतरांनी दिलेल्या उत्तराने ते संतुष्ट झाले नाहीत. मूळशंकरच्या चिंतनशीलतेमुळे तो संन्यस्त वृत्तीकडे वळू नये म्हणून वडिलांनी त्यांचे लग्न ठरविले. मात्र त्यांनी गृहत्याग केला

व १८४५ मध्ये संन्यासाश्रम स्वीकारला. त्यानंतर त्यांचे नाव 'दयानंद' झाले.

त्यांनी खऱ्या धर्माचे स्वरूप, ईश्वर व इतर अनेक प्रश्नांविषयी चिंतन केले. पंधरा वर्षे ते दूध व फळे यांवर निर्वाह करत विंध्य व हिमालयाच्या क्षेत्रात एकांतात राहिले. अनेकांकडे राहूनही खरा गुरू लाभला नाही. १८६० मध्ये मथुरेला अंध, वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध विरजानंदांची भेट झाली. खरा गुरू लाभला. वैदिक धर्म व संस्कृतीचे तसेच शिक्षणाचे निखळ स्वरूप त्यांना ज्ञात झाले. वर्तमान शिक्षण व धर्मातील दोष, मूर्तिपूजा, अनिष्ट प्रथांचा नाश व जगाचा उद्धार यासाठी अडीच वर्षे तेथे राहून दयानंदांनी ज्ञानपिपासा पूर्ण केली. निःस्वार्थ गुरूला काय गुरुदक्षिणा द्यावी? गुरूने मागितले – सत्याचा प्रसार, पौराणिक हिंदू धर्माचे उच्चाटन आणि वैदिक ज्ञानाची पुनर्स्थापना.

दयानंदानी यासाठी संपूर्ण जीवन ब्रह्मचारी राहून कार्य करण्याचा निश्चय करून गुरुदक्षिणा दिली.

१८६३ पासून त्यांनी शास्त्रार्थ करून मूर्तिपूजेचे अंधरूढींचे खंडन सुरू केले. वैदिक साहित्याचे खरे व शुद्ध स्वरूप त्यांनी आपल्या प्रकांड पांडित्यपूर्ण चिंतनातून साकार केले. अस्खलित संस्कृतमधील शास्त्रार्थ व व्याख्यांने या बळावर खोट्या पंडितांवर त्यांनी विजय मिळवले. बंगालच्या व्याख्यानात केशवचंद्र सेन यांच्या सूचनेमुळे मातभाषा गुजराती व संस्कृतची विद्वत्ता असूनही त्यांनी राष्ट्रभाषा हिंदीतून (जनभाषेतून) धर्म व्याख्याने सुरू केली. सर्वसामान्यांना त्यांचे म्हणणे कळू लागले. लाखो लोक त्यामुळे लाभान्वित झाले.

**(क) आर्य समाज स्थापना व तत्त्वे**

स्वामी दयानंदानी मुंबई येथे चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १९३२ (१० एप्रिल १८७५) रोजी आर्य समाजाची स्थापना केली. हा मान महाराष्ट्राची राजधानी मुंबईला मिळाला. येथूनच धर्म व समाजजागृतीचा शंखध्वनी करून त्यांनी देशव्यापी आर्य समाजरूपी आंदोलन निर्माण केले. त्यांनी सर्वांना कळावे म्हणून 'सत्यार्थ प्रकाश', 'ऋग्वेदादिभाष्यभूमिका', तसेच चार वेद ग्रंथांची हिंदी भाषेतून रचना केली. त्यावरून त्यांचे संपूर्ण वैदिक साहित्याचे ज्ञान किती व्यापक होते हे दिसून येते. त्यांनी 'आर्य समाजाची' दहा तत्त्वे सांगितली. त्यातून आर्य समाजाच्या कार्याची दिशा ठरली.

**(ख) आर्य समाजाची दहा तत्त्वे व तत्त्वज्ञान**

(०१) परमेश्वर एक आहे. तो सर्व शक्तिमान, अनादी, अनंत, निराकार, सर्वसाक्षी व दयाळू आहे. तो विश्वाचा पालक, निर्माता व नियंता आहे.

(०२) तोच सर्व ज्ञानाचा आदी, उगम असून सर्व वस्तू परमेश्वराच्या स्वरूपात ज्ञात आहेत.

(०३) त्यावर विश्वास ठेवून प्रत्येक जण त्याचे सानिध्य मिळवू शकतो. मध्यस्थ नको.

(०४) सर्व ज्ञानाचे भांडार वेद आहेत.

(०५) ते ईश्वरप्रणीत असून त्यांचे वाचन, श्रवण व शिकणे प्रत्येक आर्याचे कर्तव्य आहे.

(०६) वेद पवित्र धर्मग्रंथ आहेत. त्यांचे प्रामाण्य मानावे. (Go back to Vedas) 'वेदाकडे चला' ही घोषणा त्यांनी दिली.

(०७) प्रत्येकाने सत्याचा स्वीकार व असत्याचा त्याग करावा.

(०८) अज्ञान नष्ट करूनच प्रत्येकाने ध्येय मानून ज्ञान प्रसार करावा.

(०९) नीतीने वागा, अनीतीचा त्याग करा.

(१०) प्रत्येकाने स्वार्थाला दुय्यम मानावे, स्वार्थापेक्षा दुसऱ्याच्या उत्कर्षात आपलाही फायदा आहे असे समजून वागावे. मनुष्याचे सर्वांगीण कल्याण साधावे. दररोज ब्रह्मयज्ञ, देवयज्ञ, पितृयज्ञ, अतिथियज्ञ, बलियज्ञ करावेत. चातुर्वण्य गुणकर्मांने मानावेत. मूर्तिपूजा, अवतारवाद, तीर्थे, व्रते, पौराणिक अनुष्ठान, श्राद्ध, पुरोहितांचे कर्मकांड, जातिभेद त्यागावे. वेद म्हणजे 'ज्ञान'. स्त्री, शूद्र सर्वांना ते ज्ञान घेता येते.

आर्य परंपरा व वैदिक धर्माची जगाला दीक्षा देणे. 'कृण्वन्तो विश्वामार्यम्' फळ प्राप्तीची आशा न ठेवता कर्म करणे. ईश्वर अवतार घेत नसतो. संपूर्ण मानवाचे सर्वांगीण कल्याण हे मानवाचे खरे कर्तव्य आहे असे ते म्हणत. नियोग पद्धती दयानंदांना विशेष प्रसंगी मान्य होती. सामाजिक कार्याचा आढावा आपण पुढे घेणार आहोतच.

**(ग) आर्य समाजाचे योगदान**

(१) आर्य समाजाने मूर्तिपूजेला विरोध करून स्तुती, प्रार्थना, उपासना, वाणी, वर्तन व विचार पावित्र्याला प्राधान्य दिले.

(२) शुद्धी चळवळ चालवून धर्मांतराला रोखले. इतर धर्मांत गेलेले पण पुन्हा हिंदू होऊ इच्छित असतील तर त्यांना पुन्हा धर्मविधी करून हिंदू बनवले.

(३) मुंबईत जन्मलेला हा समाज पंजाबात इतरत्र फोफावला.

(४) अनिष्ठ प्रथा, रूढी, परंपरा बुद्धीच्या कसोटीवर न पटणाऱ्या बाबी दयानंदांनी नाकारल्या.

(५) स्त्री-शिक्षण व गुरुकुल शाळा, महाविद्यालय यांचा प्रारंभ झाला.

(६) विविध देवदेवतांना न मानता, बळी न देता एकाच ईश्वराची उपासना करावी. ज्ञाननिष्ठ, बुद्धिनिष्ठ धर्म समजून घ्यावा.

(७) आर्य समाजाच्या शाखांमार्फत आर्य परंपरेचे संस्कार, यज्ञ पद्धती, ईश्वराचे वर्णन, हवन व धर्मविधींचे शुद्ध रूपात संस्कार केले.

(८) महाराष्ट्रात सर्वच शहरांत व गावोगावी शाखा सुरू झाल्या. हैद्राबाद मुक्ती लढ्यात धारूर, लातूर, सोलापूर, उदगीर, निलंगा, गुंजोरी, इत्यादी शाखांनी प्रभावी कार्य केले.

हिंदूंचे रक्षण केले. देशभर राष्ट्रीय भावना वाढवून लढाऊ धर्म व नेते पुरविले.

### (ए) स्वामी विवेकानंद व रामकृष्ण मिशन

रामकृष्ण परमहंस (मूळ नाव गदाधर चटर्जी) यांचा जन्म १८३६ मध्ये बंगालमध्ये झाला. १८८६ मध्ये त्यांनी शरीर त्याग केला. परमहंसांनी हिंदू धर्माच्या तत्त्वज्ञानाचा तेजस्वी व स्वयंभू पैलू जगासमोर मांडला. सगुण-निर्गुण दोन्ही प्रकारची ईश्वरभक्ती, सर्व धर्मांच्या शिकवणीतून ईश्वराप्रत जाता येते. उपासनेचे प्रकारही वेगवेगळे असू शकतात. लोकसेवा हीच ईश्वर सेवा होय. त्यांनी धर्मचळवळीला सतेज बनवले.

स्वामी विवेकानंद (नरेंद्र) हे त्यांचे आवडते शिष्य. विवेकानंदांचा जन्म १८६३ मध्ये झाला. १९०२ मध्ये त्यांनी बेलूर मठात शरीर त्याग केला. शिक्षित असलेला पदवीधर जेव्हा रामकृष्णांच्या सानिध्यात आला तेव्हा तो 'ईश्वर पाहिला आहे काय'? असा प्रश्न करतो. 'होय, अगदी तू मला पाहतोस त्याहून अधिक स्पष्टपणे मी त्याला पाहू शकतो' असे उत्तर रामकृष्ण देतात. अध्यात्म, हिंदू धर्म, वेदांत व सर्वधर्मसमभावाचे तत्त्वज्ञान नरेंद्राला आवडले. 'मनुष्यमात्राच्या ठायी आध्यात्मिक जागृती घडवून आणण्याचा व त्यांची दुःखे निवारण करण्याचा' गुरूंचा संदेश घेऊन विवेकानंदांनी १८९३ मध्ये अमेरिकेतील सर्वधर्म परिषद जिंकून युरोप अमेरिकेतील भारतीय धर्म, आध्यात्माचा संदेश देऊन स्वदेश बांधवांना जागे केले. हिंदुस्थानचे गुरुपद जगाला पटवून, देश बांधवांनाही त्यांनी स्वतःच्या दोषापासून धर्म व समाज स्वच्छ करण्याचा संदेश देण्यासाठी व मानवसेवा हीच ईश्वर सेवा समजून मानवी कार्य करण्यासाठीच रामकृष्ण मिशनचे कार्य सुरू केले. महाराष्ट्रात आज अनेक ठिकाणी त्यांच्या शाखा आहेत. धर्म, समाजकार्य व प्रकाशनाच्या कार्यात नागपूर शाखा महत्त्वाची आहे. बुलढाणा जिल्ह्यात हिवरा आश्रम व महाराष्ट्रात इतर अनेक ठिकाणी धर्माचा संदेश देणारी त्यांची केंद्रे चालतात.

### (ऐ) थिऑसॉफिकल सोसायटी

या धर्मसंप्रदायाची स्थापना न्यूयॉर्क (अमेरिका) येथे १८७५ मध्ये झाली. महर्षी दयानंदांनी थिऑसॉफीचे संस्थापक रशियन विदुषी मॅडम ब्लॅव्हाटस्की व अमेरिकन लष्करी अधिकारी कर्नल ऑलकॉट यांना हिंदुस्थानात येण्याचे निमंत्रण दिले. त्यांनी १८७९ मध्ये मुंबईस भेट देऊन तेथील व्याख्यानात महत्त्वाच्या बाबी मांडल्या. हिंदी राष्ट्राचे नेतृत्व हिंदी पुढाऱ्यांनीच केले पाहिजे. हिंदुस्थानने आध्यात्मिक संस्कृतीचा अभिमान कधीच सोडू नये. यामुळे लोकांना त्यांच्याबद्दल आदर वाटू लागला. १८८२ मध्ये मद्रासला शाखा होऊन ॲनी बेझंटबाईंनी प्रभावीपणे हे धर्मप्रसार कार्य केले.

थिऑसॉफी म्हणजे ईश्वरप्राप्ती करून देणारा संप्रदाय. हा सर्व धर्मसंग्रहक असून हिंदू धर्म व आध्यात्मावर भर देणारा संप्रदाय होय. ब्रह्म, कर्म, पुनर्जन्म, मोक्ष, निर्वाण यावर श्रद्धा ठेवणारा असून सर्वशक्तिमान ईश्वर एकच आहे. हिंदू धर्म व तत्त्वज्ञानाचे त्यांनी पुनरुज्जीवन सुरू केले. इतर धर्मांवर टीका केली नाही. बेझंट बाई तर भारतालाच मातृभूमी मानत. त्या कृष्णभक्त बनल्या. त्यांनी विश्वबंधुत्वाचा प्रसार केला. हिंदू, मुसलमान ख्रिस्ती, पारशी, बौद्ध अशा सर्व धर्मांचा त्यांनी समावेश करूनच व्यापक विचार ठरवले. मुंबई शाखेचे अध्यक्ष मालवणकर होते. प्रमुख व्यवस्थापक लोकहितवादी होते. ही शाखा १८ ऑगस्ट १८७९ रोजी स्थापन झाली होती. धर्मपंथासोबत आचार, विचार आणि व्यवहार हे तीनही संदर्भ घेऊन धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय असे विषय त्यांनी हाताळले. देशात ३७५ शाखा निर्माण झाल्या. एकट्या महाराष्ट्रात ७५ शाखांची निर्मिती झाली. विद्वत्ता, सत्ता व संपदा असलेल्या मंडळींवर यांचा प्रभाव पडला.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ७*

**पुढील विधानांत गाळलेल्या जागी योग्य शब्द भरा.**

(१) महर्षी दयानंद सरस्वती यांनी ------- ची स्थापना केली.
(२) आर्य समाजाची स्थापना ------- येथे झाली.
(३) आर्य समाजाने अनुष्ठान, जातिभेद, कर्मकांड यांना ------- मानले.
(४) रामकृष्ण मिशनने ------- सेवा ही ईश्वर सेवा मानली.
(५) ------- म्हणजे ईश्वरप्राप्ती करून देणारा संप्रदाय होय.
(६) ------- यांनी थिऑसॉफिकल सोसायटीच्या माध्यमातून मोठे कार्य केले.

## १.२.६ विष्णुबुवा ब्रह्मचारी यांचे जागृती कार्य (१८२९-१८७१)

विष्णुबुवा ब्रह्मचारी (भिकाजी गोखले) यांचा जन्म रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात शिरवली येथे इ.स. १८२९ मध्ये झाला. मौजी बंधन, वेदाध्ययन व सुरेख, वळणदार लेखनासोबत त्यांनी व्यावहारिक शिक्षणही घेतले. सुरुवातीला गरिबीमुळे त्यांनी महसूल खात्यात नोकरी धरली. आईने त्यांना शेती, बागाईत, गुरे चारणे, लाकुड फोडणे अशा कामांत गुंतवले. त्यांनी नोकरी सोडली. काही दिवस महाडला किराणा-भूसार दुकानात काम केले. संगमेश्वर (रत्नागिरी) कस्टम खात्यात नोकरी करून नंतर सरकारी नोकरीची पात्रता परीक्षा दिली. त्यांचा ओढा व्यावहारिक जीवनापेक्षा धर्म, धर्मग्रंथ, संस्कृतचा अभ्यास याकडे होता. विवेक सिंधू, एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, दासबोध, बोधसागर यासारखे ग्रंथ अभ्यासून १३ व्या वर्षी त्यांनी ईश्वरप्राप्तीसाठी गृहत्याग केला. सप्तशृंगीच्या डोंगरावर तपाचरण करून त्यांना आत्मज्ञान व साक्षात्कार झाला. वैदिक धर्माचे श्रेष्ठत्व पुन्हा प्रस्थापित करण्याचा संकल्प करून नाशिक, पंढरपूर येथे लोकांना वैदिक धर्माचे रहस्य समजावले. 'भावार्थ सिंधू' हा पाच प्रकरणांचा ओवीबद्ध ग्रंथ लिहिला. 'सेतुबंध', 'वेदोक्त

धर्मप्रकाश', 'चतु:श्लोकी श्री भागवत', 'सुखदायक राज्य प्रकरणी निबंध', 'बोधसागर' हे ग्रंथ लिहिले. महादेवशास्त्री कोल्हटकरांच्या परिचयानंतर त्यांनी सांगली, मिरज, वाई, पुणे, सातारा येथे व्याख्याने दिली. मुंबईलाही त्यांनी ५० सभा घेतल्या. एकीकडे त्यांनी पाखंड मतखंडन केले तर दुसरीकडे खिस्ती धर्म प्रसारकांपासून दीन-दुबळ्यांना धर्म परिवर्तनापासून वाचविले. खिस्ती धर्मांतर परतवून हिंदू धर्म रक्षणार्थ त्यांनी प्रयत्न केले. त्यांनी हिंदू समाजाच्या उत्कर्षासाठी समाजरचनेत आमूलाग्र बदलही सुचविले.

## १.२.७ धर्मप्रबोधन : काही संदर्भ

ग. बा. सरदार यांनी नवसंप्रदायांच्या (मानवधर्म सभा, परमहंस सभा, प्रार्थना समाज, इत्यादी.) अपयशाची पुढील कारणे दिली आहेत.

(१) खिस्ती धर्माची उसनवारी त्यामुळे लोकांनी त्यांना 'परके' समजले.

(२) नवधर्म भक्ताची मतभिन्नता व हिंदूंचे (टिळकांसह) त्याकडे दुर्लक्ष व टीका.

(३) सुधारकांच्या आचारविचारात एकवाक्यता नसणे.

(४) धर्मक्रांतीचे बरेच प्रयोग गुप्तपणे चालत.

(५) हे सर्व धर्मसुधारक परसत्तेचे ताबेदार किंवा भाट बनले होते. यामुळे बहुजन समाजातील धर्मक्रांती घडली. ते आपण फुले व इतरांच्या वर्तनात पाहिले.

पं. रमाबाई, डॉ. गोवंडे सारख्यांनी खिस्ती धर्म स्वीकारला. कविवर्य रेव्हरंड टिळक यांनी मत परिवर्तनामुळे खिस्ती धर्म स्वीकारला तर काहींनी (केशवचंद्र सेन, इत्यादी.) खिस्ती धर्माशी तन्मय होऊन फक्त शिक्कामोर्तब मान्य न करता त्याप्रमाणे वागत राहिले. तिसरा एक प्रवाह होता खिस्ती धर्मातील समता, जनसेवा व पाश्चात्य राष्ट्रातील बुद्धिवाद, भौतिकवाद यांकडे वळून हिंदू धर्मातील दोष दर्पण करणारा. उदाहरणार्थ, लोकहितवादी, महात्मा फुले, इत्यादींनी या पुढे प्रवाहाचे प्रतिनिधित्व केले. गोपाळराव आगरकर (१८५६-१८९५) यांना परमेश्वराचे स्वरूप अगम्य वाटायचे. नास्तिक नसले तरी ते म्हणत 'जगत कारण आहे (ईश्वर) हे आम्हांस कबूल आहे. पण आमच्या सध्याच्या ज्ञानेंद्रियांनी खरे ज्ञान होण्याचा संभव नाही. धर्माचा आरंभ पिशाच्च कल्पनेपासून झाला आहे व मनुष्याने प्रत्येक देवता आपल्या स्वभावाच्या वळणावर नेली आहे. परमेश्वर जीवास अगम्य आहे, अशी बुद्धीची भावना होऊ लागते'. पाश्चात्य संस्कृतीतील बुद्धिवाद व व्यक्तिस्वातंत्र्य या नवतत्त्वांच्या निकषावर आपल्या हिंदू धर्माची तत्त्वे घासून पाहून ती हिणकस असतील तर त्यागण्याचा सल्ला ते देतात.

दा. न. शिखरे यांनी रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, स्वामी रामतीर्थ व योगी भांडारविंद या संत चतुष्ट्यांचा यांचा उल्लेख केला आहे. यांचे शिष्य व शाखा कार्य महाराष्ट्रात चालू आहे. आंग्ल शिक्षित तरुण मंडळींवर त्यांची चांगलीच छाप उमटली होती. राजकारण त्यागून 'वासुदेव सर्वमिति' चा साक्षात्कार मिळवून पूर्ण योग, दिव्य जीवन, अतिमानस यांविषयी नव्याने विचार द्रष्टा योगी श्री. अरविंद घोष यांनी मांडले. पाँडिचेरीहून श्री. अरविंदाश्रमामार्फत 'संजीवन' मराठी मासिक व श्रीमाताजी प्रसिद्ध करण्यात येते. श्रीअरविंदाच्या ग्रंथांची मराठी भाषांतरे झाली आहेत. बरेच महाराष्ट्रीयन तेथे राहतात. स्वामी रामतीर्थांनी आधुनिक संत म्हणून असेच धर्मसमन्वयवादी विचार मांडले.

लोकमान्य टिळकांनी धर्मविषयी काही विचार मांडले. त्यांनी 'गीतारहस्य' ग्रंथ लिहिला. श्री. अरविंद म्हणतात, 'भारतीय आत्मविद्येचा उत्कृष्ट परिणाम म्हणजे गीता. जीवनाचे, कर्माचे, मानवी अस्तित्वाचे व मानवसेवेचे महत्त्व ठसवणारा जो संदेश गीता देते, तो आधुनिक ध्येयवादाशी सुसंगत कसा आहे हे 'गीतारहस्य' ने दाखवले आहे. पं. रमाबाईंच्या 'शारदासदन' मार्फत आतून धर्मप्रसार चालू असल्याचे त्यांनी सप्रमाण मांडले. 'गणेशोत्सव' हे धर्मचक्र ठरले. सार्वजनिक स्वरूपात गणपती उत्सव करण्याची परंपरा, व्याख्याने, प्रवचने, मेळे यांद्वारा ज्ञानप्रसार करून जनजागृती घडवून आणण्याची १८९३ ची परंपरा महाराष्ट्रात व देशातील इतर प्रांतात धर्मभावना जागवत आहे. हिंदू समाज संघटनेला हे पोषक ठरले आहे. समाजात धर्मबुद्धीचे जतन व्हावे असे त्यांना वाटे. धर्मातील तत्कालीन व परिवर्तनीय भाग असेल तर त्याचा त्याग करण्यास ते मुळीच कचरत नसत. अस्पृश्यता त्यांना मान्य नव्हती. १९१८ च्या मुंबईच्या इतिहास प्रसिद्ध परिषदेत त्यांनी अस्पृश्यतेला 'चले जाव' ची नोटीस दिली.

रँग्लर परांजपे यांनी १९०४ मध्ये 'हिंदू धर्म म्हणजे एक वेडगळ समजुतीचा भारा' असा लेख लिहिला होता. त्याला प्रत्युत्तर देताना टिळकांनी लिहिले 'हिंदू धर्माइतका आग्रहशून्य धर्म दुसरा कोणताच नाही. ज्याने त्याने आपापल्या धर्मात राहून आत्म्याचे कल्याण करावे, असे हिंदू लोक समजतात'. 'तस्मात् शास्त्रं प्रमाणंते' अशी त्यांची भूमिका असली तरीही त्या शास्त्र वचनांना आपल्या बुद्धीचा निकष लावण्यास ते चुकत नसत. हिंदू धर्माची व्याख्या करताना ते लिहितात -

'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु। साधनानामनेकता।।
उपास्यानामनियम:। एतद्धर्मस्य लक्षणम्।।'

यानुसार हिंदू धर्म व्यापक व सहिष्णू होय. 'भारत धर्म महामंडळात त्यांनी व्याख्यानातून हिंदू धर्मातील बारीक सारीक भेदभाव नष्ट होऊन तो एक बलिष्ठ व संघटित धर्म होईल' असा आशावाद मांडला होता. त्यांच्या 'गीतारहस्य' तत्त्वज्ञानातील प्रसारामुळे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात अनेक प्रचारक फिरले व त्यामुळे महाराष्ट्रातील धार्मिक जीवनात नवचैतन्याची प्रचंड लाट उठली. जशी इतर काळात कधीच उठली नाही. पौर्वात्त्य व पाश्चात्त्य धर्मप्रवृत्तींचे मिश्रण त्यांना मान्य नव्हते.

महात्मा गांधींच्या ईश्वरनिष्ठेची, मानवधर्माची व जनसेवेची छाप त्यांच्या लाखो अनुयायांवर पडली. महाराष्ट्रात विनोबांसारखे शिष्य जन्मले. त्यांनी मानवधर्माला महत्त्व दिले.

अस्पृश्यांना मंदिर मुक्त करण्यासाठी साने गुरुजींसारखे सरसावले. विनोबांनी भूदान यज्ञरूपी धर्मचक्र व गीताई, गीता प्रवचने, दानयज्ञविषयक केलेली मीमांसा महत्त्वपूर्ण होय.

सनातनी धर्मतत्त्वासाठी आधुनिक साधनांनी झटणाऱ्या संस्था व समाज देशात व महाराष्ट्रात कमीच दिसतात. 'भारत धर्म महामंडळ' ही १९०२ मधील दिल्लीतील स्थापित संस्था. तिने ८ वर्षांत देशात ६०० शाखा निर्माण केल्या 'वर्णाश्रम स्वराज्य संघ' महाराष्ट्रात जन्मला. तो संतोजी महाराज कुकुरमुंडेकर-सारख्यांनी चालवला. विनायक महाराज मसूरकर यांनी 'ब्रह्मचर्याश्रमाने' १९२५-३५ या काळात प्रभावी कार्य केले आहे. आहिताग्नी शंकरराव राजवाडेंची 'शारदीय ज्ञानसत्र' पुणे ही संस्था जन्मली.

शास्त्रप्रामाण्य व बुद्धिप्रामाण्य यांचा मेळ घालून तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी परिषद (१९३४) नंतर तीच 'धर्मनिर्णय मंडळ (१९३८) या नावाने कार्यरत दिसते. यात वाईचे नारायणशास्त्री मराठे (स्वामी केवलानंद), नागपूरचे डॉ. के. ल. दप्तरी, मुंबईचे महामहोपाध्याय, डॉ. पां. वा. काणे, बदलापूरचे नानासाहेब चाफेकर यांनी बाह्य आचारात सारासार बुद्धीने बदल करायचा असे परिवर्तनवादी विचार धर्मप्रबोधनात जोपासले. स्वामी केवलानंदांनी वाईची 'प्राज्ञ पाठशाळा' सुरू करून धर्मसंस्कारांचे व्रत घेतले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींनी 'धर्मकोशाचे' प्रचंड कार्य हाती घेऊन पूर्णत्वास नेले. योगमार्गाचे आधुनिक शास्त्रानुसार उपपादन करण्याचे कार्य 'योगमीमांसा' इंग्रजी त्रैमासिक व 'कैवल्यधाम' चे प्रयत्न दिसतात.

ह.भ.प. ल. रा. पांगारकर (१८७२-१९४१), शंकर श्रीकृष्ण देव (१८८१-१९५८), विष्णुबुवा जोग यांचे शिष्य श. वा. उर्फ सोनोपंत दांडेकर (जन्म १८९६), प्रा. डॉ. रामभाऊ दत्तात्रय रानडे (१८८६-१९५७), श्रीमंत प्रतापशेठ (धुळे) व त्यांचे तत्त्वज्ञान मंदिर, बापटशास्त्रींचे 'आचार्यकुल' या धर्म व संशोधन संस्था धर्मप्रचाराचे कार्य करत आहेत. हिंदू धर्मातील आध्यात्मप्रधान तत्त्वज्ञान व शुद्ध आचरण टिकवून भ्रामक समाज व नास्तिकवाद विरोधी धर्मप्रबोधन करून महाराष्ट्रातील समाजाच्या हृदयातून निकोप धर्माचे विचार निनादत राहतील.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ८*

**पुढील विधानांत गाळलेल्या जागी योग्य शब्द भरा.**

(१) विष्णुबुवा ब्रह्मचारींनी लोकांना ------- धर्मी होण्यापासून वाचविले.

(२) 'भावार्थ सिंधू', 'सेतूबंध, 'वेदोक्त प्रकाश', 'चतुःश्लोकी भागवत' इत्यादी अनेक ग्रंथ ------- यांनी लिहिले.

(३) पं. रमाबाई, डॉ. गावंडेसारख्यांनी ------- धर्म स्वीकारला.

(४) रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, स्वामी रामतीर्थ व ------- हे संत चतुष्टय होय.

(५) योगी श्री. अरविंद घोषांनी पूर्णयोग, दिव्य जीवन व ------- विषयी विचार मांडले.

(६) शंकरराव राजवाडेंनी '------- ज्ञानसत्र' ही संस्था पुण्यात स्थापन केली.

## १.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

**प्रबोधन :** समाजात प्रचलित असलेल्या आचार, विचार व व्यवहारात जेव्हा दोष उत्पन्न होतात तेव्हा समाजाला पुन्हा बुद्धिनिष्ठ व विज्ञाननिष्ठ पद्धतीने जागृत करण्याच्या प्रक्रियेला 'प्रबोधन' म्हणतात.

**चळवळ :** विशिष्ट व्यक्ती वा समुदायाने एकत्र येऊन सर्वांच्या हितार्थ केलेला हा प्रामाणिक प्रयत्न असतो. एखादी मार्गदर्शक व्यक्ती वा विचारप्रणाली त्यामागे असते. त्या प्रेरणेने झालेल्या प्रयत्नास चळवळ म्हणता येईल.

**ख्रिश्चन मिशनरी :** ख्रिश्चन धर्माचा प्रसार करणारी धर्म प्रचारकांची ही संघटना आहे. सोबत मानवोद्धारार्थ शिक्षण, आरोग्य, आर्थिक मदत, इत्यादी कामेही केली जातात.

**एकेश्वरवाद :** ईश्वर निर्गुण, निराकार, अनंत व सर्वव्यापी असून एकच आहे. त्याची अनेक रूपांत पूजा म्हणजे बहुदेवतावाद होय. म्हणून एक ईश्वराची पूजा एकेश्वरवाद म्हणवते. इस्लाम वैदिक मूळ धर्म यातील, थॉमस पेनच्या विचारातील एकेश्वरवाद ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज यांनी उचलला, प्रसारित केला.

**बहुदेवतावाद :** ईश्वराची एकाऐवजी अनेक, विविध रूपांत उपासना करणारा मतप्रवाह, यामुळे हिंदू धर्मात अनेक संप्रदाय जन्मले.

**परमहंस सभा :** जसा हंस नीर-क्षीरविवेक ठेवून पाणी व दूध वेगळे करतो तसे धर्माविषयी बुद्धी व तर्काने विचार करून सत्य शोधून ईश्वराकडे वळण्याचा प्रयत्न करणारी सभा परमहंस सभा होय. दादोबा पांडुरंगांनी हिची स्थापना केली होती.

**पारमहंसिक ब्राह्मधर्म :** पारमहंसिक सभेकरता दादोबांनी वीस ओव्यांची पोथी लिहिली. ती म्हणजे 'पारमहंसिक ब्राह्मधर्म'. यात त्यांनी विश्वकुटुंब, विश्वबंधुत्व, सदाचरण, शुद्ध अंत:करण, ज्ञान, भूतदया, स्वदेश प्रेम, धर्म, सेवा व धर्मक्रांतीतून महाराष्ट्रधर्म मांडला.

**ब्राह्मो समाज :** राजा राममोहन रॉय यांनी १८७५ मध्ये बंगालच्या भूमीवर एकेश्वरवादी, वैदिक शुद्ध स्वरूपाचा विचार आणि धर्मात व समाजात सुधारणाकरण्यासाठी हा समाज स्थापन केला.

**प्रार्थना समाज :** ब्राह्मो समाजाच्या प्रेरणेने महाराष्ट्रात धार्मिक

व सामाजिक सुधारणांसाठी धडपडणारा हा समाज होय. याची स्थापना १८६७ मध्ये झाली.

**हिंदू धर्मातील प्रोटेस्टंट पंथ :** ज्याप्रमाणे ख्रिश्चन धर्मात सुधारणावादी, नवे व उदारवृत्तीचे विचार जोपासणारा प्रोटेस्टंट पंथ आहे, तसा हिंदू धर्मात भागवत धर्म आहे. तो हिंदू धर्मातील प्रोटेस्टंट पंथ होय. रानडे प्रार्थना समाजाला जुन्या भागवत धर्माची शाखा मानत.

**षडंग उपासना पद्धती :** प्रार्थना समाजात साप्ताहिक उपासना केली जाते. या उपासनेची सहा अंगे आहेत. ती म्हणजे उद्बोधन, स्तवन, कृतज्ञता, दर्शन, प्रार्थना, निरूपण.

**अखिल भारतीय डिप्रेस्ड क्लास मिशन :** समाजसेवा व अस्पृश्योद्धार कार्य करताना महर्षी वि. रा. शिंदे यांनी १९०६ मध्ये मिशन बनविले.

**सत्यशोधक समाज :** महात्मा फुलेंनी ईश्वराला 'निर्मीक' म्हटले. 'सत्य' म्हणजेच 'निर्मीक'. त्याचा शोध घेणारा समाज सत्यशोधक समाज होय. यामार्फत त्यांनी सत्यधर्म, सामाजिक व धार्मिक सुधारणा करून तळागाळातल्या लोकांना, स्त्रियांना आधार दिला.

**सार्वजनिक सत्यधर्म :** हा महात्मा जोतीबांचा श्रेष्ठ ग्रंथ होय. सत्य निर्मीकाचे रूप होय. सत्य स्वरूप निर्मीक परिपूर्ण आहे. त्याला पूजा-अर्चा नको. मध्यस्थ नको. 'सार्वजनिक सत्वर्तना'साठी त्यांनी ३३ नियमांच्या आचरणातून सत्यधर्माचे सार्वजनिक स्वरूप सांगितले. यात मानवता, सदाचरण, परोपकार, बंधुत्व, निर्मीकांवर विश्वास व विचारस्वातंत्र्य याला महत्त्वाचे स्थान आहे.

**आर्य समाज :** वैदिक धर्माला निर्भेळ स्वरूपात वेदा(ज्ञान)च्या आधारे महर्षी दयानंदांनी मांडून सामाजिक-धार्मिक सुधारणेसाठी हा समाज मुंबई येथे १८७५ मध्ये स्थापन केला. याचे कार्य देश विदेशात चालू आहे.

**वेदाकडे चला :** महर्षी दयानंदांनी वेद सर्व विद्येचे आधार मानले. पुनरुद्धारासाठी 'वेदाकडे चला' हा नारा दिला.

**रामकृष्ण मिशन :** स्वामी विवेकानंदांचे गुरू रामकृष्ण परमहंस होते. त्यांच्या उपदेशानुसार 'मानवसेवा हीच ईश्वरसेवा' मानून मानवी शिक्षण, आरोग्य व विकासासाठी काम करणारी संस्था त्यांनी स्थापन केली. तिचे नाव 'रामकृष्ण मिशन' होय.

## १.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - १*

(१) (✓), (२) (✓), (३) (✓), (४) (X), (५) (X), (६) (✓), (७) (✓), (८) (✓), (९) (X), (१०) (✓), (११) (✓).

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - २*

**(अ)** (१) (✓), (२) (✓), (३) (✓), (४) (X), (५) (✓).

**(आ)** (१) भौतिक सुधारणा, (२) वैज्ञानिक दृष्टीकोना, (३) शिक्षण, (४) अनिष्ट प्रथांवर (५) बंगाल.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ३*

(१) (✓), (२) (✓), (३) (X), (४) (X), (५) (✓).

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ४*

(१) (✓), (२) (✓), (३) (X), (४) (✓), (५) (✓), (६) (✓), (७) (X).

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ५*

(१) राजा राममोहन रॉय, (२) प्रार्थना समाजा, (३) डॉ. आत्माराम पांडुरंग, (४) सर नारायण गणेश चंदावरकर (५) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे (६) प्रवर्तकातील मतभेद, आचार विचारांत विसंगती, मर्यादित जनपाठिंबा.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ६*

(१) (✓), (२) (✓), (३) (✓), (४) (X), (५) (X).

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ७*

(१) आर्य समाज, (२) मुंबई, (३) निषिद्ध, (४) मानव, (५) थिऑसॉफी (६) ॲनी बेझंट.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ८*

(१) ख्रिश्चन, (२) विष्णुबुवा ब्रह्मचारी (३) ख्रिश्चन (४) योगी भांडारविंद (५) अतिमानस (६) शारदीय.

## १.५ सारांश

धर्म हे संस्कृतीचे श्रेष्ठ अंग आहे. धर्मस्वरूपात ईश्वर भक्ती, मानवता, प्रेम, सत्य, न्याय, दया, प्रेम, इत्यादी वृत्तींचे आचरण अपेक्षित आहे. धर्मातून एक प्रभावी विचारप्रणाली, संघटन, नेतृत्व व चळवळ जन्म घेते. भारतात ईस्ट इंडिया कंपनीने व्यापारासोबत सत्ता व ख्रिस्ती धर्मप्रसारास प्रारंभ केला. १८१३ मध्ये त्यास कायद्याद्वारे परवानगी लाभली. भारतात अनेक धर्म व मिशनरी चर्च, सोसायट्या उदयास आल्या. अनेक वेळा ख्रिस्ती धर्मप्रसारात हिंदू धर्मास अन्यायकारक वागणूक मिळाली. भारतात अनेक विचारवंतांनी उन्नतीसाठी प्रथम उच्च धर्माचा प्रसार होणे आवश्यक आहे अशी भूमिका मांडली. धर्माबरोबरच सामाजिक सुधारणेसही वाव मिळू लागला. त्याकामी ब्रिटिश राज्यकर्त्यांशी ओळख, भौतिक सुधारणा, शिक्षण व उदारमतवादी मते, प्रबोधन, इत्यादी गोष्टी साहाय्यभूत ठरल्या. यातूनच धार्मिक व सामाजिक

चिंतन होऊन आपल्या धर्मातील अनिष्ट प्रथा, पद्धती यांवर टीका होऊ लागली. त्या दूर कराव्यात यासाठी संघटित प्रयत्नांची गरज मांडण्यात आली. धार्मिक प्रबोधनास न्या. रानडे, जांभेकर यांचे विचार परिणामकारक ठरले. धर्म व समाजसुधारणेवर त्यांनी भर दिला. बाळशास्त्री जांभेकरांना महाराष्ट्रातील सर्वच सुधारणांचे आद्य प्रवर्तक मानण्यात येते. दादोबा पांडुरंग यांनी मानवधर्म सभेची स्थापना करून ईश्वर निराकार आहे, नित्य कर्मे विवेक बाळगून करावीत. ज्ञान, शिक्षण व विचार यांचे व्यक्तीला स्वातंत्र्य आहे असे मत मांडले. परमहंस सभेद्वारे त्यांनी धार्मिक जागृती केली.

दादोबांनंतर धर्मप्रबोधन कार्यात लोकहितवादींचे नाव अग्रणी आहे. हीन कर्मकांडांना त्यांनी कडाडून विरोध केला. सुदृढ समाजासाठी धार्मिक आचार विचार सुसंगत असावेत असे त्यांनी म्हटले.

विविध समाजांनी, संस्थांनीदेखील धर्मप्रबोधन कार्यात आपला वाटा उचलला. राजा राममाहेन रॉय यांनी स्थापन केलेल्या ब्राह्मो समाजापासून भारतात धार्मिक प्रबोधनास प्रारंभ झाला. बालविवाह, बहुपत्नीत्व, केशवपन इत्यादी अनिष्ट प्रथांना विरोध करण्यात आला. ३१ मार्च १८६७ रोजी प्रार्थना समाजाची स्थापना करण्यात आली. नैतिक व आध्यात्मिक प्रगती, प्रेम व ईश्वरपूजा, मानघाने भेदभाव न करणे आदी उद्दिष्टे प्रार्थना समाजाची होती. प्रार्थना समाजाने मोठ्या प्रमाणावर धर्मप्रबोधनाचे कार्य केले.

आधुनिक महाराष्ट्रातील मूलगामी समाज परिवर्तनाच्या चळवळीचे अध्वर्यू म्हणून महात्मा जोतीराव फुले यांचे नाव अग्रणी आहे. सत्यशोधक समाजाची स्थापना करून त्यांनी हिंदू धर्मातील अनिष्ट प्रथांवर टीका केली. 'एक ईश्वर एक धर्म' या विचारांचा पुरस्कार आणि प्रसार केला.

आर्य समाजानेही भारतात महत्त्वपूर्ण योगदान दिले. महर्षी दयानंद सरस्वती यांनी अंधश्रद्धांवर टीका व वैदिक साहित्याचे खरे स्वरूप मांडले. आर्य समाजाने सत्याचा स्वीकार व असत्याचा त्याग करण्यावर भर दिला आणि इतर अनेक तत्त्वे मांडली. स्वामी विवेकानंदांनी सगुण-निर्गुण दोन्ही प्रकारची ईश्वरभक्ती, सर्व धर्मांच्या शिकवणीतून ईश्वराप्रत जाता येते असे मत मांडले. हिंदू धर्माचे गुरूपद जगाला पटवून दिले. थिऑसॉफिकल सोसायटीने हिंदू धर्म व तत्त्वज्ञान यांचे पुनरुज्जीवन करण्याचे कार्य सुरू केले. ॲनी बेझंट यांनी या संप्रदायाद्वारे मोठे कार्य केले. त्यांनी विश्वबंधुत्वाचा प्रसार केला.

विष्णुबुवा ब्रह्मचारी यांनी वैदिक धर्माचे श्रेष्ठत्व पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी मोठे प्रयत्न केले. त्यासाठी संसार त्याग केला. ख्रिस्ती धर्मांतर परतवून हिंदू धर्म रक्षणार्थ त्यांनी प्रयत्न केले.

याशिवाय लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांची ईश्वरनिष्ठा, मानवधर्म, जनसेवा यांचा प्रभाव लाखो अनुयायांवर पडला. त्यातून विनोबांची भूदान चळवळ, अस्पृश्यांना मंदिर प्रवेश मुक्त करण्याचे साने गुरुजींचे प्रयत्न साकारले.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

**पुढील प्रश्नांची १५ ते २० ओळींत उत्तरे लिहा.**

(०१) धर्मसुधारणा म्हणजे काय ते विशद करा.
(०२) धर्मप्रबोधनाची कारणे विशद करा.
(०३) १९व्या शतकातील धर्मपरंपरेत कोणते दोष होते ते स्पष्ट करा.
(०४) जांभेकरांचे धर्मप्रबोधनातील कार्य स्पष्ट करा.
(०५) विष्णुबुवा ब्रह्मचारी यांचे कार्य स्पष्ट करा.
(०६) संत चतुष्ट यांचा प्रभाव स्पष्ट करा.
(०७) परमहंस सभेचे धार्मिक प्रबोधनातील कार्य स्पष्ट करा.
(०८) प्रार्थना समाजाची धर्मप्रबोधनातील भरीव कामगिरी विशद करा.
(०९) सत्यशोधक समाजाची धर्मप्रबोधनातील भूमिका स्पष्ट करा.
(१०) आर्य समाजाचे धार्मिक चळवळीतील योगदान स्पष्ट करा.
(११) थिऑसाफिकल सोसायटीचे कार्य स्पष्ट करा.

## १.७ क्षेत्रीय कार्य

★ तुमच्या परिसरातील धार्मिक संप्रदायाची माहिती मिळवा व ती नोंदवा.

★ परिसरातील धर्मसुधारणा व प्रबोधन कार्याची माहिती गोळा करा.

## १.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


(१) गं. बा. सरदार, *महाराष्ट्र जीवन.*
(२) पु. ग. सहस्रबुद्धे, *महाराष्ट्र संस्कृती.*
(३) प्रा. सौ. मेघा सिधये, *महाराष्ट्र दर्शन (संत दर्शन).*
(४) गो. नी. दांडेकर, *महाराष्ट्र दर्शन.*

# घटक २ : सुधारणावादी चळवळी

*अनुक्रमणिका*


२.० उद्दिष्टे
२.१ प्रास्ताविक
२.२ विषय-विवेचन
२.२.१ एकोणिसाव्या शतकारंभीचे महाराष्ट्रातील समाजजीवन
२.२.२ ख्रिश्चन मिशनरी व ब्रिटिश प्रशासन : सुधारणांतील योगदान
२.२.३ आरंभीच्या सामाजिक चळवळी व सुधारक
२.२.४ सामाजिक चळवळींचे महाराष्ट्रातील योगदान
२.२.५ महाराष्ट्रातील महिला चळवळी
२.२.६ महाराष्ट्रातील शैक्षणिक चळवळी
२.२.७ इतर चळवळी
२.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
२.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
२.५ सारांश
२.६ सरावासाठी स्वाध्याय
२.७ क्षेत्रीय कार्य
२.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


## २.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

★ एकोणिसाव्या शतकारंभीचे महाराष्ट्रातील समाजजीवन कसे होते याचे वर्णन करता येईल.

★ ख्रिश्चन मिशनरी व ब्रिटिश प्रशासन यांच्यामुळे सामाजिक, शैक्षणिक बदल, जुनाट कल्पनांचे उच्चाटन घडून येण्यास कशी मदत झाली ते स्पष्ट करता येईल.

★ महाराष्ट्रातील आरंभिक चळवळींचे आधारस्तंभ जगन्नाथ शंकरशेठ, आचार्य बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग तर्खडकर, लोकहितवादी आदींचे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील योगदान स्पष्ट करता येईल.

★ प्रार्थना समाज, आर्य समाज यांचे सामाजिक चळवळीतील योगदान विशद करता येईल.

★ पुनरुज्जीवनवादी सुधारकांचे सामाजिक चळवळीतील योगदान स्पष्ट करता येईल.

★ महाराष्ट्रातील महिला चळवळींविषयी माहिती देता येईल.

★ एकोणिसाव्या शतकातील सुधारकांचे स्त्री-जीवन व स्त्री-जीवनातील सुधारणा याविषयीची मते स्पष्ट करता येईल.

★ महाराष्ट्रातील शैक्षणिक चळवळीत महर्षी कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे महत्त्वपूर्ण योगदान स्पष्ट करता येईल.

★ महाराष्ट्रातील इतर चळवळी जसे ब्राम्हणेतर चळवळ, दलित चळवळ, आदिवासी चळवळ, शेतकरी चळवळ आदी चळवळींविषयी व या चळवळीत महत्त्वपूर्ण कार्य केलेल्या व योगदान दिलेल्या व्यक्तींविषयी माहिती सांगता येईल.

## २.१ प्रास्ताविक

महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळींचा अभ्यास करताना आधुनिक कालखंड डोळ्यासमोर तरळतो. आंग्ल पूर्वकाळ जवळपास ७०० वर्षांचा, पण आंग्ल किंवा आधुनिक काळ फक्त १५० वर्षांच्या आसपास असून त्यात झालेली सामाजिक स्थित्यंतरे त्यापूर्वी कधीच झाली नाहीत. समाजरचनेत मागील प्रदीर्घ काळात विशेष स्थित्यंतरे घडली नाहीत मात्र आधुनिक काळात धार्मिक प्रबोधनासोबत सामाजिक चळवळींचे कार्यही समांतर चालू राहिले आणि समाजाचे चित्र पालटून गेले. सामाजिक गती पुन्हा वाढली, पाश्चात्त्य विद्येमुळे १८०० नंतर सापाने कात टाकावी तशी भारतीय व महाराष्ट्र समाजजीवनाने कात टाकली.

सामाजिक जीवन म्हटले की त्यात कुटुंब, जाती, वर्ण, परंपरा, सामाजिक दर्जा, संस्था, स्त्री-जीवन, जीवनाचे आधार यांचा अभ्यास येतो. तसेच समाजरचना, शिक्षण परंपरा, नैतिक आचरणाचा धर्म किंवा व्यवहार, आर्थिक आधार, चालीरीती, रूढी, परंपरा आणि संस्कृती, इत्यादी मुद्द्यांचा विचार करावा लागतो. न्या. रानडेंनी राजकीय हक्क प्राप्त करूनच चांगली समाजरचना उभी करता येते व त्यासाठी धार्मिक आधारांना महत्त्व दिले. समता व बंधुतेचाही येथे विचार केला पाहिजे. रानडेंनीच समाजकारणाचा व समाजसुधारणेचा पहिला प्रबल विचार मांडला. त्या पूर्वी त्यात इतकी स्पष्टता व धार नव्हती. आधीच्या घटकात आपण महाराष्ट्रातील धार्मिक प्रबोधन समजून घेतले. आता या घटकात आपण महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी, त्यांचे आधारस्तंभ (व्यक्ती) व त्यांच्या कार्याचा आढावा घेणार आहोत.

## २.२ विषय-विवेचन

### २.२.१ एकोणिसाव्या शतकारंभीचे महाराष्ट्रातील समाजजीवन

महाराष्ट्रातील मराठी सत्ता अखेरची घटका मोजत होती. ईस्ट इंडिया कंपनीचा जम बसू लागला होता. १८१८ नंतर महाराष्ट्रात सामाजिक सुधारणा चळवळीचा इतिहास दिसू लागतो. इथवरच्या दोन दशकांतील समाजजीवन पाहता जातिसंस्था कठोर होती. जातिनिर्बंध प्रभावीपणे पाळले जात होते. ग्रंथप्रामाण्य व परंपरागत जोपासलेले कनिष्ठतेचे विचार, बुद्धिप्रामाण्याला थारा देणारे नव्हते. आध्यात्मिक व धार्मिक विचारांत अंधश्रद्धा, रूढी पालन यांवर भर होता. परदेशगमन, रोटी-बेटी व्यवहार, समुद्रलंघन करण्यावर बंधने आली. समाज बहिष्कार टाकेल या भीतीने अशी कृत्ये वर्ज्य ठरली. कूपमंडूकता वाढली. स्पृश्य वा उच्चवर्णीय ब्राह्मण शूद्रादी अस्पृश्य जातींचा छळ करत व त्यांना पशुतुल्य वागवत अस्पृश्य व तळागाळातील लोकांना समाजात स्थान नव्हते.

स्त्रियांची स्थिती करुणाजनक होती. मूठभर स्त्रिया समाजात मान मिळवू शकल्या, पण सामान्यपणे स्त्रीला स्वातंत्र्य नव्हते. ती सर्वत्र बंधनात होती. आठव्या वर्षीच विवाह, धार्मिक व कौटुंबिक दर्जा दुय्यम असणे, शिक्षणापासून वंचित ठेवले जाणे, वैधव्याचे लादलेले जीवन, विधवेचा पुनर्विवाह अमान्य, भ्रूण हत्या, हुंडा पद्धती यांमुळे स्त्रीला जीवन जगणे असह्यच होते.

अस्पृश्यांना स्पर्शही करू नये, बालविवाह, बाला-जरठ विवाह, बहुपत्नीत्व, विधवा केशवपन, इत्यादी अनिष्ट परंपरा समाजात मूळ धरून होत्या. बंदिस्त डबक्यातील घाणेरड्या पाण्यासारखी समाजाची अवस्था होती. पाश्चात्त्य भौतिक प्रगती, ख्रिश्चन धर्म, पाश्चात्त्य शिक्षण व संस्कृतीचा महाराष्ट्रातील समाजजीवनावर परिणाम झाला. स्त्री ही पुरुषांच्या उपभोगाची वस्तू किंवा हक्काची गुलाम बनली होती. तिचे सामाजिक-आर्थिक स्वातंत्र्यही संपले होते. पिता, पती व पुत्र या तिघांच्या मर्जीने तिचे जीवन तिला जगावे लागत असे. स्वतंत्र विचार व स्वातंत्र्य संपले होते. सामाजिक विषमता व वर्गसंघर्ष तीव्र होता. अस्पृश्यांना देवालये, पाणवठे, सार्वजनिक स्थळे, धर्मस्थळे, इत्यादींकरिता बंदी होती. सामाजिक न्यायाची परंपरा राहिली नव्हती.

**सामाजिक चळवळींची चाहूल व महाराष्ट्र**

पेशवाई बुडाली, ब्रिटिश सत्ता आली. आरंभिक काळात ब्रिटिश सत्ताधीशांनी धूर्तता केली. सनातनी, धार्मिक व सामाजिक प्रश्नांत हेतुपूर्वक दखल टाळली, धर्मांतर टाळले. पण एकोणिसाव्या शतकारंभापासून नव्या युगाची चाहूल लागली. तीन बाबी प्रभावी ठरल्या. नवी शासन पद्धती, इंग्रजी शिक्षण व ख्रिस्ती धर्मोपदेशकाच्या धर्मप्रसाराला विरोध यांमुळे मध्ययुगीन पेशवाई बेबंदशाही, अनीती, अस्थिरता, अशांतता यांऐवजी ब्रिटिशांचे शांततेचे, स्थिरतेचे व सुखावह सुधारणांचे राज्य आले. दगेधोपे, लुटालूट, अन्यायी आक्रमणे यांना आळा घालून शिस्तबद्ध कारभार दिसू लागला. हे शासन आधुनिक जाण असलेले, जनतेला ईश्वरी वरदान वाटणारे होते. त्यामुळे ते काही भारतीय विचारवंतांनाही भावले. शिक्षण सामाजिक संस्था, विचार व व्यवहारातून आधुनिकीकरणाकडे वाटचाल झाली. काही सनातनी लोकांनी सामाजिक बदलांना विरोध केला. पण पाश्चात्त्य राज्य, शिक्षण, संस्कृती, बुद्धिनिष्ठता यांची जवळीक असलेले सुशिक्षित इंग्रजी संपर्कामुळे या बदलांकडे वळले. ज्ञान-विज्ञान, इंग्रजी शिक्षण, स्त्री-शिक्षण व सामाजिक जीवनात बदल, स्पृश्यास्पृश्य भेद, इत्यादींपासून वेगळे होऊन, रूढी, परंपरांना त्यागून, दलित व अस्पृश्यांना बरोबरीने वागवून नवीन समाज उभारणीसाठी काही जण धजले. भौतिक सुधारणा, नवीन विचार, सामाजिक समता, धर्म-अध्यात्माऐवजी दैनंदिन जीवनातील प्रश्नांची उत्तरे सामाजिक वागण्यातून शोधणे. ग्रंथप्रामाण्याऐवजी बुद्धिप्रामाण्य व विज्ञाननिष्ठा यांकडे वळण होऊ लागले. आत्मावलोकन, आपले दोष, श्रुति-स्मृतिऐवजी कालानुरूप बदलती समाज नियमने, प्रत्येकाला समाजात मत मांडण्याचे स्वातंत्र्य, इत्यादी नव्या युगाच्या प्रेरणा ग्रहण करून नवीन सामाजिक जीवनाकडे वळण झाले. महाराष्ट्रात बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, शंकरशेठ, दादोबा पांडुरंग यांनी अगदी आरंभिक मुहूर्तमेढ रोवली. न्या. रानडेंनी त्याला तात्त्विक बळकटी दिली. यानंतर परमहंस सभा, प्रार्थना समाज, आर्य समाजापासून थेट स्वतंत्र महाराष्ट्राच्या निर्मितीपर्यंत सामाजिक परिवर्तनाच्या स्त्री-जीवन, शेतकरी, कामगार, अस्पृश्यता, दलितोद्धार, इत्यादी क्षेत्रात विस्तारले. महर्षी कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी शाहू महाराज, जोतीबा फुले, डॉ. आंबेडकरांपर्यंत व त्यानंतरही ह्या चळवळींचा वारसा महाराष्ट्रात प्रभाव वाढवताना दिसतो. सुधारकांच्या परंपरेने या कार्याला बळकटी आली. वृत्तपत्रे व नियतकालिके यांतून आपला देश, महाराष्ट्र, संस्कृती धर्म यांतील दोष व त्यांचे निराकरण करण्याची गरज, कालानुरूप नवीन दृष्टी व बदल याकडे वळण झाले.

ज्या सलग भागात बहुसंख्य मराठी बोलणारे तो महाराष्ट्र व या प्रदेशात राहणारा समाज तो महाराष्ट्र समाज होय. मराठी भाषिक नसलेले पण येथे स्थायिक असलेले इतर भाषा, वंश, धर्माचे लोकही महाराष्ट्रीयनच ठरतात. या व्यापक अर्थाने आपण महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधन व चळवळींचा येथे विचार करू या.

***स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - १***

**पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगून कंसात (X) किंवा (✓) अशी खूण करा.**

(१) १८१८ पूर्वी महाराष्ट्रात जातिसंस्था प्रबळ होती. (   )

(२) महाराष्ट्रात स्त्रियांना कुटुंबात व समाजात उच्च स्थान होते. (   )

(३) बालविवाह, अनिष्ट प्रथा-परंपरा महाराष्ट्रात मूळ धरून होत्या. (  )

(४) ब्रिटिश सत्तेमुळे इंग्रजी शिक्षण, संस्कृती, बुद्धिनिष्ठता आदी मूल्ये रुजू लागली. (  )

(५) महाराष्ट्रात बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, शंकरशेठ आदींनी सुधारणांची आरंभिक मुहूर्तमेढ रोवली. (  )

## २.२.२ ख्रिश्चन मिशनरी व ब्रिटिश प्रशासन: सुधारणांतील योगदान

एकोणिसाव्या शतकाचा परिचय सुधारणांचे शतक म्हणूनच दिला पाहिजे. एके काळचा प्रगत संस्कृतीचा हा देश ब्रिटिश कंपनीचे साम्राज्य आले तेव्हा मागासलेला बनला होता. राजकीय व सामाजिक दृष्ट्या भारत पोखरलेला होता. अनिष्ट परंपरांचे स्तोम माजले होते. महाराष्ट्रात मराठी सत्ता संपली पण लोकांना त्याचे दुःख वाटत नव्हते. पुढील दोन्ही उद्गार महत्त्वाचे व बोलके वाटातात. *एलफिन्स्टन* म्हणतो, 'सर्व स्तरांवर खोटे-नाटे आहे. व्यभिचार व वेश्यागमन यांनी उच्च वर्गात अढळस्थान मिळवले आहे. जातिव्यवस्था हा प्रभावी व सामाजिक घटक बनला आहे'.

*जेम्स डग्लसच्या* मते, 'तत्कालीन शिक्षण दुरवस्थेला पोहोचले होते. पेशव्यांनी शिक्षण सुधारण्यासाठी कोणतेही भरीव काम केले नाही. त्या काळी एकही श्रेष्ठ ग्रंथ निर्माण झाला नाही. सामान्य माणसाचा शिक्षणाकडे कल नव्हता व त्याच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे शिक्षण घेण्याची इच्छा नव्हती. महाराष्ट्रात १०० पैकी ९९ लोक अज्ञानी होते. धर्माच्या बाबतीत अशीच परिस्थिती होती'.

धर्म व समाजरचना एकमेकांत इतक्या गुंतल्या होत्या की त्यांना एकमेकांपासून वेगळे करणे शक्य नव्हते. धर्मशास्त्रांनी जातिनिहाय गट पाडले होते. पुण्याचे महत्त्व संपून मुंबईला महत्त्व आले होते.

Social (Socio) हा शब्द सामाजिक या अर्थाने येतो. येथे सामाजिक सुधारणा चळवळीसाठी सामाजिक पुनर्रचना, सामाजिक वर्तणूक, चालीरीती, समाजरचना व समाज नियंत्रण यांच्याकडे वळणे गरजेचे आहे. 'एखाद्या प्रभावी व्यक्तीने किंवा त्याच्या विचारसरणीमुळे भारावलेले लोक जेव्हा एकत्र येतात व ते सर्व मिळून आपल्या गुरूचा संदेश सर्वत्र प्रसारित करतात तेव्हा या सामुदायिक प्रयत्नांना चळवळ म्हणतात', असे मत *प्रा. केनिथ जोन्सने* व्यक्त केले आहे. अशा संघटित चळवळींमुळे समाज परिवर्तन होत असते.

प्रा. जोन्सने (१) संक्रमण अवस्थेतील सुधारणा (२) दुसऱ्या संस्कृतीमधून स्वीकारलेल्या व एकमेकांवर सांस्कृतिक प्रभाव टाकणाऱ्या चळवळी असे दोन प्रकार सांगितले आहेत. आपल्याकडील सर्व सामाजिक सुधारणा ब्रिटिश संस्कृती व प्रभावाच्या होत्या. त्यांना दुसऱ्या गटात ठेवले पाहिजे.

ख्रिश्चन मिशनरींच्या धर्मप्रसाराचा परिचय आपण मागील घटकात अभ्यासला. येथे फक्त ख्रिश्चन मिशनरींचा व शासनाचा सामाजिक संदर्भ पाहू. ख्रिस्ती मिशनरींना धर्मप्रचारास प्रारंभी मनाई होती. १८१३ च्या कायद्यामुळे त्यांना हे अधिकार मिळाले. त्यांनी धर्मकार्यासोबत शिक्षण, गरिबांना मदत (आर्थिक), आरोग्य सेवा दिल्या. मुंबई, गिरगाव, खेतवाडी परिसरात १८२४ मध्ये मुलींच्या शाळा व नंतर मुलांच्या शाळा सुरू केल्या. गॉर्डन हॉल मिशनने ८-९ शाळा चालवून ४०० मुलींना शिक्षण दिले. स्कॉटिश व ऑक्झिलरी मिशनरीने एकंदर ६५ शाळा सुरू केल्या. कोकणामध्ये शिक्षणाची सोय झाली. मोफत धर्मग्रंथांसोबत अभ्यासाची पुस्तकेही पुरवली. रेव्ह. जॉन विल्सन व त्याच्या पत्नीने पारशी, मराठी, गुजराती मुलींसाठी शिक्षणाची सोय करून १८२६-२७ मध्ये ३०० व १८४९-५० मध्ये २००० विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याबाबत मदत केली. १८६१ पर्यंत हे कार्य खूप विस्तारले. १८६१ मध्ये 'विल्सन कॉलेज' 'सेंट्रल कॉलेज'चे नाव ठेवण्यात आले. आता धर्मदीक्षाही सुरू झाल्या. ख्रिस्ती धर्म भरपूर प्रसारित झाला तर त्यातून सामाजिक समता येण्याची त्यांची अपेक्षा होती. कारण येथे जातीयता घट्ट पायावर उभी आहे. ख्रिस्ती धर्माचा बाप्तिस्मा घेताना हिंदू लोक आपली जात कायम ठेवण्याची मागणी करत. म्हणजे जात ही सामाजिक प्रतिष्ठेची व धर्माच्या मूळ स्वरूपाशी एकरूप झालेली दिसते. धर्मप्रसारक संस्कृत व मराठी शिकून ग्रंथवाचन करत, अनुवाद करत आणि प्रवचने देत. विल्यम केरेने तर १८११ मध्ये संपूर्ण बायबल मराठीत अनुवादित केले. डॉ. रॉबर्ट ट्रमंडने मराठी व्याकरण व शब्दकोश प्रसिद्ध केले. पूर्वी शासन सामाजिक व शैक्षणिक कार्यापासून वेगळे होते. आता हळूहळू मेकॉलेचे मिनट (१८३५), वूडचा खलिता (१८५३) या आधारे इंग्रजी माध्यमातून शाळा, महाविद्यालयांतून शिक्षण देऊ लागले. इंग्रजी हे वाघिणीचे दूध ठरले.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२*

**पुढील विधानांत गाळलेल्या जागी योग्य शब्द भरा.**

(१) एकोणिसाव्या शतकाचा परिचय ------- शतक म्हणूनच दिला पाहिजे.

(२) पुण्याचे महत्त्व संपून ------- ला महत्त्व आले होते.

(३) प्रा. जोन्सने संक्रमण अवस्थेतील व दुसऱ्या ------- मधून स्वीकारलेल्या सुधारणा सांगितल्या.

(४) ------- च्या कायद्यानुसार मिशनरींना ख्रिस्ती धर्म-प्रसाराचे अधिकार मिळाले.

(५) 'सेंट्रल कॉलेज'चे नाव इ.स.१८६१ मध्ये ------- कॉलेज असे ठेवण्यात आले.

(६) ------- ने बायबलचा मराठीत अनुवाद केला.

(७) ------- ने मराठी व्याकरण व शब्दकोश प्रसिद्ध केले.

(८) ------- हे शिक्षण वाघिणीचे दूध ठरले.

## २.२.३ आरंभीच्या सामाजिक चळवळी व सुधारक

महाराष्ट्रात आरंभीच्या सामाजिक चळवळींचे आधारस्तंभ जगन्नाथ शंकरशेठ, आचार्य बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग तर्खडकर, भाऊ महाजन, लोकहितवादी व डॉ. भाऊ दाजी लाड यांचे कार्य या क्षेत्रातील पायाभूत कार्य होय. म्हणून त्यांना महाराष्ट्रातील जागृतीचे आद्य प्रवर्तक मानले जाते. या व्यक्तींचा व त्यांच्या या चळवळींतील कार्याचा आपण परिचय करून घेऊ.

### (अ) जगन्नाथ शंकरशेठ व त्यांचे कार्य (१८०३-१८६५)

ठाणे जिल्ह्याच्या मुरबाडचे मुकटे हे सोनार कुटुंब होय. शंकरशेठ यांचे वडील घोडबंदरला व शंकरशेठ मुंबईला येऊन राहिले. जगन्नाथाचा जन्म १० फेब्रुवारी १८०३ रोजी झाला. लक्ष्मी व सरस्वतीचे वरदान लाभल्याने ते श्रीमंत व विद्वानही होते. ते लहान असताना आईचा व १ वर्षाचे असताना वडिलांचा मृत्यू झाला. सर्व जबाबदारी जगन्नाथांवर पडली. ते इंग्रजी, मराठी, संस्कृत भाषेत निपुण होते. व्यापारामुळे त्यांचा दबदबा होता. ब्रिटिश अधिकारी, गव्हर्नर आदींशी त्यांचे चांगले संबध होते. त्यांचा स्वभाव राज्यकर्ते व स्थानिक समाजाची मर्जी संपादन करणारा होता. त्यांनी लोकांची गाऱ्हाणी सरकारकडे मांडून हव्या त्या सुधारणा मिळवल्या. एलफिन्स्टनने अनेक वेळा त्यांना मदतीला घेतले. शिक्षणाशिवाय मुंबईकराचा उद्धार नाही हे त्यांनी एलफिन्स्टनला पटवले. मिशनरी शिक्षण सर्वांना नव्हते म्हणून त्यांनी पुढाकार घेऊन २१ ऑगस्ट १८२२ मध्ये 'बॉम्बे नेटिव्ह स्कूल'ची स्थापना केली. १८२४ मध्ये तिचे 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' मध्ये रूपांतर होऊन अनेक शाळा सुरू झाल्या. या कामी सदाशिव छत्रे, जगन्नाथ शास्त्री क्रमवंत, बाळ गंगाधर शास्त्री, जांभेकरांनी सहकार्य केले. १८२७ मध्ये त्यांनी त्यांच्या अध्यक्षतेत एलफिन्स्टनच्या इंग्लंड पद्धतीनंतर उच्च शिक्षणासाठी निधी गोळा करून एलफिन्स्टन फंड उभारला. १८३७ साली एलफिन्स्टन कॉलेज सुरू केले. बोर्ड ऑफ एज्युकेशनची स्थापना करून ते सदस्य बनले. १८५६ मध्ये शिक्षण खाते त्यातूनच रूपांतरित स्वरूपात जन्मले.

यापूर्वी १८४५ मध्ये 'स्टुडंट लिटररी अॅण्ड सायंटिफिक सोसायटी'च्या स्थापनेत त्यांनी दादाभाई नौरोजी, भाऊ दाजी लाड, वि. ना. मंडलिक या तरुणांना मदत केली. अर्थसाहाय्य तर ते प्रत्येक संस्थेला देत असत. १८४८ ला मुलींची शाळा सुरू केली. ग्रँट मेडिकल कॉलेज उभारणी, बॉम्बे युनिव्हर्सिटी स्थापना व पाच हिंदी फेलो, सिनेटमध्ये मराठी माध्यमाचा आग्रह, १८५७ मध्ये 'दि जगन्नाथ शंकरशेठ फर्स्ट ग्रेड अँग्लो व्हर्निक्युलर स्कूल'चा आरंभ केला. विनायकराव या पुत्राने वडिलांच्या नावे शिष्यवृत्ती देण्यास प्रारंभ केला.

राजकारणात येऊनच हवे ते मागता येईल आणि मिळवता येईल असे त्यांना वाटत असे. दादाभाईंसोबत त्यांनी प्रयत्न करून १८५२ मध्ये 'बॉम्बे असोसिएशन' ही राजकीय संस्था सुरू केली. १८६१ मध्ये कायदेमंडळात हिंदी लोकांना प्रतिनिधित्व मिळवून दिले. ते कायदेमंडळाचे सभासद बनले. कायदा करताना लोकमत कळावे म्हणून गव्हर्नर जगन्नाथ शंकरशेठचा सल्ला घेत असे. सरकारी दरबारात आपले वजन वापरून लोकोपयोगी कामे करावीत असा त्यांचा स्वभाव होता. उदाहरणार्थ, पेटी सेशन मध्ये एक मॅजिस्ट्रेट असून जनतेला योग्य न्याय मिळावा म्हणून त्यांचे २ प्रतिनिधी (जस्टिस ऑफ पीस) राजाकडून हिंदी लोकच नेमण्यास भाग पाडले. मुंबई शहरात १८२५ मध्ये १२ जे. पी. नियुक्त झाले. त्यातील चार महाराष्ट्रीयांपैकी जगन्नाथ शंकरशेठ एक होते. 'ग्रँडज्युरी'त गोरे पंचासोबत त्यांनी हिंदी माणूसही ठेवला. बॅरिस्टरऐवजी वकील खटले चालविण्यास खास 'स्मॉल कॉज' मध्ये सामान्य वकिलाला अधिकार देऊन सामान्यांच्या खटले चालवण्याची मान्यता होऊन सामान्यांना न्याय मिळणे शक्य झाले.

त्यांनी रु. ५०००/- देणगी देऊन 'रॉयल एशियाटिक सोसायटी' मुंबईला स्थापना केली. विज्ञानाचे स्वतंत्र ग्रंथ आणून जगन्नाथ शंकरशेठ लायब्ररी उभी केली. कावसजी इंस्टिट्यूट, राणीच्या बागेचे उद्घाटन केले. बागेत व्हिक्टोरिया व अल्बर्ट म्युझियम उभारून ५०००/- रुपयांचे अर्थसाहाय्य दिले. त्यांनी 'अग्रिहार्टीकल्चरल सोसायटी ऑफ वेस्टर्न इंडिया', 'जिओग्राफिकल सोसायटी' सुरू केली. अनेकानेक संस्थांचे अध्यक्ष असले तरी 'जनतेचा सेवक' १८३७ चे भिवंडीचे पालखी प्रकरण व हिंदू-मुसलमान दंगा, १८६३ चे गोऱ्यांद्वारा मूर्ती भंग, द्वारकेला मूर्ती भंग केली तिची प्रतिष्ठापना, तसेच सोनापूर स्मशानभूमी प्रकरण, इत्यादी प्रसंग त्यांनी मध्यस्थी करून मिटवले. ठाणे-बोरीबंदर रेल्वे (१८५३), बोरीबंदर ते पुणे रेल्वे (१८५३) सुरू करण्यासाठी त्यांचे प्रयत्न कामी आले. मुंबईसाठी महानगरपालिका आहे. म्युनिसिपल कायदा करून ही संस्था जन्माला घालण्यात जगन्नाथ शंकरशेठ यांचे प्रयत्न कारणीभूत होते. मुंबईचा सांस्कृतिक, बौद्धिक, नागरी सुविधांचा विकास करण्यास ते नेहमी तत्पर असत. त्यांनी अनेक संस्था सुरू केल्या ज्या आजतागायत कार्यरत आहेत. त्यांनी अनेक देवालये, धर्मशाळा व दवाखाने बांधविले. १८ ऑक्टोबर १८६५ रोजी त्यांनी इहलोक सोडला. त्यांच्या महान कर्तृत्वाची आठवण टाऊन हॉल इमारतीतील त्यांचा पुतळा आजही करून देत आहे. हा सर्वोत्कृष्ट पुतळा मुंबईमध्ये लंडनचा मूर्तिकार मॅथ्यू नोबलने तयार केला.

### (आ) बाळशास्त्री जांभेकरांचे योगदान (१८१२-१८४६)

एक उमदा शिक्षक, विद्वान व ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वाचे बाळशास्त्री जांभेकर हे उठून दिसणारे समाजसुधारक होते. त्यांचा जन्म रत्नागिरी जिल्हयातील पोंबर्ले या गावी झाला. ते मराठी व संस्कृत शिकले. नंतर मुंबईला येऊन दोन-तीन वर्षांतच त्यांनी

इंग्रजीवर प्रभुत्व मिळवले. वडील गंगाधर शास्त्री यांनी त्यांना बापू छत्रेंच्या मार्गदर्शनाखाली ठेवले होते. एकंदर ते इंग्रजी, बंगाली, फारसी या भाषांबरोबरच गणित, भूगोल या विषयांतही तज्ज्ञ बनले. ते १८२८ मध्ये एलफिन्स्टन विद्यालयात अध्यापक झाले. १८३२ मध्ये सरकारने त्यांची नेमणूक अक्कलकोटच्या युवराजद्वयांसाठी केली. १८३४ मध्ये ते एलफिन्स्टन इंस्टिट्यूटमध्ये अध्यापक, पुढे प्राध्यापक झाले. दादाभाई नौरोजी, केरूनाथ छत्रेंचे ते गुरू. अध्यापक वर्गाचे 'रिरेक्टर' व नतर इन्स्पेक्टर राहिले. सरकारी पदे सांभाळली व सोबत लोकशिक्षण, समाजसुधारणा, पदरचा खर्च करून ज्ञानप्रसार व इतिहास-संशोधन केले. वयाच्या ३४ व्या वर्षी ते वारले. त्यांनी अनेक विषयांची पाठ्यपुस्तके लिहिली व छपाईची सोय नसताना ज्ञानांची सेवा केली. सरकारी अधिकारी त्यांचा सल्ला घेऊनच शिक्षणप्रसाराचे कार्य करत. त्यांनी शिक्षकांना आपण ऋषींप्रमाणे विद्यासंपन्न व विद्यादान करणारे आहोत असा सल्ला दिला. त्यांनी प्रचंड ज्ञानभांडार ठेवले जे जन्मभर पुरेल शिक्षकी पेशा हलका मानू नका. मठ्ठ प्रजेमुळे सरकारी नोकर महत्त्वाचे ठरतात. विद्याप्रसार व्हावा; त्यामुळे सरकारी नोकरांचा थाटमाट जाईल. स्वदेशाभिमान व स्वधर्माभिमान उत्पन्न व्हावा असा प्रयत्न करावा. सरकार व प्रजा, धनी व चाकर, आई-बाप व पुत्र यांत प्रेमभाव वाढेल; जास्त विद्यासंपन्न होऊनच लोकजागृती करता येईल. ते स्वत: पहिले महाराष्ट्रीयन विद्वान ठरतात. त्यांनी शिलालेख, ताम्रपट, प्राचीन ब्राह्मी लिपी व इतर बाबींवर इंग्रजीतून लिहिले जे 'बॉम्बे रॉयल एशियाटिक सोसायटी'च्या संशोधन पत्रिकेत छापले गेले. वृत्तपत्र 'दर्पण' सुरू करून त्यातून लेखन केले. प्रतिगामी, सनातनी विचार सोडून, मातृभाषा, इंग्रजी एका किंवा अनेक प्राचीन भाषांचे सखोल ज्ञान मिळवा असे ते म्हणत. त्यांनी पाश्चात्त्य विद्येचा फैलाव, देशाची भरभराट, लोककल्याण यांकडे लक्ष वळवले. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या खंडनाला उत्तर देणे, प्रतिगामी विचार त्यागणे, लोकमत, धर्म व समाजसुधारणांवर भर दिला. स्त्री-शिक्षण, विधवा-विवाहाचा पुरस्कार केला. त्यांच्या लेखन व जागृती कार्यामुळे गर्व्हनर सर जेम्स कार्नक यांनी इ.स. १८४० मध्ये जांभेकरांना 'जस्टीस ऑफ दि पीस' ही पदवी दिली. आद्य इतिहास संशोधक, शिक्षणतज्ज्ञ, श्रेष्ठ पत्रकार, आद्य वृत्तपत्रकार, जनप्रतिनिधी तसेच एक प्रगमनशील व्यवहारवादी सुधारक म्हणून आचार्य बाळशास्त्री जांभेकरांचा मान कायम राहील. महाराष्ट्रातील समाजसुधारणा चळवळींत आरंभीच्या मोजक्या सुधारणांत त्यांचे नाव महत्त्वपूर्ण ठरते.

### (इ) दादोबा पांडुरंग तर्खडकरांचे सामाजिक योगदान

दादोबा पांडुरंग तर्खडकर 'मराठी भाषेचे व्याकरण' या विस्तृत ग्रंथलेखनामुळे 'मराठी भाषेचे पाणिनी' मानले जातात. मूळचे त्यांचे घराणे वसईजवळ तर्खडचे. मुंबईत स्थायिक झाल्यामुळे शिक्षणानंतर एलफिन्स्टन कॉलेजात शिक्षक, नार्मल क्लासेसचे शिक्षक, शाळा तपासणीस, डेप्युटी कलेक्टर या पदांच्या निवृत्तीनंतर ट्रान्सलेटर (बडोदा संस्थान) कार्य करीत राहिले. सरकारने त्यांना 'रावबहादूर' ही पदवी बहाल केली. १८८२ मध्ये त्यांचा मृत्यू झाला.

धार्मिक कार्याप्रमाणे त्यांनी सामाजिक सुधारणांचाही पुरस्कार केला. देशी भाषेला शासकीय बदलत्या धोरणांमुळे हळूहळू अडथळा येत होता. त्यांनी स्वभाषा, स्वसंस्कृतीचा अभिमान कधीही सोडला नाही. इंग्रजी शिक्षणामुळे नोकरी मिळते तरी व्याकरणाच्या सातव्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत त्यांनी नमूद केले की, 'मी मराठीला जननीप्रमाणे मानतो, त्या आपल्या भाषेची शेवटपर्यंत सेवा केल्यावाचून राहवत नाही'. सामाजिक सुधारणा चळवळींचा हा आरंभीचा काळ होता. या प्रेरणेनेच पुढील सुधारकांचे सामाजिक कार्य व चळवळी उभ्या राहिल्या. त्यांनी शैक्षणिक ग्रंथाचे लेखन केले. त्यांनीच प्रेरणा देऊन 'मानवधर्म सभा' साकार केली. त्यातील सात धर्मसूत्रे धार्मिक व सामाजिक सुधारणांचा आधार मानली. त्यात ईश्वर एक आहे, मनुष्यमात्रांची जात एक आहे, धर्म एक आहे, श्रेष्ठ-कनिष्ठत्व गुणांवरून ठरवावे कुळावरून नाही, सर्वांनी विवेकाने वागवावे, परमेश्वर प्राप्तीसाठी भक्ती करावी, सर्वांना सन्मार्गाची, सदाचाराची शिक्षा द्यावी. तसेच जादूगार, मांत्रिक विरोधी मोहीमही चालवली. सामाजिक समता, मानवी ऐक्य, बंधुता यांवर त्यांनी भर दिला. श्रेष्ठ-कनिष्ठाचा खरा आधार ओळखून समाजाला मार्गदर्शन केले. १८४९ ला स्थापन झालेल्या 'परमहंस सभे'च्या निर्मितीत त्यांचा महत्त्वाचा वाटा होता.

### (ई) डॉ. भाऊ दाजी लाड यांचे कार्य (१८२४-७४)

रामकृष्ण विठ्ठल लाड ऊर्फ भाऊ दाजी लाड यांचा जन्म १८२४ मध्ये गोव्यातील मांजरे सारस्वत कुटुंबात झाला. शिक्षण व नोकरीसाठी ते मुंबईत राहिले. ब्रिटिशांचा अन्याय, अत्याचार व पिळवणूक यांविरुद्ध त्यांनी संघटन केले. सनदशीर चळवळीची भूमिका तयार केली. सर्जन राहून त्यांनी विविध संस्था उभारून मुंबईत जनसेवा व जनजागृती केली. 'बॉम्बे असोसिएशन' (१८५२), 'ईस्ट इंडिया असोसिएशन' लंडनची शाखा उघडण्यात दादाभाईंना त्यांनी मदत दिली. सरकार जनताभिमुख व्हावे, जनतेची गाऱ्हाणी ऐकून सोडवावीत यासाठी ते सतत प्रयत्न करत. त्यांनीच 'ज्ञानप्रसारक सभा' ही संघटना विकसित केली. वाङ्मय निर्मिती, इतिहास संशोधन व लेखन केले. ताम्रपट, शिलालेख अभ्यासले. समाजोपयोगी नवी औषधे व उपचार पद्धतीही त्यांनी शोधल्या. न्या. रानडेंचे नेमस्त राजकारण, ना. गोखलेंचे 'सर्व्हन्टस् ऑफ इंडिया सोसायटी'च्या स्थापनेमागेही त्यांची प्रेरणा राहिली. त्यांच्या कार्यामुळे सामाजिक प्रबोधनाला चालना मिळाली. त्यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेताना हे मुद्दे लक्षात ठेवता येतील.

### (उ) भाऊ महाजनांचे जागृती कार्य

समाज जागा झाला की सर्व सुधारणा पचनी पडतात. समाज जागृतीचे कार्य निर्भीड, सडेतोड, समतोल, स्वाभिमानी वृत्ती

जोपासणारा करू शकतो. अशी व्यक्ती जे लिहिते ते कदाचित तत्कालीन सामाजिक मनोभूमिकेची तयारी नसल्यामुळे समाजाला पचत नाही. मानवी काळाची ती गरज असते. जगासोबत जाणारी ती पावले असतात. अशाच एका सुधारकाचे हे सामाजिक जागृतीचे कार्य असून त्याचे नाव भाऊ महाजन (कुंटे) होय. ते बाळशास्त्रींचे वर्गसोबती होते. त्यांनी 'दर्पण' मध्ये सहभाग घेऊन व लेखन केले. १८३२ पासून ते या कार्यात रस घेऊ लागले नंतर 'दिग्दर्शन' मासिकात लिहीत राहिले. त्यांनी 'प्रभाकर' नावाचे साप्ताहिक चालवले. १८५३ पासून 'धूमकेतू' पत्र व नंतर 'ज्ञानदर्शन' मधून त्यांनी लेखन केले. अनेक लेखकांचे अनुवादित ग्रंथ त्यांनी त्रैमासिकांतून प्रकाशित केले. 'शब्दसिद्धी' सोडता इतर ग्रंथ नाहीत. 'मराठी वृत्तपत्र संस्था जिवंत असेपर्यंत 'प्रभाकर'ची स्मृती अखंड नांदेल' असे मत *ग. बा. सरदार* यांनी व्यक्त केले आहे.

## (ऊ) लोकहितवादींचे सामाजिक चिंतन

मागील घटकात लोकहितवादींच्या जीवनाचा व धार्मिक योगदानाचा परिचय आपण करून घेतला. येथे फक्त सामाजिक चिंतन व कार्याचा मागोवा घेऊ. त्यांनी इनाम कमिशनचे काम करीत असताना जहागिरी, इनामे, सनदांसंबंधी हजारो जुनी कागदपत्रे हाताळली. मराठे शाहीतील सरंजामशाहीवर चिंतन केले. त्यांनी 'शतपत्रांत' ऐतिहासिक, धार्मिक, राजकीय आणि सामाजिक माहितीही दिली आहे. इतिहास, चरित्रे, राजकीय आणि आर्थिक विषयांवर लेखन केले व ग्रंथ तयार केले. तसे ग्रंथ व लेखन सामाजिक विषयांतही केले. उदाहरणार्थ, (१) जातिभेद, (२) भिक्षुक, (३) प्राचीन आर्यविद्या व रीती, (४) महाराष्ट्रातील कामगारांसाठी संभाषण, (५) यंत्रज्ञान, (६) शतपत्रे, (७) निबंध संग्रह तसेच विविध नियतकालिकांतून इतर स्फुटलेखनही केले.

सामाजिक सुधारणांविषयी ते लिहितात -

'हिंदू समाजाच्या निष्क्रियतेला परंपरागत, साचेबंद, जुनाट धर्म कारणीभूत आहे. समाजाची घडण बलिष्ट व सुयोग्य पायावर व्हावी यासाठी धार्मिक विचार व आचार सुसंगत असणे आवश्यक आहे. त्यासाठी धर्माचा साधकबाधक विचार केल्याशिवाय सामाजिक सुधारणेचा विचार परिपूर्ण होऊ शकत नाही'.

त्यांना समाजाची सर्वांगीण सुधारणा हवी होती. जातिव्यवस्था अपरिवर्तनीय नसून परिवर्तनीय आहे. यासाठी त्यांनी प्राचीन धर्मग्रंथांचेच दाखले दिले. बाविसाव्या पत्रात ते लिहितात - 'या देशाचे उर्जित होण्यास ज्या अडचणी आहेत त्यातील मुख्य तीन दिसतात. (१) जात, (२) स्त्रियांची स्थिती, लहानपणी लग्न, (३) स्त्री-पुरुष असमानता.

समाजात सर्वत्र अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट चालीरीती आहेत. त्या नष्ट करून समाजाची उन्नती व्हावयाची असेल तर शिक्षणाची आवश्यकता आहे. शिक्षणात संस्कृतऐवजी व परंपरागत ज्ञानाऐवजी नवीन पाश्चात्त्य ज्ञानाची गरज आहे. लोक मूर्खपणात राहून भिकारी होत चालले आहे. अज्ञान रोगाने ग्रस्त होऊन मरावयास टेकले आहेत. त्यात औषधे कशाची? त्यांनी जीवनाभिमुख ज्ञानाचा पुरस्कार केला. तसेच इंग्रजी शिक्षण एवढे दर्जेदार आहे की, ते घेऊन आम्ही अधिक प्रगती करू व शेवटी संसदही मागू असे ते म्हणत. नोकरीच्या गावी वृत्तपत्रे, वाचनालय, व सामाजिक सुधारणेच्या संस्था त्यांनी सुरू केल्या. याचे उत्तम उदाहरण पुणे वाचनालय हे आहे. त्यांनी ज्ञानप्रकाश, हिंदू प्रकाश या वृत्तपत्र स्थापनेत मदत केली. वाईच्या कृष्णा नदीच्या पूरग्रस्तांना मदत दिली. मुंबई आर्य समाजाचे अध्यक्ष, विश्वस्त मंडळ सभासद राहून प्रभावी सामाजिक जागृतीचे कार्य केले. अहमदाबादला प्रार्थना समाजाच्या वतीने व्याख्याने दिली. गुजरातमध्ये १३ वर्षे राहून लोककल्याणाची कामे केली. ते परोपकारी होते म्हणून लोकप्रिय झाले. फिरावयास जाताना नोकरासोबत मलमपट्टीचे सामान घेऊन जात आणि आंधळ्या-पांगळ्यांना, महारोगी असेल तर त्यास ते मलमपट्टी, औषध-पाणी करत. लोकनिंदा सहन करून त्यांनी काम केले असे *ग. बा. सरदार* म्हणतात ते योग्यच होय. (ग्रंथ - *महाराष्ट्रातील उपेक्षित मानकरी*)

लोकहितवादींनी पुढीलप्रमाणे कामे केली.

- ★ लोकहितवादींनी सामाजिक अज्ञान घालविण्याचे प्रयत्न केले.
- ★ कर्मकांड व व्रतवैकल्ये यास विरोध केला.
- ★ जातिभेदाला विरोध केला.
- ★ सामाजिक समतेचा पुरस्कार केला.
- ★ समाज पतनास ब्राह्मण नेतृत्व जबाबदार होय.
- ★ स्त्रियांची दुरवस्था जावी, लादलेल्या प्रथा रद्दबातल व्हाव्यात.
- ★ पाश्चात्त्य शिक्षणाचा आग्रह धरावा कारण ती नवयुगाची संजीवनी आहे.
- ★ ईश्वरनिष्ठा, खरा धर्म, आचार-विचार स्वातंत्र्य, समता जातिभेदरहित गुणातित समाज, सर्वांगीण समाजसुधारणेचा आग्रह धरला.

लोकहितवादींचे कार्य पुढील सुधारकांना मार्गदर्शक ठरले.

## *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ३*

**पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगून कंसात (X) किंवा (✓) अशी खूण करा.**

(०१) जगन्नाथ शंकरशेठ यांचा जन्म १० फेब्रुवारी १८०३ मध्ये झाला. ( )

(०२) 'बॉम्बे नेटिव्ह स्कूल' ची स्थापना २१ ऑगस्ट १८२२ मध्ये करण्यात आली. ( )

(०३) १८५३ साली एलफिन्स्टन कॉलेज सुरू झाले. ( )

(०४) ठाणे-बोरीबंदर रेल्वे १८९० मध्ये सुरू झाली. ( )

(०५) बाळशास्त्री जांभेकर पहिले महाराष्ट्रीयन विद्वान ठरतात. त्यांनी शिलालेख, ताम्रपट, प्राचीन ब्राह्मी लिपी व इतर

बार्बीवर इंग्रजी लेख लिहिले; जे रॉयल एशियाटिक सोसायटीने छापले. ( )

(०६) जांभेकरांनी 'केसरी' हे वृत्तपत्र सुरू केले. ( )

(०७) १८४० मध्ये जांभेकरांना 'जस्टिस ऑफ पीस' ही पदवी देण्यात आली. ( )

(०८) दादोबा पांडुरंगांनी 'मानव धर्मसभा' साकार केली. ( )

(०९) लोकहितवादींनी 'प्रभाकर' हे साप्ताहिक चालवले. ( )

(१०) 'या देशाचे उर्जित होण्यास ज्या अडचणी आहेत त्यातील जात, स्त्रियांची स्थिती, लहानपणी लग्न व स्त्री-पुरुष समतेची गरज' असे लोकहितवादी म्हणाले. ( )

(११) जगन्नाथ शंकरशेठ आर्य समाजाचे अध्यक्ष होते. ( )

(१२) 'रॉयल एशियाटिक सोसायटी'ला लोकहितवादींनी ५०००/-ची देणगी दिली. ( )

## २.२.४ सामाजिक चळवळींचे महाराष्ट्रातील योगदान

### (अ) प्रार्थना समाजाचे सामाजिक चळवळींतील योगदान

प्रार्थना समाजाची स्थापना व धार्मिक प्रबोधनातील योगदान आपण मागील घटकात अभ्यासले. येथे सामाजिक चळवळीतील योगदान समजून घेऊ.

प्रार्थना समाजाने जातिव्यवस्था, बालविवाह, दलित उद्धार स्त्री-शिक्षण यांसाठी प्रयत्न केले. ब्राह्मो समाजाच्या प्रभावातून स्थापन झालेल्या या समाजाने त्या समाजाच्या सामाजिक कार्याचा वारसा चालवला. १८७६ मध्ये भिकोबा लक्ष्मण चव्हाणांनी मुंबईत पहिली रात्रशाळा चालू केली. सर्व जाती-जमातींची मुले त्यात शिक्षण घेऊ शकत. विशेष म्हणजे शिपाई, पोस्टमन, मोटर ड्रायव्हर, गिरणी कामगार अशा सर्वसामान्यांची मुले शिकत. या समाजाने विद्यार्थी शिक्षणासाठी 'कमवा व शिका' योजना चालवली. १८७५ मध्ये उमीया शंकर लालशंकर यांनी अनाथ मुलांसाठी (१८७८) पंढरपूरला अनाथाश्रम सुरू केले. दुष्काळाची विविध कामे (१८७६-७७) हाती घेऊन लोकांना मदत केली. प्रतापचंद्र मुजुमदारांनी व डॉ. सखाराम अर्जुन यांनी स्त्री-शिक्षणासाठी धडपड केली. रानडेंनी १८८२ ला पुण्यात मुलींची शाळा सुरू केली. पंडिता रमाबाईंनी आर्य महिला समाज सुरू केला. प्रार्थना समाजाच्या महिला कार्यकर्त्यांनी मदत दिली. १९०१ मध्ये सर नारायण चंदावरकरांची कन्या सौ. शिरूरने मुंबईत सामाजिक परिषदेचे अधिवेशन घेतले.

विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'डिप्रेस्ड क्लास मिशन' सुरू करून दलितासाठी कार्य केले. १९०१ मध्ये दलितांकरिता व्यापक कार्याची योजना केली. भिकोबा चव्हाणने वासुदेव बाबाजी नवरंगेशी काशीबाई या विधवेचा विवाह घडवला. डॉ. आत्माराम पांडुरंग व नारायण महादेव परमानंद यांनी स्त्रीचे विवाहाचे वय २० असावे हे स्पष्ट केले. जनसामान्यांचा नैतिक स्तर उंचावण्यासाठी 'ब्राह्मो पोस्टल मिशन' व 'संगतसभां'द्वारा प्रयत्न केले. संत तुकारामांच्या गाथा गायनातून धार्मिक-सामाजिक प्रबोधन केले.

### (आ) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे (१८७३-१९४४)

निराश्रित व दीनदुबळ्यांच्या उद्धारासाठी जीवन समर्पित करणारे २० व्या शतकातील महाराष्ट्रातील महान सुधारक म्हणून महर्षी शिंदे परिचित आहेत. पददलितांचा उद्धारक, थोर विचारवंत, चिकित्सक संशोधक, महर्षी पदाला शोभणारे तत्त्वचिंतक असे व्यक्तिमत्त्व लाभलेले एक थोर समाजसुधारक होते.

कर्नाटकातील जमखंडी या संस्थानी गावात जन्मलेले, विलायतेत जाऊन शिकून आलेले आणि अनेक विद्वानांचा भारतात सहवास लाभलेल्या महर्षी शिंदे यांनी सयाजीराव गायकवाडांकडे दिवाण या पदाची नोकरी नाकारली. ६० रुपये महिना घेऊन प्रार्थना समाजाचे प्रचार कार्य केले. त्यांनी फ्रान्स, हॉलंड, जर्मनी, इटली, इत्यादी देशांची सामाजिक स्थिती अभ्यासली. ॲमस्टरडमच्या 'आंतरराष्ट्रीय उदार धर्म परिषदेचे' प्रतिनिधित्व करून 'हिंदुस्थानचा उदार धर्म' हा निबंध सादर केला. पुढे एकेश्वरी धर्म परिषदेचे कार्य करून लोकास्थिती, अस्पृश्यांची स्थिती, चालीरीती, धर्मपंथाचे निरीक्षण व अभ्यास केला.

त्यांनी डिप्रेस्ड क्लास मिशनची स्थापना (१८ ऑगस्ट १९०६) करून त्यामार्फत अस्पृश्योद्धाराचे कार्यासाठी आपले आयुष्य वेचले. मिशन स्थापनेच्या वेळी न्या. चंदावरकर अध्यक्ष होते. ही 'भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळी' पुढील हेतूनें काम करू लागली. (१) शिक्षण प्रसार (२) नोकऱ्या मिळवून देणे (३) सामाजिक अडचणी सोडविणे (४) सार्वजनिक धर्म, व्यक्तिगत शील व नागरिकता हे गुण गरिबांत वाढवणे. हे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना अस्पृश्य वस्तीत राहणे बंधनकारक केले. मुंबई, पुणे, हुबळी, सातारा, ठाणे, दापोली, मालवण, मंगलोर, मद्रास, अकोला, इंदूर, अमरावती, भावनगर, कोल्हापूर, इत्यादी ठिकाणी अस्पृश्यांसाठी प्राथमिक, माध्यमिक शाळा, उद्योग शाळा, वसतिगृहे, रात्रशाळा, उपासनागृहे, मोफत दवाखाने, इत्यादी कामी अनेकांचे सहकार्य मिळविले. स्वत:चे संपूर्ण कुटुंब या कामी लावले. मुंबई, मद्रास व मध्य प्रदेशापर्यंत मिशनचे कार्य सुरू झाले. त्यांचे चरित्रकार *प्राचार्य तोरडमल* लिहितात, 'दीनदुबळ्यांची सेवा म्हणजे ईश्वर सेवा' असे ते मानत. डॉ. भांडारकर, न्या. चंदावरकरांशी मतभेद होताच त्यांनी प्रार्थना समाज सोडला.

त्यांनी इंदूरकर होळकरांची २० हजारांची मदत मिळवून व सरकारी मदत घेऊन पुण्यात अहिल्याश्रमाची सुरुवात केली व ती अस्पृश्यांच्या ताब्यात दिली. *प्रा. मा. प. मंगुडकरांच्या* मते, 'अस्पृश्यता निवारणाच्या कार्यासाठी जन्माला आलेली ही संस्था भारतातील संस्थात्मक प्रयत्न करणारी एकमेव संस्था होती'.

## २.२.३ आरंभीच्या सामाजिक चळवळी व सुधारक

महाराष्ट्रात आरंभीच्या सामाजिक चळवळींचे आधारस्तंभ जगन्नाथ शंकरशेठ, आचार्य बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग तर्खडकर, भाऊ महाजन, लोकहितवादी व डॉ. भाऊ दाजी लाड यांचे कार्य या क्षेत्रातील पायाभूत कार्य होय. म्हणून त्यांना महाराष्ट्रातील जागृतीचे आद्य प्रवर्तक मानले जाते. या व्यक्तींचा व त्यांच्या या चळवळींतील कार्याचा आपण परिचय करून घेऊ.

### (अ) जगन्नाथ शंकरशेठ व त्यांचे कार्य (१८०३-१८६५)

ठाणे जिल्ह्याच्या मुरबाडचे मुकटे हे सोनार कुटुंब होय. शंकरशेठ यांचे वडील घोडबंदरला व शंकरशेठ मुंबईला येऊन राहिले. जगन्नाथांचा जन्म १० फेब्रुवारी १८०३ रोजी झाला. लक्ष्मी व सरस्वतीचे वरदान लाभल्याने ते श्रीमंत व विद्वानही होते. ते लहान असताना आईचा व १ वर्षाचे असताना वडिलांचा मृत्यू झाला. सर्व जबाबदारी जगन्नाथांवर पडली. ते इंग्रजी, मराठी, संस्कृत भाषेत निपुण होते. व्यापारामुळे त्यांचा दबदबा होता. ब्रिटिश अधिकारी, गव्हर्नर आदींशी त्यांचे चांगले संबंध होते. त्यांचा स्वभाव राज्यकर्ते व स्थानिक समाजाची मर्जी संपादन करणारा होता. त्यांनी लोकांची गाऱ्हाणी सरकारकडे मांडून हव्या त्या सुधारणा मिळवल्या. एलफिन्स्टनने अनेक वेळा त्यांना मदतीला घेतले. शिक्षणाशिवाय मुंबईकरांचा उद्धार नाही हे त्यांनी एलफिन्स्टनला पटवले. मिशनरी शिक्षण सर्वांना नव्हते म्हणून त्यांनी पुढाकार घेऊन २१ ऑगस्ट १८२२ मध्ये 'बॉम्बे नेटिव्ह स्कूल'ची स्थापना केली. १८२४ मध्ये तिचे 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' मध्ये रूपांतर होऊन अनेक शाळा सुरू झाल्या. या कामी सदाशिव छत्रे, जगन्नाथ शास्त्री क्रमवंत, बाळ गंगाधर शास्त्री, जांभेकरांनी सहकार्य केले. १८२७ मध्ये त्यांनी त्यांच्या अध्यक्षतेत एलफिन्स्टनच्या इंग्लंड पद्धतीनंतर उच्च शिक्षणासाठी निधी गोळा करून एलफिन्स्टन फंड उभारला. १८३७ साली एलफिन्स्टन कॉलेज सुरू केले. बोर्ड ऑफ एज्युकेशनची स्थापना करून ते सदस्य बनले. १८५६ मध्ये शिक्षण खाते त्यातूनच रूपांतरित स्वरूपात जन्मले.

यापूर्वी १८४५ मध्ये 'स्टुडंट लिटररी अँण्ड सायंटिफिक सोसायटी'च्या स्थापनेत त्यांनी दादाभाई नौरोजी, भाऊ दाजी लाड, वि. ना. मंडलिक या तरुणांना मदत केली. अर्थसाहाय्य तर ते प्रत्येक संस्थेला देत असत. १८४८ ला मुलींची शाळा सुरू केली. ग्रँट मेडिकल कॉलेज उभारणी, बॉम्बे युनिव्हर्सिटी स्थापना व पाच हिंदी फेलो, सिनेटमध्ये मराठी माध्यमाचा आग्रह, १८५७ मध्ये 'दि जगन्नाथ शंकरशेठ फर्स्ट ग्रेड अँग्लो व्हर्निक्युलर स्कूल'चा आरंभ केला. विनायकराव या पुत्राने वडिलांच्या नावे शिष्यवृत्ती देण्यास प्रारंभ केला.

राजकारणात येऊनच हवे ते मागता येईल आणि मिळवता येईल असे त्यांना वाटत असे. दादाभाईंसोबत त्यांनी प्रयत्न करून १८५२ मध्ये 'बॉम्बे असोसिएशन' ही राजकीय संस्था सुरू केली. १८६१ मध्ये कायदेमंडळात हिंदी लोकांना प्रतिनिधित्व मिळवून दिले. ते कायदेमंडळाचे सभासद बनले. कायदा करताना लोकमत कळावे म्हणून गव्हर्नर जगन्नाथ शंकरशेठचा सल्ला घेत असे. सरकारी दरबारात आपले वजन वापरून लोकोपयोगी कामे करावीत असा त्यांचा स्वभाव होता. उदाहरणार्थ, पेटी सेशन मध्ये एक मॅजिस्ट्रेट असून जनतेला योग्य न्याय मिळावा म्हणून त्यांचे २ प्रतिनिधी (जस्टिस ऑफ पीस) राजाकडून हिंदी लोकच नेमण्यास भाग पाडले. मुंबई शहरात १८२५ मध्ये १२ जे. पी. नियुक्त झाले. त्यातील चार महाराष्ट्रीयांपैकी जगन्नाथ शंकरशेठ एक होते. 'ग्रँडज्युरी'त गोरे पंचासोबत त्यांनी हिंदी माणूसही ठेवला. बॅरिस्टरऐवजी वकील खटले चालविण्यास खास 'स्मॉल कॉज' मध्ये सामान्य वकिलाला अधिकार देऊन सामान्यांच्या खटले चालवण्याची मान्यता होऊन सामान्यांना न्याय मिळणे शक्य झाले.

त्यांनी रु. ५०००/- देणगी देऊन 'रॉयल एशियाटिक सोसायटी' मुंबईला स्थापना केली. विज्ञानाचे स्वतंत्र ग्रंथ आणून जगन्नाथ शंकरशेठ लायब्ररी उभी केली. कावसजी इंस्टिट्यूट, राणीच्या बागेचे उद्घाटन केले. बागेत व्हिक्टोरिया व अल्बर्ट म्युझियम उभारून ५०००/- रुपयांचे अर्थसाहाय्य दिले. त्यांनी 'अग्रिहार्टीकल्चरल सोसायटी ऑफ वेस्टर्न इंडिया', 'जिओग्राफिकल सोसायटी' सुरू केली. अनेकानेक संस्थांचे अध्यक्ष असले तरी 'जनतेचा सेवक' १८३७ चे भिवंडीचे पालखी प्रकरण व हिंदू-मुसलमान दंगा, १८६३ चे गोऱ्यांद्वारा मूर्ती भंग, द्वारकेला मूर्ती भंग केली तिची प्रतिष्ठापना, तसेच सोनापूर स्मशानभूमी प्रकरण, इत्यादी प्रसंग त्यांनी मध्यस्थी करून मिटवले. ठाणे-बोरीबंदर रेल्वे (१८५३), बोरीबंदर ते पुणे रेल्वे (१८५३) सुरू करण्यासाठी त्यांचे प्रयत्न कामी आले. मुंबईसाठी महानगरपालिका आहे. म्युनिसिपल कायदा करून ही संस्था जन्माला घालण्यात जगन्नाथ शंकरशेठ यांचे प्रयत्न कारणीभूत होते. मुंबईचा सांस्कृतिक, बौद्धिक, नागरी सुविधांचा विकास करण्यास ते नेहमी तत्पर असत. त्यांनी अनेक संस्था सुरू केल्या ज्या आजतागायत कार्यरत आहेत. त्यांनी अनेक देवालये, धर्मशाळा व दवाखाने बांधविले. १८ ऑक्टोबर १८६५ रोजी त्यांनी इहलोक सोडला. त्यांच्या महान कर्तृत्वाची आठवण टाऊन हॉल इमारतीतील त्यांचा पुतळा आजही करून देत आहे. हा सर्वोत्कृष्ट पुतळा मुंबईमध्ये लंडनचा मूर्तिकार मॅथ्यू नोबलने तयार केला.

### (आ) बाळशास्त्री जांभेकरांचे योगदान (१८१२-१८४६)

एक उमदा शिक्षक, विद्वान व ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वाचे बाळशास्त्री जांभेकर हे उठून दिसणारे समाजसुधारक होते. त्यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील पोंबर्ले या गावी झाला. ते मराठी व संस्कृत शिकले. नंतर मुंबईला येऊन दोन-तीन वर्षांतच त्यांनी

इंग्रजीवर प्रभुत्व मिळवले. वडील गंगाधर शास्त्री यांनी त्यांना बापू छत्रेंच्या मार्गदर्शनाखाली ठेवले होते. एकंदर ते इंग्रजी, बंगाली, फारसी या भाषांबरोबरच गणित, भूगोल या विषयांतही तज्ज्ञ बनले. ते १८२८ मध्ये एलफिन्स्टन विद्यालयात अध्यापक झाले. १८३२ मध्ये सरकारने त्यांची नेमणूक अक्कलकोटच्या युवराजद्वयांसाठी केली. १८३४ मध्ये ते एलफिन्स्टन इंस्टिट्यूटमध्ये अध्यापक, पुढे प्राध्यापक झाले. दादाभाई नौरोजी, केरूनाथ छत्रेंचे ते गुरू. अध्यापक वर्गाचे 'रिक्टर' व नंतर इन्स्पेक्टर राहिले. सरकारी पदे सांभाळली व सोबत लोकशिक्षण, समाजसुधारणा, पदरचा खर्च करून ज्ञानप्रसार व इतिहास-संशोधन केले. वयाच्या ३४ व्या वर्षी ते वारले. त्यांनी अनेक विषयांची पाठ्यपुस्तके लिहिली व छपाईची सोय नसताना ज्ञानाची सेवा केली. सरकारी अधिकारी त्यांचा सल्ला घेऊनच शिक्षणप्रसाराचे कार्य करत. त्यांनी शिक्षकांना आपण ऋषींप्रमाणे विद्यासंपन्न व विद्यादान करणारे आहोत असा सल्ला दिला. त्यांनी प्रचंड ज्ञानभांडार ठेवले जे जन्मभर पुरेल शिक्षकी पेशा हलका मानू नका. मठ्ठ प्रजेमुळे सरकारी नोकर महत्त्वाचे ठरतात. विद्याप्रसार व्हावा; त्यामुळे सरकारी नोकरांचा थाटमाट जाईल. स्वदेशाभिमान व स्वधर्माभिमान उत्पन्न व्हावा असा प्रयत्न करावा. सरकार व प्रजा, धनी व चाकर, आई-बाप व पुत्र यांत प्रेमभाव वाढेल; जास्त विद्यासंपन्न होऊनच लोकजागृती करता येईल. ते स्वत: पहिले महाराष्ट्रीयन विद्वान ठरतात. त्यांनी शिलालेख, ताम्रपट, प्राचीन ब्राह्मी लिपी व इतर बाबींवर इंग्रजीतून लिहिले जे 'बॉम्बे रॉयल एशियाटिक सोसायटी'च्या संशोधन पत्रिकेत छापले गेले. वृत्तपत्र 'दर्पण' सुरू करून त्यातून लेखन केले. प्रतिगामी, सनातनी विचार सोडून, मातृभाषा, इंग्रजी एका किंवा अनेक प्राचीन भाषांचे सखोल ज्ञान मिळवा असे ते म्हणत. त्यांनी पाश्चात्त्य विद्येचा फैलाव, देशाची भरभराट, लोककल्याण यांकडे लक्ष वळवले. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या खंडनाला उत्तर देणे, प्रतिगामी विचार त्यागणे, लोकमत, धर्म व समाजसुधारणांवर भर दिला. स्त्री-शिक्षण, विधवा-विवाहाचा पुरस्कार केला. त्यांच्या लेखन व जागृती कार्यामुळे गव्हर्नर सर जेम्स कार्नक यांनी इ.स. १८४० मध्ये जांभेकरांना 'जस्टीस ऑफ दि पीस' ही पदवी दिली. आद्य इतिहास संशोधक, शिक्षणतज्ज्ञ, श्रेष्ठ पत्रकार, आद्य वृत्तपत्रकार, जनप्रतिनिधी तसेच एक प्रगमनशील व्यवहारवादी सुधारक म्हणून आचार्य बाळशास्त्री जांभेकरांचा मान कायम राहील. महाराष्ट्रातील समाजसुधारणा चळवळींत आरंभीच्या मोजक्या सुधारणांत त्यांचे नाव महत्त्वपूर्ण ठरते.

### (इ) दादोबा पांडुरंग तर्खडकरांचे सामाजिक योगदान

दादोबा पांडुरंग तर्खडकर 'मराठी भाषेचे व्याकरण' या विस्तृत ग्रंथलेखनामुळे 'मराठी भाषेचे पाणिनी' मानले जातात. मूळचे त्यांचे घराणे वसईजवळ तर्खडचे. मुंबईत स्थायिक झाल्यामुळे शिक्षणानंतर एलफिन्स्टन कॉलेजात शिक्षक, नार्मल क्लासेसचे शिक्षक, शाळा तपासणीस, डेप्युटी कलेक्टर या पदांच्या निवृत्तीनंतर ट्रान्सलेटर (बडोदा संस्थान) कार्य करीत राहिले. सरकारने त्यांना 'रावबहादूर' ही पदवी बहाल केली. १८८२ मध्ये त्यांचा मृत्यू झाला.

धार्मिक कार्याप्रमाणे त्यांनी सामाजिक सुधारणांचाही पुरस्कार केला. देशी भाषेला शासकीय बदलत्या धोरणांमुळे हळूहळू अडथळा येत होता. त्यांनी स्वभाषा, स्वसंस्कृतीचा अभिमान कधीही सोडला नाही. इंग्रजी शिक्षणामुळे नोकरी मिळते तरी व्याकरणाच्या सातव्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत त्यांनी नमूद केले की, 'मी मराठीला जननीप्रमाणे मानतो, त्या आपल्या भाषेची शेवटपर्यंत सेवा केल्यावाचून राहवत नाही'. सामाजिक सुधारणा चळवळींचा हा आरंभीचा काळ होता. या प्रेरणेनेच पुढील सुधारकांचे सामाजिक कार्य व चळवळी उभ्या राहिल्या. त्यांनी शैक्षणिक ग्रंथाचे लेखन केले. त्यांनीच प्रेरणा देऊन 'मानवधर्म सभा' साकार केली. त्यातील सात धर्मसूत्रे धार्मिक व सामाजिक सुधारणाचा आधार मानली. त्यात ईश्वर एक आहे, मनुष्यमात्रांची जात एक आहे, धर्म एक आहे, श्रेष्ठ-कनिष्ठत्व गुणांवरून ठरवावे कुळावरून नाही, सर्वांना विवेकाने वागवावे, परमेश्वर प्राप्तीसाठी भक्ती करावी, सर्वांना सन्मार्गाची, सदाचाराची शिक्षा द्यावी. तसेच जादूगार, मांत्रिक विरोधी मोहीमही चालवली. सामाजिक समता, मानवी ऐक्य, बंधुता यावर त्यांनी भर दिला. श्रेष्ठ-कनिष्ठाचा खरा आधार ओळखून समाजाला मार्गदर्शन केले. १८४९ ला स्थापन झालेल्या 'परमहंस सभे'च्या निर्मितीत त्यांचा महत्त्वाचा वाटा होता.

### (ई) डॉ. भाऊ दाजी लाड यांचे कार्य (१८२४-७४)

रामकृष्ण विठ्ठल लाड ऊर्फ भाऊ दाजी लाड यांचा जन्म १८२४ मध्ये गोव्यातील मांजरे सारस्वत कुटुंबात झाला. शिक्षण व नोकरीसाठी ते मुंबईत राहिले. ब्रिटिशांचा अन्याय, अत्याचार व पिळवणूक यांविरुद्ध त्यांनी संघटन केले. सनदशीर चळवळीची भूमिका तयार केली. सर्जन राहून त्यांनी विविध संस्था उभारून मुंबईत जनसेवा व जनजागृती केली. 'बॉम्बे असोसिएशन' (१८५२), 'ईस्ट इंडिया असोसिएशन' लंडनची शाखा उघडण्यात दादाभाईंना त्यांनी मदत दिली. सरकार जनताभिमुख व्हावे, जनतेची गाऱ्हाणी ऐकून सोडवावीत यासाठी ते सतत प्रयत्न करत. त्यांनीच 'ज्ञानप्रसारक सभा' ही संघटना विकसित केली. वाङ्मय निर्मिती, इतिहास संशोधन व लेखन केले. ताम्रपट, शिलालेख अभ्यासले. समाजोपयोगी नवी औषधे व उपचार पद्धतीही त्यांनी शोधल्या. न्या. रानडेंचे नेमस्त राजकारण, ना. गोखलेंचे 'सर्व्हन्टस् ऑफ इंडिया सोसायटी' च्या स्थापनेमागेही त्यांची प्रेरणा राहिली. त्यांच्या कार्यामुळे सामाजिक प्रबोधनाला चालना मिळाली. त्यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेताना हे मुद्दे लक्षात ठेवता येतील.

### (उ) भाऊ महाजनांचे जागृती कार्य

समाज जागा झाला की सर्व सुधारणा पचनी पडतात. समाज जागृतीचे कार्य निर्भीड, सडेतोड, समतोल, स्वाभिमानी वृत्ती

जोपासणारा करू शकतो. अशी व्यक्ती जे लिहिते ते कदाचित तत्कालीन सामाजिक मनोभूमिकेची तयारी नसल्यामुळे समाजाला पचत नाही. मानवी काळाची ती गरज असते. जगासोबत जाणारी ती पावले असतात. अशाच एका सुधारकाचे हे सामाजिक जागृतीचे कार्य असून त्याचे नाव भाऊ महाजन (कुंटे) होय. ते बाळशास्त्रींचे वर्गसोबती होते. त्यांनी 'दर्पण' मध्ये सहभाग घेऊन व लेखन केले. १८३२ पासून ते या कार्यात रस घेऊ लागले नंतर 'दिग्दर्शन' मासिकात लिहीत राहिले. त्यांनी 'प्रभाकर' नावाचे साप्ताहिक चालवले. १८५३ पासून 'धूमकेतू' पत्र व नंतर 'ज्ञानदर्शन' मधून त्यांनी लेखन केले. अनेक लेखकांचे अनुवादित ग्रंथ त्यांनी त्रैमासिकातून प्रकाशित केले. 'शब्दसिद्धी' सोडता इतर ग्रंथ नाहीत. 'मराठी वृत्तपत्र संस्था जिवंत असेपर्यंत 'प्रभाकर'ची स्मृती अखंड नांदेल' असे मत *गं. बा. सरदार* यांनी व्यक्त केले आहे.

### (ऊ) लोकहितवादींचे सामाजिक चिंतन

मागील घटकात लोकहितवादींच्या जीवनाचा व धार्मिक योगदानाचा परिचय आपण करून घेतला. येथे फक्त सामाजिक चिंतन व कार्याचा मागोवा घेऊ. त्यांनी इनाम कमिशनचे काम करीत असताना जहागिरी, इनामे, सनदांसंबंधी हजारो जुनी कागदपत्रे हाताळली. मराठे शाहीतील सरंजामशाहीवर चिंतन केले. त्यांनी 'शतपत्रांत' ऐतिहासिक, धार्मिक, राजकीय आणि सामाजिक माहितीही दिली आहे. इतिहास, चरित्रे, राजकीय आणि आर्थिक विषयांवर लेखन केले व ग्रंथ तयार केले. तसे ग्रंथ व लेखन सामाजिक विषयांतही केले. उदाहरणार्थ, (१) जातिभेद, (२) भिक्षुक, (३) प्राचीन आर्यविद्या व रीती, (४) महाराष्ट्रातील कामगारांसाठी संभाषण, (५) यंत्रज्ञान, (६) शतपत्रे, (७) निबंध संग्रह तसेच विविध नियतकालिकांतून इतर स्फुटलेखनही केले.

सामाजिक सुधारणांविषयी ते लिहितात -

'हिंदू समाजाच्या निष्क्रियतेला परंपरागत, साचेबंद, जुनाट धर्म कारणीभूत आहे. समाजाची घडण बलिष्ट व सुयोग्य पायावर व्हावी यासाठी धार्मिक विचार व आचार सुसंगत असणे आवश्यक आहे. त्यासाठी धर्माचा साधकबाधक विचार केल्याशिवाय सामाजिक सुधारणेचा विचार परिपूर्ण होऊ शकत नाही'.

त्यांना समाजाची सर्वांगीण सुधारणा हवी होती. जातिव्यवस्था अपरिवर्तनीय नसून परिवर्तनीय आहे. यासाठी त्यांनी प्राचीन धर्मग्रंथांचेच दाखले दिले. बाविसाव्या पत्रात ते लिहितात 'या देशाचे उर्जित होण्यास ज्या अडचणी आहेत त्यातील मुख्य तीन दिसतात. (१) जात, (२) स्त्रियांची स्थिती, लहानपणी लग्न, (३) स्त्री-पुरुष असमानता.

समाजात सर्वत्र अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट चालीरिती आहेत. त्या नष्ट करून समाजाची उन्नती व्हावयाची असेल तर शिक्षणाची आवश्यकता आहे. शिक्षणात संस्कृतऐवजी व परंपरागत ज्ञानाऐवजी नवीन पाश्चात्य ज्ञानाची गरज आहे. लोक मूर्खपणात राहून भिकारी होत चालले आहे. अज्ञान रोगाने ग्रस्त होऊन मरावयास टेकले आहेत. त्यात औषधे कशाची? त्यांनी जीवनाभिमुख ज्ञानाचा पुरस्कार केला. तसेच इंग्रजी शिक्षण एवढे दर्जेदार आहे की, ते घेऊन आम्ही अधिक प्रगती करू व शेवटी संसदही मागू असे ते म्हणत. नोकरीच्या गावी वृत्तपत्रे, वाचनालय, व सामाजिक सुधारणेच्या संस्था त्यांनी सुरू केल्या. याचे उत्तम उदाहरण पुणे वाचनालय हे आहे. त्यांनी ज्ञानप्रकाश, हिंदू प्रकाश या वृत्तपत्र स्थापनेत मदत केली. वाईच्या कृष्णा नदीच्या पूरग्रस्तांना मदत दिली. मुंबई आर्य समाजाचे अध्यक्ष, विश्वस्त मंडळ सभासद राहून प्रभावी सामाजिक जागृतीचे कार्य केले. अहमदाबादला प्रार्थना समाजाच्या वतीने व्याख्याने दिली. गुजरातमध्ये १३ वर्षे राहून लोककल्याणाची कामे केली. ते परोपकारी होते म्हणून लोकप्रिय झाले. फिरावयास जाताना नोकरासोबत मलमपट्टीचे सामान घेऊन जात आणि आंधळ्या-पांगळ्यांना, महारोगी असेल तर त्यास ते मलमपट्टी, औषध-पाणी करत. लोकनिंदा सहन करून त्यांनी काम केले असे *गं. बा. सरदार* म्हणतात ते योग्यच होय. (ग्रंथ - *महाराष्ट्रातील उपेक्षित मानकरी*)

लोकहितवादींनी पुढीलप्रमाणे कामे केली.

★ लोकहितवादींनी सामाजिक अज्ञान घालविण्याचे प्रयत्न केले.
★ कर्मकांड व व्रतवैकल्ये यास विरोध केला.
★ जातिभेदाला विरोध केला.
★ सामाजिक समतेचा पुरस्कार केला.
★ समाज पतनास ब्राह्मण नेतृत्व जबाबदार होय.
★ स्त्रियांची दुरवस्था जावी, लादलेल्या प्रथा रद्दबातल व्हाव्यात.
★ पाश्चात्य शिक्षणाचा आग्रह धरावा कारण ती नवयुगाची संजीवनी आहे.
★ ईश्वरनिष्ठा, खरा धर्म, आचार-विचार स्वातंत्र्य, समता जातिभेदरहित गुणातित समाज, सर्वांगीण समाजसुधारणेचा आग्रह धरला.

लोकहितवादींचे कार्य पुढील सुधारकांना मार्गदर्शक ठरले.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ३*

**पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगून कंसात (X) किंवा (✓) अशी खूण करा.**

(०१) जगन्नाथ शंकरशेठ यांचा जन्म १० फेब्रुवारी १८०३ मध्ये झाला. ( )

(०२) 'बॉम्बे नेटिव्ह स्कूल' ची स्थापना २१ ऑगस्ट १८२२ मध्ये करण्यात आली. ( )

(०३) १८५३ साली एलफिन्स्टन कॉलेज सुरू झाले. ( )

(०४) ठाणे-बोरीबंदर रेल्वे १८९० मध्ये सुरू झाली. ( )

(०५) बाळशास्त्री जांभेकर पहिले महाराष्ट्रीयन विद्वान ठरतात. त्यांनी शिलालेख, ताम्रपट, प्राचीन ब्राह्मी लिपी व इतर

बार्बीवर इंग्रजी लेख लिहिले; जे रॉयल एशियाटिक सोसायटीने छापले. ( )

(०६) जांभेकरांनी 'केसरी' हे वृत्तपत्र सुरू केले. ( )

(०७) १८४० मध्ये जांभेकरांना 'जस्टिस ऑफ पीस' ही पदवी देण्यात आली. ( )

(०८) दादोबा पांडुरंगांनी 'मानव धर्मसभा' साकार केली. ( )

(०९) लोकहितवादींनी 'प्रभाकर' हे साप्ताहिक चालवले. ( )

(१०) 'या देशाचे उर्जित होण्यास ज्या अडचणी आहेत त्यातील जात, स्त्रियांची स्थिती, लहानपणी लग्न व स्त्री-पुरुष समतेची गरज' असे लोकहितवादी म्हणाले. ( )

(११) जगन्नाथ शंकरशेठ आर्य समाजाचे अध्यक्ष होते. ( )

(१२) 'रॉयल एशियाटिक सोसायटी'ला लोकहितवादींनी ५०००/-ची देणगी दिली. ( )

## २.२.४ सामाजिक चळवळीचे महाराष्ट्रातील योगदान

### (अ) प्रार्थना समाजाचे सामाजिक चळवळींतील योगदान

प्रार्थना समाजाची स्थापना व धार्मिक प्रबोधनातील योगदान आपण मागील घटकात अभ्यासले. येथे सामाजिक चळवळीतील योगदान समजून घेऊ.

प्रार्थना समाजाने जातिव्यवस्था, बालविवाह, दलित उद्धार स्त्री-शिक्षण यासाठी प्रयत्न केले. ब्राह्मो समाजाच्या प्रभावातून स्थापन झालेल्या या समाजाने त्या समाजाच्या सामाजिक कार्याचा वारसा चालवला. १८७६ मध्ये भिकोबा लक्ष्मण चव्हाणांनी मुंबईत पहिली रात्रशाळा चालू केली. सर्व जाती-जमातींची मुले त्यात शिक्षण घेऊ शकत. विशेष म्हणजे शिपाई, पोस्टमन, मोटर ड्रायव्हर, गिरणी कामगार अशा सर्वसामान्यांची मुले शिकत. या समाजाने विद्यार्थी शिक्षणासाठी 'कमवा व शिका' योजना चालवली. १८७५ मध्ये उमीया शंकर लालशंकर यांनी अनाथ मुलांसाठी (१८७८) पंढरपूरला अनाथाश्रम सुरू केले. दुष्काळाची विविध कामे (१८७६-७७) हाती घेऊन लोकांना मदत केली. प्रतापचंद्र मुजुमदारांनी व डॉ. सखाराम अर्जुन यांनी स्त्री-शिक्षणासाठी धडपड केली. रानडेंनी १८८२ ला पुण्यात मुलींची शाळा सुरू केली. पंडिता रमाबाईंनी आर्य महिला समाज सुरू केला. प्रार्थना समाजाच्या महिला कार्यकर्त्यांनी मदत दिली. १९०१ मध्ये सर नारायण चंदावरकरांची कन्या सौ. शिरूरने मुंबईत सामाजिक परिषदेचे अधिवेशन घेतले.

विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'डिप्रेस्ड क्लास मिशन' सुरू करून दलितांसाठी कार्य केले. १९०१ मध्ये दलितांकरिता व्यापक कार्याची योजना केली. भिकोबा चव्हाणने वासुदेव बाबाजी नवरंगेशी काशीबाई या विधवेचा विवाह घडवला. डॉ. आत्माराम पांडुरंग व नारायण महादेव परमानंद यांनी स्त्रीचे विवाहाचे वय २० असावे हे स्पष्ट केले. जनसामान्यांचा नैतिक स्तर उंचावण्यासाठी 'ब्राह्मो पोस्टल मिशन' व 'संगतसभां'द्वारा प्रयत्न केले. संत तुकारामांच्या गाथा गायनातून धार्मिक-सामाजिक प्रबोधन केले.

### (आ) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे (१८७३-१९४४)

निराश्रित व दीनदुबळ्यांच्या उद्धारासाठी जीवन समर्पित करणारे २० व्या शतकातील महाराष्ट्रातील महान सुधारक म्हणून महर्षी शिंदे परिचित आहेत. पददलितांचा उद्धारक, थोर विचारवंत, चिकित्सक सशोधक, महर्षी पदाला शोभणारे तत्त्वचिंतक असे व्यक्तिमत्त्व लाभलेले एक थोर समाजसुधारक होते.

कर्नाटकातील जमखंडी या संस्थानी गावात जन्मलेले, विलायतेत जाऊन शिकून आलेले आणि अनेक विद्वानांचा भारतात सहवास लाभलेल्या महर्षी शिंदे यांनी सयाजीराव गायकवाडांकडे दिवाण या पदाची नोकरी नाकारली. ६० रुपये महिना घेऊन प्रार्थना समाजाचे प्रचार कार्य केले. त्यांनी फ्रान्स, हॉलंड, जर्मनी, इटली, इत्यादी देशांची सामाजिक स्थिती अभ्यासली. ॲमस्टरडमच्या 'आंतरराष्ट्रीय उदार धर्म परिषदेचे' प्रतिनिधित्व करून 'हिंदुस्थानचा उदार धर्म' हा निबंध सादर केला. पुढे एकेश्वरी धर्म परिषदेचे कार्य करून लोकास्थिती, अस्पृश्यांची स्थिती, चालीरीती, धर्मपंथाचे निरीक्षण व अभ्यास केला.

त्यांनी डिप्रेस्ड क्लास मिशनची स्थापना (१८ ऑगस्ट १९०६) करून त्यामार्फत अस्पृश्योद्धाराचे कार्यासाठी आपले आयुष्य वेचले. मिशन स्थापनेच्या वेळी न्या. चंदावरकर अध्यक्ष होते. ही 'भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळी' पुढील हेतूने काम करू लागली. (१) शिक्षण प्रसार (२) नोकऱ्या मिळवून देणे (३) सामाजिक अडचणी सोडविणे (४) सार्वजनिक धर्म, व्यक्तिगत शील व नागरिकता हे गुण गरिबांत वाढवणे. हे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना अस्पृश्य वस्तीत राहणे बंधनकारक केले. मुंबई, पुणे, हुबळी, सातारा, ठाणे, दापोली, मालवण, मंगलोर, मद्रास, अकोला, इंदूर, अमरावती, भावनगर, कोल्हापूर, इत्यादी ठिकाणी अस्पृश्यांसाठी प्राथमिक, माध्यमिक शाळा, उद्योग शाळा, वसतिगृहे, रात्रशाळा, उपासनागृहे, मोफत दवाखाने, इत्यादी कामी अनेकांचे सहकार्य मिळविले. स्वतःचे संपूर्ण कुटुंब या कामी लावले. मुंबई, मद्रास व मध्य प्रदेशापर्यंत मिशनचे कार्य सुरू झाले. त्यांचे चरित्रकार *प्राचार्य तोरडमल* लिहितात, 'दीनदुबळ्यांची सेवा म्हणजे ईश्वर सेवा' असे ते मानत. डॉ. भांडारकर, न्या. चंदावरकरांशी मतभेद होताच त्यांनी प्रार्थना समाज सोडला.

त्यांनी इंदूरकर होळकरांची २० हजारांची मदत मिळवून व सरकारी मदत घेऊन पुण्यात अहिल्याश्रमाची सुरुवात केली व ती अस्पृश्यांच्या ताब्यात दिली. *प्रा. मा. प. मंगुडकरांच्या* मते, 'अस्पृश्यता निवारणाच्या कार्यासाठी जन्माला आलेली ही संस्था भारतातील संस्थात्मक प्रयत्न करणारी एकमेव संस्था होती'.

(१०) तत्कालीन समाजाला आगरकरांचा दृष्टिकोन पचनी पडला नाही. कारण ते काळाच्या १०० वर्षे पुढे होते. ( )

(११) विष्णुबुवा ब्रह्मचारी यांनी सर्व प्रजा हे एक कुटुंब मानून सर्व जमीन व संपत्ती यांवर सामाजिक मालकी प्रस्थापित करावी असे मत मांडले. ( )

(१२) रावसाहेब वि. ना. मंडलिक यांनी मुंबई विद्यापीठात देशी भाषा वगळण्याच्या ठरावास सक्त विरोध केला. ( )

(१३) लो. टिळकांचा मुख्य भर सामाजिक सुधारणांवर होता राजकीय स्वातंत्र्य आपण नंतर प्राप्त करून असे ते म्हणत. ( )

(१४) गोपाळकृष्ण आगरकर यांनी विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनातून समाजशास्त्रीय विचार मांडले. ( )

## २.२.५ महाराष्ट्रातील महिला चळवळी

### (अ) एकोणिसाव्या शतकातील चळवळी

महाराष्ट्रातील महिला चळवळीच्या अभ्यासाचे दोन भाग करता येतील. त्यातील पहिला भाग एकोणिसाव्या शतकातील महिला संदर्भ व दुसरा भाग वीसाव्या शतकातील महिला चळवळींचे संदर्भ. प्राचीन काळी स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीचे स्थान होते व तिला देवी, शक्ती अशा स्वरूपात पूज्य मानले होते. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगा उद्धारी' म्हणून स्त्रीकडे भारतीय पाहत. या पूज्य व आदरणीय स्त्री समाजावर मध्यकाळात भरपूर बंधने येऊन तिची गळचेपी झाली. एकवीसव्या शतकाच्या पहिल्या दशकात कर्तृत्ववान व समाजाचा आधार असलेली ही स्त्री पुरुषाच्या बरोबरीसाठी 'मुक्ती लढा' व 'समतेचा लढा' देत आहे. व्यक्तिगत जीवनात स्त्रीला सासरी त्रास सोसावा लागतो तर कधी माता, भार्या, रंभा व रणचंडिकाही व्हावे लागते. ती अबला ठरवली गेली म्हणून ती 'सबला' असल्याचे प्रयत्न करत आहे. तिच्या या वाटचालीत अनेक समाजसुधारकांनी तिचे प्रश्न समाजासमोर मांडले. आज स्त्रियांच्या अनेक संघटना काम करताना दिसतात. स्त्रिला उपभोग्य वस्तू न समजता आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक जीवनात योग्य स्थान मिळावे अशी धडपड या चळवळींतून होताना दिसते. महिला चळवळीची सुरुवात पाहता फुले, कर्वे, रानडे, शाहू महाराज, दयानंद सरस्वती, इत्यादी अनेक सुधारकांचे त्यात योगदान दिसते. तसेच येथील स्त्री-जीवनाचा गांभीर्याने विचार करून विलायतेत खळबळ उडवून देणारे एडवर्ड मूर (हिंदू इनफंटिसाइड - १८११), रे जॉन कॉरमॅक (अकाउंट ऑफ दि अबॉलिशिन ऑफ फिमेल इनफंटिसाइड इन गुजरात - १८१५), जेम्सटॉड ने संसदेत प्रश्न पोहोचविले. वाराणसीचा रेसिडेंट डंकन कॉर्नवालिस, शोअर, क्रॅक्रॉफ्टन, मूर, ह्यूम, जॉन स्ट्रेची यांनी प्रयत्नपूर्वक भारतीय स्त्रियांना जिवत राहण्याची सनद मिळवली (५ ए - १८७४). पुढे एकोणिसाव्या शतकाच्या पाचव्या दशकात या प्रश्नाला उधाण आले १८४५ मध्ये मुलींचा बाप्तिस्मा झाला

१८४८ पासून सुधारक स्त्री-शिक्षणाकडे वळले. फुलेंनी पहिली मुलींची शाळा प्रथम पुण्यात सुरू केली. त्याच वर्षी 'स्टुडंटस् लिटरसी ॲण्ड सायंटिफिक सोसायटी' स्थापन झाली. संस्थेत बहीरामजी कर्सेटजी या पारशी व्यक्तीने 'फिमेल एज्युकेशन'वर लेख व स्त्रियांसाठी जगन्नाथ शंकरशेठ च्या वाड्यात शाळा सुरू झाली. स्टुडंटस् लिटरसी ॲण्ड सायंटिफिक सोसायटीला दादाभाई नौरोजी, दादोबा पांडुरंग, डॉ. भाऊ दाजी लाडांचे मार्गदर्शन लाभले. मिशनरी लोकांचे (ख्रिस्ती) मुलींसाठी शिक्षणाचे यापूर्वी उल्लेख धर्मप्रबोधनात दिले आहेतच. १८५१ मध्ये पुण्यातील चिपळूणकर वाड्यात शाळा सुरू झाली. यात सावित्रीबाईंना तीन वर्षे शिकवून समर्पित शिक्षिकेचे कार्य मिळाले. विरोधकांनी फुले कुटुंबावर दगड, गोटे, शेण फेकून त्यांना त्रास दिला. पण काम चालूच राहिले. फुलेंचे कार्य या घटकात आले आहे. नंतर १८५३ मध्ये मुलींची संख्या ८ वरून २३७ झाली. ह्या कार्याला ऑस्किन पेरींनी ९० रुपये व दक्षिणा प्राईज फंडातून दरमहा ७५ रुपये मिळू लागले. दुर्गा, अना या दादोबा पांडुरंगांच्या मुलींना शिकण्यास त्रास झाला. कारण त्या ख्रिश्चन बाईकडे शिकत. अना (अन्नपूर्णा) येथून विलायतेत जाणारी पहिली महिला होय. न्या. रानडेंनी पत्नी रमाबाईला घरचा विरोध पत्करून शिकवले. त्या पुस्तकी नव्हे तर समाजोपयोगी कार्य जिद्दीने करून पुढे आल्या. काशीबाई कानिटकर घरचा विरोध असतानाही गोविंदरावांमुळे शिकल्या व उत्तम लेखिका बनल्या. गोपाळराव जोशींनी आनंदीबाईंना शिकवले. पुढे अमेरिकेत वैद्यकीय शिक्षण घेण्यास जाणाऱ्या त्या पहिल्या महाराष्ट्रीयन महिला ठरल्या. तेव्हा या ब्राह्मण कन्येचे वय १८ वर्षे होते. रखमाबाईंनीही उच्च शिक्षण मिळवले होते.

### (आ) एकोणिसाव्या शतकातील सुधारकांचे योगदान

स्त्री-जीवन सुधारावे, त्यांचे शिक्षण व्हावे, प्रौढ विवाह, जरठ-कुमारी विवाह निषेध, विधवा पुनर्विवाह, सामाजिक विषमता, स्त्री-पुरुष अधिकार, इत्यादी प्रश्न हाताळून प्रयत्न करणारे सुधारकांचे कार्य उल्लेखनीय ठरते. बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, लोकहितवादी, दादोबा पांडुरंग, आत्माराम पांडुरंग, राम बालकृष्ण यांनी (परमहंस सभेमार्फत) विधवा पुनर्विवाह, स्त्री-पुरुष समानता, स्त्री-शिक्षण, केशवपन बंदी, इत्यादींसाठी प्रयत्न केले. १८४० मध्ये विष्णुशास्त्री बापटांची 'पुनर्विवाह प्रकरण' पुस्तिका निघाली. १८४२ मधील बेळगावच्या दोन बाल विधवा ब्राह्मण मुलींचे पुनर्विवाह उल्लेखनीय होत. १८५७ ला बाबा पदमजींच्या 'यमुना पर्यटन' कादंबरीत 'विधवा श्रुमार्जन' हा संस्कृत निबंध व मराठी अनुवाद लिहिला. फुलेंचे स्त्रीविषयक उद्धाराचे कार्य आपण समजून घेतले.

विष्णुशास्त्री पंडिताचे (१८२७-१८७६) या संदर्भातील कार्य विशेष उल्लेखनीय आहे. ते दुर्लक्षित राहिले. त्यांनी बालविवाह, पुनर्विवाह, जरठ-कुमारी विवाह, इत्यादी प्रश्न उपसंपादक म्हणून 'इंदुप्रकाश' मध्ये लिहिले. व्याख्याने, चर्चा,

कीर्तने यांतून विचार मांडले. 'ब्राह्मण कन्या विवाह' हा तर्कशुद्ध ग्रंथ आहे. ईश्वरचंद्र विद्यासागरांच्या 'विधवा विवाह' या ग्रंथाचा मराठी अनुवाद त्यांनी केला. त्या विरोधात काशीच्या पंडितांचा 'विधवा विवाह खंडन' हा ग्रंथ निघाला. शास्त्रींनी त्याला प्रत्युत्तर देऊन 'विध्वोद्वाह विवेक' ग्रंथ रचला. धर्म वचनाचे आधार वापरले. विचारासोबत कृतिशीलता दाखवली. १८५६ मध्ये विधवा विवाहोत्तेजक मंडळ स्थापन केले. प्रत्यक्ष विधवा विवाह घडवले. रानडेंनी पत्नी मृत झाल्यावर त्यांनी ११ वर्षीय रमाबाईंशी विवाह केला. विष्णुशास्त्री यांनी कुसुमताई पटवर्धन या विधवेशी विवाह करून आदर्श उदाहरण दिले. आगरकरांचे कार्य यापूर्वी उल्लेखिले आहे. प्रार्थना समाजाचे सामाजिक कार्यही आपण समजून घेतले. त्यात स्त्री संदर्भ अभ्यासले.

### (इ) भारतीय राष्ट्रीय समाज परिषद

परंपरावादी विचारक व सुधारक यांच्यातील वाद वाढले. बेहेरामजी मलबारींनी बालविवाह व सक्तीचे वैधव्य यांविषयी लॉर्ड रिपनला निवेदने दिली. अनेकांना प्रती पाठवल्या. रिपनने पाठिंबा दर्शविला पण लोकमताचा कौल महत्त्वाचा सांगितला. कायदे पंडितांचा सल्ला घेतला. तूर्त सरकारने लक्ष घालणे योग्य नाही. सुधारकांनी झटावे. योग्य वेळी सरकार हस्तक्षेप करील असे कळविले. असाच एक प्रश्न दादाजी विरुद्ध रखमाबाई प्रकरणामुळे देशभर नवमत वाढवणारा ठरला. इ.स. १८८७ मध्ये भारतीय राष्ट्रीय सामाजिक परिषद बनली. न्या. रानडे, चंदावरकर बेहेरामजी, दिवाण बहादूर, रघुनाथराव, आगरकर, इत्यादी प्रवर्तकांचा त्यात वाटा होता. विधवा विवाहासाठी कायदा व्हावा. कलकत्ता अधिवेशनात (१८८६) काँग्रेसने फक्त राजकीय मागण्यांवर विचार करावा सामाजिक नव्हे असे मत दादाभाईंनी मांडले. म्हणून न्या. रानडेंनीही विधवा विवाह पुरस्कार व बालविवाह निषेधार्थ भारतीय राष्ट्रीय सामाजिक परिषद स्थापन केली. गोखले, आगरकर, न्या. चंदावरकर यांनी सहकार्य केले. रानडेंची पत्रे, व्याख्याने, आगरकरांचे 'सुधारक' वृत्तपत्र, लोकांची प्रतिज्ञापत्रके या माध्यमातून मुलींचे शिक्षण, हुंडाबंदी, विधवा विवाह संमती, बालविवाह निषेध, इत्यादींविषयी जागृती केली. १८९० ला कायदेमंडळासमोर बिल आले. १८९१ मध्ये संमती वयाचा कायदा झाला. टिळकांच्या विरोधानंतर १८९५ पासून ह्या परिषदेच्या वेगळ्या सभा झाल्या.

### (ई) महाराष्ट्रातील वीसाव्या शतकातील महिला चळवळ

वीसाव्या शतकात राष्ट्रीय काँग्रेसबरोबर राहून राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीत काही महिलांनी मोलाची कामगिरी बजावली. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी महर्षी कर्वे यांचे स्त्रीविषयक कार्य सुरू होऊन १९६२ पर्यंत त्यांनी ते केले. याचा परामर्श शैक्षणिक चळवळीत आपण घेऊ. १९३७ मध्ये पुणे येथे स्थापन झालेल्या अखिल भारतीय महिला परिषदेने महिला चळवळीला प्रोत्साहित केले. ही हिंदू महिला परिषद या नावाने ज्ञात आहे व दुसरे मत पाश्चात्त्य उदारमतवादी स्त्री-मुक्ती लढा असे राहिले. स्त्री-शिक्षण, स्त्री प्रतिनिधित्व, स्त्री मताधिकार यांवर भर देणे, सामाजिक परंपराविरुद्ध लढा देण्यास स्त्रीला जागे करणे, समान कायदेशीर हक्क मिळावेत यासाठी मागरिट भगिनींनी प्रयत्न केले. लिंगीय समता हवी तेवढी साकारली नाही. १९६० नंतर ग्रामीण, गरीब आदिवासी, कारखान्यातील कामगार महिला, धुळे जिल्ह्यातील ग्रामीण महिलांचा प्रश्न व स्त्री प्रश्नी त्यांची एकजूट यात बरेच यश आले. आंतरराष्ट्रीय महिला वर्ष व दशकानिमित्त (१९७५-८५) स्त्री प्रश्नांकडे लक्ष वेधले. महाराष्ट्रात ६० महिला संघटना कार्यरत आहेत. निलम गोऱ्हे, मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर, ज्योती म्हापसेकर, छाया दातार, सुधा कुलकर्णी, कुंदा कदम, निर्मला साठे, मीना इनामदार, शैलजा सातपुते व शेकडोंचे कार्य उल्लेखनीय ठरते. आर्थिक, कौटुंबिक, राष्ट्रीय शिक्षणविषयक, आरोग्यविषयक, नागरी सुविधांसंबंधी, सामाजिक, न्यायिक कायदेविषयक संपत्तीत वारसा हक्क, इत्यादी मागण्यांविषयी जागृती व कृती होत आहे.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न – ५*

**पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगून कंसात (X) किंवा (✓) अशी खूण करा.**

(१) प्राचीन काळी स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीचे स्थान होते. ( )

(२) स्त्रियांचे प्रश्न समाजसुधारकांनी समाजापुढे मांडले. ( )

(३) महात्मा फुले यांनी मुलींची पहिली शाळा पुण्यात सुरू केली. ( )

(४) मुलींचे शिक्षण, हुंडा, बालविवाह, इत्यादींविरोधी बिले १८९० मध्ये कायदे मंडळावर आली. ( )

(५) स्वातंत्र्य चळवळीत महिलांनी मोठे योगदान दिले. ( )

(६) अलीकडच्या स्त्रियांच्या समस्या मांडण्याच्या व सोडवण्याच्या कामी निलम गोऱ्हे, मृणाल गोरे, ज्योती म्हापसेकर यांनी मोठे कार्य केले आहे. ( )

## २.२.६ महाराष्ट्रातील शैक्षणिक चळवळी

यापूर्वीच्या घटकात अनेक सुधारकांनी शैक्षणिक कार्य केल्याचे उल्लेखले आहे. येथे त्यामुळेच महत्त्वाचे ठरलेले दोन महापुरुषांचे कार्य उल्लेखले आहे.

### (अ) महर्षी धोंडो केशव कर्वे (१८५८-१९६२)

म. धोंडो केशव कर्वे यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यात शेरवली येथे झाला. १८८१ मध्ये ते कला स्नातक (बी.ए.) झाले. १८७३ मध्ये राधाबाईंशी त्यांचा विवाह झाला. राधाबाईंच्या अचानक निधनामुळे त्यांनी विधवा गोपुबाईंशी (शारदासदन मधील) विवाह करून आदर्श घातला. १०४ वर्षे जगून या

ऋषितुल्य सुधारकाने स्त्री-जीवनातील प्रश्न सोडवण्यासाठी लोकोत्तर महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांचे कार्य व केंद्र हिंगणे (पुणे) होय. बनारस विद्यापीठाने त्यांना डी.लिट. ही पदवी दिली.

विधवा विवाहोत्तेजक मंडळी संस्था स्थापना (१८९३), अनाथ बालिकाश्रम संस्था स्थापना (१८९९), महिला विद्यालय (१९०७), निष्काम कर्ममठ (१९१०), महिला विद्यापीठ (१९१६) हेच नंतर एस.एन.डी.टी. विद्यापीठ बनले. महाराष्ट्रात ग्रामीण शिक्षण प्रसारासाठी 'ग्राम प्राथमिक शिक्षण मंडळ' स्थापन केले. त्यांच्या लोकोत्तर कार्याचा गौरव करून आचार्य अत्रेंनी त्यांना भारतातील एका क्रांतिकारक शतकाचे साक्षीदार व महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाचे शिल्पकार म्हटले आहे.

### (आ) कर्मवीर भाऊराव पाटील (१८८७-१९५९)

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी कर्वेप्रमाणेच महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रात क्रांती घडवली. कोल्हापूर जिल्ह्यात कुंभोज येथे त्यांचा जन्म झाला. हे आजोळ होते. त्यांचे गाव ऐतवडे होते. अठराव्या वर्षी लग्न झाले. त्यांच्या मते, जागृतीचे खरे तंत्र, विचार, उच्चार, आचारांचे उगमस्थान शिक्षण असून सत्य, सामाजिक समता, धार्मिक व आर्थिक स्वातंत्र्य याचा संगम शिक्षणात होतो. स्वावलंबन, स्वाभिमान, स्वाध्याय व स्वातंत्र्य ही चतुःसूत्री त्यांनी शिक्षणातून साकार केली. मोडेल पण वाकणार नाही, साधेपणा, जातीय ऐक्यावर भर, त्याग, मानवतावाद, बंधुत्व, श्रमप्रतिष्ठा, स्वावलंबन, अन्यायाची चीड, दुर्दम्य आशावाद हे त्यांचे विशेष गुण. महात्मा फुले, शाहू महाराज, वि. रा. शिंदे, संत गाडगे महाराज यांचा प्रभाव त्यांनी ग्रहण केला. त्यांच्या संस्था व कार्य म्हणजे १९१० मध्ये दुधगाव शिक्षण प्रसारक संस्था, आश्रम वसतिगृह, १९१९ मध्ये रयत शिक्षण संस्था (स्थापना कराडजवळ व कार्यालय, सातारा), वसतिगृहासह शाळा उभ्या करणे, शिक्षकांसाठी 'सिल्व्हर ज्युबली रूरल ट्रेनिंग कॉलेज, छत्रपती बोर्डिंग हाऊस (सातारा), १९३७ पासून प्राथमिक शिक्षण खेडोपाडी नेण्याचे कार्य सुरू केले. पुढे माध्यमिक शाळा स्थापन केल्या. १९४० मध्ये 'महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूल' व १९४७ मध्ये 'छत्रपती शिवाजी कॉलेज', सातारा व इतर अनेक शाखा काढल्या. संत गाडगे महाराज कॉलेज, कराड सुरू केले. १९८६-८७ पर्यंत १६ पूर्व प्राथमिक शाळा, ३२१ माध्यमिक शाळा, ८ अध्यापक विद्यालये, २९ महाविद्यालये, १९ वसतिगृहे, ६ कार्यालये, ३७ इतर शाखा असा रयत शिक्षण संस्थेचा विस्तार झाला. भारत सरकारने 'पद्मभूषण', पुणे विद्यापीठाने 'डी.लिट' ह्या सन्मान्य पदव्या देऊन त्यांचा गौरव केला.

### (इ) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'डिप्रेस्ड क्लास मिशन' स्थापन करून शैक्षणिक कार्य केले हे आपण पाहिले. जोतीरावानंतर अतिशय तळमळीने छत्रपती शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. मुलांना शाळेत पाठविण्यासाठी पालकांना लेखी कळविले. बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार केला. कोल्हापूरमध्ये वसतिगृहे काढून खेड्यातील मुलांची सोय केली. दलित वर्गाला शैक्षणिक सोयी दिल्या. त्यांना शाळा, महाविद्यालयात शिक्षण मोफत दिले. सरकारी नोकऱ्यांत ५०% जागा ठेवल्या. पुणे, नाशिक व अहमदनगरला वसतिगृहे स्थापन केली. डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे चें अध्यक्षपद स्वीकारले.

### (ई) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१८९१-१९५६)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांसाठी शिक्षण-प्रसार केला. तसेच मोफत वाचनालय चालवले. यासाठी 'बहिष्कृत हितकारिणी सभा' (१९२४) स्थापन केली. प्रौढ व तरुणांसाठी रात्रीच्या शाळा सुरू केल्या. अस्पृश्यांना शैक्षणिक सवलती मिळवून दिल्या. घटनेत तरतूद केली. १९४६ मध्ये 'पिपल्स एज्युकेशन सोसायटी' स्थापन केली. मुंबईला 'सिद्धार्थ कॉलेज' व औरंगाबाद येथे 'मिलिंद कॉलेज' सुरू केले.

### (उ) डॉ. पंजाबराव देशमुख (१८९८-१९६५)

विदर्भात डॉ. पंजाबराव देशमुख यांनी बहुजन समाजासाठी शिक्षणाकडे लक्ष पुरवले. अमरावतीला 'श्रद्धानंद छात्रालय' (१९२६) स्थापन करून सर्व जातींसाठी मुक्त केले. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व्हावे म्हणून जिल्हा कौन्सिल मध्ये प्रयत्न केले. गरजू व गरीब मुलांना सोयी-सवलती देऊन शिक्षणमंत्रीपद सार्थक केले. १९३२ मध्ये 'श्री. शिवाजी शिक्षण संस्था' स्थापन केली. 'प्राथमिक शिक्षक संघ' सुरू केला.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ६*

**पुढील विधानात गाळलेल्या जागी योग्य शब्द भरा.**

(१) १८४८ मध्ये सुधारक ------- शिक्षणाकडे वळले.

(२) ------- ही महाराष्ट्रातून विलायतेत जाऊन शिकलेली पहिली महिला होय.

(३) बाबा पदमजींच्या 'यमुना पर्यटन' कादंबरीत ------- हा संस्कृत निबंध मराठी अनुवादासह लिहिला गेला.

(४) संमती वयाचा कायदा इ.स. ------- मध्ये मान्य झाला.

(५) १९७५ ते ८५ हे दशक 'आंतरराष्ट्रीय ------- दशक होते.

(६) महर्षी कर्वेनी १९०७ मध्ये 'महिला -------' स्थापन केले.

(७) कर्मवीर भाऊराव पाटील यांना सरकारने ------- ही सन्मान्य पदवी दिली.

## २.२.७ इतर चळवळी

### (अ) ब्राह्मणेतर चळवळ

जोतीराव फुल्यांनी १८४७ पासून या चळवळीचे बीजारोपण केले. हे एक जनआंदोलन होते. सत्यशोधक चळवळीने पार्श्वभूमी तयार केली. १९११ मध्ये महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात मराठा-कुणबी शेतकऱ्यांनी उठाव केला. तेथून या चळवळीची सुरुवात झाली असे डॉ. सरदेसाई मानतात. या चळवळीचे प्रमुख टप्पे (१) १९१७ ते १९२२ (२) १९२३-१९२९ (३) १९३०-१९४९ असे राहिले. एकोणिसाव्या शतकात ब्राह्मण-ब्राह्मणेतर व दोन समाज गटांत संघर्ष सुरू झाला. गेल ऑमवेल, य. दि. फडके यांनी या चळवळीला शेतकऱ्यांवर आधारित बहुजन समाजाची चळवळ म्हटले आहे. फुल्यांनंतर राजर्षी शाहू महाराज (१८७४-१९२२) यांनी ब्राह्मणेतरांची सुधारणा व दलित उद्धार कार्य हाती घेतले. या चळवळीत वालचंद कोठारी, केशवराव जेधे, जवळकर, मुकुंदराव पाटील, श्रीपतराव शिंदे, माधवराव बागल, प्रबोधनकार ठाकरे, इत्यादींनी योगदान दिले. या चळवळीची मूळ प्रेरणा राजकीय असली तरी डॉ. नलवडेंच्या मते सत्यशोधक समाजाप्रमाणे या चळवळीने मानवी समतेवर भर दिला. या चळवळीने १९१८ साली विठ्ठलभाई पटेल बिल (आंतरजातीय विवाह) याला पाठिंबा दिला. १९१९ मध्ये टिळकांचा सत्कार व मानपत्राचा कार्यक्रम केला. सक्तीचे व मोफत शिक्षण, शिवाजी मेमोरियल प्लॅन केला. छत्रपती मेळा सुरू केला. महात्मा फुलेंचा पुतळा पुणे नगरपालिकेत असावा, अल्प भूधारणा बिलाविरुद्ध संघर्ष (६० हजार सह्या), चवदार तळ्याचा सत्याग्रह, पर्वती (पुणे) देवालय सर्वांना खुले करणे, इत्यादी कार्य पार पाडले. ब्राह्मणेतर पक्ष या स्वरूपातही कार्य केले.

### (आ) दलित चळवळ

'दलित' शब्द जातिवाचक किंवा कालचा शोषित व आजचा संघर्षशील या अर्थाने काही जण वापरतात. अनेकांनी आर्थिक दृष्ट्या दुर्बल असणाऱ्यांना दलित मानले आहे. हा शब्द सामाजिक दृष्ट्या मागास असलेल्या समाजाचे प्रतिनिधित्व करतो. हिंदू समाजाने बहिष्कृत व तिरस्कृत ठेवलेल्या जाती-जमातींना दलित म्हणणे योग्य होईल. अस्पृश्य, दलित यांचा उद्धार व्हावा यासाठी महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. आंबेडकर यांचे कार्य उल्लेखनीय आहे. त्याही पूर्वी बाळशास्त्री जांभेकरांनी 'दर्पण' मधून यासाठी वैचारिक पार्श्वभूमी मांडलेली दिसते.

महात्मा फुलेंचे कार्य आपण समजून घेतले आहेच. त्यांच्या प्रेरणेने वळसंगकरांनी व घाटगे आर. एस. यांनी 'दीनबंधू' व 'सुधाकर' साप्ताहिकांतून लेखन केले. 'विटाळ विद्वासन' हे पत्र १८८९ मध्ये प्रसिद्ध केले. वळसंगकरांनी 'अन्याय, दोष परिहारक मंडळी' ही संघटना बनवली. 'अखंड' नावाखाली कविता लिहिल्या. 'सामाजिक परिषद' अधिवेशनात (पुणे) सवर्ण हिंदूंना दलितांसाठी विनवले. त्यांचे कार्य श्रीपतराव थोरात (अहमदनगर), शि. ज्ञा. कांबळे (पुणे), कि.फ. बनसोड (नागपूर) यांनी चालू ठेवले.

छत्रपती शाहू महाराजांनी अस्पृश्यांना समान संधी मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. जाणता राजा व दलित वस्तीत जावून त्यांच्या सोबत पंक्तीत जेवणारा राजा म्हणजे छत्रपती शाहू. त्यांच्या संस्थानात अस्पृश्यांना दरबारात-राजवाड्यात नोकरीसाठी घेतले. गंगाराम कांबळे या अस्पृश्याला कोल्हापुरात मध्यवस्तीत हॉटेल बांधून दिले. महाराज स्वत: तेथे चहा घेत असत. हरिजन तलाठी नेमले. त्यांना बढत्या दिल्या. विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे बांधली. अस्पृश्यता पाळू नये असा हुकूम काढला. अस्पृश्यांना शाळा, विहिरी, तलाव, दवाखाने, पाणवठे खुले केले. वटहुकूम काढून सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा ठरवला. सुशिक्षित अस्पृश्य तरुणांना वकिलीच्या सनदा दिल्या. आंतरजातीय विवाह घडवले. बेरड, रामोशी, फासेपारधी यांना समाजात दर्जा देण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्य परिषदांना ते हजेरी लावत. नोकरीत ५०% आरक्षण ठेवले. डॉ. आंबेडकरांना परदेशात जाऊन शिक्षण घेण्यासाठी मदत केली. त्यांचे कार्य आदर्श व प्रेरणादायी होते.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र भारतात आमचे स्थान काय असेल, भवितव्य काय असेल, आमचा छळ थांबेल काय, सवलती मिळतील काय, शोषण संपेल काय, असे प्रश्न उभे केले. अस्पृश्यतेचा प्रश्न त्यांनी स्वतंत्रपणे सोडविण्याचा प्रयत्न केला. १९२३ मध्ये सी. के. बोलेंनी दलितांसाठी शाळा, सार्वजनिक जागा, कार्यालये, दवाखाने, विहिरी व तलाव येथे प्रवेश द्यावा अशी कायदेमंडळात मागणी केली. १९२३ ला सरकारने तसा आदेश काढला. पण कार्यवाही होत नव्हती म्हणून १९२६ मध्ये बोलेंनी पुन्हा ठराव मांडला. डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षतेत 'कुलाबा डिस्ट्रिक्ट डिप्रेस्ड क्लास'ची सभा झाली. वीरेश्वर देवालय प्रवेशाच्या भीतीने सवर्णांनी हल्ला केला. २० जण जखमी झाले. डॉ. बाबासाहेबांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी महाडचे चवदार तळे अस्पृश्यांना मोकळे केले. 'मनुस्मृती' ही अस्पृश्यांना समाजात स्थान देत नाही. तिचे दहन करण्यात आले हे हिंदूंच्या सनातनी वृत्तीविरोधात एक प्रतीकात्मक कृत्य होते.

प्रत्येक हिंदूला कोणत्याही हिंदू धर्मस्थळी जाण्याचा मूलभूत मानवी हक्क आहे. अमरावतीच्या अंबा मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून १९२७ मध्ये पंजाबराव देशमुखांनी त्यांची भूमिका समजून घेतली. नंतर हिंदूंपैकी एस. एम. जोशी, म. वि. गाडगीळ, विनायकराव भुस्कुटे, बी. के. गायकवाड यांनी मदत केली. पर्वती मंदिर (पुणे), काळाराम मंदिर (नाशिक) अस्पृश्यांना खुले करण्यात आले. १९३० च्या गोलमेज परिषदेत अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. आंबेडकर हजर होते. अस्पृश्य हिताची हमी त्यांनी मिळवली. ब्रिटिश पंतप्रधानांनी 'जातीय निवाडा' प्रसिद्ध केला. महात्मा गांधींना तो

विधवा विवाह, बालविवाह, संमती यांविषयी जागृती केली. महर्षी कर्वे यांनी सामाजिक परंपरेविरुद्ध लढा देण्यासाठी स्त्रीला जागे करण्याची गरज स्पष्ट केली. महिला चळवळीला प्रोत्साहन दिले.

शैक्षणिक चळवळीचेही महाराष्ट्रात चांगले कार्य झाले. महर्षी कर्वे यांनी हिंगणे (पुणे) येथे स्त्री-शिक्षण संस्था स्थापन केली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्वावलंबन, स्वाभिमान, स्वाध्याय व स्वातंत्र्य ही चतु:सूत्री शिक्षणातून साकार केली. रयत शिक्षण संस्था स्थापन करून खेडोपाडी शिक्षण पोहोचवले. शाहू महाराजांनी खेड्यातील मुलांसाठी, दलित वर्गाच्या मुलांसाठी शैक्षणिक सोयी उपलब्ध करून दिल्या. शिक्षण घेण्यास त्यांना उत्तेजन दिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांसाठी शिक्षणप्रसार केला. त्यांच्यात जागृती निर्माण केली. अस्पृश्यांना शैक्षणिक सवलती मिळवून दिल्या. विदर्भात डॉ. पंजाबराव देशमुख यांनी बहुजन समाजाच्या शिक्षणाकडे लक्ष दिले. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व्हावे म्हणून प्रयत्न केले.

याशिवाय महाराष्ट्रात इतर अनेक चळवळींनी जोर धरला. त्यात प्रामुख्याने ब्राह्मणेतर चळवळी, दलित चळवळी, आदिवासी चळवळी, शेतकरी चळवळी, विद्यार्थी चळवळी, तरुणांच्या चळवळी आदींचा उल्लेख करता येईल. या सर्व चळवळींचा विचार आपण विस्ताराने केला आहे.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

**(अ) पुढील प्रश्नांची १५ ते २० ओळींत उत्तरे लिहा.**

(१) प्रार्थना समाजाचे महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीतील योगदान स्पष्ट करा.

(२) आर्य समाजाचे महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीतील योगदान स्पष्ट करा.

(३) सत्यशोधक समाजाचे महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीतील योगदान स्पष्ट करा.

(४) आगरकरांची बुद्धिनिष्ठ समाजसुधारणा स्पष्ट करा.

**(आ) खालील विषयांवर २० ते २५ ओळींत टिपा लिहा.**

(१) जगन्नाथ शंकरशेठ

(२) विष्णुबुवा शास्त्री

(३) महिला चळवळ

(४) दलित चळवळ

(५) ब्राह्मणेतर चळवळ

(६) शैक्षणिक चळवळ

(७) शेतकरी चळवळ

(८) विद्यार्थी व तरुणांच्या चळवळी

## २.७ क्षेत्रीय कार्य

तुमच्या परिसरातील सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांची नोंद करा. त्यांच्या कार्याचे क्षेत्र व त्यांचे महत्त्व याचा अहवाल लिहा.

## २.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


(१) प्रा. मो. नि. ठोके, *आधुनिक महाराष्ट्राचे उद्गाते*

(२) डॉ. बी. एन्. सरदेसाई, *आधुनिक महाराष्ट्र*

(३) प्रा. भिडे, प्रा. पाटील, *महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास*

(४) पाध्ये-टिकेकर, *आजकालचा महाराष्ट्र*

(५) महेश जोशी, *सत्यशोधक समाजाचा इतिहास*

(६) गं. बा. सरदार, *महाराष्ट्र जीवन (खंड २)*

(७) गं. बा. सरदार, *महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी*

(८) रा. प्र. कानिटकर, *एकशेएक श्रेष्ठ मानव*

(९) डॉ. निर्मलकुमार फडकुले (संपा.), *प्रबोधनातील पाऊलखुणा*

# घटक ३ : कामगार चळवळी

*अनुक्रमणिका*


३.० उद्दिष्टे
३.१ प्रास्ताविक
३.२ विषय-विवेचन
 ३.२.१ भारतातील कामगार चळवळ : पार्श्वभूमी
 ३.२.२ कामगार चळवळीचा प्रारंभ होण्याची कारणे
 ३.२.३ कामगार चळवळींची उद्दिष्टे
 ३.२.४ कामगार संघाची कार्ये
 ३.२.५ महाराष्ट्रातील कामगार चळवळींचा प्रारंभ
 ३.२.६ विसाव्या शतकातील कामगार चळवळ
 ३.२.७ कामगार चळवळ व औद्योगिक अशांतता
३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
३.५ सारांश
३.६ सरावासाठी स्वाध्याय
३.७ क्षेत्रीय कार्य
३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ३.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यासानंतर आपल्याला -

★ भारतातील कामगार चळवळींची पार्श्वभूमी स्पष्ट करता येईल.

★ कामगार चळवळींचा प्रारंभ होण्याची कारणे स्पष्ट करता येतील.

★ कामगार चळवळींची उद्दिष्टे विशद करता येतील.

★ कामगार संघाची कार्ये सांगता येतील.

★ महाराष्ट्रातील कामगार चळवळींचा प्रारंभ कसा झाला ते स्पष्ट करता येईल.

★ विसाव्या शतकांतील कामगार चळवळींची वाढ कशी झाली ते स्पष्ट करता येईल.

★ कामगार चळवळ व औद्योगिक अशांतता यांतील संबंध व त्याचे परिणाम स्पष्ट करता येतील.

★ महाराष्ट्रातील कामगार चळवळींमधील अडसर स्पष्ट करता येतील.

★ कामगार चळवळ प्रभावी करण्यासाठी उपाययोजना स्पष्ट करता येतील.

## ३.१ प्रास्ताविक

भारत हा मूलतः कृषिप्रधान देश आहे. भारतात शेती व शेतकऱ्यांचे प्रश्न नेहमीच महत्त्वाचे राहिले आहेत. आधुनिक काळात कामगार हा घटक कारखानदारीनंतर लक्षावधींच्या संख्येत निर्माण झाला. त्यामुळे त्याच्या व्यक्तिगत प्रश्नांपेक्षा सामूहिक स्वरूपाचे प्रश्न, समान प्रश्न सोडविण्यासाठी संघटित होऊन एकत्र प्रयत्न सुरू झाले. यातून कामगार हित, कल्याण व सर्वांगीण प्रगतीची उद्दिष्टे गाठवयाची होती. अशा लढ्यालाच चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले.

युरोपमध्ये औद्योगिक क्रांती घडली. अठराव्या शतकाच्या मध्यापासून उत्पादन वाढले. कारखानदारी वाढली. कामगारांचे मालकांकडून शोषण होऊ लागले. कामगार विपन्नावस्थेत एक विषम सम ज घटक ठरले. अनेक प्रश्न उत्पन्न झाले. यांतून कामगारांना न्याय मिळावा, त्यांच्या मूलभूत गरजा भागवता याव्यात, त्यांचे शोषण बंद होऊन त्यांना योग्य मोबदला मिळावा, सोयी सवलती मिळाव्यात तसेच सर्वांगीण प्रगती व्हावी, इत्यादींसाठी सामूहिक प्रयत्नांतून कामगार चळवळी निर्माण झाल्या. अठराव्या शतकाच्या २-३ दशकांत हे प्रश्न व त्या विषयीची जागृती दिसू लागली. आज युरोपच नव्हे तर जगभर या कामगार संघटनांचे स्वरूप दिसते. कामगारांच्या हितासाठी कार्ल मार्क्सने जगातील सर्व कामगारांना एक होण्याचे, रक्तरंजित क्रांतीसाठी तयार राहण्याचे आवाहन केले होते. साम्यवादी तत्त्वज्ञान मार्क्स-एंजेलसमुळे जगाला एका वेगळ्या वळणाकडे घेऊन जाणारे ठरले. भांडवलशाहीविरुद्ध साम्यवादाचा हा लढा जगाला दोन विचारप्रवाहात विभागणारा ठरला. रशियात कामगारांची क्रांती घडली. रशियाने साम्यवाद स्वीकारला. चीन, इंडोचायनाचे देश, आग्नेय आशिया आणि हळूहळू जगभर साम्यवाद विस्तारला. श्रम करणारा कामगार त्याला उत्पादन व नफ्यात वाटा मिळावा, त्याचे जीवन मालकाप्रमाणे सुख-समृद्धीचे असावे, इत्यादी बाबी पाहता आज हा स्वतंत्र अभ्यास विषय बनत आहे. आंतरराष्ट्रीय संघटना म्हणून कामगार संघटना (ILO अंतर्गत) काम करत आहेत. त्यांना योग्य वेतन द्यावे, मानवी वागणूक द्यावी, मनोरंजन व कामाच्या तासाच्या मर्यादा, अतिरिक्त कामाचा मोबदला, आरोग्य, जोखीम, विमा, कुटुंबाचे हित, इत्यादी अनेक प्रश्न सोडवून ह्या चळवळीने कामगार जगत सुखी व समृद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

## ३.२ विषय-विवेचन

### ३.२.१ भारतातील कामगार चळवळ : पार्श्वभूमी

इंग्रज भारताचे साम्राज्यकर्ते झाले. त्यांच्यासोबत व्यापार व आर्थिक यंत्रणाही स्थिरावली. औद्योगिक क्रांतीमुळे देशात कामगार व कारखानदारी वाढू लागली. येथील उद्योग, व्यापारावर ब्रिटिशांनी नियंत्रण ठेवले. एकोणिसाव्या शतकात या औद्योगिक स्वरूपाच्या नवीन विकासासोबत उत्पादनास गती आली आणि कामगारांचे प्रश्न निर्माण झाले. ब्रिटिशांनी शेतकऱ्यांची पिळवणूक केली. त्यांनी उद्योग व कारखाने सुरू करून त्यांच्या गरजा पूर्ण करून घेण्याचा आटोकाट प्रयत्न केला. भारतात कारखानदारी जन्मली. हळूहळू तिचा विस्तार झाला. १८५३ मध्ये आगगाडी निर्मितीचा पहिला कारखाना उभा झाला. कामगार वर्गाचेही बीजारोपण झाले. १८५४ मध्ये नानाभाई कावसजी या पारशी गृहस्थाने मुंबई येथे आधुनिक स्वरूपाचा वस्त्रोद्योग (गिरणी) सुरू केला. मुंबईचे हवामान कापड उद्योगासाठी अनुकूल असल्यामुळे येथे हा उद्योग स्थिरावला. टाटा यांनी नागपूर येथे 'एम्प्रेस मिल' स्थापन केली. पहिल्या महायुद्धापर्यंत भारतभर हा व्यवसाय सुरू होऊन व २७४ कापड गिरण्या चालू झाल्या. एकट्या मुंबई शहरात १५० कापड गिरण्या उभ्या राहिल्या. देशात खनिज प्राप्तीमुळे लोखंड व पोलाद कारखाने उभे झाले. धातू उद्योग, कोळसा, अभ्रक, मँगनीजची प्रगती झाली. 'कमी खर्चात जास्त नफा' ह्या तत्त्वामुळे मालकांचा फायदा व कामगारांवर अन्याय होऊ लागला. त्याला वाचा फोडण्याचे काम सुधारकांनी केले. भारतीय कामगारांना परकीय कामगारांबद्दल माहिती देणे, त्यांच्यात परिवर्तन घडवून आणणे, इत्यादी कार्यांत अखिल भारतीय स्तरावर लाला लजपतराय, जोसेफ बॅप्टिस्टा, नारायण जोशी, दिवाण चिमणलाल यांनी प्रभावी कार्य केले. महाराष्ट्रात टिळक, बॅप्टिस्टांप्रमाणे नारायण मेघाजी लोखंडे यांनी प्रभावीपणे कामगारांचे नेतृत्व केले. सदाशिवराय केळकर, एस. एम. जोशी, नारायण मल्हार जोशी, स्वामी रामानंद तीर्थ, इत्यादींनी कार्य केले.

१८८५ साली परिवर्तन घडवून कामगार कल्याणासाठी धडपड करण्यात नारायण मेघाजी लोखंडे यांचे प्रयत्न मूलगामी ठरले. देशोदेशीच्या मजुरांची स्थिती व दुःखे यांची माहिती मिळू लागली. 'संप' हा प्रभावी उपाय असल्यामुळे १९ व्या शतकात १८८५ च्या सुमारास जी. आय. पी. रेल्वेच्या सिग्नल खात्याच्या लोकांनी संप केला. काम करणे बंद करून मागण्या मान्य करवून मालकांना वठणीवर आणण्यात यश मिळवले. १९०५ साली वंगभंग चळवळीतून आगगाडी कारखाना, कापड गिरण्या आणि सरकारी छापखान्यातील कामगारांचे संप झाले. १९०८ मध्ये टिळकांच्या अटकेच्या निषेधार्थ कामगारांनी संप केला. १९१८ मध्ये हजारो कामगार संप करून उठले. धर्मानंद कोसांबीची मार्क्सवर झालेली व्याख्याने परिणामकारक ठरली. टिळकांच्या अटकेविरोधी झालेल्या संपाला राजकीय महत्त्व होते तसेच रौलट ॲक्ट विरोधात केलेल्या संपाला राजकीय महत्त्व लाभले. १९२० मध्ये 'ऑल इंडिया ट्रेड युनियन' स्थापन झाली. मुंबईत पहिले अधिवेशन झाले. त्याचे अध्यक्ष लाला लजपतराय होते. १९२४ मध्ये चित्तरंजन दास आणि १९२६ मध्ये गिरी यांनी अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविले. समाजवादाचा उदय होऊन १९२९ मध्ये भारतात काँग्रेसने त्याचा स्वीकार केला. यानंतर लोकशाही समाजवादाची वाटचाल झाली. १९२९ मध्ये अहमदाबाद येथे कामगारांनी संप केले. महात्मा गांधींनी कामगारांना मार्गदर्शन केले. शेतकरी कामगार पक्षाने प्रयत्न केले. अशा गतिमान झालेल्या या भारतीय कामगार चळवळीचा महाराष्ट्रातील उदय, विकास येथे पाहणार आहोत.

***स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - १***

**पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगून कंसात (X) किंवा (✓) अशी खूण करा.**

(१) भारत हा कृषिप्रधान देश आहे. ( )
(२) युरोपमध्ये औद्योगिक क्रांती घडली. ( )
(३) कार्ल मार्क्सने जगातील सर्व कामगारांना एक होण्याचे आवाहन केले. ( )
(४) रशियाने साम्यवाद नाकारून भांडवलशाहीचा पुरस्कार केला. ( )
(५) नानाभाई कावसजी या गृहस्थांनी मुंबईत आधुनिक स्वरूपाची कापड गिरणी सुरू केली. ( )
(६) कामगारांनी आपले हक्क पदरात पाडून घेण्यासाठी संपाचे हत्यार उपसले. ( )
(७) लोकमान्य टिळक, महात्मा गाधी यांचा कामगार संघटनांना विरोध होता. ( )

### ३.२.२ कामगार चळवळीचा प्रारंभ होण्याची कारणे

महाराष्ट्रात कामगार चळवळ मुंबईत जन्मली. मुंबईहून तिचा इतरत्र विस्तार झाला. त्यामागे काही कारणे घडली. ती पुढीलप्रमाणे आहेत.

**(अ) फॅक्टरी ॲक्ट**

फॅक्टरी ॲक्टचा संबंध मँचेस्टर (इंग्लंड) व मुंबई येथील कापड गिरणी मालकांच्या स्वार्थाशी जडलेला होता. मुंबईमधील कापड गिरण्यांच्या स्थापनेमुळे मँचेस्टरच्या कापड उद्योगास धोका निर्माण झाला; आणि अशातच मुंबईच्या वातावरणाला आवर घालण्याचे ठरले. मुंबईची भरभराट अडचणीत आणण्याचा प्रयत्न झाला व फॅक्टरी ॲक्ट लागू करण्याची सूचना मुंबई सरकारला मिळाली.

### (आ) रॉयल मिलमधील संदर्भ

मि. ब्राऊनने स्त्रियांची व १२ वर्षांखालील बालकांची पिळवणूक केली म्हणून मुंबई सरकारला फॅक्टरी ॲक्ट लागू करण्याचे कळविण्यात आले. हा कायदा लागू करण्यामागे खऱ्या अर्थाने उदार विचार नसून वेगळाच हेतू होता.

### (इ) बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन

मुंबई येथील मिल मालकांनी एकत्र संघटन केले. त्यातून 'बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन'चा जन्म झाला. फॅक्टरी ॲक्ट लागू होणार या भीतीतूनच ही संघटना निर्माण करण्यात आली. यामागे कामगारांचे हित महत्त्वाचे नसून कारखानदारांचे स्वहित व स्वार्थ ही मुख्य भावना होती.

### (ई) मँचेस्टरचा वाढता दबाव व बदलते वातावरण

नॉटच्या अध्यक्षतेत फॅक्टरी ॲक्ट बनवण्यासाठी एक कमिशन नियुक्त करण्यात आले. त्यात गिरणी मालकाचे प्रतिनिधी म्हणून मिबाय थेल, सर मंगलदास नथुभाय, मॅक्सवेल, मोरारजी गोकुळदास, दिनशॉ पॉटर हे होते. सर्वसामान्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. ब्लानी व रावसाहेब विश्वनाथ मंडलिक यांचा समावेश होता. या सर्वांनी फॅक्टरी ॲक्टच्या विरोधात भूमिका घेतली. तसे त्यांनी सरकारला कळविले.

### (उ) मंदीचा फटका

१८७९-८० मध्ये मंदीचा फटका बसला. त्यामुळे सर्व गिरणी मालक व व्यवसायांचे मालक त्रासले. मजुरी कमी झाली. कामही मिळेना. आठवड्यातून २-३ दिवस गिरण्या बंद ठेवल्या जाऊ लागल्या. कामगारांचे हाल सुरू झाले. यामुळे कामगार चळवळ सुरू करण्यास हातभार लागला.

### (ऊ) कायद्याच्या पक्षात व विरोधात वृत्तपत्रांतून जनमत प्रगटले

फॅक्टरी ॲक्टविषयी वृत्तपत्रांतून बरीच चर्चा झाली. काहींनी त्याच्या बाजूने मत मांडले तर काहींनी विरोधात. 'नेटिव्ह ओपिनियन' व 'राफ्त गोफ्तर' ने विरोधात लेखन छापले. 'जमे जमशेद'नेही विरोधी भूमिकेतून लिहिले. 'इंदुप्रकाश' ने फॅक्टरी ॲक्ट लागू केला पाहिजे असे मत मांडले. त्यामुळे शिक्षितांचे मत सरकारसमोर व सर्वांसमोर सादर झाले. अशातच सरकारने 'फॅक्टरी ॲक्ट' लागू केल्याची घोषणा केली.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२*

**पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगून कंसात (X) किंवा (✓) अशी खूण करा.**

(१) महाराष्ट्रातील कामगार चळवळीचा जन्म मुंबईत झाला. ( )

(२) मुंबईतील कापड गिरण्यांच्या स्थापनेमुळे मँचेस्टरचा कापड उद्योग धोक्यात आला, त्यामुळे फॅक्टरी ॲक्ट लागू करण्यात आला. ( )

(३) फॅक्टरी ॲक्टमुळे मुंबईतील कापड उद्योग भरभराटीस आला. ( )

(४) मुंबई येथील मिल मालक एकत्र आले ते कामगार हितासाठी नव्हे तर स्वतःच्या फायद्यासाठी ! ( )

(५) मंदीची झळ, फॅक्टरी ॲक्टविरोधी वातावरणातून कामगार चळवळीस जोर धरण्यास अनुकूल वातावरण निर्माण झाले. ( )

(६) फॅक्टरी ॲक्टला सर्व वृत्तपत्रांनी आपल्या लेखांद्वारे पाठिंबा दिला. ( )

## ३.२.३ कामगार चळवळींची उद्दिष्टे

कामगार चळवळीला पूर्णपणे समजून घेण्यासाठी कामगार चळवळींचा (१) उद्दिष्टात्मक, (२) रचनात्मक, (३) कार्यात्मक दृष्टिकोनातून विचार करून कामगार चळवळी का व कशा निर्माण झाल्या हे समजून घेणे आवश्यक आहे. मानवाच्या संघटित प्रयत्नांचे अनेक जीवनानुभव असतात. ते जमेस धरून कामगार क्षेत्रात उतरलेल्या नेत्यांना व कार्यकर्त्यांना स्वतःची स्थिती, राहणीमानाचा दर्जा यांचा विचार करण्याची प्रेरणा लाभते. श्रम हा समाजजीवनातील स्थायी, क्रियाशील व मानवी घटक आहे. उत्पादन प्रक्रियेचा सक्रिय घटक आहे. श्रम साठवून ठेवता येत नाही म्हणून त्याची सौदा करण्याची शक्ती कमी असते. श्रम विकता येतात. श्रमिकांची गतिशीलता कमी असते. अशा मर्यादांमुळेच श्रमाचे सर्वत्र शोषण (पिळवणूक) होते. यामुळे या चळवळींची उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत.

### (अ) कामगार चळवळींची उद्दिष्टे

(१) कामगारांचे जीवन सुधारणे.

(२) कामगारांना संरक्षण मिळवून देणे.

(३) कामगारांची होणारी पिळवणूक थांबवणे.

(४) कामगारांना माणूस म्हणून जगता यावे यासाठी प्रयत्न करणे.

(५) कामगारांना आर्थिक वेतन, सोयी व भत्ते, इत्यादी प्राप्त करून देणे.

(६) कामगारांचे सामाजिक, सांस्कृतिक व आरोग्य, इत्यादी प्रश्न सोडवून त्यांना योग्य दर्जा मिळवून देणे.

(७) कामगारांना जागतिक चळवळीशी व मजुरांशी जोडून ठेवणे.

(८) व्यवस्थापनात व शासनात योग्य सहभाग मिळवून देणे, या उद्दिष्टांनी कामगार संघ, कामगार चळवळ कार्य करताना दिसतात.

याआधारे विविध स्तरांवरील कामगारांचे संघ, कामगारांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन चालणाऱ्या चळवळी कधी

विधवा विवाह, बालविवाह, संमती यांविषयी जागृती केली. महर्षी कर्वे यांनी सामाजिक परंपरेविरुद्ध लढा देण्यासाठी स्त्रीला जागे करण्याची गरज स्पष्ट केली. महिला चळवळीला प्रोत्साहन दिले.

शैक्षणिक चळवळीचेही महाराष्ट्रात चांगले कार्य झाले. महर्षी कर्वे यांनी हिंगणे (पुणे) येथे स्त्री-शिक्षण संस्था स्थापन केली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्वावलंबन, स्वाभिमान, स्वाध्याय व स्वातंत्र्य ही चतु:सूत्री शिक्षणातून साकार केली. रयत शिक्षण संस्था स्थापन करून खेडोपाडी शिक्षण पोहोचवले. शाहू महाराजांनी खेड्यातील मुलांसाठी, दलित वर्गाच्या मुलांसाठी शैक्षणिक सोयी उपलब्ध करून दिल्या. शिक्षण घेण्यास त्यांना उत्तेजन दिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांसाठी शिक्षणप्रसार केला, त्यांच्यात जागृती निर्माण केली. अस्पृश्यांना शैक्षणिक सवलती मिळवून दिल्या. विदर्भात डॉ. पंजाबराव देशमुख यांनी बहुजन समाजाच्या शिक्षणाकडे लक्ष दिले. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व्हावे म्हणून प्रयत्न केले.

याशिवाय महाराष्ट्रात इतर अनेक चळवळींनी जोर धरला. त्यात प्रामुख्याने ब्राह्मणेतर चळवळी, दलित चळवळी, आदिवासी चळवळी, शेतकरी चळवळी, विद्यार्थी चळवळी, तरुणांच्या चळवळी आदींचा उल्लेख करता येईल. या सर्व चळवळींचा विचार आपण विस्ताराने केला आहे.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

**(अ) पुढील प्रश्नांची १५ ते २० ओळींत उत्तरे लिहा.**

(१) प्रार्थना समाजाचे महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीतील योगदान स्पष्ट करा.

(२) आर्य समाजाचे महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीतील योगदान स्पष्ट करा.

(३) सत्यशोधक समाजाचे महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीतील योगदान स्पष्ट करा.

(४) आगरकरांची बुद्धिनिष्ठ समाजसुधारणा स्पष्ट करा.

**(आ) खालील विषयांवर २० ते २५ ओळींत टिपा लिहा.**

(१) जगन्नाथ शंकरशेठ

(२) विष्णुबुवा शास्त्री

(३) महिला चळवळ

(४) दलित चळवळ

(५) ब्राह्मणेतर चळवळ

(६) शैक्षणिक चळवळ

(७) शेतकरी चळवळ

(८) विद्यार्थी व तरुणांच्या चळवळी

## २.७ क्षेत्रीय कार्य

तुमच्या परिसरातील सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांची नोंद करा. त्यांच्या कार्याचे क्षेत्र व त्यांचे महत्त्व याचा अहवाल लिहा.

## २.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


(१) प्रा. मो. नि. ठोके, *आधुनिक महाराष्ट्राचे उद्गाते*

(२) डॉ. बी. एन्. सरदेसाई, *आधुनिक महाराष्ट्र*

(३) प्रा. भिडे, प्रा. पाटील, *महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास*

(४) पाध्ये-टिकेकर, *आजकालचा महाराष्ट्र*

(५) महेश जोशी, *सत्यशोधक समाजाचा इतिहास*

(६) गं. बा. सरदार, *महाराष्ट्र जीवन (खंड २)*

(७) गं. बा. सरदार, *महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी*

(८) रा. प्र. कानिटकर, *एकशेएक श्रेष्ठ मानव*

(९) डॉ. निर्मलकुमार फडकुले (संपा.), *प्रबोधनातील पाऊलखुणा*

# घटक ३ : कामगार चळवळी

*अनुक्रमणिका*


३.० उद्दिष्टे
३.१ प्रास्ताविक
३.२ विषय-विवेचन
 ३.२.१ भारतातील कामगार चळवळ : पार्श्वभूमी
 ३.२.२ कामगार चळवळीचा प्रारंभ होण्याची कारणे
 ३.२.३ कामगार चळवळींची उद्दिष्टे
 ३.२.४ कामगार संघाची कार्ये
 ३.२.५ महाराष्ट्रातील कामगार चळवळींचा प्रारंभ
 ३.२.६ विसाव्या शतकातील कामगार चळवळ
 ३.२.७ कामगार चळवळ व औद्योगिक अशांतता
३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
३.५ सारांश
३.६ सरावासाठी स्वाध्याय
३.७ क्षेत्रीय कार्य
३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ३.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यासानंतर आपल्याला -

★ भारतातील कामगार चळवळींची पार्श्वभूमी स्पष्ट करता येईल.

★ कामगार चळवळींचा प्रारंभ होण्याची कारणे स्पष्ट करता येतील.

★ कामगार चळवळींची उद्दिष्टे विशद करता येतील.

★ कामगार संघाची कार्ये सांगता येतील.

★ महाराष्ट्रातील कामगार चळवळींचा प्रारंभ कसा झाला ते स्पष्ट करता येईल.

★ विसाव्या शतकांतील कामगार चळवळींची वाढ कशी झाली ते स्पष्ट करता येईल.

★ कामगार चळवळ व औद्योगिक अशांतता यांतील संबंध व त्याचे परिणाम स्पष्ट करता येतील.

★ महाराष्ट्रातील कामगार चळवळींमधील अडसर स्पष्ट करता येतील.

★ कामगार चळवळ प्रभावी करण्यासाठी उपाययोजना स्पष्ट करता येतील.

## ३.१ प्रास्ताविक

भारत हा मूलतः कृषिप्रधान देश आहे. भारतात शेती व शेतकऱ्यांचे प्रश्न नेहमीच महत्त्वाचे राहिले आहेत. आधुनिक काळात कामगार हा घटक कारखानदारीनंतर लक्षावधींच्या संख्येत निर्माण झाला. त्यामुळे त्याच्या व्यक्तिगत प्रश्नांपेक्षा सामूहिक स्वरूपाचे प्रश्न, समान प्रश्न सोडविण्यासाठी संघटित होऊन एकत्र प्रयत्न सुरू झाले. यातून कामगार हित, कल्याण व सर्वांगीण प्रगतीची उद्दिष्टे गाठावयाची होती. अशा लढ्यालाच चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले.

युरोपमध्ये औद्योगिक क्रांती घडली. अठराव्या शतकाच्या मध्यापासून उत्पादन वाढले. कारखानदारी वाढली. कामगारांचे मालकांकडून शोषण होऊ लागले. कामगार विपन्नावस्थेत एक विषम समाज घटक ठरले. अनेक प्रश्न उत्पन्न झाले. यांतून कामगारांना न्याय मिळावा, त्यांच्या मूलभूत गरजा भागवता याव्यात, त्यांचे शोषण बंद होऊन त्यांना योग्य मोबदला मिळावा, सोयी सवलती मिळाव्यात तसेच सर्वांगीण प्रगती व्हावी, इत्यादींसाठी सामूहिक प्रयत्नांतून कामगार चळवळी निर्माण झाल्या. अठराव्या शतकाच्या २-३ दशकांत हे प्रश्न व त्या विषयीची जागृती दिसू लागली. आज युरोपच नव्हे तर जगभर या कामगार संघटनांचे स्वरूप दिसते. कामगारांच्या हितासाठी कार्ल मार्क्सने जगातील सर्व कामगारांना एक होण्याचे, रक्तरंजित क्रांतीसाठी तयार राहण्याचे आवाहन केले होते. साम्यवादी तत्त्वज्ञान मार्क्स-एंजेल्समुळे जगाला एका वेगळ्या वळणाकडे घेऊन जाणारे ठरले. भांडवलशाहीविरुद्ध साम्यवादाचा हा लढा जगाला दोन विचारप्रवाहात विभागणारा ठरला. रशियात कामगारांची क्रांती घडली. रशियाने साम्यवाद स्वीकारला. चीन, इंडोचायनाचे देश, आग्नेय आशिया आणि हळूहळू जगभर साम्यवाद विस्तारला. श्रम करणारा कामगार त्याला उत्पादन व नफ्यात वाटा मिळावा, त्याचे जीवन मालकाप्रमाणे सुख-समृद्धीचे असावे, इत्यादी बाबी पाहता आज हा स्वतंत्र अभ्यास विषय बनत आहे. आंतरराष्ट्रीय संघटना म्हणून कामगार संघटना (ILO अंतर्गत) काम करत आहेत. त्यांना योग्य वेतन द्यावे, मानवी वागणूक द्यावी, मनोरंजन व कामाच्या तासाच्या मर्यादा, अतिरिक्त कामाचा मोबदला, आरोग्य, जोखीम, विमा, कुटुंबाचे हित, इत्यादी अनेक प्रश्न सोडवून ह्या चळवळीने कामगार जगत सुखी व समृद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

## ३.२ विषय-विवेचन

### ३.२.१ भारतातील कामगार चळवळ : पार्श्वभूमी

इंग्रज भारताचे साम्राज्यकर्ते झाले. त्यांच्यासोबत व्यापार व आर्थिक यंत्रणाही स्थिरावली. औद्योगिक क्रांतीमुळे देशात कामगार व कारखानदारी वाढू लागली. येथील उद्योग, व्यापारावर ब्रिटिशांनी नियंत्रण ठेवले. एकोणिसाव्या शतकात या औद्योगिक स्वरूपाच्या नवीन विकासासोबत उत्पादनास गती आली आणि कामगारांचे प्रश्न निर्माण झाले. ब्रिटिशांनी शेतकऱ्यांची पिळवणूक केली. त्यांनी उद्योग व कारखाने सुरू करून त्यांच्या गरजा पूर्ण करून घेण्याचा आटोकाट प्रयत्न केला. भारतात कारखानदारी जन्मली. हळूहळू तिचा विस्तार झाला. १८५३ मध्ये आगगाडी निर्मितीचा पहिला कारखाना उभा झाला. कामगार वर्गाचेही बीजारोपण झाले. १८५४ मध्ये नानाभाई कावसजी या पारशी गृहस्थाने मुंबई येथे आधुनिक स्वरूपाचा वस्त्रोद्योग (गिरणी) सुरू केला. मुंबईचे हवामान कापड उद्योगासाठी अनुकूल असल्यामुळे येथे हा उद्योग स्थिरावला. टाटा यांनी नागपूर येथे 'एम्प्रेस मिल' स्थापन केली. पहिल्या महायुद्धापर्यंत भारतभर हा व्यवसाय सुरू होऊन व २७४ कापड गिरण्या चालू झाल्या. एकट्या मुंबई शहरात १५० कापड गिरण्या उभ्या राहिल्या. देशात खनिज प्राप्तीमुळे लोखंड व पोलाद कारखाने उभे झाले. धातू उद्योग, कोळसा, अभ्रक, मँगनीजची प्रगती झाली. 'कमी खर्चात जास्त नफा' ह्या तत्त्वामुळे मालकांचा फायदा व कामगारांवर अन्याय होऊ लागला. त्याला वाचा फोडण्याचे काम सुधारकांनी केले. भारतीय कामगारांना परकीय कामगारांबद्दल माहिती देणे, त्यांच्यात परिवर्तन घडवून आणणे, इत्यादी कार्यांत अखिल भारतीय स्तरावर लाला लजपतराय, जोसेफ बॅप्टिस्टा, नारायण जोशी, दिवाण चिमणलाल यांनी प्रभावी कार्य केले. महाराष्ट्रात टिळक, बॅप्टिस्टांप्रमाणे नारायण मेघाजी लोखंडे यांनी प्रभावीपणे कामगारांचे नेतृत्व केले. सदाशिवराय केळकर, एस. एम. जोशी, नारायण मल्हार जोशी, स्वामी रामानंद तीर्थ, इत्यादींनी कार्य केले.

१८८५ साली परिवर्तन घडवून कामगार कल्याणासाठी धडपड करण्यात नारायण मेघाजी लोखंडे यांचे प्रयत्न मूलगामी ठरले. देशोदेशीच्या मजुरांची स्थिती व दुःखे यांची माहिती मिळू लागली. 'संप' हा प्रभावी उपाय असल्यामुळे १९ व्या शतकात १८८५ च्या सुमारास जी. आय. पी. रेल्वेच्या सिग्नल खात्याच्या लोकांनी संप केला. काम करणे बंद करून मागण्या मान्य करवून मालकांना वठणीवर आणण्यात यश मिळवले. १९०५ साली वंगभंग चळवळीतून आगगाडी कारखाना, कापड गिरण्या आणि सरकारी छापखान्यातील कामगारांचे संप झाले. १९०८ मध्ये टिळकांच्या अटकेच्या निषेधार्थ कामगारांनी संप केला. १९१८ मध्ये हजारो कामगार संप करून उठले. धर्मानंद कोसांबीची मार्क्सवर झालेली व्याख्याने परिणामकारक ठरली. टिळकांच्या अटकेविरोधी झालेल्या संपाला राजकीय महत्त्व होते तसेच रौलट ॲक्ट विरोधात केलेल्या संपाला राजकीय महत्त्व लाभले. १९२० मध्ये 'ऑल इंडिया ट्रेड युनियन' स्थापन झाली. मुंबईत पहिले अधिवेशन झाले. त्याचे अध्यक्ष लाला लजपतराय होते. १९२४ मध्ये चित्तरंजन दास आणि १९२६ मध्ये गिरी यांनी अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविले. समाजवादाचा उदय होऊन १९२९ मध्ये भारतात काँग्रेसने त्याचा स्वीकार केला. यानंतर लोकशाही समाजवादाची वाटचाल झाली. १९२९ मध्ये अहमदाबाद येथे कामगारांनी संप केले. महात्मा गांधींनी कामगारांना मार्गदर्शन केले. शेतकरी कामगार पक्षाने प्रयत्न केले. अशा गतिमान झालेल्या या भारतीय कामगार चळवळीचा महाराष्ट्रातील उदय, विकास येथे पाहणार आहोत.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - १*

**पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगून कंसात (X) किंवा (✓) अशी खूण करा.**

(१) भारत हा कृषिप्रधान देश आहे. ( )

(२) युरोपमध्ये औद्योगिक क्रांती घडली. ( )

(३) कार्ल मार्क्सने जगातील सर्व कामगारांना एक होण्याचे आवाहन केले. ( )

(४) रशियाने साम्यवाद नाकारून भांडवलशाहीचा पुरस्कार केला. ( )

(५) नानाभाई कावसजी या गृहस्थांनी मुंबईत आधुनिक स्वरूपाची कापड गिरणी सुरू केली. ( )

(६) कामगारांनी आपले हक्क पदरात पाडून घेण्यासाठी संपाचे हत्यार उपसले. ( )

(७) लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांचा कामगार संघटनांना विरोध होता. ( )

### ३.२.२ कामगार चळवळीचा प्रारंभ होण्याची कारणे

महाराष्ट्रात कामगार चळवळ मुंबईत जन्मली. मुंबईहून तिचा इतरत्र विस्तार झाला. त्यामागे काही कारणे घडली. ती पुढीलप्रमाणे आहेत.

**(अ) फॅक्टरी ॲक्ट**

फॅक्टरी ॲक्टचा संबंध मँचेस्टर (इंग्लंड) व मुंबई येथील कापड गिरणी मालकांच्या स्वार्थाशी जडलेला होता. मुंबईमधील कापड गिरण्यांच्या स्थापनेमुळे मँचेस्टरच्या कापड उद्योगास धोका निर्माण झाला; आणि अशातच मुंबईच्या वातावरणाला आवर घालण्याचे ठरले. मुंबईची भरभराट अडचणीत आणण्याचा प्रयत्न झाला व फॅक्टरी ॲक्ट लागू करण्याची सूचना मुंबई सरकारला मिळाली.

### (आ) रॉयल मिलमधील संदर्भ

मि. ब्राऊनने स्त्रियांची व १२ वर्षांखालील बालकांची पिळवणूक केली म्हणून मुंबई सरकारला फॅक्टरी अॅक्ट लागू करण्याचे कळविण्यात आले. हा कायदा लागू करण्यामागे खऱ्या अर्थाने उदार विचार नसून वेगळाच हेतू होता.

### (इ) बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन

मुंबई येथील मिल मालकांनी एकत्र संघटन केले. त्यातून 'बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन'चा जन्म झाला. फॅक्टरी अॅक्ट लागू होणार या भीतीतूनच ही संघटना निर्माण करण्यात आली. यामागे कामगारांचे हित महत्त्वाचे नसून कारखानदारांचे स्वहित व स्वार्थ ही मुख्य भावना होती.

### (ई) मँचेस्टरचा वाढता दबाव व बदलते वातावरण

नॉटच्या अध्यक्षतेत फॅक्टरी अॅक्ट बनवण्यासाठी एक कमिशन नियुक्त करण्यात आले. त्यात गिरणी मालकांचे प्रतिनिधी म्हणून मिबाय थेल, सर मंगलदास नथुभाय, मॅक्सवेल, मोरारजी गोकुळदास, दिनशॉ पॉटर हे होते. सर्वसामान्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. ब्लानी व रावसाहेब विश्वनाथ मंडलिक यांचा समावेश होता. या सर्वांनी फॅक्टरी अॅक्टच्या विरोधात भूमिका घेतली. तसे त्यांनी सरकारला कळविले.

### (उ) मंदीचा फटका

१८७९-८० मध्ये मंदीचा फटका बसला. त्यामुळे सर्व गिरणी मालक व व्यवसायांचे मालक त्रासले. मजुरी कमी झाली. कामही मिळेना. आठवड्यातून २-३ दिवस गिरण्या बंद ठेवल्या जाऊ लागल्या. कामगारांचे हाल सुरू झाले. यामुळे कामगार चळवळ सुरू करण्यास हातभार लागला.

### (ऊ) कायद्याच्या पक्षात व विरोधात वृत्तपत्रांतून जनमत प्रगटले

फॅक्टरी अॅक्टविषयी वृत्तपत्रांतून बरीच चर्चा झाली. काहींनी त्याच्या बाजूने मत मांडले तर काहींनी विरोधात. 'नेटिव्ह ओपिनियन' व 'राफ्त गोफ्तर' ने विरोधात लेखन छापले. 'जमे जमशेद'नेही विरोधी भूमिकेतून लिहिले. 'इंदुप्रकाश' ने फॅक्टरी अॅक्ट लागू केला पाहिजे असे मत मांडले. त्यामुळे शिक्षितांचे मत सरकारसमोर व सर्वांसमोर सादर झाले. अशातच सरकारने 'फॅक्टरी अॅक्ट' लागू केल्याची घोषणा केली.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२*

**पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगून कंसात (X) किंवा (✓) अशी खूण करा.**

(१) महाराष्ट्रातील कामगार चळवळीचा जन्म मुंबईत झाला. ( )

(२) मुंबईतील कापड गिरण्यांच्या स्थापनेमुळे मँचेस्टरचा कापड उद्योग धोक्यात आला, त्यामुळे फॅक्टरी अॅक्ट लागू करण्यात आला. ( )

(३) फॅक्टरी अॅक्टमुळे मुंबईतील कापड उद्योग भरभराटीस आला. ( )

(४) मुंबई येथील मिल मालक एकत्र आले ते कामगार हितासाठी नव्हे तर स्वतःच्या फायद्यासाठी ! ( )

(५) मंदीची झळ, फॅक्टरी अॅक्टविरोधी वातावरणातून कामगार चळवळीस जोर धरण्यास अनुकूल वातावरण निर्माण झाले. ( )

(६) फॅक्टरी अॅक्टला सर्व वृत्तपत्रांनी आपल्या लेखांद्वारे पाठिंबा दिला. ( )

## ३.२.३ कामगार चळवळींची उद्दिष्टे

कामगार चळवळीला पूर्णपणे समजून घेण्यासाठी कामगार चळवळींचा (१) उद्दिष्टात्मक, (२) रचनात्मक, (३) कार्यात्मक दृष्टिकोनातून विचार करून कामगार चळवळी का व कशा निर्माण झाल्या हे समजून घेणे आवश्यक आहे. मानवाच्या संघटित प्रयत्नांचे अनेक जीवनानुभव असतात. ते जमेस धरून कामगार क्षेत्रात उतरलेल्या नेत्यांना व कार्यकर्त्यांना स्वतःची स्थिती, राहणीमानाचा दर्जा यांचा विचार करण्याची प्रेरणा लाभते. श्रम हा समाजजीवनातील स्थायी, क्रियाशील व मानवी घटक आहे. उत्पादन प्रक्रियेचा सक्रिय घटक आहे. श्रम साठवून ठेवता येत नाही म्हणून त्याची सौदा करण्याची शक्ती कमी असते. श्रम विकता येतात. श्रमिकांची गतिशीलता कमी असते. अशा मर्यादांमुळेच श्रमाचे सर्वत्र शोषण (पिळवणूक) होते. यामुळे या चळवळीची उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत.

### (अ) कामगार चळवळींची उद्दिष्टे

(१) कामगारांचे जीवन सुधारणे.

(२) कामगारांना संरक्षण मिळवून देणे.

(३) कामगारांची होणारी पिळवणूक थांबवणे.

(४) कामगारांना माणूस म्हणून जगता यावे यासाठी प्रयत्न करणे.

(५) कामगारांना आर्थिक वेतन, सोयी व भत्ते, इत्यादी प्राप्त करून देणे.

(६) कामगारांचे सामाजिक, सांस्कृतिक व आरोग्य, इत्यादी प्रश्न सोडवून त्यांना योग्य दर्जा मिळवून देणे.

(७) कामगारांना जागतिक चळवळीशी व मजुरांशी जोडून ठेवणे.

(८) व्यवस्थापनात व शासनात योग्य सहभाग मिळवून देणे, या उद्दिष्टांनी कामगार संघ, कामगार चळवळ कार्य करताना दिसतात.

याआधारे विविध स्तरांवरील कामगारांचे संघ, कामगारांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन चालणाऱ्या चळवळी कधी

राजकीय पक्षांच्या तर कधी स्वतंत्र स्वरूपात अस्तित्वात येतात. त्यांना आपण वरील उद्दिष्टांचे फलित मानू या.

### (आ) कामगार चळवळीचे रचनात्मक स्वरूप

कामगार व कारखाने हे शब्द सर्वत्र तेच असले तरी आपल्या देशात वा इतर देशांत देशकालपरत्वे कामगार चळवळींचे व संघांचे स्वरूप भिन्न असते. याची निर्मिती औद्योगिकीकरणामुळे उद्भवलेल्या आर्थिक व राजकीय परिस्थितीमुळे होते. धंदेनिहाय संघ, औद्योगिक संघ, साधारण संघ, महासंघ असे हे स्वरूप असू शकते. नवीन शोध, यंत्र वापर व उत्पादन प्रक्रियेत जसजशी गती वाढली तसतशी कामगारांत अकुशल कामगारांची संख्या वाढली. कुशल कामगारांनी स्वतःच्या हितरक्षणार्थ संघ स्थापन केले. पूर्वी या संघांची संख्या मुंबईत जास्त होती. आता ती घटली आहे. तरी विमान वाहतूक, बंदरे, गोदीचा परिसर येथे असे संघ आढळतात. यातून विघटनाची स्थिती टिकते ती विलीन करून एकरूपता राहावी म्हणून. राष्ट्रीय श्रम आयोगाने धंदेनिहाय संघ औद्योगिक संघात विलीन करण्याची सूचनावजा शिफारस केली. यामूळे एका उद्योगातील (कुशल-अकुशल) संपूर्ण कामगारांचा संघटनात्मक औद्योगिक संघ बनण्यास गती लाभली. अशा संघामुळे वाटाघाटीची सोय होते. कारखान्यातील परिस्थितीसाठी उपाय करणे शक्य होते. विविध हितसंबंधांचे एकत्र सामंजस्य करणे शक्य होते. तिसरा प्रकार साधारण संघाचा होय. यात सदस्य होण्यास धंदा, उद्योग श्रेणीचे बंधन नसते. पहिल्या दोन प्रकारच्या संघांपेक्षा या संघाचे कार्यक्षेत्र व्यापक असते. विविध कामगार संघ यामुळे एकत्र राहू शकतात. विविध प्रकारच्या व सर्व कामगार संघांना एकत्रित ठेवण्यासाठी महासंघ हा चौथा प्रकार विकसित होत असतो. महासंघाची स्थापना स्थानीय, विभागीय प्रदेश व देशव्यापी स्वरूपाची असू शकते. संपूर्ण कामगार विश्व यामुळे जोडले जाते एका केंद्रापासून थेट लहान घटकापर्यंत गतिमान स्वरूपात टिकून राहते. विविध कामगार संघ व चळवळींची कार्येही या अनुषंगाने समजून घेणे क्रमप्राप्त ठरते.

## ३.२.४ कामगार संघाची कार्ये

कामगार जगतासाठी जी उद्दिष्टे यापूर्वी आपण अभ्यासली त्यांची पूर्तता करण्यासाठी या चळवळीने किंवा कामगार संघाने प्रत्यक्षात प्रयत्न करावयाचे असतात. ही कार्ये दोन प्रकारची आहेत - (अ) अंतर्गत कार्ये (आ) बहिर्गत कार्ये.

### (अ) अंतर्गत कार्ये

कामगार हितसंबंधांचे रक्षण व संवर्धन व्हावे म्हणून करावी लागणारी कार्ये अंतर्गत कार्ये होत. ही कार्ये पुढीलप्रमाणे -

(१) कामगारांना कामाचा योग्य मोबदला मिळवून देणे.
(२) कामगारांच्या कामाची परिस्थिती यथायोग्य ठेवणे.
(३) कामगारांच्या कामाचे तास नियमानुसार ठेवणे.
(४) कामगारांच्या कामात येणाऱ्या अडचणी सोडविणे.
(५) कामगारांसाठी आवश्यक सोयी आणि कामगार जागृती करणे.
(६) कामगारांना योग्य वागणूक देण्यास मालक, व्यवस्थापनास भाग पाडणे.
(७) कामगार गुलाम नसून व्यवस्थापनाचा वाटेकरी आहे. त्याला व्यवस्थापनात योग्य वाटा मिळवून देणे.
(८) कारखानदारांच्या अनियंत्रित सत्तेला आळा घालणे.

ही सर्व अंतर्गत कार्ये प्रथम सामूहिक वाटाघाटीच्या माध्यमातून करण्यास यश न आल्यास संपाचा मार्ग हाताळणे रास्त मानले जाते.

या सोबत पुढील बहिर्गत कार्ये करावयाची असतात.

### (आ) बहिर्गत कार्ये

कामगार जगताचे प्रश्न दिवसेंदिवस वाढत असल्याने कार्यांचा व्यापही वाढत आहे. अनेक प्रश्नांचा संबंध वरील अंतर्गत कार्यांत बसत नाही. तो दैनंदिन कार्याशी किंवा कारखान्यातील उत्पादनाशी नसतो. समाजाचा घटक म्हणून सुसंस्कृत जीवन कामगारांना जगता यावे याच्याशी संबंधित असतो. अशा कार्यांना 'बहिर्गत कार्ये' म्हणता येईल. ती पुढीलप्रमाणे -

(०१) कामगार वस्त्यांमध्ये सुधारणा घडवणे.
(०२) कामगारांना व्यवस्था उपलब्ध करून देणे. त्यात निवास, रस्ते, उजेड, बगीचे, इत्यादी सोयी पाहणे.
(०३) कामगारांसाठी साक्षरता वर्ग चालवणे.
(०४) कामगारांसाठी वाचनालयाची व्यवस्था करणे.
(०५) कामगारांना कायद्याचे ज्ञान व मार्गदर्शनाची सोय करणे.
(०६) कामगारांना माफक दरात आवश्यक वस्तूंचा पुरवठा करणे.
(०७) कामगारांच्या मनोरंजनासाठी (सिनेमागृह, दूरदर्शनसंच, इत्यादी.) व्यवस्था करणे.
(०८) कामगारांना आरोग्याच्या सोयी व वैद्यकीय उपचार पुरवणे.
(०९) सरकार व राजकीय पक्षांवर दडपण आणून कामगार कल्याण साध्य करण्यासाठी कायदे संमत करून घेणे.
(१०) कामगार हितरक्षकाला निवडणुकीच्या वेळी मतदानाच्या माध्यमातून विधानसभेवर निवडून देणे.
(११) पक्षाशी जोडलेल्या कामगार संघटनांतून राजकीय दबाव टिकवणे.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ३*

**पुढील विधानांत गाळलेल्या जागी योग्य शब्द भरा.**

(१) कामगार हा उत्पादनाचा ------- घटक आहे.
(२) श्रमिकांना आपले ------- साठवून ठेवता येत नाही.

(३) कामगारांची सौदाशक्ती ------- असते.

(४) कामगार चळवळ, कामगार संघ व कामगार समस्या प्रदेशानुरूप ------- असतात.

(५) ------- कामगार असंघटित आहेत.

(६) कामगारांच्या हितसंबंधांचे रक्षण करणे हे कामगार संघाचे ------- कार्य होय.

(७) कामगारांना शिक्षण देणे, आवश्यक त्या वस्तू पुरवणे हे कामगार संघाचे ------- कार्य आहे.

## ३.२.५ महाराष्ट्रातील कामगार चळवळीचा प्रारंभ

भारतीय कामगार जगतात मुंबई नगरीतील परिवर्तनांचा वाटा महत्त्वाचा आहे. १८७५ मध्ये मुंबई नगरीने पहिला सामान्य व असंघटित प्रयत्न केला. सोराबजींच्या नेतृत्वाने कायदा व्हावा म्हणून आवाज उठवला गेला. कामगारांना संघटित करून पहिला संघटनात्मक प्रयत्न १८९० मध्ये मुंबई येथून नारायण मेघाजी लोखंडे यांनी केला. 'बॉम्बे मिल हँडस् असोसिएशन' च्या उभारणीमुळे ही चळवळ जन्मली. कदम मनोहर यांनी लिहिलेल्या 'नारायण मेघाजी लोखंडे यांचे चरित्र' या ग्रंथात *प्रो. दिनेश चक्रवर्तींनी* लिहिले आहे की, एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या २० वर्षांत भारतात कामगार चळवळीस सुरुवात झाली. १८९० साली कामगार वर्गामध्ये खऱ्या अर्थाने जाणीव निर्माण झाली. या वेळी भारतीय कामगार अशिक्षित व अडाणी होते. त्यांच्यात जातिभेद व भाषाभेद होते. गावातून शहरात नवखे होऊन राहणारे हे कामगार. त्यांना इंग्रजी येत नसे. संघ बनवण्याचे तंत्र त्यांना अवगत नव्हते. आपली नेमकी भूमिका ज्ञात नव्हती. कामगार त्रिश्वाबाहेरचे (आऊट साइडर्स) म्हणजे डॉक्टर, वकील व राजकीय पुढारी त्यांचे संघ बनवून जबाबदारी घेत. म्हणून त्यांना 'आऊट साइडर्स' नाव पडले. तरी कामगारांसाठी ते बाहेरचे नसायचे. ते कामगार संघ कायद्यान्वये सन्मान्य सभासद म्हणून निवडून येत.

### (अ) नारायण मेघाजी लोखंडे (१८४८-१८९७)

ब्रिटिश काळात मुंबईच्या औद्योगिक विकासामुळे महाराष्ट्रातील मुंबई प्रांतात कामगार चळवळीने मूळ धरले. या चळवळीला आकार देण्यात सर्वांत अग्रणी व्यक्ती होते नारायण मेघाजी लोखंडे. महाराष्ट्रप्रमाणेच देशभरातील चळवळींतही त्यांचे नाव या चळवळीच्या उभारणीसाठी अग्रदूत म्हणून घेतले जाते. त्यांचे मूळ गाव पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील कन्हेरसर हे होते. त्यांचा जन्म १८४८ मध्ये ठाणे येथे झाला. तेथेच मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले. १८७० पर्यंत रेल्वे लोकोमोटिव्ह खात्यात कारकून व नंतर पोस्ट विभागात नोकरी केली.

आरंभीच्या काळात १८७० पासूनच बहुजन समाजाचे अज्ञान, चालीरीती, शिक्षणाची आवश्यकता यांविषयी नारायण लोखंडे यांनी स्फुट लेखन केले. पूर्वीची नोकरी सोडून ते मांडवीच्या मिलमध्ये स्टोअरकीपर बनले. ब्राह्मणेतरांचे प्रथम वृत्तपत्र (१८७७) 'दीनबंधू'चे ते संपादक होते. आता मिलच्या नोकरीद्वारे त्यांना कामगारांचे जीवन जवळून पाहण्याची, अनुभवण्याची संधी लाभली. त्या वेळी कावसजी दावर यांची १८५४ पासून चालणारी पहिली कापड गिरणी मुंबईत होती. नंतर या गिरण्यांची संख्या सतत वाढत राहिली. मुंबईच्या कापड गिरण्यांचा कारभार पाहण्यात मॅनेजिंग एजन्टसना महत्त्व होते. मॅनेजर दैनंदिन कामकाज व व्यवस्थापन सांभाळत. विविध खात्यांचे मास्टर्स व असिस्टंट कार्डिंग, विव्हिंग आणि स्पिनिंगची कामे पाहत. त्यांच्या हाताखाली जॉबर्स व सुपरवाइजर्स असत. त्यांचा कामगारांशी संपर्क असे. गिरणीत नोकरी मिळवून देणारा 'जॉबर' हा महत्त्वाचा घटक असून त्या कामासाठी तो 'बक्षीस' किंवा 'दस्तुरी' घेत असे. २ ते ५ रुपये एवढी रक्कम स्त्री-पुरुष त्यास देत. हा प्रकार चांगला नव्हता. तो बंद करण्याचे प्रयत्न 'बॉम्बे मिल ओनर्स असोशिएशन'ने केला. त्यात यश आले नाही. १९३३ मध्ये हे थांबले; पण तोपर्यंत 'जाबर्स' हे कामगारांचे शोषण करतच होते. नवी गिरणी निघाली की अशिक्षित, अकुशल कामगार काम मागत. सशक्त पण कोवळ्या वयाच्या मुलांना संधी मिळायची. ५ ते ७ वर्षांच्या मुलांनाही कामात गुंतवले जाई. गिरण्या वाढल्या तशी कामगारांची संख्याही वाढली, उत्पादन व नफा प्रचंड वाढला पण कामगारांची वेतनवाढ फारच कमी झाली. पुढील तक्त्यावरून हे स्पष्ट करता येईल.

| *काळाचा टप्पा* | *नोकरीत वाढ (टक्क्यांत)* | *वेतन वाढ (टक्क्यांत)* | *सुविधा* |
|---|---|---|---|
| १८७५ ते १८८२ | १३५% | ९.४% | दुर्लक्षित |
| १८७५ ते १८९० | ३३६% | १७.६% | दुर्लक्षित |
| १८८४ (स्त्रिया) | २२.२% | --- | दुर्लक्षित |
| १८९७ (स्त्रिया) | २३.३% | --- | दुर्लक्षित |
| १८७० (५ ते ७ वर्षीय बालके) | १०% | --- | दुर्लक्षित |
| गिरण्या हिवाळ्यात दिवसा १० ते १२ तास आणि उन्हाळ्यात १३-१४ तास चालत. | | | |

कामगार जीवनाच्या समस्या वाढतच होत्या. भरतीत जातीय विचार होत असे. जॉबर आपल्या जातीची माणसे कामासाठी आणत असे. 'युनायटेड स्पिनिंग अँड विव्हिंग मिल' चे उदाहरण पाहिले तर असे दिसते की, या मिलमध्ये मागासवर्गीयांना घेत नसत. कारण यात विव्हिंग विभागात सर्व विभागांपेक्षा जास्त वेतन होते. कामाच्या तासाविषयी शोषण चालत असे. सूर्योदयाच्या उजेडापासून सूर्यास्त व पूर्ण अंधार होईपर्यंत हिवाळ्यात १२ ते १३ आणि उन्हाळ्यात १३ ते १४ तास काम करून घेत. उशीर केला की कामगारांच्या वेतनातून कपात करत.

कामगारांचे जीवन हलाखीचे बनले होते. लोखंडे यांनी

१८८४ मध्ये ५५०० कामगार उघड्यावर गिरणीबाहेर झोपत अशी नोंद केली आहे. वेळापत्रक व काम अनिश्चित होते. ९० ते १०० अंश उष्णतेत, कोंदट वातावरणात काम करावे लागे. हिंदू सणाच्या वेळी अर्धा दिवस काम बंद राही बाकी सुट्या नसत. 'बॉम्बे मिल ओनर्स असोशिएशन'चे १६ नियम दिखाऊ होते कारण ते पाळले जात नसत. या स्थितीनेच नारायण मेघाजी लोखंडेना कामगार जीवनासाठी चळवळ हाती घेण्यास प्रेरित केले होते. यासोबत फॅक्टरी अॅक्ट व चळवळ प्रारंभही आपण अभ्यासला. या सर्व बाबींतून कामगार चळवळ सुरू झाली व हळूहळू विस्तारली.

## (आ) लोखंडे यांचे संघटनात्मक व जागृती कार्य

फॅक्टरी अॅक्ट आणि कामगार चळवळीचा प्रारंभ आपण समजून घेतला. १८८१ ला 'फॅक्टरी अॅक्ट' लागू करण्याची शिफारस करण्यात आली. लोखंडेंनी 'इंडियन स्पेक्टेटर' व 'राफ्त गोफ्तर' या दोन पत्रातून कामगारांसाठी संघटना असावी अशी गरज व्यक्त केली. त्यांनी 'दीनबंधू'मधूनही कामगारांची दुःखे स्पष्टपणे मांडली. या सोबत त्यांनी भारतातील पहिली कामगार संघटना 'बॉम्बे मिल हँड असोसिएशन' या नावाने स्थापन केली. त्यांच्या या संघटनात्मक व जागृती कार्याला रघू भिकाजी, गेनू बाबाजी, नारायण सुकौजी यांसारख्या जॉबर्सनी मदत केली हे उल्लेखनीय आहे. सत्यशोधक समाज बहुजनांसाठी झटत होता. त्यामार्फत रघू कोरगावकर, कृ. स. केळुसकर, रामचंद्र शिंदे, नारायण पवार, इत्यादींनी कामगार चळवळीत आपला वाटा नोंदवला.

लोखंडे एकीकडे गिरणी-कारखाने, त्यातील कामगार जीवन यांतील वस्तुस्थिती अभ्यासत तर दुसरीकडे ते शासकीय व कायदेशीर बाजूही अभ्यासत. १८८१ च्या फॅक्टरी अॅक्टचा अभ्यास करून त्यातील अपूर्णता त्यांनी सर्वांसमोर ठेवल्या, त्यात काही अपेक्षित सुधारणा सुचवल्या. २२ व २३ सप्टेंबर १८८४ रोजी परळ तसेच भायखळा येथे सभा घेऊन जागृती केली.

## (इ) फॅक्टरी कमिशनला सादर केलेल्या मागण्या

कामगारांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळवून वरील सभांमध्ये त्यांनी ठराव पास केले. त्यात पुढील मागण्या होत्या त्या मागण्या त्यांनी फॅक्टरी कमिशनचे अध्यक्ष डब्ल्यू. बी. मूलक यांना सादर केल्या.

(१) गिरणी कामगारांना रविवारी पूर्ण दिवस विश्रांती द्यावी.
(२) दुपारी अर्धा तास कामगारांना सुटी असावी.
(३) सकाळी ६.३० पासून सूर्यास्तापर्यंत काम व्हावे.
(४) कामगारांना महिन्याच्या १५ तारखेपर्यंत वेतन द्यावे.
(५) कामावर दुखापत झाली तर तो बरा होईपर्यंत त्याला पूर्ण पगार द्यावा. कामावर कामगाराचा मृत्यू झाला तर त्याच्या कुटुंबाला पेन्शन दिली जावी.

मुंबईतील मागण्यांवर विचार चालू असतानाच कामगारांनी १८८५ मध्ये २ गिरण्यांमध्ये पगार कपात व पगारास नकार या कारणास्तव संप केला.

कुर्ल्याच्या स्वदेशी मिलमध्ये १८८७ मध्ये संप झाला. टाटांनी उत्तरेतून मजूर आणून अयशस्वी शह दिला. स्त्रिया सणासुदीला कामावर येत नाहीत म्हणून मालकांची नाराजी होती. फॅक्टरी अॅक्टनुसार काही बदल करता यावेत म्हणून लोखंडेंनी ३ जून १८८९ रोजी मुंबई सरकारला पत्राद्वारे कायदा करण्याची विनंती केली. प्रारंभी रविवारच्या सुटीस कामगारांचा विरोध झाला. कारण ख्रिश्चनांचा चर्चचा आणि हिंदूंचाही खंडोबा व कुलस्वामिनीचा हा वार. ब्रिटिशांनाही सोयीचा वार हाच. शेवटी रविवारची आठवडी सुटी कामगारांना लोखंडेंच्या सभेतील मार्गदर्शनानंतर १० जून १८९० मध्ये मान्य झाली. हा चळवळीचा फार मोठा विजय होता. लोखंडे यांची कामगार जीवनाशी जवळीक वाढली. यामुळे कामगारांचे विविध प्रश्न ओळखून त्यांची सोडवणूक करण्यात लोखंडेना यश आले.

## (ई) १८९२ चा फॅक्टरी अॅक्ट

संपूर्ण जगभर कामगार पुरुषांचेच नव्हे तर स्त्रियांचे व बालकांचेही प्रश्न चर्चेत आले. १८९० च्या बर्लिन परिषदेत ही चर्चा झाली. कारण ही आंतरराष्ट्रीय परिषद होती. मँचेस्टर चेंबर्स ऑफ कॉमर्सने भारतीय कापड गिरणी उद्योगातील सुधारणा त्वरीत लागू करण्याची मागणी केली. पण गिरणी मालक संघाचा विरोध झाला. यासाठी मेजर लेथब्रीजच्या अध्यक्षतेत सरकारने कमिशन नेमले. यात भारतीय सदस्यही होते. त्या कमिशनने भेटी घेऊन विविध कामगार संघटना, गिरणी मालक संघटना यांची मते जाणून घेतली. मुंबई, अहमदबाद येथे जाऊन पाहणी केली. त्यानंतर नवा फॅक्टरी अॅक्ट मान्य झाला. हाच १८९२ ला लागू झालेला कायदा होय.

### १८९२ ला लागू झालेल्या फॅक्टरी अॅक्टमधील तरतूदी

(१) फॅक्टरीची व्याख्या : जेथे ५० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार चार महिने वा अधिक काळ काम करतात अशी उत्पादनाची जागा.
(२) कामाचे तास स्त्रियांसाठी ११, दुपारी १ ते १.३० दरम्यान अर्धा तास विश्रांती.
(३) स्त्री कामगारांना सकाळी ६ पूर्वी बोलावू नये. सायंकाळी ६.३० नंतर कामासाठी थांबवू नये.
(४) मुलाचे वय १४ वर्षे वयापर्यंत मानावे.
(क) वयोमर्यादा ९ ते १४ वर्षे (ख) मुलांनी ५.१५ ते सकाळी ८.३० पर्यंत काम करून शाळेत हजर राहावे.
(इ) दुपारी १२.३० ते ३.४५ काम करून घरी जावे.
(ई) दुसऱ्या पाळीतील मुलांनी ८.३० ते १२ सकाळी गिरणीत काम करावे, नंतर ३.४५ पर्यंत शाळा करून पुन्हा ३.४५ ते सायं. ६.४५ गिरणीत काम करावे, इत्यादी.

दोन्ही पाळींतील मुलांना साडे सहा तासांपेक्षा जास्त काम देऊ नये.

(५) सर्व गिरण्यांत १२ ते २ दरम्यान अर्धा तास मध्यंतर व आठवडी एक तास सुटी रविवारी ठेवावी.

(६) पाणी पुरवठा, सांडपाणी, स्वच्छता व हवा पाण्याची पुरेशी सोय हवी. या कामासाठी स्थानिक शासनाने पुढाकार घ्यावा.

या देशातील स्थानिक कामगार चळवळ या कायद्याने फलिभूत झाली. लोखंडे यांचे फार सहकार्य लाभले होते. सरकारने १८९१ चा गिरणी मालक संघाचा कायदा झाल्यावर त्यांचा सत्कार करून गौरव केला.

### (उ) रॉयल कमिशन व लोखंडेंची साक्ष

१८९१ मध्ये 'रॉयल कमिशन ऑन लेबर' ची स्थापना झाली. त्यात तीन समित्या बनवण्यात आल्या. त्यांनी कामगार संघटना, मालकांची संघटना यांबरोबर चर्चा केली. कमिशनसमोर लोखंडेंची साक्ष महत्त्वाची होती. त्यातील कांही महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे-

(१) कामगारांना सुटीच्या दिवशी अर्धा दिवस काम करावे लागते.

(२) त्या अर्धा दिवसाच्या कामाचा मोबदला मिळत नाही.

(३) चूक झाली म्हणून कामावरून कमी करणे, पगार गोठवणे चुकीचे आहे.

(४) पगार दोन किंवा त्यापेक्षा जास्त महिन्यांनी दिला जातो.

(५) गिरणीतील एजंट वा मॅनेजर नको असेल त्या कामगारास कधीही काढतात.

(६) त्याविरुद्ध जाब विचारण्याची सोय नाही.

या साक्षीआधारे भावी कायदे करण्यास मदत झाली. लोकमान्य टिळक, महात्मा फुले, भालेकर यांच्याशी आपल्या प्रतिभासामर्थ्याने लोखंडेंनी वाद केले व स्वमत टिकवले. १८९३ च्या हिंदू-मुस्लीम दंग्यात त्यांनी घेतलेल्या उत्कृष्ट भूमिकेमुळे सरकारने त्यांना १८९५ मध्ये 'रावबहादूर' पदवी बहाल करून त्यांचा गौरव केला. १८९२-९३ मध्ये लोखंडेनी निर्माण केलेल्या चैतन्यामुळे मुंबई कामगार संप यशस्वी झाला.

फेब्रुवारी १८९७ मध्ये वयाच्या ४९ व्या वर्षी प्लेगमुळे लोखंडे मृत्यु पावले.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ४*

**पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगून कंसात (X) किंवा (✓) अशी खूण करा.**

(१) कामगार चळवळीला निश्चित असे स्वरूप देण्यास नारायण मेघाजी लोखंडे हे अग्रणी होते. ( )

(२) जॉबर्स हे मध्यस्थ कामगारांचे हितरक्षण करत असत. ( )

(३) कामगारांची संघटना असावी आणि कामगार संघटनांची गरज असा विचार लोखंडे यांनी व्यक्त केली. ( )

(४) लोखंडे यांनी 'फॅक्टरी ॲक्ट'ला संपूर्ण पाठिंबा व्यक्त केला. ( )

(५) नारायण मेघाजी लोखंडे यांच्या प्रयत्नांतून कामगारांच्या रविवारच्या सुटीची मागणी मान्य झाली. ( )

(६) १८९१ मध्ये 'रॉयल कमिशन ऑन लेबर' स्थापन करण्यात आले. ( )

(७) लोखंडे यांना कामगार चळवळीचा जनक मानण्यात येते. ( )

## ३.२.६ विसाव्या शतकातील कामगार चळवळ

### (अ) पहिले दशक

राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीमुळे घडणाऱ्या विविध घटनांचे परिणाम कामगार चळवळीवर होणे अनिवार्य होते. बंगालची फाळणी झाली. तिचे पडसाद देशभर उमटले. संपूर्ण देशात राष्ट्रप्रेम उफाळून आले. कामगारांच्या जीवनाशी याचा संबंध फार कमी होता. पण कामगारांनीही संप केला. कामाचे तास कमी करण्याची मागणी केली. पोस्ट खात्यात परिणाम उमटले. त्यात संघटन उदयास आले. १९०७ मध्ये 'बॉम्बे पोस्टल युनियन' ही संघटना स्थापन करण्यात आली. राजकीय क्षेत्रात बंगालच्या फाळणीप्रमाणे देशव्यापी परिणाम करणारी दुसरी घटना म्हणजे १९०८ मध्ये लोकमान्य टिळकांना झालेली अटक होय. कामगार वर्ग पेटून उठला. महाराष्ट्राच्या व राष्ट्राच्या अस्मितेचा हुंकार सर्वत्र जाणवला. टिळकांना झालेली ६ वर्षाची शिक्षा संपूर्ण देशात कामगारांना अस्वस्थ करणारी ठरली. देशव्यापी संपात महाराष्ट्राने ६ दिवस संप करून आपला वाटा नोंदवला. १९०८ मध्ये श्री. स्मिथ यांच्या अध्यक्षतेखाली कामगारांचे प्रश्न समजून ते सोडवून त्यांना शांत ठेवण्यासाठी कमिशन नियुक्त झाले. सर्व परिस्थिती अभ्यासून कमिशनने अहवाल सादर केला. विसाव्या शतकाचे पहिले दशक संपण्यापूर्वीच १९१० मध्ये (१) 'कामगार हितवर्धक सभा', मुंबई आणि (२) 'सोशल सर्व्हिस लीग'ची स्थापना होऊन या चळवळीला गती आली.

### (आ) दुसरे दशक

स्मिथ कमिशनने आपला अहवाल सरकारला सादर केला. त्यावर विचार होऊन १९११ चा फॅक्टरी ॲक्ट तयार झाला. त्यातील प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे -

(१) वर्षातून ४ महिन्यांपेक्षा कमी काळ चालणाऱ्या कारखान्यांनाही कायदा लागू असेल.

(२) कामगारांना वयाचा दाखला अनिवार्य असेल.

(३) कापड गिरणीत मुलांना ६ तास काम द्यावे.

(४) स्त्रियांना रात्री काम देऊ नये.

(५) पुरुषांसाठी कापड गिरणीत १२ तास काम असेल. वेळ पहाटे ५ ते सायंकाळी ७ दरम्यान असेल. शिफ्टसाठी हा नियम नसेल.

(६) अपघात, स्वच्छता, उजेड यांविषयीचे नियम कारखान्यांना लागू असतील.

जागतिक रंगमंचावर पहिले महायुद्ध पेटले. याच दरम्यान रशियन राज्यक्रांतीने कार्ल मार्क्सची साम्यवादी घोषणा 'जगातील कामगारांनो एक व्हा !' प्रभावित केले. अनुसूयाबेन यांनी अहमदाबाद येथे गांधीजींच्या मार्गदर्शनात कामगारांचा एक संघ बनवला. १९१८ मध्ये पी. बी. वाडियांनी 'मद्रास लेबर युनियन' बनवली. राष्ट्रीय स्तरावरही कामगार चळवळ गती घेऊ लागली. १९२० साली 'All India Trade Union Corporation' स्थापन झाली. यासाठी अध्यक्ष म्हणून लाला लजपतराय यांचे नेतृत्व लाभले.

हा काळ राजकीय धामधुमीचा होता. स्वातंत्र्यसंग्राम उग्र बनत होता. स्वाभाविकच लढाऊ कामगार चळवळीला पाठिंबा मिळाला. कामगार चळवळीतील इतर विचार मागे पडू लागले. कामगार संघटनांनी राजकारणात भाग घेऊ नये असा सूर होता. पण परकीय जुलमी सत्तेच्या कारभारामुळे हा विचार मागे पडला. ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस स्थापन झाली तेव्हाचा काळ राष्ट्रीय धामधुमीचा होता. जालियनवाला बाग हत्याकांड, देशाला चिंतेत टाकणारी घटना होय. खिलाफत चळवळ, होमरूल चळवळ, मोपल्याचे बंड, ब्रिटिश युवराजाच्या भेटीवर टाकलेला बहिष्कार, इत्यादी घटना घडल्या. यामुळे या परिणामांचे एकदाच मिश्रण झाले. या घटनांनी परस्पर प्रभावित केले. क्रांतिकारक चळवळ वाढत होती. संपांना राजकीय स्वरूप येऊ लागले. युवराजाच्या भारत भेटीवर बहिष्कार म्हणून एन. डब्ल्यू. रेल्वेच्या कामगारांनी संप केला. काँग्रेसच्या बहिष्काराच्या व असहकाराच्या चळवळीला पाठिंबा देणारे व दडपशाहीचा निषेध करणारे संपही कामगारांनी केले. जगभर साम्राज्यशाहीचा व भांडवलशाहीचा धिक्कार करणाऱ्या घोषणा कामगार देत होते.

महात्मा गांधी कामगार चळवळीत राजकारण आणू नये या मताचे होते. लाला लजपतराय यांसारखे पुढारी 'संघटित कामगार हाच भांडवलीशाही व साम्राज्यशाहीवर उतारा आहे' असे मानत. मात्र सी. आर. दास म्हणत, 'राष्ट्रीय चळवळीत व कामगारांच्या चळवळीत झगडा येण्याचे कारण नाही. स्वराज्य जनतेसाठी आहे.'

## (इ) तिसरे दशक

१९२१ मध्ये ना. म. जोशी यांनी कामगार संघांना कायदेशीर मान्यता मिळवून देण्याच्या संदर्भात एक विधेयक मांडले. पण ते समंत होऊ शकले नाही. देशात विविध संघटनांना एकत्र आणण्याची गरज निर्माण झाली आणि 'अखिल भारतीय ट्रेड युनियन' चा जन्म झाला. १९२२ मध्ये सर्व प्रांतीय संघटनांना एकत्र आणण्यासाठी फेडरेशन स्थापन झाले. आंतरराष्ट्रीय श्रमसंस्थेत देशाच्या एक संघटनेमुळे सहभाग शक्य झाला.

१९२२ मध्ये 'फॅक्टरी अक्ट' मान्य झाला. या कायद्यामुळे

(१) यांत्रिक शक्ती वापरण्याऱ्या आणि २० पेक्षा जास्त कामगार असणाऱ्या कारखान्यांना हा कायदा लागू करण्यात आला.

(२) प्रांतांना गरज वाटली तर १० पेक्षा जास्त कामगार असणाऱ्या व यांत्रिक शक्ती वापरणाऱ्या कारखान्यांनाही हा कायदा लागू करता येईल.

(३) १२ वर्षांखालील मुलांना कामावर घेऊ नये.

(४) आठवडी ६० व दर दिवशी ११ तास (स्त्री व पुरुषांसाठी) काम असावे.

(५) स्वच्छता, हवा, प्रकाश या तरतुदी निरीक्षणार्थ इन्स्पेक्टर ठेवणे कारखान्याची जबाबदारी असेल.

१९२२ मध्ये रेल्वे कर्मचाऱ्यांनी 'अखिल भारतीय रेल्वे कर्मचारी संघ' स्थापन केला. १९२६ मध्ये कामगार संघटनांना कायदेशीर मान्यता मिळाली. नोंदणी झालेल्या संस्थांची संख्या वाढली. देशात साम्यवादी विचारप्रवाह प्रभाव वाढत होता. १९२६ पासून साम्यवाद्यांनी कामगार संघटनांवर आपली पकड निर्माण करण्याचा प्रयत्न चालू केला. त्यापूर्वी काँग्रेसची पकड जास्त प्रभावी होती. १९२७ मध्ये मुंबईत वेगळ्या 'गिरणी कामगार संघाची' स्थापना झाली. यातील सभासद संख्या ५४,००० झाली. १९२८ मध्ये श्रीपाद अमृत डांगे गिरणी कामगार युनियनचे काम करीत होते. भास्करराव जाधवांना मुंबईत डांगेचे (एक ब्राह्मण) नेतृत्व नको होते. काही काळ जवळकर दिनकररावांनी डांगेंना विरोध केला. १९२८ चा संप मुंबईत सहा महिने टिकला. १९२९ मध्ये कम्युनिस्टांनी नागपूर अधिवेशनात दोन ठराव संमत करून घेतले. एक रॉयल कमिशनवर बहिष्कार व दुसरा म्हणजे मास्कोमधील तिसरी आंतरराष्ट्रीय संलग्नता होय. या सोबत ट्रेड युनियनवर साम्यवादी प्रभाव वाढला. परिणामी कम्युनिस्टेतर पुढाऱ्यांनी (जोशी, गिरी, बखले, दिवाण चिमणलाल, दिवाण, शिवराव) 'नॅशनल ट्रेड युनियन फेडरेशन' ची स्थापना झाली. दोन्ही संघटनांत तीव्र मतभेद निर्माण झाले. त्यामुळे 'ऑल इंडिया रेड ट्रेड युनियन काँग्रेस' ही डाव्या पक्षाची संघटना तर 'नॅशनल ट्रेड युनियन फेडरेशन' अशा दोन संघटना १९२९ मध्ये अस्तित्वात आल्या. मि. व्हिटलेच्या अध्यक्षतेत एक कमिशन भारत मंत्र्याने तयार केले. या लेबर कमिशनने अभ्यास करून शिफारशी केल्या.

## (ई) चौथे दशक (१९४० ते १९४७)

मि. व्हिटले यांच्या कमिशनने दिलेल्या अहवालाच्या आधारे १९३४ चा 'फॅक्टरी ॲक्ट' तयार झाला. या कायद्याने कारखान्यांचे 'कायमचे व हंगामी' असे दोन भाग केले.

पहिल्या दर्जातील कारखान्यांसाठी कामाचे तास १० व आठवडी तास ५४ ठरले. दुसऱ्या (हंगामी) कारखान्यात ११ तास व आठवडी ६० तास हे प्रमाण ठरले. मुलांसाठी ५ तास काम ठरले. १५ ते १७ वयोगट वेगळा करण्यात आला.

कारखान्यांनी प्रौढ कामगारांना सतत १३ तास व मुलांना ७.३० तास काम देऊ नये. मालकांनी कारखान्यात योग्य ते हवामान राखावे, इन्स्पेक्टर ठेवावा. प्रथमोपचाराची व्यवस्था, स्त्रियांसाठी स्वतंत्र खोली, कामगारांसाठी विश्रांतिगृहे कारखाना आणि गिरणी मालकांनी करावीत. अशा विविध बंधनांमुळे सुधारणा अपेक्षित होत्या.

भारतात एकीकडे कामगार सुधारणांचे कायदे हळूहळू सोई उपलब्ध करून कामगार जीवनाचा दर्जा पूर्वीपेक्षा सुधारत होते तर दुसरीकडे देशभर शेतकरी-कामगार संघटनांचे जाळे विणले जावे हा प्रयत्न चालू होता. १९३४ पर्यंत कम्युनिस्ट पक्षाला काँग्रेसच्या मंत्रिमंडळाच्या काळात (१९३७) थोडी सूट मिळाली होती. आता ते बेकायदेशीर ठरल्यामुळे पूर्णतः नेस्तनाबूत करण्याचा प्रयत्न झाला. ही बंदी १९४२ पर्यंत राहिली. दुसऱ्या महायुद्धामुळे काँग्रेसने सत्तात्याग करताच साम्यवाद्यांना धारेवर धरण्यात आले. या काळात मोठ्या संख्येतील कैदी हे साम्यवादी व त्यांचे सहकारी होते. १९३८ मध्ये 'नॅशनल ट्रेड युनियन फेडरेशन' व 'ऑल इंडिया रेड ट्रेड युनियन काँग्रेस' हे 'एआयटीयुसी' मध्ये समाविष्ट झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात सरकारला कामगारांचा पाठिंबा हवा होता म्हणून कामगारांच्या मागण्या मंजूर करण्यासाठी त्यांनी कारखानदारांना भाग पाडले होते.

१९३६ मध्ये भूमिहीन, गरीब कुळे, शेतकरी आणि कामगार यांच्या अडीअडचणी दूर करण्यासाठी स्वतंत्र 'मजूर पक्षाची' स्थापना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली. हा राजकीय पक्ष होता. या पक्षाचा जाहीरनामा त्यांनी प्रसिद्ध केला. 'आधुनिक महाराष्ट्राचे उद्गाते' या ग्रंथात लेखक प्रा. मो. नि. ठोके यांनी हा जाहीरनामा दिला आहे.

'या पक्षामार्फत कामगारांच्या हिताचे कायदे व्हावेत, जनतेत उत्पादन शक्ती व कार्यक्षमता वाढावी म्हणून प्रयत्न केले जातील. नवीन धंदे सुरू करण्यात येतील. ज्या कुळांची मालकाकडून पिळवणूक होते ती पिळवणूक थांबवण्यासाठी प्रयत्न केले जातील. भूमिहीन, मजूर, कामगार, यांच्या हितासाठी हा पक्ष प्रयत्न करणार आहे'. त्यांनी १९३७ मध्ये निवडणुका लढवून मिळवलेल्या १७ जागांवरील उमेदवारांना सहकार्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुंबईतून निवडून आले. शेतकरी, कामगार यांच्या संघटना बांधून व निवडलेल्या १३ उमेदवारांमार्फत विधिमंडळातही त्यांनी प्रभावी काम केले.

१९४२ च्या 'छोडो भारत' प्रसंगी इंग्रजांना कामगारांचे सहकार्य हवे होते. त्यांना 'छोडो भारत' पासून दूर न्यावयाचे होते. गव्हर्नर जनरलने बाबासाहेबांना कार्यकारी मंडळात मजूर मंत्री नेमले. बाबासाहेबांनी महात्मा गांधींच्या 'करेंगे या मरेंगे' या घोषणेचा धिक्कार करून १३ नोव्हेंबर १९४२ रोजी मुंबई आकाशवाणीवर 'भारतीय मजूर पक्ष आणि महायुद्ध' या विषयावर भाषण दिले. त्यात त्यांनी लोकशाही पक्षाचा विजय झाला तर स्वातंत्र्य व नवीन समाजरचना लाभेल. स्वातंत्र्यासोबत योग्य राज्यघटना व समाजरचनासुद्धा यावी. कामगारांनी आपली संपूर्ण शक्ती एकवटून 'छोडो भारत' ही मागणी करण्यापेक्षा नवीन भारताची मागणी करावी. हिंसेला शरण जाऊन मिळवलेली शांतता ही खरी शांतता नव्हे, ती आत्महत्या होय असे वक्तव्य केले. (आधुनिक महाराष्ट्राचे उद्गाते - प्रा. मो. नि. ठोके)

१९४६ मध्ये केशवराव जेधे, भाऊसाहेब राऊत, तुळसीदास जाधव, शंकरराव मोरे यांनी पुढाकार घेऊन काँग्रेस अंतर्गत 'शेतकरी कामगार संघ' स्थापन केला. या संघाच्या कामात क्रांतिसिंह नाना पाटील, दत्ता देशमुख, व्यंकटराव पवार, पी. के. सावंत, रा. भ. नलावडे, यशवंतराव चव्हाण, के. डी. पाटील यांनीही भाग घेतला. खेर मंत्रिमंडळाने ज्याप्रमाणे शेतकरी कामगार संघाची दखल घ्यायला हवी होती; तशी दखल घेतली नाही. पुढे वरील सदस्यांनी काँग्रेस सोडून स्वतंत्र पक्ष उभा करण्याचे ठरवले.

### (उ) स्वातंत्र्योत्तरकालीन संदर्भ

सरदार वल्लभभाई पटेलांच्या प्रेरणेने 'इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस'ची स्थापना झाली. अतिशय कमी काळात या संघटनेने देशभर आपला प्रभाव विस्तारित केला. आंतरराष्ट्रीय संस्थेत प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार 'आयटक' ऐवजी 'इंटक' ने मिळविला.

#### (१) शेतकरी कामगार पक्ष

महाराष्ट्रातील बदलत्या राजकारणाने कलाटणी घेतली १३ जून १९४८ मध्ये यापूर्वी दिलेल्या नेत्यांनी 'शेतकरी कामगार संघ (काँग्रेस अंतर्गत) ऐवजी काँग्रेसपासून वेगळे होऊन 'शेतकरी कामगार पक्ष' (शेकाप)ची स्थापना केली. केशवराव जेधे, शंकरराव मोरे यांनी पक्ष स्थापना घोषित केली. १९४८ मध्ये सोलापूर येथे पहिले अधिवेशन झाले. 'जनसत्ता' हे मुखपत्र १९४९ च्या फेब्रुवारीत सुरू झाले. केशवरावांनी याचा प्रचार, पुणे कोल्हापूर, बेळगाव या भागात केला. नाना पाटील व काकासाहेब वाघ यांनी त्यांना मदत दिली. दाभाडी अधिवेशन होऊन 'दाभाडी प्रबंध' तयार झाला. त्यात पक्षाचे धोरण मांडले आहे. मात्र नवजीवन संघटनेला या पक्षात घ्यावे अथवा नाही यावरून वाद होऊन दत्ता देशमुख व नाना पाटील वेगळे झाले. त्यांनी कामगार-किसान पक्ष बनवला. शेकापचे मराठवाड्यातील नेते नरसिंगराव काटीकर व नंतर भाई उध्ववराव पाटील यांनी समर्थपणे वीसाव्या शतकाच्या दशकापर्यंत चालू ठेवले. कामगारांसाठी त्यांनी केलेले कार्य महाराष्ट्रस्तरावर आठवणीत ठेवण्यासारखे आहे. एन. डी. पाटील, घोडके, खपले, धोंडगे यांची नावेही या पक्ष कार्यात उल्लेखनीय आहेत.

#### (२) १९४८ चा राज्य कामगार विमा कायदा

जम्मू काश्मीर वगळता भारतभर हा कायदा लागू झाला. ४०० रुपये दरमहा पगारापर्यंतची मिळकत असणाऱ्यांना याचा फायदा मिळणार होता. दुखापत, बाळंतपण, आजारपण यामुळे कामास असमर्थ असणाऱ्यांना वैद्यकीय फायदे (अवलंबिताना) व इतर असे पाच फायदे मिळतील. कामगाराने फायदा घेताना मजुरीच्या प्रमाणात विशिष्ट दराप्रमाणे रक्कम भरावी. योजना

व्यवस्थापन एका विमा कार्पोरेशनकडे असेल. केंद्रीय मजूर मंत्री कार्पोरेशनचे पदसिद्ध अध्यक्ष मानले जातील. तसेच १२ व्यक्तींचे कार्यकारी मंडळ अंमलबजावणीसाठी नेमले जाईल. कामगारांना स्वातंत्र्योत्तर काळात पूर्वीपेक्षा सुरक्षित जीवन लाभावे असा प्रयत्न या कायद्याने झाला.

**(३) इतर काही संदर्भ**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या समाजवाद्यांनी 'हिंद मजदूर पंचायत' ही कामगार संघटना बनवली. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या 'इंडियन फेडरेशन ऑफ लेबर' चे यात विलीनीकरण झाले. 'आयटक' व 'हिंद मजदूर सभा' यातून बाहेर पडलेल्यांनी 'युनायटेड ट्रेड युनियन काँग्रेस' या संघटनेची बांधणी केली. जनसंघवादी लोकांनी १९५५ मध्ये 'भारतीय मजदूर संघ' बनवला. भारतीय पातळीवर कामगार हितासाठी भारतीय मजदूर संघ, हिंद मजदूर सभा, आयटक, इंटक, इत्यादी संघटना होत्या. या सर्व प्रमुख संघटनांची शाखा कार्यालये महाराष्ट्रात कामगारांच्या संघटनांचे काम करून महत्त्वाची कामगिरी करीत आहेत. १९९३-९४ पर्यंतची आकडेवारी पाहता शेती, जंगल, मत्स्य, खाण, उत्पादन, बांधकाम, वाहतूक, वीज, गॅस, पाणी, उद्योग, सिंचन, साखर कारखाने, एस.टी. व इतर क्षेत्रांत कामगारांचे संघ आहेत. महाराष्ट्रात ३६४९ नोंदणीकृत कामगार संघटना असून ३९,८१,००० एवढे कामगार त्यांचे सदस्य आहेत. नोंदणी नसलेल्याही अनेक संघटना आहेत. त्यातूनही हजारोंना एकत्र आणले जात आहे. मुंबई, पुणे, नागपूर, सोलापूर, अहमदनगर, औरंगाबाद, नाशिक, इत्यादी मोठ्या शहरांतून कामगार चळवळींची केंद्रे प्रभावी आहेत. औद्योगिक क्षेत्र विकासासोबत कामगार संघटनांचा जन्म अनिवार्य घटक आहे.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न – ५*

**पुढील विधानांत गाळलेल्या जागी योग्य शब्द भरा.**

(०१) इ.स. ------- मध्ये 'बॉम्बे पोस्टल युनियन' ही संघटना जन्मली.

(०२) इ.स. १९०८ मध्ये ------- अटक झाल्यावर कामगारांनी संप केला.

(०३) 'कामगार हितवर्धक सभा' व 'सोशल सर्व्हिस लीगची स्थापना ------- मध्ये झाली.

(०४) १९११ चा 'फॅक्टरी ॲक्ट' ------- पेक्षा कमी काळ चालणाऱ्या कारखान्यांनाही लागू झाला.

(०५) ------- साली 'ऑल इंडिया ट्रेड युनियन कार्पोरेशन' स्थापन झाली.

(०६) इ.स. १९२२ मध्ये 'अखिल भारतीय ------- संघ' स्थापन झाला.

(०७) ------- मध्ये कामगार संघटनांना कायदेशीर मान्यता मिळाली.

(०८) इ.स. १९२७ मध्ये 'गिरणी ------- संघ' स्थापन झाला.

(०९) 'अखिल भारतीय ट्रेड युनियन काँग्रेस' ही ------- पक्षाची संघटना होती.

(१०) इ.स. ------- मध्ये मजूर पक्ष स्थापन झाला.

(११) 'शेतकरी कामगार पक्षाची' स्थापना इ.स. ------- मध्ये झाली.

(१२) इ.स. १९४८ मध्ये 'राज्य कामगार -------' असून कायदा लागू झाला.

## ३.२.७ कामगार चळवळ व औद्योगिक अशांतता

औद्योगिक प्रगतीत महाराष्ट्र इतर प्रांतांच्या तुलनेत बराच अग्रेसर आहे. त्यामुळे विस्तारित औद्योगिक क्षेत्र व प्रचंड कामगार संख्या यामुळे बरीच अशांतता दिसून येते. कारण आज कामगार संघटना जी माध्यमे व मार्ग हाताळत आहेत. त्यामुळे बरेच प्रश्न उत्पन्न झाले आहेत. संप, टाळेबंदी, नियमानुसार काम, घेराव, आर्थिक मंदीचा तडाखा, कामगार संघटनांचे आपसांतील संघर्ष, इत्यादी कारणांमुळे श्रम, दिवस वाया जातात. उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होतो. महाराष्ट्राचे व देशाचे आर्थिक नुकसान होते. भारताची औद्योगिक राजधानी मुंबई येथे देशात काही घडले की त्याचे परिणाम उमटतात. बँका, रेल्वे, आयुर्विमा, बंदर कामगार, रसायन उद्योग, अभियांत्रिकी कारखानदारी व उत्पादन घटक, इत्यादींमुळे तसेच शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी, डॉक्टर्स, प्रशासकीय कर्मचारी, इत्यादींच्या संघटनाही येथे आहेत.

| *बाब / संदर्भ* | *१९७१* | *१९८१* | *१९९४* | *२००२* |
|---|---|---|---|---|
| १. संप टाळेबंदीची संख्या | ६९० | ६३६ | १५६ | ४३ |
| २. भाग घेतलेल्या कामगारांची संख्या (हजारांमध्ये) | ४५० | २०० | ०८९ | ०८ |
| ३. वाया गेलेले श्रमदिवस (हजारांमध्ये) | २,०५२ | ९,५०५ | ३,६८६ | ४,९७८ |

(संदर्भ : मआप १९९३-९४ पृ. १३४)

१९८२ मध्ये कापड गिरणी कामगारांचा (मुंबई) संप दीर्घ काळ चालला. सर्वसाधारणपणे महाराष्ट्रातील औद्योगिक कामगारांत निरुत्साह व असमाधान वाढले. एकूण उत्पादन, त्यावरील कर, यांचे नुकसान, मुंबईत पसरलेली मंदीची छाया, इत्यादी परिणाम दिसून आले. सरकारने उत्तर शोधून १३ गिरण्यांचे राष्ट्रीयीकरण केले. त्यांच्या आधुनिकीकरणावर १४० कोटी खर्च मान्य केला. त्यांचे व्यवस्थापन हळूहळू कामगार प्रतिनिधींकडे देण्याचेही ठरले. १९८५ पासून नवे वस्त्रोद्योग धोरण लागू केले. कृत्रिम धाग्यावर भर, आधुनिकीकरण, स्वयंचलीकरणावर भर दिला म्हणून परंपरागत सुती उद्योगाला धक्का बसला. संगणकीकरण, स्वयंचलीकरण या आधुनिक स्वरूपामुळे खाजगी क्षेत्रातील नोकरभरती ठप्प होऊन बेकारी वाढत आहे.

### (अ) कामगार कल्याण

आय.टी.आय.मार्फत ५० व्यवसायांचे प्रशिक्षण दिले जाते. संघटित क्षेत्रांत १२ लाख व असंघटित तसेच व्यापार उद्योगात १ कोटी २१ लाख कामगार आहेत. चार हजार संघटना असून त्यात ३५ लाख सभासद आहेत. कामगार सुरक्षितता, तंटे सोडवणे, तोडगे शोधणे, कौशल्य विकास, बंद गिरण्या, उद्योग सुरू करणे व बेकारी टाळणे असे प्रयत्न चालू आहेत. कामगारांना न्याय मिळावा म्हणून 'लेबर कोर्ट' कार्यरत आहेत.

### (आ) महाराष्ट्रातील कामगार चळवळींतील अडसर

कामगार चळवळ हवी तेवढी प्रभावी झाली नाही. 'भारतीय प्रबोधन' ग्रंथातील 'भारतीय कामगार चळवळीचे अर्धशतक' या लेखात गो. द. साने लिहितात - 'स्वातंत्र्य संग्रामात लढाऊ कामगार चळवळीने प्रमुख स्थान न मिळविल्यामुळे भारत स्वतंत्र झाला तेव्हा सत्तेच्या दरबारात संघटित कामगारांना प्रमुख स्थान तर मिळालेच नाही पण मागची जागाही मिळाली नाही'.

कामगार चळवळीला फुटीचा अभिशाप आहे. यात महाराष्ट्रात जातीय संघटनांचा प्रभावही उमटला आहे. अशिक्षितपणा, अज्ञान, उदासीनता यामुळे ही चळवळ प्रभावी झाली नाही. कामगार त्वरित होणारा कायदा बघतात. दीर्घ कालीन दृष्टी ठेवत नाही. यामुळेच त्यांना एकत्र आणणे, संघटित करणे अवघड असते. फायदा मिळेपर्यंत संघटनेकडे येतात. फायदा नाही असे वाटताच संघटनेपासून दूर जातात. शेतमजूर नगद वेतनासाठी शहरातील कामगार होऊ पाहत आहेत. काही काळ शेतीत, काही काळ कारखान्यात कामाला जातात. ते स्वत:चा स्वार्थ पाहतात. संघटनेचे नियम पाळत नाहीत. साखर कारखाने हंगामी काम देतात. स्थलांतर चालूच राहते, दारिद्र्य संपतच नाही. महात्मा फुले यांनी कामगारांचा आपापसांतील बेबनाव, व्यसनाधिनता, याचा प्रखर विरोध त्यांच्या काळात केला होता. संघटनांचे वेगळे अस्तित्व व स्पर्धा, उद्योगपतींची प्रतिकूल धोरणे, शासनाची उदासिनता, संघटनेबाहेरील नेतृत्व यामुळे ही चळवळ दुबळी राहिली. कामगारांच्या वस्तीत निवासाच्या जागी आवश्यक सोयी नसणे, जागा उपलब्ध नसणे, कायदेशीरपणे, मालकांनी सोयी न पुरवणे यामुळेही त्यांची स्थिती हलाखाची दिसते. या शिवाय संघटनेचे रचनात्मक कार्याकडे दुर्लक्ष, कामगार संघांची अपुरी सदस्य संख्या, अल्प उत्पन्न, एकाच उद्योगात अनेक कामगार संघ असणे, परस्परवैमनस्य, सौदा शक्तीची कमतरता यामुळेही या चळवळीला दुबळे केले आहे.

### (इ) कामगार चळवळ प्रखर करण्यासाठी काही उपाययोजना

नवे नेतृत्व उभे करणे, राजकीय प्रभावापासून संघटना मुक्त ठेवणे, उद्योगनिहाय एकच संघ ठेवणे, विधायक कामावर भर देणे हे कामगार चळवळ प्रभावी करण्यासाठी काही उपाय सांगता येतील. कामगार नेत्यांनी कामगार शिक्षण, आरोग्य, स्त्री कामगारांचे वेगळे प्रश्न जसे प्रसूती रजा, बोनस, दैनंदिन कामाचे नियम, बाल श्रमिकांवर आळा, याकडे अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. योग्य वेतन, निश्चित कालावधीत वेतनाची प्राप्ती, विशिष्ट प्रसंगी फायदे मिळवून देणे यांकडे लक्ष पुरवले पाहिजे. कामगार चळवळींची सामुदायिक शक्ती वाढवली पाहिजे. कामगार संघटनांमध्ये गुंडगिरीचा समावेश थांबला पाहिजे. आर्थिक संस्था, संघटनात्मक बांधणीवर भर देणे आवश्यक आहे. कायद्याचा वापर व्हावा. उत्पादनाच्या व्यवस्थापनात कामगारांना सहभाग मिळावा. उद्योगपती-कामगार-शासन यांच्यात सौहार्दपूर्ण संबंध असावेत. या चळवळीला विधायक व नैतिक अधिष्ठान मिळाले तर ही चळवळ कामगारांचे व महाराष्ट्राचे फार मोठे हित साधू शकेल यात शंका नाही.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ६*

**पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगून कंसात (X) किंवा (✓) अशी खूण करा.**

(०१) इ.स. १९८२ मध्ये सरकारने १३ गिरण्यांचे राष्ट्रीयीकरण घोषित केले.

(०२) इ.स. १९८५ पासून नवे वस्त्रोद्योग धोरण लागू केले.

(०३) कामगारांना न्याय देण्यासाठी लेबर कोर्ट नसते.

(०४) कामगार चळवळीला फुटीचा अभिशाप आहे.

(०५) अशिक्षितपणा, अज्ञान, उदासीनता हे दोष महाराष्ट्रातील कामगारांत नाहीत.

(०६) संप, टाळेबंदी यांमुळे उत्पादनावर कोणताही विपरीत परिणाम होत नाही.

(०७) कामगार संघटनांनी कोणत्या तरी राजकीय पक्षाला बांधून घेणे, पक्षाशी संलग्न राहणे आवश्यक आहे.

(०८) कामगार, संघटनेशी बांधिलकी, संघटना आदेशांशी एकनिष्ठता बाळगत नाही.

(०९) प्रत्येक उद्योगात एकापेक्षा जास्त संघटना असणे केव्हाही फायदेशीरच असते.

(१०) स्त्री कामगारांना कोणत्याही समस्या भेडसावत नसल्याने स्त्री कामगारांच्या संघटना नसतात.

## ३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

**कामगार चळवळी :** उद्योगधंद्यांत काम करणाऱ्या विविध कुशल-अकुशल कामगारांच्या जीवनाचे अंतर्गत व बाह्य प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करणारी चळवळ.

**ऑल इंडिया युनियन :** अखिल भारतीय स्तरावर व्यापार क्षेत्रातील कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी १९२० मध्ये स्थापन झालेली संघटना.

**फॅक्टरी ॲक्ट** : मुंबईत व इतरत्र कापड गिरण्या सुरू होऊन विकास सुरू झाला. मँचेस्टर कापड गिरण्यांवर (इंग्लंडमध्ये) याचा वाईट परिणाम झाला म्हणून ब्रिटिशांनी मुंबई औद्योगिक विकास रोखण्यासाठी, कामगार प्रश्नासाठी हा कायदा १८९२ मध्ये मान्य केला. यानंतर अनेक वेळा फॅक्टरी ॲक्ट झाले.

**बॉम्बे पोस्टल युनियन :** पोस्ट खात्यातील कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी १९०७ मध्ये उभी झालेली संघटना.

**ऑल इंडिया ट्रेड युनियन कार्पोरेशन :** अखिल भारतीय कामगार चळवळीला गती देण्यासाठी १९२० मध्ये स्थापन झालेली संघटना.

**ऑल इंडिया ट्रेड युनियन कॉंग्रेस :** कम्युनिस्ट व कम्युनिस्टेतर यांच्या वैचारिक संघर्षामळे ही डाव्या पक्षाची संघटना बनली.

**नॅशनल ट्रेड फेडरेशन :** कम्युनिस्टेतरांची कामगार संघटना.

**शेतकरी कामगार पक्ष (शेकाप) :** शेतकरी व कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी १९४८ मध्ये महाराष्ट्रात हा राजकीय पक्ष स्थापन झाला.

## ३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - १*

(१) (✓), (२) (✓), (३) (✓), (४) (X), (५) (✓), (६) (✓), (७) (X).

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - २*

(१) (✓), (३) (✓), (३) (X), (४) (✓), (५) (✓), (६) (X).

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ३*

(१) मानवी, (२) श्रम, (३) कमी, (४) भिन्न, (५) अकुशल, (६) अंतर्गत, (७) बहिर्गत.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ४*

(१) (✓), (२) (X), (३) (✓), (४) (X), (५) (✓), (६) (✓), (७) (✓).

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ५*

(१) १९०७, (२) लोकमान्य टिळक (३) १९१०, (४) चार महिने, (५) १९२०, (६) रेल्वे कामगार, (७) १९२६, (८) कामगार (९) डाव्या, (१०) १९३६, (११) १९४८, (१२) विमा.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ६*

(१) (✓), (२) (✓), (३) (X), (४) (✓), (५) (X), (६) (X), (७) (X), (८) (✓), (९) (X), (१०) (X).

## ३.५ सारांश

प्रगती सोबत समस्यांचीही निर्मिती होत असते. औद्योगिक विकास व आधुनिकीकरणामुळे भांडवलदार वर्ग निर्माण झाला. या वर्गाने जास्त नफा मिळवला, कमाई केली. मात्र त्यासाठी नवे तंत्र, यंत्र व मानवी श्रम वापरले. कुशल-अकुशल कामगार हे औद्योगिक विकासासाठी खरे आधारभूत घटक आहेत. कामगार कष्ट करतो, काम करतो पण त्याचेच शोषण होते. कामगारांचे श्रम चोरले जातात. कामगारांना उत्पादन प्रक्रियेत व्यवस्थापनाने सहभागी करून घेतले नाही. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकांपासूनचे हे चित्र वीसाव्या शतकात स्वातंत्र्यपूर्व काळात राहिले. स्वातंत्र्योत्तर काळात त्याला गती आली व त्यात कामगार संघटनांचा प्रभाव वाढू लागला.

मुंबई हे महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील महत्त्वाचे औद्योगिक केंद्र बनले. कामगारांचे प्रश्न वाढले. १८९२ च्या फॅक्टरी ॲक्टमागे मँचेस्टरला मुंबईच्या कापड गिरण्यांचा धोका कमी करण्याचा जरी हेतू असला तरी त्यासोबत कामगारांसाठीही काही बाबींचा विचार आला. या कामात नारायण मेघाजी लोखंडे यांचे नेतृत्व व कमिशनसमोर दिलेली साक्ष महत्त्वाची होय. लोखंडेंनी कामगारांचे व उद्योग व्यवसायातील स्त्री व बालकांचे प्रश्न सतत मांडले. कामगारांचे हित करण्यासाठी प्रयत्न केले.

मुंबईत कामगारांच्या संघटना निर्माण झाल्या. संपूर्ण देशात हा विकास झाला. राष्ट्रीय स्तराच्या संघटनांचे जाळे महाराष्ट्रात निर्माण झाले. शेतकरी कामगार पक्ष, कम्युनिस्ट पक्ष यांनीही कामगार प्रश्नांकडे लक्ष दिले. कॉंग्रेस, जनसंघ, इत्यादींनी आपापले कामगार संघ तयार केले. संप, मोर्चे, हरताळ या माध्यमांतून पहिल्या महायुद्धापासून गतीने काम झाले. जागतिक कामगारांना एक करण्याची कार्ल मार्क्सची भूमिका प्रभावी झाली. बॅरिस्टर लाला लजपतराय, ना. म. जोशी, स्वामी रामानंद तीर्थ, इत्यादींनी कामगारांना नेतृत्व दिले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या क्षेत्रात अधिक परिवर्तने झाली. परंतु अद्यापही कामगार संघटनांना फूट, अज्ञान, अशिक्षितपणा, कुशलतेचा अभाव, संघटनांच्या प्रती उद्योगपतींची उदासीनता, निस्वार्थ राजकीय नेतृत्वाचा अभाव, इत्यादी समस्या भेडसावतात. या समस्यांवर मात करण्यासाठी कामगार नेतृत्वाने खंबीरता बाळगणे, संघटना सदस्य व बळ (एकी) वाढवणे आणि कामगार मूलगामी चळवळीची प्रगती करणे आवश्यक आहे.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

**पुढील प्रश्नांची १५ ते २० ओळींत उत्तरे लिहा.**

(०१) नारायण मेघाजी लोखंडे यांचे कामगार चळवळीतील योगदान विशद करा.

(०२) वीसाव्या शतकातील कामगार चळवळींची माहिती लिहा.

(०३) कामगार चळवळी सुरू होण्याची कारणे विशद करा.

(०४) कामगार चळवळींची उद्दिष्टे स्पष्ट करा.

(०५) महाराष्ट्रातील कामगार चळवळींचा प्रारंभ कसा झाला ते स्पष्ट करा.

(०६) 'कामगार कल्याण' म्हणजे काय ? त्याचे महत्त्व लिहा.

(०७) १८९२ चा फॅक्टरी ॲक्ट स्पष्ट करा.

(०८) कामगार चळवळींतील संघटनांविषयी माहिती लिहा.

(०९) कामगार चळवळींतील अडसर स्पष्ट करा.

(१०) कामगार चळवळींच्या समस्यांवर उपाययोजना स्पष्ट करा.

## ३.७ क्षेत्रीय कार्य

(१) तुमच्या परिसरातील उद्योग-व्यवसायांची नोंद करा.

(२) परिसरातील एखाद्या साखर कारखान्यातील दहा कामगारांच्या मुलाखती घेऊन प्रश्नांची यादी करा.

## ३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

(१) महात्मा फुले, *शेतकऱ्यांचा आसूड.*

(२) बेडेकर/भणगे, *भारतीय प्रबोधन.*

(३) कदम मनोहर, *नारायण मेघाजी लोखंडे यांचे चरित्र.*

(४) प्रो. चक्रवर्ती दिनेश, *नारायण मेघाजी लोखंडे यांचे चरित्र.*

# घटक ४ : सांस्कृतिक परिवर्तने

### अनुक्रमणिका


४.० उद्दिष्टे
४.१ प्रास्ताविक
४.२ विषय-विवेचन
 ४.२.१ सांस्कृतिक अभ्यास : घटक
 ४.२.२ इतिहास पुरातत्त्व
 ४.२.३ मराठी साहित्य संशोधन
 ४.२.४ कला : अर्थ, वर्गीकरण, माध्यमे
४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
४.५ सारांश
४.६ सरावासाठी स्वाध्याय
४.७ क्षेत्रीय कार्य
४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ४.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

★ सांस्कृतिक अभ्यासात कोणकोणत्या घटकांचा समावेश होतो ते सांगता येईल.

★ महाराष्ट्रात सांस्कृतिक पुनरुत्थानाच्या आरंभिक काळात झालेला साहित्य विकास स्पष्ट करता येईल.

★ प्राच्य विद्या संशोधने वं लेखनांचा विकास स्पष्ट करता येईल.

★ महाराष्ट्रात पुरातत्त्व क्षेत्रात झालेल्या प्रयत्नांचे व प्रगतीचे स्पष्टीकरण करता येईल.

★ मराठी भाषेतील लेखन व संशोधनात झालेली प्रगती स्पष्ट करता येईल.

★ मराठीतील विचारप्रधान साहित्यात जसे निबंध, वृत्तपत्रे, नियतकालिके, आदी क्षेत्रांत झालेले लेखन स्पष्ट करता येईल.

★ कलेच्या क्षेत्रात जसे साहित्य, संगीत, कला, नाट्यकला, नृत्य व शिल्प कला, आदी क्षेत्रांत महत्त्वपूर्ण कार्य केलेल्या व्यक्तींविषयी व त्यांच्या योगदानाविषयी माहिती देता येईल.

## ४.१ प्रास्ताविक

प्राचीन काळापासून महाराष्ट्राला संपन्न व सांस्कृतिक परंपरा लाभली आहे. मध्यकाळात ही परंपरा अक्षुण्ण राहिली. तसेच सध्या संस्कृतीच्या विविध अंगांना वेगवेगळ्या परिवर्तित रूपातून बहर आला आहे. यापूर्वी आपण आधुनिक महाराष्ट्रातील धार्मिक प्रबोधन, सामाजिक सुधारणा स्वरूपातील बदल, कामगारांच्या विविध चळवळी व त्यांच्या जीवनातील बदल यांचा आढावा घेतला. या घटकात आपण भारतीय संस्कृतीचा एक घटक म्हणून महाराष्ट्रीय संस्कृती व सांस्कृतिक परिवर्तने अभ्यासणार आहोत.

संस्कृतीची दोन रूपे असतात. एक आंतरिक तर दुसरे बाह्य. आंतरिक रूपामुळे मानवी मनावर व आत्म्यावर विशिष्ट संस्कार होतात. ते दीर्घ काळ टिकतात. हे संस्कार प्रत्यक्षदर्शनी दिसत नाहीत पण हा सांस्कृतिक ठेवा थोड्याफार फरकाने अमर असतो. म्हणून हे संस्कार मनावर खोलवर रुजतात. बाह्य संस्कृती हे असे संस्कृतीचे रूप होय. जे मूर्त व बाह्य व्यवहारातून प्रगट होते. या स्वरूपात होणारे बदल हे भौतिक व दर्शनी स्वरूपाचे असतात. हे बदल आपणांस दिसतात व जाणवतात. या दृष्टीने विचार केला तर राहणे, बसणे, वागणे (आचार) यांतून हे बदल दिसतात. किंबहुना असे म्हणता येईल की आचार, विचार, उच्चार यांतून मानवाची संस्कृती प्रगट होते.

'भारतीय संस्कृती' हे एक नामविधान आहे. ज्यातून संमिश्र पण एकाकार संस्कृती प्रदर्शित होते. तिची अनेक रूपे आहेत. विविध प्रांतांतून असलेल्या वलयांच्या वाटचालीतून तिच्या बहुरंगी छटा उमटतात. त्यामधून बहुरंगी वीण असलेली भारतीय संस्कृती प्रगट होते. महाराष्ट्रातील सांस्कृतिक वलयांची जोपासना ही इथल्या भूमीने, लोकांनी आणि विशिष्ट परिस्थितीने विशिष्ट प्रकारे केलेली आहे. इतर प्रांतांच्या वलयांप्रमाणे ती जरी वाटत असली तरी तिचे महाराष्ट्रीय स्वरूप स्वतंत्र असलेले, तिची जडणघडण निराळी असलेली जाणवते. आज तिला जे स्वरूप प्राप्त झाले आहे ते अनेक परिवर्तनांतून स्थिरावलेले आहे. ती ज्या घटकांतून टिकून आहे त्या घटकांचा व परिवर्तनांचा अभ्यास आपण येथे करणार आहोत.

## ४.२ विषय-विवेचन

### ४.२.१ सांस्कृतिक अभ्यास : घटक

मानवाच्या संस्कृतीचा अभ्यास करताना त्याच्या विविध सांस्कृतिक आविष्कारांचा अभ्यास अपेक्षित असतो. यात त्याची भाषा, वाङ्मय, लोकसाहित्य, ललित कला, ललित साहित्य, कलेचे तात्त्विक व प्रगट रूप, शिल्प, संगीत, नाट्य, नृत्य, चित्रकला, चित्रपट, इत्यादींचा अभ्यास केला जातो. या सर्वांची अनेक रूपे व छटा यांचा विचार करताना त्यात कालसापेक्ष परिवर्तने येतात त्यांचाही विचार करावा लागतो. आपण या घटकात पुढील मुद्द्यांना अनुलक्षून माहिती घेणार आहोत.

**सांस्कृतिक अभ्यास घटक**

- साहित्य
  - संशोधन
    - पुराणवस्तू, इतिहास,
    - विविध शास्त्रे व विषय
    - मराठी साहित्य
  - ललित साहित्य
    - काव्य
    - कादंबरी
    - विनोदी वाङ्मय
    - दलित साहित्य
    - लघुनिबंध
    - विचारप्रधान साहित्य
    - निबंध ग्रंथ
    - वृत्तपत्रे
    - नियतकालिके
    - समीक्षा
    - आत्मचरित्रे
    - चरित्रे
- कला
  - संगीत (शास्त्रीय)
    - लोकसंगीत व लोककला (वासुदेव, गोंधळी, जागरण, भुत्या, भराडी, वाघ्या-मुरळी, इत्यादी.)
    - नाट्यसंगीत
    - सिनेसंगीत
    - वाद्यसंगीत
    - नाटक
    - चित्रपट
    - नृत्य
    - चित्रकला
- वास्तुशिल्प, स्थापत्य

आता आपण यांपैकी प्रत्येक उपघटकाचा वेगळा विचार करू व त्यांची माहिती घेऊ.

### (अ) साहित्याची निर्मिती

महाराष्ट्रातील आधुनिक काळाच्या विकासाविषयी *रामचंद्र शंकर वाळिंबे* यांच्या मते, 'शेवटच्या बाजीरावाच्या कारकिर्दीतच इंग्रजी विद्यांचे संस्कार येथील बुद्धिमान लोकांवर होऊ लागले. पेशवाईतील शासन पद्धती व ब्रिटिश शासन पद्धती यांतही फार महत्त्वाचा फरक होता. या सर्व गोष्टींच्या प्रभावातून ब्रिटिश अमदानीतील मराठी वाङ्मय निर्माण झाले'. (*महाराष्ट्र जीवन : परंपरा, प्रगती आणि समस्या* - संपादक गं. बा. सरदार)

मुंबई प्रांताचा पहिला गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन यांच्या धोरणामुळे शिक्षण प्रसार, इंग्रजीतील पुस्तकांची मराठीत भाषांतरे व्हावीत, स्वतंत्रपणे पुस्तके निघावीत यासाठी त्याने दरवर्षी खर्च केला. महाराष्ट्रातील बुद्धिमान लोकांनीही भरपूर प्रयत्न केले. त्याने आपल्या धोरणानुसार महाराष्ट्रातील ग्रंथरचनेचा पाया घालून दिला. आधुनिक विचार, दिशा यांतून निर्मित पाश्चात्त्य साहित्याचा नवीन महाराष्ट्रीय साहित्यावर प्रभाव झाला.

### (आ) सांस्कृतिक पुनरुत्थानाच्या आरंभिक काळातील साहित्य विकास

या कालखंडात विविध समाजसुधारक, धर्मसुधारकांनी महाराष्ट्रात सुधारणा, प्रेरणा व प्रबोधनाचे कार्य केले. त्यामागे भारतीय धर्म व संस्कृती सोबत त्यांनी घेतलेले भौतिक विद्यांचे ज्ञान कारणीभूत होते. त्यांनी लोकांना पाश्चात्त्य शिक्षण घेण्याचा आग्रह केला. *लोकमान्य टिळक* म्हणत की, 'तुम्ही ग्रॅज्युएट रामदासी व्हा'. अर्थात, महाराष्ट्रीय वारसा हवा पण नवीन शिक्षणाचे वळणही हवे. पाश्चात्त्यांच्या भौतिक विद्येमुळे इंग्रजी, मराठी, हिंदी या भाषा तसेच रसायनशास्त्र व पदार्थ विज्ञान, जीवशास्त्र, स्थापत्य, वैद्यक, गणित, अर्थशास्त्र, नवीन व्यावसायिक व यंत्राधिष्ठित कौशल्ये, इतिहास, भूगोल, इत्यादी विषयांची नवीन संशोधने व पाश्चात्त्यांकडील माहिती मिळू लागली. ही माहिती प्राचीन व मध्ययुगीन भारतीय विद्या व शिक्षणाच्या विषयांतून नव्हती.

भारतात पाश्चात्त्य व इंग्रजीतील शिक्षण ब्रिटिशांच्या काळात हळूहळू रुजले. ख्रिश्चन मिशनरी लोक धर्मप्रसाराबरोबरच हा विद्याप्रसार करू लागले. हे आपण अभ्यासले आहे. त्यांच्या कार्याच्या प्रेरणेतून त्या वेळच्या नवशिक्षितांनी चिंतन केले. यात बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, चिपळूणकर, आगरकर, महात्मा फुले यांनी शिक्षणाचे दुर्लक्षित दालन पुन्हा उघडले. राष्ट्रीय शिक्षणाची वृत्ती जन्मली. राष्ट्रीय धर्तीची शाळा व महाविद्यालये स्थापन झाली. यात टिळक व आगरकरांनी भरीव काम केले. महर्षी धोंडो केशव कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील, इत्यादींनी प्रभावी कार्य केले. स्त्री-शिक्षण, अस्पृश्यांचे शिक्षण, सर्वांसाठी पाश्चात्त्य शिक्षण, राष्ट्रीय वृत्तीचे शिक्षण यासाठी धडपड झाली. इंग्रज आले तेव्हा महाराष्ट्र मागासलेला होता. इंग्रजीची अनास्था होती. पाश्चात्त्य ज्ञान, विज्ञान, बुद्धिवादी विचारसरणी, वैज्ञानिक दृष्टिकोन व नवे संशोधन महाराष्ट्रात आले ते या पाश्चात्त्य विद्येमुळे.

### (इ) संशोधनाकडे वळण

भारतातील प्राचीन ज्ञान व संशोधने व त्याची अनुभवनिष्ठा मध्यकाळात मागे पडली. भारत जगातील अनेक देशांना धर्म, तत्त्वज्ञान व विविध विषयांचे ज्ञान देणारा देश होता. पण येथील परंपरा खुंटली. ब्रिटिश सत्ता स्थापन झाल्यावर आधुनिक काळात पाश्चात्त्य शिक्षण व संशोधनाचा परिचय झाला. या देशात व महाराष्ट्रात संशोधन जन्मले. गणित, ज्योतिष, पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, वैद्यकीय, जीव-रसायन, भूगर्भशास्त्र, कृषी, स्थापत्यशास्त्र यांमुळे मराठीतून ग्रंथरचना सुरू झाली.

जुने ज्ञान भांडार अपुरे व कालबाह्य ठरले. नवे सिद्धांत, नवे संशोधन, नवीन ज्ञान, नवी दृष्टी यांचे महत्त्व महाराष्ट्रीय संशोधकांना समजले. हळूहळू याकडे लक्ष केंद्रिभूत झाले.

यांत्रिक व नौकानयन क्षेत्रांत प्रथम भरारी घेणारे पहिले शास्त्रज्ञ करशेठजी होत.

सृष्टी विज्ञानाकडे वळून नवीन शोध लावणारे गो. बा. चिपळूणकर होत.

गणिताच्या क्षेत्रात काही गणितज्ज्ञ निपजले. त्यांपैकी टिळक, केरूनाना छत्रे, दीक्षित, व्यं.बा. केतकर, ग. स. महाजनी, वि. वा. नारळीकर, डी. डी. कोसांबी, पा. वा. सुखात्मे, हुजूर बाजार, इत्यादी नावे महत्त्वाची आहेत.

रसायनशास्त्रात जतकर, डी. एस. कुलकर्णी, जी. एस. व्हीलर, देशमुख, डी.डी. सोळंखी, डी. बी. लिमये, व्ही. व्ही. असोलकर, आर. सी. शहा, आर. डी. देसाई, के. वेंकटवरन, जी. व्ही. जाधव, पी. एम. बर्वे, एन. एन. गोडबोले, बी. डी. टिळक, टी. जी. काळे, के. ए. ठकार, सी. आर. तळपदे, इत्यादी.

पदार्थ विज्ञानात शं. ल. गोखले, एन. आर. तावडे, गो. रा. परांजपे, के. आर. दीक्षित, एच. जे. अर्णीकर, मो. वा. चिपळूणकर, आर. के. असुंडी, जी. एस्. गोखले, वि. वि. सोहनी, व्ही. एम. घाटगे, एस. एल. चोरघडे, व्ही. जी. भिडे, पी. बी. देव, बी. बी. देशपांडे, चंद्रशेखर अप्पा, जे. डी. रानडे, एम. बी. नेवगी, पी. के. कट्टी, वाय. जी. नायक, इत्यादी.

वनस्पतिशास्त्रात एस. पी. आघारकर, एस. एल. अजरेकर, एस. बी. काजळे, आर. एस. इनामदार, टी. जी. येवलेकर. या व्यतिरिक्त भूगर्भ, कृषी, स्थापत्य, पुरातत्त्व इतिहास, इत्यादी विषयांतही भरपूर नावे देता येतील. (*महाराष्ट्र संस्कृती* - पु. ग. सहस्रबुद्धे) काही शास्त्रज्ञ व विद्वानांना विशेष कीर्ती लाभली. त्यांपैकी जोशी श्रीधर सर्वोत्तम होत. यांनी आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवली. त्यांनी विद्युत भट्टी तयार केली. गोडबोले नृसिंह नारायण यांनी दूध, तूप, अंडी विषयांवर नवे सिद्धांत मांडले.

तळपदे शिवराज बापूजी यांनी वेदाध्ययन करून वैदिक पद्धतीने विमान (मरुत्सखा) १८९५ मध्ये बनवून उडवून दाखविले. त्या कार्यक्रमात न्या. रानडे, भिसे शंकर आबाजी हे महाराष्ट्रातील यंत्रविद्या तज्ज्ञ होते. आघारकर शंकर पांडुरंग हे वनस्पती शास्त्रज्ञ होत. जयंत नारळीकर जगविख्यात गणितज्ञ, खगोल, पदार्थ वैज्ञानिक म्हणून सर्वश्रुत आहेत.

### (ई) प्राच्य विद्या संशोधन व लेखन

भारतात या भूमीचा वारसा सांगणारा अभ्यास, प्राच्य संस्कृतीकडे वळणारा अभ्यास, प्राच्य विद्या या नावाने ओळखला जातो. येथे चीन, आग्नेय आशिया, जपान, इत्यादी पौर्वात्य देशांकडे न वळता आपण भारताकडे केंद्रित होणार आहोत. भारताच्या प्राचीन इतिहासाचा व संस्कृतीचा अभ्यास व संशोधन म्हणजे प्राच्य विद्या संशोधन होय. विशाल व व्यापक संस्कृती आणि इतिहासाला ऐतिहासिक अभ्यासाच्या दृष्टीने, शास्त्रीय दृष्टी ठेवून आपण अभ्यासले नाही. ब्रिटिश काळात या अभ्यासाला चालना मिळाली. त्यानंतर भारतीय अभ्यासक याकडे वळले. ब्रिटिश काळात पुरावानिष्ठ लेखन सुरू झाले. पुरावे गोळा होऊ लागले. वेद, उपनिषद, प्राचीन वाङ्मय, शिलालेख, नाणी, ताम्रपट, इत्यादी साधने उजेडात आली. चार्ल्स् विल्फिन्सन या इंग्रज विद्वानाने संस्कृत शिकून भगवतगीतेचा अनुवाद (१७८५) इंग्रजीत केला. कलकत्त्याचे न्यायाधीश विलियम जोन्सने कालिदासाचे 'शाकुंतल' भाषांतरित केले. भारतीय श्रेष्ठ संस्कृतीच्या अभ्यासाचे आकर्षण जन्मले. या कार्यात श्लेगेल बंधू (जर्मनी), चेझी, बाम (फ्रेंच), कोल ब्रुक, रॉय, मॅक्समूलर, डेव्हीस यांनी वाटा उचलला. या कार्याची प्रेरणा घेऊन तरुण भारतीय अभ्यासक व संशोधक इकडे वळले.

हिंदुस्थानची समाजसंस्था, लोकजीवन, इतिहास, भूतकालीन सांस्कृतिक व वैचारिक आंदोलने, इत्यादी उद्देशाने कलकत्ता येथे 'रॉयल एशियाटिक सोसायटी' (१७८४) ची स्थापना झाली. मुंबई येथे १८०४ मध्ये 'बॉम्बे लिटररी सोसायटी' सुरू झाली. प्राच्य विद्या संशोधनाला देशात व युरोपात गती लाभली. स्वतंत्रपणे हा अभ्यास सुरू झाला. संस्कृत व बौद्ध वाङ्मय उजेडात आले. भारतीय विद्वान म्हणून पहिला मान बाळकृष्ण जांभेकरांचा आहे. त्यांनी शिलालेख अभ्यासले. रॉयल एशियाटिक सोसायटीच्या नियतकालिकात ते छापले गेले. गावोगावी पायपीट करून आणि शोधून शिलालेख, ताम्रपट, हस्तलिखिते गोळा करणारे भाऊ दाजी लाड हे होते. संग्रह करणे, नकला करणे, विवेचक लेख लिहिणे सुरू झाले. या आरंभिक लेखनाविषयी डॉ. भांडारकर म्हणतात. 'त्यांच्या लेखांचा आधार घेतल्यावाचून प्राच्य विद्या संशोधकाला पुढे पाऊलच टाकता येणार नाही'.

होमर कृत इलियड अभ्यासून न्या. तेलंग यांनी रामायणाचे भाषांतर केले, ते गाजले. ख्रिश्चनांनी भगवत गीता ख्रिस्तोतर कालीन ठरविलेले मत त्यांनी सप्रमाण खोडून काढले. रामायण, महाभारताची खरी ओळख होऊन त्याबद्दल आकर्षण निर्माण झाले. प्रभावी ग्रंथ म्हणून म. गो. कुंटे यांचा 'हिंदुस्थानातील

आर्य संस्कृतीतील स्थित्यंतरे' याचा उल्लेखता येईल. यानंतर वेद वाङ्मयावर लेखन झाले. ऋग्वेद व अथर्व वेदांची भाषांतरे डॉ. काथवटे, शं. पा. पंडित, राजारामशास्त्री भागवतांनी केले.

टिळकांनी 'ओरायन', 'द. आर्क्टिक होम ऑफ दि वेदाज्' हे ग्रंथ लिहिले. भारतीयांचा न्यूनगंड कमी झाला. 'उत्तर ध्रुव सदृश्य भूमी ही आर्यांची मूळ भूमी होय' हा त्यांचा सिद्धांत स्वतंत्र विचाराचा होय. त्यांनी ऋग्वेदाचा काळ इ.स.पूर्व ४५०० ठरवला. 'गीता रहस्य' हा टिळकांचा ग्रंथ नैतिक ज्ञान विवेचक, पाश्चात्त्य-पौर्वात्य साहित्यात अद्भुत ठरलेला ग्रंथ होय. विचारमंथन सुरू होऊन महाराष्ट्रात आत्मविश्वास व क्षमतेवर विश्वास जागा झाला.

या परंपरेत एक महत्त्वाचे नाव येते ते डॉ. रा. गो. भांडारकर यांचे. त्यांनी 'इंडियन अँटिक्वरी' या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या नियतकालिकात संशोधनपूर्ण लेखन केले. त्यांचे 'अर्ली हिस्ट्री ऑफ डेक्कन', 'शैव व वैष्णव पंथ' प्रभावी ग्रंथ होत. विल्सनचे 'फायलालॉजिकल लेक्चर्स' (व्याख्यानमाला) भारतीय स्तरावर भाषाशास्त्र अभ्यासासाठी पायाभूत ठरले. त्यांच्या कार्य प्रेरणेतून १९१७ मध्ये प्रा. रा. द. रानडे, डॉ. गुणे, डॉ. बेलवलकर, डॉ. रा. ना. दांडेकरांनी 'भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंदिर' ४० वर्षे चालविले. 'ॲनल्स' हे मासिक काढले. १२५ ग्रंथ प्रसिद्ध केले. डॉ. वेलणकरांना महाभारतावरील कार्यामुळे कीर्ती लाभली.

वेद, उपनिषदे, धर्मशास्त्रे यांविषयी या काळात लेखन व संशोधन गतीमान राहिले. महाराष्ट्रीयन अभ्यासकांनी भारतीय संस्कृतीचे मूलगामी संशोधन करून विविध पैलू, पं. श्री. दा. सातवळेकरांचे चार वेदांवरील स्वस्त व दर्जेदार ग्रंथ माध्यमातून समोर आले. डॉ. श्री. व्यं. केतकरांचे ज्ञान कोश, तयार झाले. श्री. सोनटक्के, श्री. काशीकरांनी वैदिक संशोधनामार्फत ऋग्वेदाची संशोधित आवृत्ती छापली. तसेच सिद्धेश्वर चित्राव शास्त्रींनीही ऋग्वेद भाषांतरासह आवृत्ती काढली. वैदिक देवतांचे अभिनव दर्शन हा रा. ना. दांडेकरांचा ग्रंथ तसेच दैवतेतिहास शास्त्र, मानववंशशास्त्र, मानवेतिहास व भाषाशास्त्रावर लेखन झाले.

उपनिषदांविषयी प्रा. रा. दा. रानडेंचा 'कन्स्ट्रक्टिव्ह सर्वे ऑफ दि उपनिषदाज' आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रींचा संपादनाने 'उपनिषदकांड' असे ग्रंथ तयार झाले. त्यांनीच 'वैदिक संस्कृतीचा विकास' आचार्य लिमयेंनी '१८ मुख्य उपनिषदे', बौद्ध व जैन ग्रंथांआधारे वेदवेदांगातील शब्द व वाक्य यांची खंडसूची तयार झाली. पूर्वमीमासा दर्शनावर केवलानंद सरस्वतींनी 'मीमांसाकोश' चे पाच खंड तयार केले. पातंजल योग अभ्यास, कैवल्यधाम आश्रम व 'योगमीमांसा' त्रैमासिक चालू झाले. कुलगुरू चि. वि. वैद्यांनी 'महाभारत उपसंहार', 'दि रिडल ऑफ दि रामायण', डॉ. अ. द. पुसाळकर, डॉ. अळतेकर, मो. स. घुर्वे यांनी लेखन केले.

भारतीय धर्म व साहित्याचा वेध घेऊन 'धर्मशास्त्रांचा इतिहास' महामहोपाध्याय काणेंनी लिहिला. तो पाच खंडांचा एकमेव शास्त्रीय दृष्टीने सप्रमाण लिहिलेला हिंदू धर्म व संस्कृतीचा वारसा म्हणून जगभर ओळखला जाऊ लागला.

डॉ. पा. कृ. गोडे हे प्राच्य विद्यामंदिर क्युरेटर होते. त्यांनी पाश्चात्त्य मासिकांतून ४५० लेख छापले. डॉ. मिराशींनी 'सातवहन शक क्षत्रपांचा इतिहास व कोरीव लेख', 'वाकाटकांचा इतिहास', 'कलचूरी घराणे', इत्यादी संशोधनपूर्ण ग्रंथ लिहिले. संशोधन मुक्तावलीचे आठ खंड प्रसिद्ध केले. कालिदास, भवभूतीबद्दल संशोधनपूर्ण लेखन केले. या काळात संस्कृत सोबत प्राकृत लेखनही झाले. ह. रा. वेलणकर, डॉ. पां. रा. गुणे, डॉ. प. ल. वैद्य, प्रा. म. अ. घाटगे, डॉ. आ. वे. उपाध्ये, स. आ. जोगळेकर, इत्यादींनी लेखन केले. डॉ. घाटगेंनी 'इंट्रोडक्शन टू अर्धमागधी', जोगळेकरांनी 'गाथा सप्तशती' (प्रस्तावना टीकासह) प्रसिद्ध केली. पुष्पदंताचे 'महापुराण' या ग्रंथाची आवृत्ती व डॉ. वैद्य यांनी 'वररूची', हेमाद्री व त्रिविक्रम ची प्राकृत व्याकरण संशोधित स्वरूपात सर्वांसमोर आणली.

या काळात बौद्ध धर्म तसेच समाजशास्त्राविषयी लेखन झाले. भगवान बुद्ध, समाधी मार्ग, बुद्धाचा संघ परिचय, हिंदी संस्कृती व अहिंसा हे ग्रंथ धर्मानंद कोसांबीनी लिहिले. 'विसुद्धिवग्गा' ह्या ग्रंथाचा इंग्रजी अनुवाद, डॉ. प. ल. वैद्य यांचे बौद्ध संस्कृत ग्रंथमालेत दिव्या वदान, ललित विस्तार, अवदान शतक, इत्यादी ग्रंथांचे प्रकाशन झाले. डॉ. आंबेडकरांनी 'Who Were The Shudras?', 'दि अनटचेबल्स' हे दोन ग्रंथ लिहिले. बौद्ध साहित्य अभ्यासून यावर लेखन केले. डॉ. इरावती कर्वेंनी 'युगान्त', 'हिंदू किनशीप', 'हिंदू सोसायटी अँण्ड इंटरप्रिटेशन', 'महाराष्ट्र अँण्ड पिपल', 'मराठी संस्कृती', इत्यादी ग्रंथ लिहिले.

## *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - १*

**पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगून कंसात (X) किंवा (✓) अशी खूण करा.**

(०१) प्राचीन काळापासून महाराष्ट्राला संपन्न व भक्कम सांस्कृतिक परंपरा लाभली आहे. ( )

(०२) संस्कृतीच्या आंतरिक रूपामुळे विशिष्ट संस्कार मानवी मनावर व आत्म्यावर होतात. ( )

(०३) संस्कृतीचे बाह्य स्वरूप भौतिक व दर्शनी स्वरूपाचे नसते. ( )

(०४) सांस्कृतिक आविष्कारात भाषा, वाङ्मय, ललित कला, साहित्य आदी क्षेत्रांतील प्रगतीचा विचार करण्यात येतो. ( )

(०५) मुंबई प्रांताचा पहिला गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन याने शिक्षण प्रसार, भाषांतर, स्वतंत्र साहित्य निर्मिती यास मोठे प्रोत्साहन दिले. ( )

(०६) ख्रिश्चन मिशनऱ्यांनी धर्मप्रसाराबरोबर ज्ञान प्रसाराचे कार्य केले नाही. ( )

(०७) ब्रिटिश सत्ता स्थापन झाल्यावर पाश्चात्त्य शिक्षण व संशोधनाची भारतीयांना ओळख झाली. (  )

(०८) भारतीय धर्म साहित्याचा वेध घेणारा 'धर्मशास्त्राचा इतिहास' हा ग्रंथ महामहोपाध्याय काणे यांनी लिहिला. (  )

(०९) लोकमान्य टिळकांनी 'गीता रहस्य' हा ग्रंथ लिहिला. (  )

(१०) भारतीय विद्वान म्हणून पहिला मान बाळकृष्ण जांभेकरांना मिळाला. (  )

## ४.२.२ इतिहास पुरातत्त्व

पुरातत्त्व क्षेत्रात महाराष्ट्राला भक्कम वारसा लाभला आहे. अनेक ठिकाणी पुरातत्त्वीय महत्त्व ओळखून शोध घेण्यात आला, उत्खनने झाली. काही स्थळांवर प्रागैतिहासिक पुरावे, हत्यारे मिळाली. डेक्कन कॉलेजचे (पुणे) या संदर्भात उल्लेखनीय कार्य आहे. डॉ. ह. धि. सांकलिया, डॉ. एस. बी. देव यांनी प्रारंभिक प्रयत्न केले. डॉ. एम. जी. दीक्षित यांनीही वाटा उचलला. पैठण, तेर, कोल्हापूर (ब्रह्मगिरी) प्रकाशे, बहाळ, नेवासा, नाशिक, पौनी, पवनार, कौंडिण्यपूर, रामटेक, इत्यादी ठिकाणी आजवर झालेल्या उत्खननातून बरीच अज्ञात माहिती उजेडात आली. सातवाहन व त्यापानंतरच्या काळाचा प्राचीन अज्ञात वारसा उपलब्ध झाला आहे. या कार्यात अलीकडच्या पिढीतील डॉ. ढवळीकर, डॉ. बा. आं. गुप्ते, डॉ. पथी, डॉ. मोरवंचीकर, डॉ. कावाडकर, इत्यादींचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. या कामात मराठवाडा इतिहास व संस्कृती विभाग, नागपूर विद्यापीठ, पुरातत्त्व खाते औरंगाबाद, इत्यादींचा वाटा मोठा आहे. पुरातत्त्वीय पुराव्यांतून मौर्योत्तर, सातवाहन व सातवाहनोत्तर स्थळांच्या उत्खननातून भौतिक संस्कृती ज्ञात झाली आहे.

प्राचीन इतिहासावर भारतीय विद्याभवनने 'ए हिस्ट्री ॲण्ड कल्चर ऑफ इंडियन पीपल'चे दहा खंड तयार केले. त्यात डॉ. पुसाळकर, प्रा. आपटे, आल्तेकर यांनी लेखन कले. अल्तेकरांचे ग्रंथ 'स्टेट ॲण्ड गव्हर्नमेंट इन एन्शंट इंडिया', 'एज्युकेशन इन एन्शंट इंडिया', 'पोझिशन ऑफ वुमेन इन हिंदू सिविलायझेशन', 'हिस्ट्री ऑफ व्हिलेज कम्युनिटीज इन वेस्टर्न इंडिया' डांगेचा ग्रंथ 'दि प्रिमिव्हि कम्युनिझम टूस्लेव्हरी', प्रा. डी. डी. कोसांबीचा ग्रंथ 'ॲन इंट्रोडक्शन टू दि स्टडी ऑफ इंडियन हिस्ट्री' उल्लेखनीय होत.

इतिहास ग्रंथलेखनाला काळ, स्थळ व कार्यकारण संबंध जोडून लिहिण्याची परंपरा ग्रँट डफच्या ''मराठ्यांचा इतिहास'' ग्रंथापासून सुरू झाली. यानंतर महाराष्ट्रात साधार लेखन झाले. महाराष्ट्र धर्म प्रस्थापना हे मराठी सत्तेच्या प्रस्थापनेमागील उद्दिष्ट होते. विष्णुशास्त्रींनीही इतिहास प्रेम वाढविले. त्यांनी साने, मोडक व शालीग्राम यांच्या सहकार्याने 'काव्येतिहास संग्रह' मासिक सुरू करून त्यातून जुनी काव्ये, बखरी प्रसिद्ध केल्या. खरे शास्त्रींनी पटवर्धन दप्तर शोधून १३ खंड तयार केले. राजवाडेंनी घरोघर पायी हिंडून हजारो कागदपत्रे गोळा केली आणि मोठ्या बखरींपेक्षा एक लहानसे कागदपत्र अधिक विश्वासार्ह असते असे ठासून सांगितले. त्यांनी इतिहास साधनांचे २२ खंड लिहिले. राजवाडे, खरे शास्त्रींनी खंडांतून दर्जेदार, विवेचक व मार्गदर्शक प्रस्तावना लिहिल्या. खरे शास्त्रींनी न. चि. केळकरांच्या 'इंग्रज आणि मराठे' ग्रंथाला दिलेली प्रस्तावना खूप गाजली. असे साधन वजा लेखन वाढले. उदाहरणार्थ, पेशवे दप्तर (दोन भाग), होळकरी पत्रव्यवहार, मराठे शाहीतील पत्रे, भारतवर्ष, मराठी दफ्तर रूमाल (तीन), ग्वाल्हेरचा पत्रव्यवहार, इत्यादींसाठी भागवत, काळे, पारसनीस यांनी कष्ट घेतले. इंग्रजी, डच, पोर्तुगीज, फ्रेंच, फारसी साधने गोळा होऊन अभ्यासली गेली. त्या आधारे पुरावानिष्ठ लेखन झाले. बखरी, करीने, कैफियती, आज्ञापत्रे, गोळा झाली. या. मा. काळे यांनी 'वऱ्हाडचा इतिहास', 'नागपूर प्रांताचा इतिहास' हे ग्रंथ लिहिले. दत्तोपंत आपटे, कुलकर्णी, या. मा. काळे, शेजवलकर, सरदेसाई, इत्यादींनी साधने गोळा केली. इतिहास व संशोधनविषयक लेखन केले. ग्रंथ तयार झाले. ऐतिहासिक पत्रे, यादी, इत्यादी पूना रेसिडेन्सी रेकॉर्डस (काळे या.मा. व इतर संपादक) नागपूर अफेअर्स सारखे (संपादक शेजवलकर) साधन ग्रंथ तयार झाले. द. वा. पोतदारांनी इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्ड कमिशनचे १९४८ मध्ये अध्यक्षस्थान भूषविले. अनेक संशोधनपर लेख लिहिले. वा. सी. बेंद्रे यांनी साधन चिकित्सा, छत्रपती संभाजी, मालोजी राजे, शहाजी महाराज, छत्रपती शिवाजी महाराज हे चरित्र ग्रंथ लिहिले. महाराष्ट्राच्या इतिहासावर तीन खंड लिहिले. ग.ह. खरेंनी २००० पोथ्या, ५०० नाणी, १८० चित्रे, ३० ताम्रपट आणि इतर २०० ऐतिहासिक वस्तू गोळा केल्या. ३६० लेख लिहिले. मूर्तिविज्ञान, महाराष्ट्रातील चार दैवते, संशोधकाचा मित्र हे ग्रंथ लिहिले.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२*

**पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगून कंसात (X) किंवा (✓) अशी खूण करा.**

(१) ऐतिहासिक पुराव्यांवरून आपल्याला प्राचीन काळातील हत्यारे, जीवनशैली यांविषयीची माहिती मिळते. (  )

(२) इतिहास लेखनाला काल, स्थल व कार्यकारण संबंध जोडून लिहिण्याची परंपरा ग्रँट डफ याच्या 'मराठ्यांचा इतिहास' या ग्रंथापासून झाली. (  )

(३) महाराष्ट्र धर्म प्रस्थापना हे मराठी सत्तेच्या प्रस्थापनेमागील मुख्य उद्दिष्ट होते. (  )

(४) ऐतिहासिक माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीने पुरातत्त्वीय पुराव्यांचा फारसा उपयोग होत नाही. (  )

(५) राजवाडे यांनी घरोघर जाऊन ऐतिहासिक पुरावादर्शक कागदपत्रे गोळा केली. (  )

(६) बखरीपेक्षा एखादा पत्रव्यवहार, लहान कागदपत्र अधिक

विश्वासार्ह असेल असे इतिहासकार राजवाडे मानत. ( )

## ४.२.३ मराठी साहित्य संशोधन

इतिहास पुरातत्त्व याप्रमाणेच मराठी भाषेतील लेखन व संशोधन प्रभावी झाले. ल. रा. पांगारकर यांनी ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर यांचे चरित्र व वाङ्मय संशोधन केले. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास लिहिला. शं. श्री. देव यांनी 'समर्थ वाग्देवता मंदिर' स्थापन केले. समर्थ वाङ्मय संशोधन केले. य. खु. देशपांडे व डॉ. वि. भि. कोलते महानुभावी साहित्य संशोधन व लेखनात अग्रगण्य होते. वि. ल. भावेंनी महानुभावी गुप्त लिपींचा उलगडा केला. दुर्मीळ हस्तलिखिते गोळा केली. महंतांकडील दुर्मीळ कागदपत्रे उजेडात आली. य. खु. देशपांडे यांनी स्वित्सर्लंडमध्ये जाऊन प्राच्य विद्या परिषदेत लेख वाचला (१९८८). सेतू माधवराव पगडी यांनी 'इतिहासाचा मागोवा', 'हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम, 'शिवचरित्र', इत्यादी ग्रंथ लिहिले. 'काव्येतिहास संग्रह' हे मासिक का. ना. साने यांनी चालविले. त्यांनी शिवकालीन व पेशवेकालीन बखरी, चरित्रे यांचे प्रथम मराठीत संपादन केले व छापले. त्यांनी 'ऐतिहासिक पत्रे' आदी ग्रंथांचे संपादन केले. तात्यासाहेब केळकर यांनी 'मराठे व इंग्रज' ग्रंथ लिहिला. 'मराठेशाहीचे शतसांवत्सरिक श्राद्ध' हा ग्रंथही त्यांनी लिहिला. द. बा. पारसनीस, डॉ. पु. ग. जोशी, चांदोरकर, पांडोबा पटवर्धन, इत्यादींनी संशोधन कार्य केले. प्रो. ओतूरकर यांचे इतिहासावरील लेखन प्रेरणादायी व दिशासूचक ठरले. द. वि. आपटे यांचे लेख 'द. वि. आपटे लेख संग्रह' या ग्रंथात उपलब्ध आहेत. त्यांनी 'चित्रमय जगत्' चे संपादन केले होते. तसेच 'शिवचरित्र प्रदीप', 'पत्रे', 'मराठी इतिहासाची साधने' यांसारखे ग्रंथ लिहून पुढील इतिहास संशोधक व लेखकांना दिशा दाखविली. समाजशास्त्रीय संशोधनपूर्ण लेखन व सामाजिक इतिहास म्हणून इंग्रज अधिकाऱ्यांचा 'कास्टस ॲण्ड ट्राइब्ज' तसेच विविध नगरे, गावे घेऊन ग्रंथ लिहिले. अत्रेंचा 'गावगाडा' चाफेकर ना. गो. चा 'आमचं गाव'. डॉ. धुर्ये यांचे समाजशास्त्रीय प्रश्नावरील ग्रंथलेखन महत्त्वाचे ग्रंथ होत. महाराष्ट्रीय शब्द कोश, मराठी विश्वकोश, संस्कृती कोश, समाजशास्त्रीय कोश, शास्त्रज्ञ कोश व महाराष्ट्र सारस्वत, मराठवाडा सारस्वत (भाग १) सारखे ग्रंथ मराठीचे उत्तम संदर्भ ग्रंथ होत.

### (अ) ललित साहित्य

साहित्यासाठी 'ललित साहित्य' हा पर्यायी शब्द वापरला जातो. तसेच 'वाङ्मय', 'ललित वाङ्मये', 'वैचारिक साहित्य' 'शास्त्रीय साहित्य', 'व्यवहारोपयोगी साहित्य' हे मराठीत पर्यायी शब्द वापरले जातात. संस्कृतमध्ये 'काव्य' शब्द येतो.

#### (१) काव्य

मराठी काव्य दोन प्रकारचे आहे. एक जुने काव्य व दुसरे नवे काव्य. काव्य म्हणजे कविता. जुनी कविता कुसुमाग्रजांपर्यंत तर नवी म्हणजेच कुसुमाग्रजांपासून मानता येईल. जुन्या कवितेची उदाहरणे म्हणजे भा. रा. पाळंदेंची 'रत्नमाला', गोडबोले लिखित कविता म्हणजे 'सीता विवाह', 'नामार्थ दीपिका', पांडुरंगशास्त्री पारखींची 'षडऋतुवर्णने', 'बोधामृत', कीर्तीकरांची 'भक्तसुधा', शि. रा. निजसुरे, राजा माधवराव, कृष्णशास्त्री चिपळूणकर, पेठकर, लोंढे, इत्यादींचे काव्य यात येते. मात्र यात सौंदर्यशून्यता, बोजडपणा, भावहीनता, उत्कटतेची कमतरता, सृष्टीवर्णनाची जिवंतता नसणे हे दोष दिसतात. कीर्तीकरांनी इंग्रजीच्या काही ग्रंथांची रूपांतरे केली.

नव कविता अभ्यासताना केशवसुतांचे नाव अग्रणी ठरते. ते अर्वाचीन 'कवि कुलगुरू' व 'तुतारी मंडळाचे' उद्गाते होत. त्यांनी लेखनात जुनी पठडी वापरली पण पाश्चात्त्य प्रभावही घेतला. 'व्यक्तिवाद' हे नवयुग लक्षण त्यांच्या आत्मविष्कारात दिसते. त्यांची कविता 'तुतारी' 'स्फुर्ती', 'गोफण', इत्यादी जग उलथून टाकणारी भाषा बोलते. दाही दिशा गुंजायमान करणारी तुतारी असते. ते म्हणतात -

*''एक तुतारी द्या मज आणून*
*फूंकिन ती मी स्वप्राणाने*
*भेदून टाकीन सगळी गगने''*

'ग्रुपुर्झा', 'सतारीचे बोल', 'म्हातारी', 'वातचक्रे', इत्यादी काव्यग्रंथातून त्यांनी क्रांतीची हाक दिली आहे. त्यांची प्रेरणा घेऊन रेव्हरड टिळक, रेंदाळकर, गोविंदाग्रज, भा. रा. तांबे, बालकवी, दत्त कवि गोविंद, सावरकर हे सर्व लिहू लागले. रेव्ह. टिळकांनी 'वनवासी फूल', 'सुशीला', 'बापाचे अश्रू', 'माझी भार्या' ही दीर्घ काव्ये लिहिली. काही भावगीते रचली. कवी विनायक राष्ट्रीय वृत्तीचे कवी होत. त्यांची कविता 'पन्ना', 'दुर्गावती', 'संयोगिता', 'वीरमती', इत्यादी उल्लेखनीय आहेत. काही उत्कृष्ट भावगीतेही त्यांनी रचली. 'तुतारी मंडळात गोविंदाग्रज व गडकरींचा समावेश आहे. ते बरेच वेगळेपण ठेवून लिहितात. बालकवी तर निसर्ग कवी होत. 'संध्या तारके', संध्या रजनी', 'निर्झर', 'फुलराणी' या काव्यातून त्यांचे निसर्गप्रेम दिसते. रूढविरोध, गूढ गुंजन, विचारप्रधानता, इत्यादी बाबी इतर काव्यांतून व्यक्त होतात.

'मरणात खरोखर जग जगते', 'घट भरे प्रवाही' व इतर काव्ये भा. रा. तांब्यांची आठवण करून देतात.

स्फूर्ती व ओजस्वपूर्ण काव्यांसाठी सावरकर प्रसिद्ध आहेत. 'स्वतंत्रते भगवती', 'सागरास', 'माझे मृत्युपत्र', 'मी घेतलेले व्रत', हे 'आम्ही अधतेने' या कवितांवरून भव्य-दिव्य-राष्ट्रप्रेमाने भारवलेले ओतप्रोत काव्याचे कवी सावरकर अवतरतात. केशवसुत संप्रदाय १९२० पर्यंत प्रभावी राहिला. सावरकर मित्रमंडळाचे एक कवी गोविंद 'रणाविण स्वातंत्र्य कोणा मिळाले' असे लिहून स्वातंत्र्य प्रेम जागे करतात.

रविकिरण मंडळात तसा सात कवींचा अंतर्भाव आहे,

पण त्यातील माधव ज्यूलियन, यशवंत व गिरीश हे तीन महत्त्वाचे होत. त्यांनी केशवसुतांचे वळण वेगळीकडे नेले. पहिले कवी प्रेम, निसर्ग, जानपद, विडंबन, गूढगुंजन, फारसी प्रभावाकडे वळतात. गज़ल, रबाया लिहितात. 'तुटलेले दुवे', 'स्वप्नरंजन', 'मधु लहरी', इत्यादींचे स्फुटलेखन करतात.

यशवंत हे राष्ट्रीय विचारांचे कवी. भावविश्वाचे कवी. संशोधन, भावमंथन, यशोगंध, यशोनिधी ही स्फुट गीते तर जानपदी, शिशु ही निसर्गगीते लिहिली. कवी गिरीशांची 'कांचनगंगा', 'मानससेघ' ही स्फुट व 'अंबराई', 'कला', 'अभागी कमळ' ही दीर्घ काव्ये लिहिली.

१९३५ पासून मराठीत समाजाभिमुख काव्यरचना दिसते. क्रांती, स्वातंत्र्य, धनिकांचा जुलूम, दलितांची दुर्दशा यांकडे काव्याचे वळण झाले. कुसुमाग्रज, कवि अनिल, कांत, बापट, पु. शि. रेगे या धाटणीचे कवी होत. 'गर्जा जय जयकार क्रांतीचा' ही कविता मानवतावादी कुसुमाग्रजांना राष्ट्रीय पातळीवर नेते. 'हिमलाट', 'बळी', 'लिलाव', इत्यादी काव्यांतून ते समाजाभिमुख होतात. कवी अनिल 'फुलवान', 'निर्वासित चिनी मुलास', 'पेरते व्हा', इत्यादी काव्यांतून व्यक्तिगत प्रेम व वेगळे विचार मांडताना दिसतात, 'भग्नमूर्ती' हे त्यांचे राष्ट्रीय वृत्तीने रचलेले खंडकाव्य होय. वा. रा. कांत, कुसमाग्रजांप्रमाणे क्रांतीचे अग्रदूत ठरतात. विं. दा. करंदीकरांची 'खेदगंगा', केशवसुतांची तुतारी आठवून देते. काव्याचे भव्यदिव्यचे आकर्षण कमी झाले. बा. भ. बोरकर तसेच सौंदर्यवादी कवी पण संत वाङ्मय, लोकगीत, संस्कार, गेयता, अध्यात्माचे वळण ठेवून कोमलता, माधुर्य या गुणांना काव्यातून व्यक्त करतात. ग. दि. माडगूळकर इतर काव्यांपेक्षा 'गीत रामायण'मुळे सर्वश्रुत झाले.

कवयित्रींचा विचार केला तर लक्ष्मीबाई टिळक, संजीवनी मराठे, बहिणाबाई चौधरी, इंदिरा संत, शांता शेळके, पद्मा गोळे ही नावे आठवतात. स्त्री-जीवनाकडे लेखनाचा ओढा वाढला.

## (२) कादंबरी

बाबा पद्मजी (ख्रिश्चन) यांची 'यमुना पर्यटन' ही कादंबरी स्त्रीचे विधवा जीवन मांडणारी होती. हरिभाऊ आपटेंचे युग आले व कादंबरी लेखनाला गती आली. त्या अगोदर मुक्तामाला, मंजुघोषा, मित्रचंद्र, विश्वासराव या परंपरावादीच; पण 'आजकालच्या गोष्टी' म्हणजे हरिभाऊंच्या दहा कादंबऱ्या. त्यातून मानवी जीवन, स्वभाव वर्णन, चटकदार संवाद, वेधक कथन, घरगुती भाषा यामुळे हरिभाऊंचे लेखन वेगळ्या वळणाचे वाटते. 'गणपतराव', 'मी', 'मायेचा बाजार', 'लक्षात कोण घेते', इत्यादींमधून हे गुण आढळतात. वामन मल्हार जोशींनी 'रागिणी', 'नलिनी', 'इंदू काळे', 'सुशीलेचा देव' यांमधून गंभीर विषय मांडले. लालित्याकडे लक्ष कमी दिले. ना. सी. फडकेंनी 'जादुगार', 'दौलत', 'उद्धार', अटकेपारसारख्या साठ-सत्तर कादंबऱ्या लिहून कथानके, रचना, स्वभाववर्णन, प्रसंगनिर्मिती, भाषा सौष्ठव, चित्त वेधकता हे गुण वाढवले. १९३० पासून खांडेकरांची लेखणी बहरली. 'हृदयाची हाक', 'कांचन मृग' चे लेखन उत्तम आहे. माडखोलकर यांनी 'मुक्तात्मा', 'भंगलेली देवळे', 'कांता', इत्यादींतून स्त्री-जीवनाचे प्रश्न उभे केले व क्रांतिकारक चितारले. श्री. व्यं. केतकर यांनी 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' लिहिला. 'गारंबीचा बापू' लिहिणारे श्री. ना. पेंडसे, 'श्यामची आई' लिहिणारे साने गुरुजी यांची नावे उल्लेखनीय होत. वि. वि. बोकील, ना. वि. कुळकर्णी, ह. ना. आपटे, पु. भा. भावेंची नावेही महत्त्वाची ठरतात. स्त्री कादंबरीकार म्हणून गीता साने, विभावरी शिरूरकर, मालतीबाई दांडेकर, शांताबाई नाशिककर, कुमुदिनी प्रभावळकर यांनी लेखन केले. विभावरी शिरूरकर यांच्या 'हिंदोळ्यावर', 'कळ्यांचे निश्वास', 'बळी', 'शबरी' या कादंबऱ्यांतून प्रामुख्याने स्त्रिया व पददलित वर्गाच्या व्यथांचे प्रभावी चित्रण आढळते.

### *ऐतिहासिक कादंबरी*

ऐतिहासिक कादंबरी लेखनात 'मोचनगड' ही गुंजकरांची १८७१ ची कादंबरी, हरिभाऊ आपटे 'उषःकाल' कादंबरीद्वारे क्रांतीकडे नेतात. 'गड आला पण सिंह गेला', 'सूर्योदय', 'सूर्यास्त' ही प्रभावी ऐतिहासिक कादंबरी होय . नाथ माधव यांच्या शिवशाहीवरील 'स्वराज्याचा श्रीगणेशा', 'स्वराज्यावरील संकट', इत्यादी कादंबऱ्या, ना. ह. आपटेंची 'अजिंक्य तारा', हडपांच्या पेशवाई, आंग्लाईवरील कादंबऱ्या, परांजपे, चि. वि. वैद्य, रणजीत देसाई, इनामदार, इत्यादींचे लेखन महत्त्वाचे आहे. अलीकडील काळात छावा, स्वामी, मृत्युंजय, इत्यादी गाजलेल्या कादंबऱ्या असून या ऐतिहासिक कादंबऱ्या आहेत.

## (३) लघुकथा

लघुकथा या प्रांतात स. का. छत्रेंच्या बालमित्रमधील बोधकथा व इतरांच्या 'बकासुराची बखर', 'नलराजाची बखर', इत्यादी पौराणिक व सामाजिक चित्रण करणाऱ्या लघुकथा आहेत. उपदेशपर लेखन होत होते. १९२६ ते १९४५ फडके, खांडेकर युग राहिले. वि. सी. गुर्जरांचे वेगळे लेखन व अनुवाद परंपरा आली. गोखले, जोशी, कानिटकर, काशीबाई, गिरिजाबाई केळकर, दिवाकर कृष्ण यांनी स्वभावप्रधान लेखन केले. ना. सी. फडकेंच्या लघुकथा तंत्रशुद्ध, रेखीव व आकर्षक आहेत. दांडेकरांच्या लेखनात विविधता, जिव्हाळा व समृद्धता आहे. जिवंत अनुभूती देणारे 'उपेक्षितांचे अंतरंग' श्री. म. माटे यांनी लिहिले. महादेवशास्त्री जोशी, कुमठेकर, शांताबाई नाशिककर, ग. ल. ठोकळ, द. बा. दिघे, मुक्ताबाई दीक्षित, अनंत काणेकरांचे लेखन दर्जेदार आहे. स्त्री-जीवनाचे प्रश्न लघुकथांमधून हाताळले गेले. १९४५ नंतर अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, शांता शेळके, द. मा. मिरासदार, शंकर पाटील, सरोजिनी बाबर, मोकाशी, अग्निहोत्री, जयवंत दळवी, वि. शं. पारगावकर, शंकरराव खरातांच्या कथा त्यातील मनोविश्लेषणासाठी गाजल्या. मनोरंजन, किलोस्कर, रत्नाकर, इत्यादी मासिकांनी त्यांचे प्रकाशन केले.

### (४) विनोदी वाङ्मय

विनोदी वाङ्मय ही एक महत्त्वाची मराठी साहित्यविधा होय. श्री. कृ. कोल्हटकरांनीही विनोदी वाङ्मयाचा प्रारंभ मराठीत केला. त्यांच्या लेखनाचे त्रिविध हेतू दिसतात. ते म्हणजे लोकभ्रमनिरास, धर्मभोळेपणाचे उच्चाटन व रूढींचे विघटन. मनोरंजन व हास्य हा विनोदाचा स्थायी भावच असतो. मी, (सुदामा), 'बंडू नाना' व 'पांडू तात्या' हे तीन त्यांचे मानसपुत्र होत. ते सामाजिक व्यंग्यांवर प्रहार करतात. 'शिमगा', 'गणेश चतुर्थी', 'श्रावणी', 'निर्जळी एकादशी', हे त्यांचे दर्जेदार लेखन होय. गडकरी-बालकराम त्यांचे शिष्य. चि. वि. जोशींचे स्थान सर्वश्रेष्ठ ठरते. त्यांचे विनोद प्रासंगिक, सात्त्विक, स्वभावानुकूल आहेत. 'स्टेट गेस्ट', 'लग्नसराई', 'वर संशोधन', 'गुंड्याभाऊंचे दुखणे' इत्यादी त्यांचे लेखन उत्तम ठरले. डॉ. वर्टी, गो. ल. आपटेंचे लेखनही विनोदी आहे. आचार्य अत्रे तर विनोद सम्राट होते. नवयुग साप्ताहिक व मराठाचे त्यांचे लेखन रसरसलेले असायचे. विडंबन, अतिशयोक्ती, स्वभावनिष्ठता, प्रसंगानुकूलता व शब्दाशब्दांतून विनोद हे त्यांचे विशेष. वि. आ. बुवा, रमेश मंत्री, बाळ गाडगीळ, सामंत यांचे लेखन तसेच अधिक लोकप्रिय ठरले ते पु. ल. देशपांडे यांचे लेखन. दर्जेदार शाब्दिक कोट्या व विनोदाबरोबरच अंतर्मुख करणारी वैचारिकता या लेखनात प्रकर्षाने आढळते.

### (५) लघुनिबंध

कमी शब्दांत व पानांत अधिक सांगताना तात्त्विक चर्चा, शास्त्रीय सिद्धांत, गंभीर विचार, तर्कशुद्ध विवेचन, खंडन, इत्यादींचा विचार करून हितगुजशैलीत लघुनिबंध लेखन हा उत्तम गद्याविष्कार होय. फडकेंच्या 'गुजगोष्टी', 'धुम्रवलये', खांडेकरांचे 'वायुलहरी', 'सायंकाळ', 'मझधार' याची उत्तम उदाहरणे होत. खेळकर विचारशैलीत *अनंत काणेकर* म्हणतात- वि. पा. दांडेकर, ना. मा. संत, कुसुमावती देशपांडे, म. ना. अवदंत, कवी यशवंत, कुसुमाग्रज, र. गो. सरदेसाई, भागवत, गाडगीळ, करंदीकर, मंगेश पाडगावकर यांनी लघुकथेला रमणीयता व काव्यात्मकता ही देणगी दिली.'

## *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ३*

**पुढील विधानांसाठी दिलेल्या पर्यायांतून योग्य पर्यायाची निवड करा.**

(१) पुढीलपैकी कोणी ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर यांचे चरित्र वाङ्मय संशोधन केले?
(अ) ल. रा. पांगारकर (आ) पु. ल. देशपांडे (इ) रा. श्री. देव (ई) डॉ. वि. भि. कोलते

(२) आपल्या काव्यरचना व ग्रंथ यांतून क्रांतीचा ध्वनी पुढीलपैकी कोणी उमटवला?
(अ) ल. रा. पांगारकर (आ) केशवसुत (इ) भा. रा. पाळंदे (ई) रेव्हरंड टिळक

(३) निसर्गकवी म्हणून पुढीलपैकी कोणास मानण्यात येते ?
(अ) गोविंदाग्रज (आ) भा. रा. तांबे (इ) बालकवी (ई) रेव्हरंड टिळक

(४) 'गर्जा जय जय कार क्रांतीचा' ही कविता कोणी लिहिली?
(अ) कुसुमाग्रज (आ) बालकवी (इ) प्र. के. अत्रे (ई) रेव्हरंड टिळक

(५) कादंबरी लेखनाला कोणाच्या लेखनापासून गती आली?
(अ) मित्रचंद्र (आ) हरिभाऊ आपटे (इ) बा. भ. बोरकर (ई) लक्ष्मीबाई टिळक

(६) मराठी साहित्यात विनोदी वाङ्मयाचा प्रारंभ कोणाच्या लेखनापासून झाला?
(अ) श्री. कृ. कोल्हटकर (आ) बा. सी. मर्ढेकर (इ) बा. भ. बोरकर (ई) रेव्हरंड टिळक.

## (आ) विचारप्रधान साहित्य

या साहित्याअंतर्गत निबंधग्रंथ, वृत्तपत्रे, नियतकालिके, समीक्षा, आत्मचरित्रे व चरित्रे यांचा विचार येतो. तो येथे संक्षेप स्वरूपात केला आहे.

### निबंध

मराठीत १८३० नंतर निबंध हा प्रकार रूढ झाला. बाळशास्त्री, लोकहितवादी, भाऊ महाजन, विष्णुशास्त्री, टिळक, राजवाडे, आगरकर, न. चि. केळकर, सावरकर, माटे, द. के. केळकर, महर्षी शिंदे यांचे निबंधग्रंथ प्रसिद्ध आहेत. ते 'दर्पण', 'दिग्दर्शन', 'प्रभाकर', इत्यादी नियतकालिकांतून प्रकाशित होत. लोकहितवादींची 'शतपत्रे' अशीच निबंध स्वरूपात आहेत. 'निबंधसंग्रह' या ग्रंथाचे ११०० पृष्ठांत लेखन झाले आहे. दादोबा पांडुरंग, म. फुले, रामकृष्ण विश्वनाथ, आगरकर, टिळक यांचे लेखन दर्जेदार होते. सामाजिक सुधारणा, ज्ञानोपासना, कायदा, धर्म, वेद, उपनिषदे, महाकाव्ये, राजकारण, राष्ट्रीय शिक्षण, इत्यादी संदर्भ त्यात आले आहेत. तात्यासाहेब केळकरांचे शेकडो निबंध असून त्याचे १० खंड बनले आहेत. वि. वा. राजवाडे, चि. वि. वैद्य, महामहोपाध्याय वा. वि. मिराशी, पंडित सातवळेकर, डॉ. केतकर, द. वा. पोतदार, साने गुरुजींचे निबंध चांगले ठरले. तिसऱ्या पिढीत श्री. म. माटे अस्पृश्य-दलितांवर लिहू लागले. त्यांनी बुद्धिनिष्ठ व वैचारिकही लिहिले. द. के. केळकर, आचार्य जावडेकर, लक्ष्मणशास्त्री जोशी, दुर्गाबाई भागवत, इरावती कर्वे, वि. स. वाळिंबे, गं. बा. सरदार, बाळशास्त्री हरदास, नरहर कुरुंदकर, शिवाजीराव भोसले, डॉ. प्र. न. जोशी हे सर्वश्रेष्ठ निबंधकार होत. या सर्वांनी अनेकांविध विषयावर व्यासंगपूर्ण लेखन करून मराठीचा वैचारिक वारसा अधिक समृद्ध केला.

### (इ) वृत्तपत्रे

जांभेकरांच्या 'दर्पण'ने ही परंपरा मराठीत रूजवली. त्यानंतर त्यांचे 'दिग्दर्शन' आणि भाऊ महाजनांचे 'प्रभाकर' सुरू

झाले. लोकहितवादींच्या शतपत्रांतून, निबंधांतून प्रथम इंग्रजांवर टीका झाली. १८४२ मध्ये खिस्ती 'ज्ञानोदय' मधून धर्मप्रसार सुरू झाला. कृ. मा. रानडेंचे 'ज्ञानप्रकाश' (१८४९), चिपळूणकर, छत्रे, रानडे, इत्यादींचे लेख प्रसिद्ध होऊ लागले. 'इंदुप्रकाश' (विष्णुशास्त्रींचे), 'नेटिव्ह ओपिनियन' (मंडलिकांचे) यातून सुधारणा, स्त्रीविषयी अन्यायी प्रथांचा विरोध, कर, उद्योग, इत्यादींवर लेख छापले गेले. ठाण्याहून का. धो. फडकेंचे 'अरुणोदय' (विनोदी हिंदू पत्र) राजकीय लेखन देऊन सरकारी क्रोधाला बळी पडले. आगरकर-टिळकांचे 'केसरी' महत्त्वाचे ठरले. शि. म. परांजपेंचा 'काळ', भोपटकर बंधुंचा 'भाला', 'वऱ्हाडातील महाराष्ट्र', 'संदेश', टिळकांचा 'मराठा' तसेच 'वैनतेय', आंबेडकरांचे 'मूकनायक', इत्यादींतून समाईक विषयांवर लेखन झाले. जागृती कार्याला हातभार लागला, संघटन होण्यास मदत झाली.

## (ई) नियतकालिके

१८६१ मध्ये गुंजीकरांनी 'विविध ज्ञानविस्तार' मासिक सुरू केले, कीर्ती मिळवली. हरिभाऊ आपटेंचे 'करमणूक' (१८९०) साप्ताहिक, दर्जेदार कादंबऱ्या, उद्‌बोधक चरित्रे, टीका लेख, बोधकथा, स्फुट गोष्टी छापू लागले. १८९१-१९०० दरम्यान 'कोकिळ', 'दीनमित्र', 'मराठी शाळा पत्रक', 'केरळ कोकिळ', 'रत्नाकर', 'स्त्री', किर्लोस्कर', 'मनोहर', 'मनोरंजन', 'मौज', 'चित्रा', 'सत्यकथा', 'सह्यादी', 'धनुर्धर', 'मराठा वैभव', 'हंस', 'सह्याद्री', 'समाजस्वास्थ्य' यातून जीवनाच्या विविध पैलूंवर दर्जेदार लेखन होत राहिले.

## (उ) समीक्षा

या वाङ्‌मय प्रकाराअंतर्गत प्रथम विष्णुशास्त्री चिपळूणकरांचा मान आहे. त्यांनी मराठीला पाश्चात्त्य समीक्षा पद्धती दिली. 'संस्कृत कविता ग्रंथ' लिहून नव्या पद्धतीने समीक्षण सादर केले. वास्तवता, निसर्ग-स्वभाव वर्णने, कल्पनारम्यता, आत्माविष्कार व जीवनदर्शन प्रगटले. यापूर्वी ते दिले जात नव्हते यावर त्यांनी टीकात्मक लिहिले. शेक्सपिअरची नाटके, मोरोपंतांची कविता यावरही लिहिले. नंतर कोल्हटकर, श्री. कृ.चे लेखसंग्रह, वा. मा. जोशींचे मोजके टीकात्मक लेख मार्मिक व रसग्रहण दृष्ट्या महत्त्वाचे आहेत. तात्यासाहेब केळकरांचा ग्रंथ 'हास्यविनोद मीमांसा' अतिशय चांगला आहे. इतर परीक्षणेही उत्तम आहेत. रा. श्री. जोग, श्री. के. क्षीरसागर, द. के. केळकर, वि. ल. भावे, डॉ. अ. ना. देशपांडे, प्रा. रा. शं. वाळिंबे, बा. सी. मर्ढेकर, प्रभाकर पाध्ये, कुसुमावती देशपांडे, पु. शि. रेगे, दि. के. बेडेकर, शरच्चंद्र, मुक्तिबोध, द. ग. गोडसे, गंगाधर गाडगीळ, डॉ. वा. ल. कुळकर्णी, डॉ. यू. म. पठाण, इत्यादींनी मराठी समीक्षेचा विविध अंगानी दर्जेदार विस्तार केला. नवीन व आधुनिक प्रवाह परिचित करून दिले.

## (ऊ) चरित्र-आत्मचरित्र

व्यक्तीचे जीवन, तत्कालीन परिस्थिती व त्यांच्या अनुभवांना या वाङ्‌मय प्रकारातून चितारले जाते. इतिहासाएवढे महत्त्व या लेखन प्रकाराला आहे. कारण त्यातून लेखकांच्या काळाचे सांगोपांग दर्शन घडते. मराठीचे पहिले चरित्र लेखक विष्णुशास्त्री ज्यांनी आधुनिक पद्धतीचे 'जान्सनचे चरित्र' लिहिले. शास्त्रींचे चरित्र त्यांच्या बंधुंनी लिहून गुणदोषांवर प्रकाश टाकला. खाजगी पत्रव्यवहार वापरून, काशीबाई कानिटकरांनी डॉ. आनंदीबाईंचे चरित्र लिहिले. ल. रा. पांगारकरांनी अनेक चरित्रे (ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, तुकाराम, इत्यादी.) लिहिली. न. चि. केळकरांनी टिळकांचे त्रिखंडात्मक चरित्र लिहिले. गं. दे. खानोलकरांनी चार खंडांतून साहित्यिकांची चरित्रे लिहिली. नौरोजी, तेलंग, आगरकर, मॅझिनी, लेनिन, नेपोलियनची चरित्रे लिहिण्यात आली.

दादोबा पांडुरंगांनी आत्मचरित्र लिहिले. १८८४ मध्ये बा. वा. पदमर्जीनी आत्मचरित्र लिहिले. वा. ब. फडके, महर्षी कर्वे, वि. रा. शिंदे, माधवराव बागल, धर्मानंद कोसांबींची आत्मचरित्रे प्रसिद्ध आहेत. या वाचनीय आत्मचरित्रांतून समाजसुधारणेचा इतिहास डोळ्यासमोर तरळतो. सावरकर, केळकर, काकासाहेब गाडगीळ, ना. ग. गोरेंची आत्मचरित्रे प्रेरणादायी आहेत. श्री. कृ. कोल्हटकर, वि. र. घाटे, गोविंदराव टेंबे, चिंतामणराव कोल्हटकर, ग. दि. माडगूळकर, लक्ष्मीबाई टिळक, रमाबाई रानडे, पार्वतीबाई आठवले यांचीही आत्मचरित्रे आहेत. लक्ष्मीबाई टिळक यांची 'स्मृतिचित्रे' जागतिक दर्जावरही श्रेष्ठ ठरली आहेत.

## (ऐ) दलित साहित्य

अस्पृश्य गणलेल्या जाती यांनी लिहिलेले साहित्य दलित साहित्य होय असे डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे मानतात. (ग्रंथ - महाराष्ट्र संस्कृती) प्रा. गंगाधर पानतावणेंनी 'अमृत' मध्ये १९७५-७६ मध्ये १०-१२ लेख लिहून या संदर्भात वेगळी भूमिका मांडली. किसन भागू बनसोड, अण्णाभाऊ साठे, बंधू माधव, केसुबुवा गायकवाड यांचे लेखन व कार्य उल्लेखनीय होय. १९५६ नंतर डॉ. आंबेडकरांनी धर्मांतर केले त्यामुळे अनेकांना प्रेरणा मिळाली. 'दलित साहित्य वेदना व विद्रोह' हा ग्रंथ या साहित्य लेखनाची भूमिका व स्थिती मांडतो. या दलित साहित्याअंतर्गत काव्य, कथा, कादंबरी, नाटक, इत्यादींचे सतत लेखन होत आहे. 'हा हिंद देश माझा' कवितेत बनसोड यांनी माणसाला पशूपेक्षाही हीन दर्जाने वागवले जाते याचा उपहास केला आहे. वर्णव्यवस्था, विषमता, प्रथा, रूढी, हिंदू धर्म व समाज, अस्पृश्यता पाळणे यांवर प्रहार केले. दलितांचे संघटन, संघर्ष व प्रबोधन व्हावे यासाठी या साहित्यातून आक्रोश ऐकू येतो.

साहित्याच्या निर्मितीतून, वाचनातून होणारे संस्कार, मानवाला आंतरबाह्य प्रभावित करतात. यात परिवर्तनाची प्रचंड

सहावे स्वरश्री रामकृष्णबुवा वझे होत. ते ग्वाल्हेर घराण्याचे होते. नेपाळमध्ये काही दिवस दरबारी गायक म्हणून राहिले. त्यांनी अनेक स्वतंत्र चीजा व राग घेऊन स्वतंत्र पद्धती निर्माण केली. मास्टर दीनानाथ, केशवराव भोसले, चाफेकर, कागलबुवा, इत्यादी त्यांचे शिष्य. 'संगीत कला प्रकाश' हा त्यांचा प्रसिद्ध ग्रंथ होय. 'ललित कला दर्शन' व 'बळवंत संगीत मंडळी' च्या नाटकांना त्यांनी संगीत दिग्दर्शन केले.

सातवे स्वरश्री अल्लादिया खाँ हे होत. त्यांनी जयपूर घराणे चालवले. संपूर्ण भारतात त्यांनीच महाराष्ट्राला या क्षेत्रात अग्रस्थान मिळवून दिले. 'संगीत सूर्य', 'संगीत भगीरथ' व बॅरिस्टर जयकरांच्या शब्दात 'कलेतील गौरीशंकर' अशा गौरवाची पात्रता त्यांना लाभली होती. त्यांनी अनेक राग महाराष्ट्रात आणले.

विष्णुशास्त्री पलुस्करांचे शिष्य प्रा. बी. आर. देवधर होत. इंडियन स्कूल ऑफ म्युझिक ही त्यांची संस्था. कुमारगंधर्व तेथे शिकले. या प्रांतातील विद्वानांनी इतर प्रांतातील विद्वानापेक्षा अधिक ग्रंथ (संगीतावर) लिहिले.

## (ए) गायिका

बावलीबाई पालकर, अंजलीबाई मालपेकर, केसरबाई केरकर, मोगुबाई कुर्डीकर, हिराबाई बडोदेकर, माणिक वर्मा इत्यादींची नावे भारतभर प्रसिद्ध आहेत. बडोदेकर बाईंनी १९४७ च्या स्वातंत्र्य प्राप्ती वेळचे वंदे मातरम रेडिओवरून गायले होते. गाणाऱ्या स्त्रियांना जी सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झाली त्याचे मूळ हिराबाई आहेत. गायन क्षेत्रात सध्या लता मंगेशकर, आशा भोसले, अनुराधा पौडवाल यांच्या गायनाचा दर्जा श्रेष्ठ आहे. लता मंगेशकर तर यांत सर्वांत श्रेष्ठ ठरतात. त्यांची ३०,००० गाणी ध्वनिमुद्रित झाली तर २,००० पेक्षा जास्त चित्रपटांना पार्श्वसंगीत दिले आहे. त्या लोकप्रिय पार्श्वगायिका म्हणून जगाला ज्ञात आहेत. लता दीदी 'गानकोकिळा' असून अंतरराष्ट्रीय कीर्ती प्राप्त आहेत. तसेच त्यांच्या गळ्यातील गंधार ही खरोखरीच अलौकिक ईश्वरी देणगी होय.

## (ऐ) कीर्तन

नारदमुनींपासून कीर्तन परंपरेचा आरंभ मानतात. पुराण सांगणारे नारद आद्य प्रवर्तक होय. संत मंडळींपैकी नामदेवांचे नाव कीर्तनासाठी घेतले जाते. समर्थ रामदासांच्या मते 'संगीत, नृत्य, तानमान' कीर्तनाचे आवश्यक अंग हे मत सर्वश्रुत आहे. कीर्तनाचे भजन कीर्तन आणि कथा कीर्तन हे दोन प्रकार आहेत. शास्त्रशुद्ध अभ्यास करून कीर्तन करावे असा विचार अलीकडे विकसित झाला आहे. असे शास्त्रीय ज्ञान घेऊन देवजी बुवा गोगटे, चिलुबुवा फलटणकर, नाना बुवा बडोदेकर, ताहराबादकर, वऱ्हाडकर, सांगलीकर, नाशिककर, राम जोशी, इत्यादींची नावे उल्लेखनीय होत. अखिल भारतीय कीर्तन संमेलन व उत्तम प्रशिक्षणाने आज कीर्तन परंपरेला नवे रूप येत आहे.

## (ओ) लोकसंगीत

बरीच कौटुंबिक गीते, बालगीते, स्त्री गीते, सण-समारंभाची गीते, इत्यादी प्रचलित आहेत. त्यांना शास्त्रीय दर्जा नसला तरी लोकअभिरूची वाढविणारी म्हणून परंपरागत रूपात गायले जाते. तसेच अनेक प्रकारे लोकसंगीत व लोककला सादर होतात.

**लोकसंगीत (लोककला)**

वासुदेव गोंधळी बहुरूपी भुत्या चित्रकथी पांगुळ

वाघ्या-मुरळी भराडी पोतराज जोगती जागरण ताकिते

(जोगती - जोगतिणी, जागरण - लातुर जिल्हा, ललिते - नगर जिल्हा येथील बोहाडा, दशावतारी)

महाराष्ट्रात वरील विविध प्रकारांतून लोकसंगीताचा वापर लोककला सादर करण्यासाठी होतो. परंपरागत लोकसंगीताची साधने त्यात वापरतात.

याव्यतिरिक्त नाट्य संगीत, सीने संगीतही विकसित झाले आहे. वाद्य संगीताअंतर्गत सनई, सतार, सारंगी, पेटीवादन, व्हायोलीन, तबला, पखवाज वादन, इत्यादींचा उल्लेख क्रमप्राप्त ठरतो. संगीत वाद्यांचा हा गट मूळ संगीताला आधारभूत असतो. साथ देऊन संगीतात आकर्षण व प्राण ओतला जातो. सिनेमा मुळे मराठी रंगभूमी (नाट्यसृष्टी) मागे पडली. सिनेसंगीतात अलीकडे पाश्चात्य प्रभावाची गीते, गायन व साधने यांचाही वापर होत आहे.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ५*

**पुढील विधानांत गाळलेल्या जागी योग्य शब्द भरा.**

(१) कला ही देखील एक क्रीडा आहे असे ------- म्हणतो.

(२) अभिनय (माध्यम), नट व संहिता (साधने) म्हणून ------- कलेसाठी उपयोगी असतात.

(३) शिल्पकला, चित्रकला, संगीत, नृत्य, साहित्य ------- होय.

(४) संगीताचे कंठ संगीत आणि ------- संगीत हे दोन मूळ प्रकार आहेत.

(५) ------- या 'गान कोकिळा' असून त्यांना आंतरराष्ट्रीय कीर्ती लाभली आहे.

(६) भजन कीर्तन व ------- कीर्तन हे कीर्तनाचे दोन प्रकार आहेत.

(७) जागरण, गोंधळ ह्या लोककला असून त्यांचे संगीत ------- म्हणविते.

## (औ) नाट्यकला

नाट्यकला महाराष्ट्रातील एक लोकप्रिय कला आहे.

अर्वाचीन काळात म्हणजे १८८० मध्ये अण्णासाहेब किर्लोस्करांनी 'संगीत शाकुंतल' हे नाटक लिहून नाट्य रंगभूमीची सुरुवात केली. ते आधुनिक रंगभूमीचे जनक होत. 'सौभद्र', 'रामराज्यवियोग' लिहिले. शेवटचे नाटक अपूर्ण लिहून झाले. देवलांनी 'बिक्रमोर्वशीय', 'मृच्छकटिक'ची भाषांतरे केली. त्यांना 'शारदा' नाटकाने कीर्ती मिळाली. कोल्हटकर युग १८९६ पासून सुरू झाले. 'वीरतनय', 'मूकनायक', 'गुप्तमंजूषा', 'प्रेमशोधन', इत्यादी नाटके त्यांनी लिहिली. कल्पनारम्यता व वास्तवापासून दूर नेणारीही नाटके त्यांनी लिहिली. कल्पनारम्यता व वास्तवापासून दूर नेणारी ही नाटके १८९६-१९१० काळात किर्लोस्कर मंडळींनी सर्वांपर्यंत नेली. पुढचे युग आले ते विनोदी नाटकांचे; ज्यात कृत्रिमता हा मुख्य आधार आहे. कोल्हटकरांप्रमाणे त्याच वेळी खाडिलकरांचे 'सवाई माधवरावाचा मृत्यू', 'कांचनगडची मोहना', 'भाऊबंदकी', 'कीचक वध' (कर्झनशाही विरोधी) नाटके त्यांनी लिहिली. प्रा. फडकेंच्या मते 'कीचक वध' ने त्यांना जागतिक कीर्ती लाभली इतके ते दर्जेदार होते. त्यांची संगीत नाटके बालगंधर्वांनी करून त्यांना कीर्ती मिळवून दिली.

गडकरींचे गुरू कोल्हटकर. गडकरींनी त्यांचे अनुकरण केले. तसेच बरेच वेगळे लेखन केले. वास्तवतेवर आधारित 'एकच प्याला' व 'पुण्य प्रभाव', विधवा विवाहावर 'प्रेम संन्यास' ही नाटके महत्त्वाची होत. गडकरी कारुण्य व हास्यामुळे मराठी लोकांच्या स्मृतीत राहतील. वरेरकर यांनी 'कुंजविहारी', 'हाच मुलाचा बाप', 'सन्याश्याचा संसार', इत्यादी नाटके लिहिली.

'साष्टांग नमस्कार' लिहून मराठी रंगभूमी पालटणारे आचार्य प्र. के. अत्रे (१९३० नंतर) यांचे युग सुरू झाले. 'लग्नाची बेडी', 'भ्रमाचा भोपळा', 'वंदे मातरम' सारखी नाटके लिहून त्यांनी मराठी रंगभूमीला सावरले. सामाजिक समस्या हाताळताना विनोद हा स्थायी भाव त्यांच्या नाटकात आढळून येतो. मोतीराम गजानन रांगणेकरांनीही मराठी रंगभूमीला सावरले. 'कुलवधू' खूप गाजले होते. 'आशीर्वाद', 'नंदनवन', 'माझे घर', 'वहिनी' ही दर्जेदार नाटके होत. माधव नारायण जोशींनी 'प्रो. शहाणे', 'वऱ्हाडचा पाटील', 'गिरणीवाला' सारखी नाटके लिहिली. 'स्थानिक स्वराज्य' हे चांगले नाटक होय. त्यांनी सामाजिक दोष मांडले.

### (अं) गद्य रंगभूमी

संगीत नाटकात साखळी तुटते. प्रसंगांचा वेग संपतो, अभिनयाची हानी होते. गद्य नाटकात हे दोष नसतात. म्हणून गद्य रंगभूमीने जास्त यश मिळविले. १८८० मध्ये शंकरराव पाटकर व देवल यांनी 'आर्योद्धारक नाट्य संस्था' स्थापन केली. त्यानंतर 'शाहू नगरवासी' ही गद्य नाटक मंडळी बनली. तिने 'हॅम्लेट', 'मानाजीराव', 'झुंझारराव', 'त्राटिका' ही शेक्सपियरची अनुवादित नाटके रंगभूमीवर आणली. 'तुकाराम', 'नामदेव', 'राणा भीमदेव' ही क्रमश: संत चरित्रावरील व वीररसयुक्त नाटके रंगभूमीवर आली. बाळाभाऊ जोग अद्‌भुत नट, गणपतरावां-एवढे ते यशस्वी झाले. दोघांनी तीस वर्षे यशस्वी वाटचाल केली.

दुसरी नाटक मंडळी १९०४ मध्ये 'महाराष्ट्र नाटक मंडळी' या नावाने स्थापन झाली. 'कीचक वध', 'भाऊबंदकी', 'हॅम्लेट', इत्यादी खाडिलकरांची नाटके या संस्थेने करून कीर्ती मिळवली. कारखानीस, टिपणीस बंधू, त्र्यंबकराव प्रधान, गणपतराव भागवत गणपतराव जोशी या नटांचा या यशात खरा वाटा होता. यानंतरच्या नाटकातही यश मिळवले. केशवराव दाते हे उल्लेखनीय व लोकोत्तर अभिनयाचे नट होते.

ऐतिहासिक नाटकांची परंपरा 'थोरले माधवराव पेशवे' या कीर्तने लिखित नाटकाने झाली. वासुदेव शास्त्री खरे ('शिवसंभव', 'गुणोत्कर्ष', 'तारामंडल'), खाडिलकर ('सवाई माधवराव पेशवे' व 'भाऊबंदकी'), औंदकर (बेबंदशाही), गडकरी (राजअभ्यास), केळकर ('अमात्य माधव', 'चंद्रगुप्त तोतयाचे बंड', इत्यादी.), सावरकर ('सन्यस्त खड्‌गे, उत्तरक्रिया) या लेखकांची नाटके दर्जेदार व लोकप्रिय ठरली. पण करमणूक हाच हेतू नाटकांनी जोपासला. यानंतर हा हेतू व्यापक झाला. शतसांवत्सरिक नाट्यकला महोत्सवानंतर, वसंत कानेटकर, पु. ल. देशपांडे, बाळ कोल्हटकर, विजय तेंडुलकर, इत्यादींची नाटके प्रभावोत्पादक ठरली. सुहासिनी मुळगावकर व पु. ल. देशपांडेंचे एकपात्री प्रयोग प्रभावी ठरले. मुंबई मराठी साहित्य संघ व प्रोग्रेसिव्ह ड्रामेटिक असोसिएशनने भरपूर महत्त्वाचे काम केले. 'प्रेमा तुझा रंग कसा?', 'रायगडाला जेव्हा जाग येते', 'गारबीचा बापू', 'शांतता, कोर्ट चालू आहे' चे प्रयोग प्रभावोत्पादक ठरले.

### (अ:) चित्रपट

चित्रपट क्षेत्रात दादासाहेब फाळके आद्यप्रवर्तक असून त्यांनी पाश्चात्त्य चित्रपटांपासून स्फूर्ती घेतल्याचे दिसते. १९१३ मध्ये 'राजा हरिश्चंद्र' हा पहिला मराठी चित्रपट काढला. पौराणिक चित्रपटाने खूप प्रसिद्धी झाली. 'भस्मासुर मोहिनी', व 'सावित्री' हे दोन चित्रपट त्यांनी काढले. त्यांनी १७ चित्रपट व 'हिंदुस्थान फिल्म कंपनी' सुरू केली. ते चित्रपट निर्माते, रंगभूषाकार, छायाचित्रकार, नैपथ्यकार व तंत्रज्ञ होते तसेच ते भारतीय चित्रपटातील 'युगप्रवर्तक' ही होते.

बाबूराव पेंटर चित्रपटकार होते. त्यांनी 'सैरंध्री' चित्रपट काढला. टिळक त्यासाठी बाबूराव यांना 'सिनेकेसरी' म्हणत. चित्रपट दिग्दर्शन, छायालेखन, नेपथ्य, इत्यादीही त्यांनी सांभाळले. हरिभाऊ आपटेंच्या कादंबरीआधारे 'सिंहगड' हा चित्रपट सुरू केला. १९२४ मध्ये 'प्रभात फिल्म कंपनी' बाबूरावांनी स्थापन केली. 'गोपाळकृष्ण' चित्रपटाने त्यांना प्रसिद्धी लाभली.

### (क) बोलपट

चित्रपट क्षेत्रात बोलपट युग आले. 'अयोध्येचा राजा',

प्रभातचा 'माया मच्छिंद्र' (१९८३), 'धर्मात्मा' (एकनाथांच्या जीवनावर), शांताराम बापूंचा 'अमरज्योती' प्रभातच्या चिरस्मरणीय चित्रपट, 'तुकाराम', 'कुंकू', 'माणूस', 'शेजारी' असे सामाजिक चित्रपट निर्माण झाले. शांताराम बापू, राजा नेने, दामले व फतेलालसारखे दिग्दर्शक, संगीत दिग्दर्शक केशवराव भोळे, कथासंवाद शिवराम वाशीकर, गीतलेखक शांताराम आठवले, मुख्य कलाकार विष्णुपंत पारसनीस यांनी भारतीय व जागतिक कीर्ती मिळवली. 'माझा मुलगा', 'ज्ञानेश्वर' नंतर प्रधान ऐवजी 'राजकमल' कंपनी मुंबईतर्फे 'रामशास्त्री' सरस्वती सिनेटोन कोल्हापूर, हंस चित्र कंपनीचा 'छाया' चित्रपट गाजला. नवयुग, अत्रे पिक्चर्स, अरुण स्टुडिओ अशा अनेक कंपन्या आज आहेत. ऐतिहासिक चरित्रे, समाजसुधारक, इत्यादींवर चित्रपट निघाले. 'श्यामची आई' (साने गुरुजी) या आचार्य अत्रे यांच्या चित्रपटाला राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त झाला. आज या व्यवसायाने दिग्दर्शक, कलावंत, गायक, साथ देणारे व इतर काम करणारे लोक यांना काम दिले आहे.

### (ख) नृत्य

वैदिक काळापासून भारतात व सातवाहन काळापासून महाराष्ट्रात ही परंपरा आहे. प्राचीन नृत्य परंपरेत कथ्थक, मणिपुरी, भरतनाट्यम्, कथकलीपैकी दोन उत्तरेतील व दोन दक्षिणेतील आहेत. त्या १३व्या शतकापासून वेगवेगळ्या आहेत. महाराष्ट्राची स्वतंत्र अशी नृत्य पद्धती नाही. गोमंतक कलांचे माहेरघर आहे म्हणूनच तेथे गायिका, नर्तिका जन्मल्या. ताराबाई कुमठेकर यांचे नाव या क्षेत्रात गाजले. जनाबाई साखळकर, चंद्रकलाबाई, चंपाबाई वाकळीक ही नावे महत्त्वाची आहेत. नर्तक म्हणून धर्माजी जांबवलीकर, राजाराम मांजरेकरांनी कीर्ती मिळवली. सिनेसृष्टीत नाव मिळविले. मुंबईच्या जव्हेरी भगिनी व कनक रेळे मणिपुरी नृत्यात निष्णात आहेत. लच्छू महाराज, सुंदर प्रसाद, गौरीशंकर, बिपिन सिंह, कृष्णन कट्टी, गोविंदराज पिल्ले, इत्यादी नृत्य क्षेत्रातील कलाकारांनी अस्सल भारतीय व शास्त्रीय नृत्ये सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. पार्वतीकुमार, मोहनराव कल्याणपूरकर, दमयंती जोशी, रोहिणी भाटे, सारख्यांचे कार्य उल्लेखनीय होय. रोहिणी भाटेंनी पुणे येथे नृत्य अभिरूची वाढवणारी संस्था स्थापन केली आहे.

### (ग) चित्रकला

महाराष्ट्राची ही अतिशय प्राचीन कला आहे. अजिंठा, पितळखोरा चित्रकलेने संपूर्ण जगाला भुरळ घातली आहे. आधुनिक काळात विकसित मुंबई महानगरीने या कलेला पुनरुज्जीवित केले. जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌ची स्थापना १८५७ मध्ये सर जमशेदजी जी. जी. भाई यांच्या देणगीतून झाली. देशी चित्रकला शिकण्याची परंपरा राहिली नव्हती. पाश्चात्त्य चित्रकलेचा अभ्यास सुरू झाला. जुनी भारतीय कला संपली. तिला जाणणारे रसिकही राहिले नाहीत. इंग्लंडची छाया प्रकाशच्या शैलीत निर्मिती सुरू झाली. हळूहळू कलाकारांची नावे उजेडात येऊ लागली. केरळचे राजा रवि वर्मा महाराष्ट्रात राहिले. देवी, आसरा महाराष्ट्रीय स्त्रीच्या नऊवारी लुगडे व चोळी या पोषाखात चितारून ते लोकप्रिय बनले. म. वि. धुरंदर (१८६७-१९१४) यांनी महाराष्ट्रीय असून आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवली. देशीविदेशी सुवर्ण पदके मिळवली व चित्रकलेत उंची लाभली. या क्षेत्रात आबालाल रहिमान धुरंधर, नी. म. केळकर यांची नावे व कला क्षेत्रातील योगदान उल्लेखनीय होय. व्हॉईसरॉय सुवर्णपदक मिळवणारे नी. म. केळकर होते. 'बॉम्बे आर्ट सोसायटी' व 'आर्ट सोसायटी ऑफ इंडिया' या संस्थांचे ते आजन्म सभासद राहिले. बाबूराव पेंटर एक सिद्धहस्त कलाकार व अष्टपैलू कलावंत होते. मुरलीधर आचरेकरांनी परदेशात चित्र प्रदर्शने भरवली. त्यांनी 'आचरेकर अॅकेडमी ऑफ आर्टस्' संस्था स्थापन केली. ते बॉम्बे आर्ट सोसायटीचे सदस्य व काही काळ आर्ट सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्षही होते. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. ना. श्री. बेंद्रे सुंदर मांडणी व आकर्षक रंगभरणी करणारे श्रेष्ठ कलाकार होते.

मकबुल फिदा हुसेन, पद्मश्री वि. ना. आडारकर, ज. द. गोंधळेकर, के. के. हेब्बार, देऊसकर, प्रो. माधव सातवळेकर, एस. एल. हळदणकर (जलतरंग चित्रकार) त्रिंदादसारखे व दीनानाथ दलाल, सोलेगावकर (भित्ती चित्रकार) मुरली लाहोटी व लहरीवांत शहा जातिवंत कलाकार होत. चित्रकलेच्या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय मान्यता व कीर्ती मिळवून दर्जेदार परंपरा त्यांनी कायम राखली.

### (घ) शिल्पकला

महाराष्ट्राला शिल्पकलेच्या क्षेत्राला प्राचीन काळी खूप कीर्ती लाभली होती. सिद्धहस्त कलाकार शिल्पी होते. आधुनिक काळात पुन्हा एकदा ही कला आपले उच्च स्थान व श्रेष्ठ दर्जा मिळवण्यात अग्रेसर आहे. गणपतराव म्हात्रे, विनायक पांडुरंग करमरकर, र. कृ. फडके, वा. व. तालीम यांनी आज शिल्पकला क्षेत्राला जी देणगी दिली आहे ती त्यांचे नाव अमर करणारी व शिल्पकलेची उंची वाढवणारी आहे.

म्हात्रे यांच्या 'मंदिरपथगामिनी' ची जगातील अनेक जाणकार कलाकारांनी प्रशंसा केली. *रवि वर्मा* म्हणतात, 'इतकी सुंदर कलाकृती यापूर्वी झाली नाही व या पुढेही होईल की नाही याविषयी शंका वाटते'. देश विदेशांतून प्रतिक्रिया आल्या. पुतळ्याप्रमाणे त्यांचे तयार झालेले पुतळेही हुबेहूब व जिवंत वाटतात. करमरकरांनी शिवछत्रपतींचा ब्रांझचा पुतळा घडवला तो पुण्यात आहे. ३०० शिल्पकृती करणारे तालीम आठवणीत राहतील. र. कृ. फडके लंडन, शिकागो, फिलाडेल्फियात प्रदर्शने करून आले होते. पाश्चात्त्य तंत्राचा आधुनिक प्रयोग करून शिल्पकलेला त्यांनी कालसापेक्ष बनवून त्यात प्राण ओतले. शंकु चौधरी, राम किंकर, धनराज भगत, इत्यादींनी नवे प्रयोग करून शिल्पकला जी कालबाह्य झाली होती तिला गतिमान बनवली आहे.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न – ६*

**पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगून कंसात (X) किंवा (✓) अशी खूण करा.**

(१) इ. स. १८८० मध्ये 'संगीत शाकुंतल' मुळे नाट्यरंग भूमीची सुरुवात झाली. ( )

(२) 'एकच प्याला' गडकरी यांनी लिहिले. ( )

(३) 'कीचकवध' नाटक आर्योद्धारक नाटक मंडळींनी ने रंगभूमीवर आणले. ( )

(४) मराठवाडा हे कलेचे माहेरघर होय. ( )

(५) जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌ची स्थापना इ.स. १८५७ मध्ये झाली. ( )

(६) गणपतराव म्होत्र हे श्रेष्ठ दर्जाचे संगीतकार होते. ( )

(७) 'मंदिरपथगामिनी' ही रवि वर्माची उत्कृष्ट कलाकृती होय. ( )

## ४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

**कला** : हृदयातील (अंत:करणातील) विविध भावनांचा आविष्कार करणे म्हणजे कला होय.

**ललित साहित्य** : जे बोलले जाते व लिहिले जाते ती संपूर्ण लिखित निर्मिती साहित्य होय. साहित्याला 'ललित साहित्य' असा पर्यायी शब्द आहे. कविता, कथा, कादंबरी, लेख, इत्यादी अनेक प्रकारच्या ललित माध्यमांतून हे साहित्य आकार घेत असते.

**लोककला** : 'लोक'विषयक कला. लोक परंपरने जिचे स्वरूप निर्मित झाले व जोपासले ती कला. वासुदेव, गोंधळी, जागरण, भृत्या, भराडी, वाघ्या-मुरळी, इत्यादी लोककला आहेत. या कलेचे व्यवहारोपयोगी कला, धर्मनिगडित कला, मनोरंजनात्मक कला प्रकार असून त्यात विविध कला प्रकार येतात.

**लोक संगीत** : लोककलांशी संबंधित विद्या. यात भारतात भारतीय संदर्भातील संशोधन सुरू झाले. हे संशोधन, प्राचीन साहित्य, कला, पुरातत्त्व, इतिहास, संस्कृतीशी संबंधित आहे जे ब्रिटिश काळात सुरू झाले.

**स्वरश्री** : गायनाच्या क्षेत्रातील सात गणमान्य व्यक्ती. यात बाळकृष्ण इचलकरंजीकर, विष्णू दिगंबर पलुस्कर, विष्णु नारायण भातखंडे, भास्कर बुवा, अब्दुल करीम खाँ, रामकृष्ण बुवा वझे व सातवे स्वरश्री अल्लादियाँ खाँ होत.

## ४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न – १*

(०१) (✓), (०२) (✓), (०३) (X), (०४) (✓), (०५) (✓), (०६) (X), (०७) (✓), (०८) (✓), (०९) (✓), (१०) (✓).

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न – २*

(१) (✓), (२) (✓), (३) (✓), (४) (X), (५) (✓), (६) (✓).

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न – ३*

(१) (अ), (२) (आ), (३) (ई), (४) (अ), (५) (आ), (६) (अ).

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न – ४*

(अ) (१) वाग्देवता, (२) स्वित्सर्लंड, (३) केशवसुत, (४) रविकिरण, (५) रामायण.

(आ) (१) (✓), (२) (✓), (४) (✓), (४) (✓), (५) (X), (६) (✓), (७) (✓), (८) (X).

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न – ५*

(१) फ्रॉबेल, (२) नाट्यकला, (३) भक्तिकला, (४) वाद्य, (५) लता मंगेशकर, (६) कथा (७) लोकसंगीत.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न – ६*

(१) (✓), (२) (✓), (३) (X), (४) (X), (५) (✓), (६) (X), (७) (X).

## ४.५ सारांश

प्राचीन काळापासून महाराष्ट्राला संपन्न व भक्कम अशी सांस्कृतिक परंपरा लाभली आहे. मानवी संस्कृतीत आविष्कारांचा अभ्यास महत्त्वाचा असतो. भाषा, वाङ्मय, कला, साहित्य अशा विविध माध्यमांपासून हा आविष्कार व्यक्त होतो. महाराष्ट्रात शेवटच्या बाजीरावांच्या कारकिर्दीत इंग्रजी विद्येचे संस्कार होऊ लागले. माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टनने शिक्षण प्रसार, इंग्रजी पुस्तकांची मराठीत भाषांतरे आदी कार्यांत पुढाकार घेतला, नवीन लेखन, रचना यांस प्रोत्साहन दिले. समाजसुधारक धर्मसुधारक

यांनी 'समाजप्रबोधनाचे कार्य केले. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी धर्मप्रसाराबरोबर विद्याप्रसाराचेही कार्य केले. बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, महात्मा जोतीराव फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. शिक्षणक्षेत्रात मोठे कार्य केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षण प्रसारात भरीव कार्य केले. धर्म, तत्त्वज्ञानाच्या शिक्षणाबरोबरच संशोधनाच्या क्षेत्रातही मोठी प्रगती झाली. नौकानयन, सृष्टी विज्ञान, रसायनशास्त्र, गणित आदी विषयांत निरनिराळ्या तज्ज्ञांनी संशोधन केले. संशोधनात पोषक वातावरण निर्माण केले. भारतातील प्राचीन इतिहास, संस्कृतीचा अभ्यास व संशोधन म्हणजे प्राच्यविद्या संशोधन होय. यासाठी काही संस्थांचीही स्थापना करण्यात आली. जसे कलकत्ता येथील रशिया एशियाटिक सोसायटी, बॉम्बे लिटररी सोसायटी, इत्यादी न्या. तेलंग यांनी रामायणाचे भाषांतर केले. रामायण महाभारताची खरी ओळख होऊन आकर्षण निर्माण झाले. डॉ. रा. गो. भांडारकरांनी संशोधनपूर्ण लेखन केले. भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंदिरात अनेक प्रकारचे संशोधन हाती घेण्यात आले. उपनिषदांविषयी प्रा. रा. दा. रानडे यांनी 'कन्स्ट्रक्टिव्ह सर्वे ऑफ दी उपनिषदाज' हा ग्रंथ लिहिला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रींनी अनेक ग्रंथ संपादित केले.

पुरातत्त्वीय संशोधन हाती घेण्यात झाले. डॉ. द. धि. सांकलिया, एस. बी. देव आदींनी या क्षेत्रात मोठे काम केले. अलीकडच्या काळात डॉ. ढवळीकर डॉ. मोरवंचीकर आदींची नावे या क्षेत्रात घेतली जातात. ग्रँट डफने इतिहास ग्रंथलेखनाला काळ, स्थल व कार्यकारण संबंध जोडून लिहिण्याची परंपरा पाडली.

मराठी भाषेतील लेखन संशोधनही प्रभावी झाले. ल. रा. पांगारकर यांनी चरित्र वाङ्मय लेखन व संशोधन केले. डॉ. वि. मि. कोलते महानुभावी साहित्य संशोधन व लेखनात अग्रभागी होते. सेतू माधवराव पगडींनी 'इतिहासाचा मागोवा' 'हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्राम' आदी ग्रंथ लिहिले.

साहित्यात काव्याचीही प्रगती झाली. पाळंदे यांची 'रत्नमाला' गोडबोले लिखित 'सीताविवाह' प्रसिद्ध आहे. केशवसुत, कुसुमाग्रज, रेव्हरंड टिळक, भा. रा. तांबे आदींनी श्रेष्ठ काव्यरचना केली. कादंबरीच्या क्षेत्रात बाबा पद्मजी यांचे 'यमुना पर्यटन' हरिभाऊ आपटेंचे लेखन प्रसिद्ध पावले. ऐतिहासिक कादंबरीतही हरिभाऊ आपटे, ह. ना. आपटे, रणजित देसाई, इनामदार, आदींचे लेखन गाजले. सामाजिक चित्रण करणाऱ्या लघुकथांचाही विकास झाला. स्त्री-जीवनाचे प्रश्न त्यातून मांडण्यात आले. अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, शांता शेळके हे या क्षेत्रातील ख्यातकीर्द डॉ. वर्टी, गो. ल. आपटे यांनी विनोदी लेखन केले.

कमी शब्दांत अधिक तात्त्विक चिंतन व्यक्त करणारे लघुनिबंधही लिहिण्यात आले. फडकेंच्या 'गुजगोष्टी', खांडेकरांचे वायुलहरी आदी काही या क्षेत्रातील उदाहरणे आहेत. वृत्तपत्रे व नियतकालीकेही प्रसिद्ध झाली. त्यांनी समाजजागृतीस मोठा हातभार लावला. याबरोबरच समीक्षा, चरित्र-आत्मचरित्र, दलित साहित्य निर्माण झाले.

कलेच्या क्षेत्रातही साहित्य, संगीत, नाटक, शिल्पकला, चित्रकला आदी क्षेत्रांत प्रगती झाली. बाळकृष्ण इचलकरंजीकर, पं. विष्णू दिगंबर पलुस्कर आदींनी संगीत क्षेत्रात भरीव कार्य केले. लोकसंगीत, वाद्यसंगीत, आदी क्षेत्रांत प्रगती झाली. नाट्यक्षेत्रात अण्णासाहेब किर्लेस्कारांचे 'संगीत शाकुंतल', देवलांचे 'संगीत शारदा' आदी नाटकांची नावे घेतली जातात. संगीत नाटकांप्रमाणे गद्य रंगभूमीतही मोठी प्रगती झाली. 'कीचकवध', 'भाऊबंदकी' आदी नाटके गाजली. ऐतिहासिक नाटकेही निर्माण झाली. राजसंन्यास, बेबंदशाही ही त्यातील काही उदाहरणे आहेत. नाटकांनी नंतर करमणूक हा हेतू जोपासला. वसंत कानेटकर, पु. ल. देशपांडे, विजय तेंडुलकर आदींची नाटके प्रभावी ठरली.

दादासाहेब फाळके हे चित्रपटांचे आद्य जनक. प्रारंभी राजा हरिश्चंद्र हा पहिला चित्रपट, प्रारंभी मुक चित्रपट होते. बोलपटात अयोध्येचा राजा, माया मच्छिंद्र आदी चित्रपट गाजले.

नृत्य कलेतही कथ्थक, मणिपूरी, भरतनाट्यम् आदी नृत्य प्रकार प्रसिद्ध आहेत. जव्हेरी भगिनी, कनक देवे, लच्छू महाराज आदी काही अधिकारी नावे. अलीकडच्या काळात रोहिणी भाटे, सुचित्रा जोशी यांची नावे या क्षेत्रात प्रसिद्ध आहेत.

चित्रकलेत म. वि. धुरंधरांनी आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवली. जे. जे. स्कूल ऑफ आर्टची स्थापना १८५७ मध्ये सर जेमशेदजी जीजी भाई यांच्या देणगीत झाली. शिल्पकलेत विनायक करमरकर, र. कृ. फडके आदींनी शिल्पकला क्षेत्रात आपल्या कार्याद्वारे मोठी देणगी दिली. म्हात्रे यांची 'मंदिरपथगामिनी' याची जगातील अनेक कलाकारांनी प्रशंसा केली आहे. अलीकडच्या काळात शंकु चौधरी, शाम किंकर आदींनी नवनवीन प्रयोग या क्षेत्रात केले आहेत.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

**पुढील प्रश्नांची १५ ते २० ओळींत उत्तरे लिहा.**

(०१) मराठी काव्याचा विकास विशद करा.

(०२) संगीत क्षेत्रातील महाराष्ट्राची प्रगती स्पष्ट करा.

(०३) चित्रकलेच्या विकासाची माहिती लिहा.

(०४) कादंबरी लेखनातील विविध टप्पे व लेखन यांची प्रगती स्पष्ट करा.

(०५) मराठी नाट्य लेखनाविषयी सविस्तर माहिती लिहा.

(०६) लोकसंगीत क्षेत्रातील प्रगतीचा आढावा घ्या.

(०७) सप्त स्वरश्री कोणते ते स्पष्ट करून त्यांचे कार्य विशद करा.

(०८) शिल्पकला क्षेत्रात झालेल्या प्रगतीचा आढावा घ्या.
(०९) निबंध लेखन या विषयावर एक टीप लिहा.
(१०) कीर्तन व लोकसंगीत या क्षेत्राविषयी माहिती लिहा.

## ४.७ क्षेत्रीय कार्य

(१) तुमच्या परिसरातील एका साहित्यिकाची मुलाखत घेऊन लेखी नोंद करा.

(२) तुम्हांला आवडणाऱ्या कलेविषयी परिसरातील एका उपलब्ध प्रकाराची माहिती मिळवा.

## ४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


(१) शिवाजी सावंत, *मृत्युंजय.*
(२) ल. द. जोशी, *संगीत शास्त्रकार व कलावंतांचा इतिहास.*
(३) र. न. पाटकर, *कलेचा इतिहास : भारतीय व पाश्चात्य.*

# उपलब्ध शिक्षणक्रम
# CURRICULAR OFFERINGS

ज्ञानगंगा घरोघरी

## Yashwantrao Chavan Maharashtra Open University

[Established by the Government of Maharashtra and Recognised by the University Grants Commission]

**Curricular Offerings**

**Research Programmes**

- Ph.D.
  (Subject Communication, Educational Communication, Distance Education, Agricultural Communication, Agricultural Extension & Agricultural Development)
- Ph.D. (Subject-wise)
- M.Phil
  (Subject Communication, Educational Communication & Distance Education)
- M.Phil (Subject-wise)

**Post-graduate Programmes**

- Master of Arts (Subject Communication, Educational Communication, and Distance Education)
- Master of Arts in Sociology (Satellite supported)
- Master of Arts in History (Web-based)
- Master of Commerce (Subject Communication)
- Master of Science (Subject Communication, Agricultural Communication, Agricultural Extension & Agricultural Development)
- Master of Science (Bio-technology)
- Master of Science (Bio-Informatics)
- Master of Science (Genetics)
- Master of Architecture (General)
- Master of Architecture (Construction Management)
- Master of Architecture (Environmental Architecture)
- Master of Business Administration
- M.B.A. in Insurance and Banking
- M.B.A. in Hospitality Management
- M.B.A. in Tourism Management
- Master of Education
- Master of Library & Information Science
- Master in Hotel & Tourism Management
- Master in Food Processing and Preservation

**Post-Graduate Diploma Programmes**

- Gandhian Thoughts' (Residential at Wardha)
- Hospital and Health Care Management

**Degree Programmes**

- Bachelor of Architecture
- Bachelor of Arts
- Bachelor of Arts in Mass Communication & Journalism
- Bachelor of Business Administration
- B.B.A. in Insurance & Banking
- B.B.A. in Tourism Management
- B.B.A. in Hotel & Tourism Management
- Bachelor of Commerce (English Medium)
- Bachelor of Commerce ( Marathi Medium)
- Bachelor of Education
- Bachelor of Food Processing & Preservation
- Bachelor of Hotel Management & Catering Operations
- Bachelor of Hotel and Tourism Management
- Bachelor of Library & Information Science
- Bachelor of Science ( Business Information Systems)
- Bachelor of Science (Bio-technology)
- Bachelor of Science (Bio-Informatics)
- Bachelor of Science (Genetics)
- Bachelor of Science (Optometry)
- Bachelor of Science ( Medical Laboratory Technology)
- Bachelor of Science in Agriculture
- Bachelor of Science in Horticulture
- Bachelor of Technology (Electronics Engineering)
- Bachelor of Technology (Marine Engineering)
- Bachelor of Technology (Mechanical Engineering)

**Diploma Programmes**

- Advance Diploma in Computing
- Diploma in Agri- Business Management
- Diploma in Architectural Assistantship
- Diploma in Automobile Engineering
- Diploma in Automobile Techniques
- Diploma in Beauty Therapy & Cosmetology
- Diploma in Building Engineering
- Diploma in Communication Engineering
- Diploma in Community College
- Diploma in Computer Hardware Maintenance & Network Technologies (Windows 2000 server)
- Diploma in Computer Hardware Maintenance & Network Technologies (Windows 2003)
- Diploma in Computer Hardware Maintenance & Network Technologies (Linux)
- Diploma in Computer Operations
- Diploma in Computer Technology
- Diploma in Computerised Financial Accounting
- Diploma in Computing
- Diploma in Co-operative Management
- Diploma in Co-operative Management (Banking)

## Curricular Offerings

- Diploma in Co-operative Management (Dairy)
- Diploma for Electrician & Domestic Appliances Maintenance
- Diploma in Embedded Systems
- Diploma in Fashion Design
- Diploma in Floriculture & Landscape Gardening
- Diploma in Fruit Production
- Diploma in Game Programming
- Diploma in Gandhian Philosophy
- Diploma in Industrial Electronics
- Diploma in Instrumentation Engineering
- Diploma in Interior Decoration and Design
- Diploma in Journalism & Mass communication
- Diploma in Mechanical Engineering
- Diploma in .Net Programming
- Diploma in Office Computing
- Diploma in Ophthalmic Technical Assistant
- Diploma in Printing Technology and Graphic Arts
- Diploma in Production Engineering
- Diploma in Programming Languages
- Diploma in School Management
- Diploma in Thermal Engineering
- Diploma in Vegetable Production
- Diploma in Yogashikshak

**Certificate Programmes**

- Architectural Draftsmanship
- Arogyamitra
- Automobile Engineering
- Beauty Parlour Management
- Building Web Portals through ASP.NET
- Communication Engineering
- Computer Aided Design (CAD)
- Computer Operations
- Computer Operations for the Blind
- Computer Technology
- Computerised Financial Accounting
- Consumer Protection
- Content cum Methodology in School Subject
- DATA Structures through C
- Desk Top Publishing (DTP)
- Digital Electronics and Microprocessors
- Direct X Game Programming
- Domestic Wireman
- Early Childhood Care and Education (Bal Sevika)
- Electrical Engineering
- Electronics Engineering
- Embedded Systems
- Enterprise Solutions using J2EE
- Fabricator
- Fitter General
- Foundation Course in Japanese Language
- Gardening
- Human Rights
- Industrial Electronics
- Industrial Security Guard
- Instrumentation Engineering
- Interior Design
- Information Technology
- Information Technology (For School going Children)
- Lathe Operator
- Mason
- Mechanic Four Wheeler
- Mechanic Radio & Tape
- Mechanic TV and VCD
- Mechanic Two Wheeler
- Mobile repairing
- Motor rewinding
- Office Computing
- OOPs and C++
- Patient Assistant
- Personality Development
- Plumber
- Preparatory (English Medium)
- Preparatory (Marathi Medium)
- Production Engineering
- Programming Excellence through C#
- Programming Excellence through VB.NET
- Programming Expertise in C
- Refrigeration and Air Conditioning
- Screen Printing
- Self Help Group Facilitators
- Tailoring
- Thermal Engineering
- Traditional Birth Attendant
- Visual Programming
- WEB Development

**Orientation Programme**

- Human Rights
- MPSC - UPSC (Composite) Competitive Examination Guidance

ISBN 81-8055-087-7 (HIS 310-2)

*First edition developed under DEC development grant*